**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १००१/२००८
अपील क्रमांक १००२/२००८
अपील क्रमांक १००३/२००८
अपील क्रमांक १००४/२००८
अपील क्रमांक १००५/२००८
अपील क्रमांक १००६/२००८
अपील क्रमांक १००७/२००८

१) श्री चंद्रकान्त रामभाऊ चिमोटे,
५२५, गुरुमाऊली, न्यू नंदनवन ले आऊट,
नागपूर-९. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर,
१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॅाट चौक,
उमरेड रोड, नागपूर-०९. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
फॅारेस्ट डिपार्टमेंट एम्लाईज को.ऑप.हाऊसिंग सोसा.लि.,
सेमीनरी हिल्स, काटोल रोड, नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १.७.२००९)

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ४.६.२००८, २५.२.२००८, २५.२.२००८, १५.७.२००८, २५.२.२००८, ५.२.२००८ व ५.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण ७ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी वरील सर्व अपीलांमध्ये अनुक्रमे दिनांक ९.२.२००८, १५.११.२००७, १५.११.२००७, २९.२.२००८, १५.११.२००७, २९.९.२००७ व २१.९.२००७ रोजी सदरचे सहकारी गृह निर्माण संस्थेच्या संदर्भात विविध प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन न देता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी संस्थेस लागू नसल्यामुळे संस्थेस माहिती पुरविणे बंधनकारक नाही. तसेच आपण संस्थेचे सभासद असल्याने संस्थेच्या मान्यताप्राप्त उपविधी प्रमाणे उपविधी क्रमांक १७३ अन्वये आपणास हवी असलेली माहिती संस्थेच्या कार्यालयातून उपविधीच्या तरतुदीप्रमाणे रक्कम जमा करुन

घेता येते. आपण संस्थेचे पदाधिकारी हजर असलेल्या दिवशी संस्थेच्या कार्यालयात येवून व आवश्यक असलेल्या रकमेचा भरणा करुन अशी माहिती प्राप्त करुन घ्यावी. संस्थेच्या दिनांक २७.१.२००८ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत हजर न होता व विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर त्याच वेळी कार्यकारीणी कडून न घेता त्यानंतर माहितीच्या अधिकाराचा सबब दाखवून आपण संस्थेकडून माहिती मागविण्याचा हेतू काय. आपण या संस्थेत सभासद झाल्यापासून आजपर्यंत संस्थेच्या एकाही सर्वसाधारण सभेत हजर झालेले नाही व संस्थेच्या कारभारा विषयी आपले समाधान करुन घेतलेले नाही हे विशेष, असे कळविलेले दिसून येते. व माहितीच्या अधिकाराखाली आपण पत्रव्यवहार करु नये असे त्यांना सुचविले आहे. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २७.३.२००८, १९.१२.२००७, १९.१२.२००७, १५.११.२००७ व ५.५२००८ रोजी एकुण ७ प्रथम अपीले दाखल केलेले दिसून येते. सदरच्या सातही प्रथम अपीलांचा निर्णय हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिलेला असून संस्थेच्या पदाधिका-यांनी निर्णयाच्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरीलप्रमाणे ७ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरचा अधिनियम हा संस्थेस लागू आहे. संस्थेस शासनाकडून भूखंड मिळालेला आहे. व त्यामुळे संस्थेचा हया अधिनियमाच्या सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ठ होतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे संस्थेवर बंधनकारक आहे. व संस्थेने त्याबाबत त्याकरीता जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे सुध्दा आवश्यक आहे. संस्थेचे सचिव यांनी जे पत्र दिलेले आहे ते पत्र आयोगाचे निदर्शनास आणण्यात आले व त्यामध्ये स्पष्टपणे अपीलकर्ता हे संस्थेचे सभासद असल्यामुळे त्यांना उपविधीप्रमाणे माहिती मागता येते व त्याकरीता त्यांनी खर्चाचा भरणा करणे आवश्यक आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी त्यांना अधिकार असतांना कोणत्याही सर्वसाधारण सभेस ते हजर राहीलेले नाही. उलट त्यांनी कोणत्याही शंकाचे समाधान करुन घेतलेले नाही, हे त्या पत्रान्वये निदर्शनास आणलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांना जो वैधानिक अधिकार दिलेला आहे त्या अधिकाराचा वापर केलेला नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अधिनियमाच्या तरतुदी हया सदरच्या संस्थेस लागू होत असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती करीता अर्ज सादर करण्याचा

अधिकार आहे. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या वैधानिक अधिकाराचा वापर केलेला नसल्यामुळे त्यांनी सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे अतिरिक्त खर्चाचा भरणा करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेल्या सर्व माहितीच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी संस्थेचे पदाधिकारी/सचिव यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांनी त्यांच्या सर्व माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीकरीता अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे अतिरिक्त खर्च प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे भरणे आवश्यक राहील. त्याकरीता संस्थेचे पदाधिकारी/सचिव यांनी एकुण पृष्ठ संख्या किती होईल ही माहिती अपीलकर्ता यांना व्यक्तीशः लेखी देण्यात यावी. ती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः लेखी घ्यावी व त्याप्रमाणे एकुण खर्चाचा भरणा करावा व त्यांना संस्थेच्या सचिवांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९/२००९**

**१) श्री एस.एस. रोकडे,**
**१३२, सम्यक नगर, नारी रोड, नागपूर-४४००२६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**नवप्रतिभा हायस्कुल, हातला, ता.काटोल,**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे शिपाई श्री अरुण दहाट यांचेबध्दल ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.८.२००८ रोजी सदरची माहिती माहितीचा अधिकार नियम क्रमांक ८ (त्र) नुसार उपलब्ध करुन देता येणार नाही कारण माहिती कोणत्या कामासाठी मागीतली आहे हे नमुद केले नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना दिनांक २७.११.२०८ रोजी मुख्याध्यापक यांनी पुन्हा स्पष्टीकरण विचारलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ८.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पाचही मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती विलंबाने उपलब्ध झाली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री एस.एस. मुर्ती यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जातील अनुक्रमांक-६, ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन त्यांनी दिलेले नव्हते व त्यामुळे त्यांना त्याबाबत

//२//

माहिती मागण्याबाबत कारण विचारण्यात आले होते. कारण ती त्रयस्थ पक्षाची माहिती होती. त्यानंतर त्रयस्थ पक्षाला विचारणा करण्यात आली व त्यांनी अनुमती दिल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे हेतूतः विलंब झालेला नाही.

यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या विलंबास अपीलकर्ता स्वतः कारणीभूत आहे असे दिसून येते. त्यांनी चुकीचे अ प्रपत्र वापरलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०/२००९**

**१) श्री भाऊराव झिंगुजी गोहत्रे,**
**५९, बंडु सोनी ले आऊट, परसोडी,**
**नागपूर-२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर,**
**ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर,**
**ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांचेकडे कु. वैशाली भाऊराव गोहत्रे यांच्याबध्दल एकुण २२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२०८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १८.३.२००९ रोजी एकुण ४१ पृष्ठांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती अपूर्ण व चुकीची आहे व विलंबाने उपलब्ध करुन

दिलेली आहे. विलंबाच्या करीता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती आस्थापना शाखेकडे असल्यामुळे दिनांक ११.११.२००८ रोजी श्री पडगिलवार, आस्थापना शाखा यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता पत्र दिले होते. परंतु श्री पडगिलवार यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झाला. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यास श्री पडगिलवार, आस्थापना शाखा हे जबाबदार दिसून येतात. जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय्य घेण्याची जी तरतुद आहे व अशा प्रकारे सहाय्य घेतले असल्यास अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे सदरच्या कर्मचा-यास माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यामुळे श्री पडगिलवार यांना माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहील. तसेच अपीलकर्ता यांना कु.वैशाली भाऊराव गोहोत्रे यांच्या दोन वेतन वाढी थांबविण्याकरीता टिपणी/आदेश उपलब्ध असल्यास ते उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच त्यांच्या १५९ दिवसांच्या बिनपगारी रजा केलेल्या आहेत त्याकरीता कारणे दाखवा नोटीस काढली असेल तर त्या नोटीसची प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.१०.२००८ च्या अर्जाप्रमाणे त्यांना कु. वैशाली भाऊराव गोहत्रे यांच्या दोन वेतन वाढी थांबविण्याच्या टिपणीची/आदेशाची प्रत तसेच त्यांच्या १५९ दिवसांच्या बिनपगारी रजा करण्याच्या कारणे दाखवा नोटीसची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे श्री पडगिलवार, आस्थापना शाखा हे जबाबदार दिसून येतात, व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची

कारवाई प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांनी करावी व अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११/२००९**

**१) श्री दत्तात्रय व्यंकटेश क्षिरसागर,**
**सिव्हील लाईन्स, क्वार्टर नं.डी-३५,**
**यमुना निवास, वर्धा ता.जि. वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(महसुल)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा चिटणीस(महसुल शाखा),**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे जानेवारी, १९९२ ते ऑगष्ट, २००८ पावेतो पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात येत असल्याने शासनाच्या विषयांकित स्थायी आदेशाच्या तथा शिस्त वर्तणुक अपील नियमातील कलमामधील तरतूदी जाणून घेणेबाबत. माहिती व्यक्त्ीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.९.२००८ रोजी माहितीच्या अधिकारात नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा अर्जावरुन बोध होत नाही. माहितीबाबत स्पष्ट कळविल्यास पुढील कार्यवाही करता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी माहितीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांना स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १५.१२.२००८ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांना १९९२ पासूनच्या डी.पी.सी.च्या कार्यवृत्ताची विभागीय आयुक्त कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी द्यावी. तसेच उर्वरित माहिती जिल्हाधिकारी वर्धा यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलार्थी यांचा अर्ज जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा, असा निर्णय दिलेला दिसून येतो.

//२//

सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक २०.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या करीता रुपये २०/- शासन कोषागारात भरावे असे आदेश दिलेले दिसून येतात. व दिनांक २५.६.२००९ रोजी आयुक्त नागपूर विभाग कार्यालयास जिल्हाधिकारी वर्धा यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झ ालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना डी.पी.सी. मधील अहवाल प्राप्त करुन दिलेला आहे व त्या अहवालामध्ये सर्व माहिती उपलब्ध आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यात आदेशाची प्रत नाही. त्यामुळे आदेशाची प्रत उपलब्ध असल्यास द्यावी व नसलयास तसे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना डी.पी.सी.मधील अहवालात नमुद केल्याप्रमाणे आदेश पारित असल्यास आदेशाची प्रत किंवा पारित नसल्यास तसे लेखी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२/२००९**
**अपील क्रमांक २३/२००९**

**१) श्री सत्तार खान अब्बास खान,**
**पांडे महाल समोर, भंडारा. ता.जि. भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा यांचेकडे खोटे कागदपत्र देवून मोटार वाहकांचे लायसंस मिळविली याबाबत अमजतखान वाहेद खान यांच्या बध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.११.२००७ रोजी त्रयस्थ पक्षास संधी देण्याकरीता त्यांचा संपूर्ण पत्ता, वाहक परवाना व बॅच क्रमांक देवून ७ दिवसांचे आंत कळवावे जेणेकरुन आपल्या अर्जावर तातडीने निर्णय घेणे शक्य होईल अन्यथा आपला अर्ज निकाली काढण्यात येईल असे अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी पत्ता न कळविल्यामुळे दिनांक २३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.७.२००८ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील विलंबाने सादर केलेले असल्यामुळे व एकुणच मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण विवेचन करुन सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या व्यक्तीची माहिती मागितली ती व्यक्ती त्रयस्थ पक्ष आहे व त्यामुळे त्रयस्थ पक्षाची अनुमती विचारणे आवश्यक असल्यामुळे तशा प्रकारचे पत्र अपीलकर्ता यांना दिले होते. त्यातही अपीलकर्ता यांनी सन २००१ मधील माहिती मागितलेली आहे. परंतु, भंडारा येथील कार्यालय हे सन २००१ मध्येच सुरु झालेले आहे व त्यापुर्वीची माहिती ही गोंदिया कार्यालयामध्ये उपलब्ध असू शकते. त्यातही अमजतखान वाहेद खान यांना वाहन चालकाचा परवाना देण्याबाबतची तपासणी केली असता त्यांचे नांव आढळून येत नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यातही अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील हे मुदती बाहेर दाखल केलेले आहेत व त्या कारणास्तव दोनही अपीले खारीज करण्यायोग्य आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, एस.टी.खात्याकडून अनुकंपा तत्वावर ज्या नियुक्त्या देण्यात आल्या त्यात हे नांव आहे. परंतु त्यांच्याकडे तपशिल नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या नोंदवहीची तपासणी करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक २३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी शासकिय परिवहन अधिकारी यांचे कार्यालयात, आपल्या कार्यालया मार्फत वाहकांना जो परवाना दिला जातो त्याबाबतची माहिती सन २००० पासूनची खालील तक्यात वर्षवार पुरवावी. वाहकांचे नांव, पत्ता, परवाना दिलेली तारीख, परवाण्याचे स्वरुप, शिकाऊ/कायम परवाण्याच्या अवधी व वाहकांचा बिल्ला क्रमांक तसेच सादर केलेला अर्ज क्रमांक व अर्जाची तारीख तक्यात द्यावी, ही माहिती पुरविण्यात यावी. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

७. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१०.२००७ रोजी रुपये ५४६०/- अपेक्षित खर्च आहे असे कळविण्यात आलेले असून तो कार्यालयात भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक १५.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेला असून तक्यात माहिती मागितली होती. प्रत्येकाची माहिती नको असे नमुद केलेले आहे. व त्यानंतर दिनांक २३.१०.२००७ रोजी अर्जाद्वारे मागितलेली माहिती तक्याच्या स्वरुपात कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही व आपणास आवश्यक असलेली कोणतीही विहित नमुना तक्यात मोटार वाहन कायद्याअंतर्गत समाविष्ट नसल्यामुळे अभिलेखावर माहिती उपलब्ध नाही. ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती पुरविणे नियमानुसार अपेक्षित आहे. आपणास ज्या स्वरुपाची माहितीची **// ३ //**

आवश्यकता आहे त्याकरीता अर्जासह निरीक्षण शुल्क भरणा करुन पाहणी करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. मागणीतील माहिती क्रियेट तयार करुन पुरविणे अपेक्षित नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७ जुलै, २००८ रोजी देण्यात आला असून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

८. जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय सुध्दा योग्य आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्यांची पाहाणी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २२/२००९ व २३/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवून व प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून अभिलेख्यांची पाहाणी करावी व माहिती उपलब्ध झाल्यास आवश्यक त्या माहितीचा खर्च भरावा. पाहाणीचाही खर्च भरावा. त्याकरीता अपीलकर्ता यांचा अर्ज आल्यानंतर त्या दिवशी व वेळेत जन माहिती अधिकारी यांनी एका कार्यालयीन कर्मचा-यांच्या उपस्थितीत सदरचे अभिलेखे अपीलकर्ता यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२/२००९**

**१) श्री पुरणदास हरिदास लोणारे,**
**लाला लजपतरॉय वार्ड, नाशिक नगर, भंडारा,**
**ता.जि. भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**नगर परिषद कार्यालय, भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद भंडारा यांचेकडे दिनांक ४.९.२००४ ते ११.१२.२००७ पर्यंत केलेल्या अर्ताबाबतची कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविण्यात आले व त्याप्रमाणे दिनांक ६.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.९.२००८ रोजी दिला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मला आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. आवश्यक ती माहिती याचा अर्थ अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे कार्यवाही करुन अतिक्रमण काढणे अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे तक्रार अर्जावर जी कार्यवाही झालेली असेल त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध होतात. परंतु कोणत्याही प्रकरणाबध्दल कार्यवाही करुन मिळत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना

// २ //

त्यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे संबंधीतांना दिलेल्या नोटसच्या प्रती दिलेल्या आहेत. पोलीसांना पत्र दिलेले आहेत. परंतु पोलीस हजर झाले नाही, त्या पत्रांची प्रत दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पोलीसांची मदत मागितली असता त्याचा खर्च भरावा लागतो व तो खर्च नगर परिषदेने भरलेला नसल्यामुळे पोलीस येण्यास तयार नाही व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, पोलीसांच्या मदतीशिवाय अतिक्रमण काढता येणार नाही. तसेच संबंधीतांनी अतिक्रमण स्वतः काढतो असे लेखी सुध्दा दिलेले आहे. व त्यामुळे ती कार्यवाही पुढे झालेली नाही. ही सर्व माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे माहिती मिळाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०/२००९**

**१) श्री राजू राहुलकर,**
**शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॅालेज रोड,**
**गजानन स्टोर्स के सामने, गोंदिया, ता.जि.गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**सालेकसा, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**तहसिल कार्यालय (अन्न व पुरवठा विभाग),**
**सालेकसा, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ रोजी, जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय सालेकसा यांचेकडे मौजा नवेगांव (कावराबांध) येथील रेशन दुकानाबाबत ऑगष्ट, २००८ ते आजपर्यंतची माहिती एकुण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. बी.पी.एल. म्हणून रेशन कार्डची झेरॉक्स जोडलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यांना बी.पी.एल. प्रमाणपत्र घेवून यावे असेही कळविलेले दिसून येते. तसेच मागितलेली माहिती ही व्यापक प्रमाणात आहे व आता अवंटन तरतुद पुरेशी नाही. त्यामुळे मुद्या क्रमांक १ व २ मध्ये नमूद कागदपत्रे सादर केल्यास रक्क्म दाखल करुन माहिती घेवून टपाल खर्च जमा करुन देण्याची तयारी शक्य तो ठेवावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३०.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु

// २ //

उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तसेच मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे व निधीची उपलब्धता नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर योग्य आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील कागदपत्रांचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाचे वेळेत, मागितलेल्या माहितीचे अभिलेखे निरीक्षण करण्याकरीता तारीख व वेळ कळविण्यात यावी. तसेच अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदरचे अभिलेखे निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे व आवश्यक असेल ती माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६/२००९**

**१) श्री लिलाधर नारायण बेंद्रे**
**प्लॅाट नं. अ-५, वैभवनगर, वानाडोंगरी,**
**ता. हिंगणा, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**(सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद यांचेकडे दिनांक १.१.९६ ते १.१.९७ ची कनिष्ठ सहायक पदाची सेवा जेष्ठता यादी तसेच ३ मुद्यांवर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने माहिती पुर्वीच उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे दिनांक २८.१२.२००८ रोजी सुनावणीस हजर झाले नसल्यामुळे अपीलार्थीच्या गैरहजेरीमध्ये नैसर्गिक न्याय तत्वाला डावलून निर्णय देण्यात आला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना असे सांगितले की, दिनांक ९.५.२००८ रोजीचे माहितीच्या अर्जाप्रमाणे हिच माहिती मागितली होती. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००८ रोजी माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक

// २ //

२९.११.२००८ ला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने ९०/- बँकेत भरणा करण्यास सांगितले. परंतु त्यांनी चालानची प्रत सादर केली नाही व त्यामुळे माहिती दिली गेली नाही.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक १.१.९६ ते १.१.९७ या कालावधीतील सेवा जेष्ठता यादी मागितली होती. दिनांक १.१.९८ ची सेवा जेष्ठता यादी घेवून जाण्यास सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात दिनांक १.१.९६ ते १.१.९७ या कालावधीत कोणत्याही प्रकारची सेवा जेष्ठता यादी काढण्यात आली नव्हती. त्यामुळे ती उपलब्ध नसल्यामुळे, ती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.९.१९९६ चा जावक क्रमांक ६५३६ प्रमाणे सदरची सेवा जेष्ठता यादी काढण्यात आलेली आहे अशी त्यांची माहिती आहे. व त्यामुळे त्याप्रमाणे तपासणी करुन त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितल्याप्रमाणे जिल्हा परिषद नागपूर या सार्वजनिक प्राधिकरणाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.९.९६ चा जावक क्रमांक ६५३६ प्रमाणे तपासणी करुन दिनांक १.१.९६ ते १.१.९७ च्या सेवा जेष्ठता यादीतील खात्री करुन ती माहिती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ७९/२००९

**१) श्री निलेश सुरेश निंबाळकर,**
**मु.पांढरी (गा.) पो. बेलोना,**
**ता.नरखेड, जिल्हा नागपूर-४४१३०४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, काटोल, जि. नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**नरखेड, ता. नरखेड, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक २२.६.२००९ अन्वये मागितलेली माहिती प्राप्त झालेली आहे. केस रद्य करण्यात यावी असे आयोगास लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४/२००९**

**१) श्री रत्नाकर रामराव खरात,**
**आदर्श कॅालनी, सितलवाडी,**
**मु.पो.ता. रामटेक, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**नागपूर ग्रामीण नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी, प.ह.क्रं.४२,**
**तलाठी कार्यालय खापरी (रेल्वे),**
**मार्फत तहसिलदार, नागपूर (ग्रामीण)**
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.१००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे निवेदन दिनांक ७.७.२००९ अन्वये माहिती मिळाली. करीता अपील मागे घेत असल्याचे आयोगास लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८६/२००९**

**१) श्री गोपाळा चिनबाजी हटवार,**
**मु. सुलेझरी, पंचायत समिती नागभिड मागे,**
**ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्याबाबत पंचायत समिती नागभिड अंतर्गत आजपर्यंत कोणकोणत्या संदर्भाने कोणत्या तारखेला किती शिक्षकांचे वरिष्ठ वे.श्रे. प्रस्ताव मंजूरीसाठी प्राप्त झाले अशा प्रकारची ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.११.२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुरुवातीला असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती किंवा कागदपत्रे मिळाले नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता दिनांक ४.११.२००८ रोजी म्हणजे विहित मुदतीत अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ मधील माहिती प्रस्तावासह उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या क्रमांक २,३ व ४ वर कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले आहे. आता कार्यवाही पुर्ण झालेली आहे व प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. त्या संपूर्ण प्रस्तावाची कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. प्रथम अपीलाच्या **// २ //**

संदर्भात निर्णय जरी झालेला नसला तरी अपीलकर्ता यांना अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहाण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्याविरुध्द दिनांक २९.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली असे दाखल केलेल्या खुलाशावरुन दिसून येते. व त्यात कार्यवाही पुर्ण
झाल्यानंतर अंतिम माहिती पुरविण्यात येईल असा खुलासा दाखल केलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक २,३ व ४ ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत विना मुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८३/२००९**

**१) श्री अजय गोपीनाथ कोंडेकर,**
**वार्ड नं. १२, विहिरगांव तुकूम,**
**मुल, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**सावली. ता. सावली, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, सावली यांचे कार्यालयात गांव नमुना सात भु.क्रं.११८७ (जुना), गांव नमुना सात भु.क्रं.१०७४ (नवीन), सर्व फेर फार सत्यप्रती, सातबारा वर फेर फार ज्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना मिळालेली माहित ही चुकीची आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जी माहिती तलाठी यांचेकडे उपलब्ध होती तीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, श्री कोंडेकर गोपीनाथ पो. यांचेकडून श्री गेडाम मारोती भिका यांचकडे सदरची जमीन कशी वर्ग झाली याबध्दलचे फेर फार क्रमांकाची माहिती त्यांना हवी आहे. परंतु त्याबध्दलची माहिती तलाठी कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी

//२//

यांनी सांगितले. व फेर फार क्रमांक सुध्दा सातबारामध्ये दिलेला नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५/२००९**

**१) श्री मनोहर शामराव व-हाडे,**
**मु. मोहगांव, पो.पिपळा किनखेड,**
**ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. कळमेश्वर,**
**ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**गट ग्राम पंचायत मोहगांव(सावंगी)**
**पो. पिपळा किनखेडे, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे श्री मनोहर नागोराव डोळसे यांचे घराचा आजचा प्रमाणात नसलेला नकाशा जोडला आहे. त्या नकाशात एकुण १८ बिंदू आहेत. त्या बिंदूच्या २२ जोडया मधील अंतर मिटर सेमी मध्ये मोजून मला कळवावीत वगैरे.. अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक २०.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना आपण श्री मनोहर नागोराव डोळसे यांच्या घराच्या नकाशाचे बिंदूनिहाय मोजणी मागितलेली आहे. सदर प्रकारात असलेली मोजणी व मापे ग्रा.पं. मोहगांव या कार्यालयांत उपलब्ध नाही. आणि आपणास दिनांक २२.४.२००८ ला दिलेल्या पत्रासोबत सदर घराचे विक्रिपत्राचे झेरॉक्स प्रत आपणास दिलेली आहे. असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

//२//

३.  त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी नकाशा स्वत: तयार केला आहे व तो काल्पनिक नकाशा आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना त्या जागेची मोजणी करुन पाहिजे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी सदर व्यक्ती वारंवार आलटून पालटून माहिती मागत असतो. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वारंवार त्यांना देवूनही सदर माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही असे शेरे पत्रावर देवून प्रथम अपीलीय अधिकारी व आयोगाकडे तक्रार दाखल करीत असतो. अशा प्रकारे दिनांक २३.४.२००९ चे पत्रान्वये एक प्रकरण आपण खारीज केलेले आहे. आतापर्यंत २५-३० पत्रान्वये माहिती मागितलेली आहे व ती दिलेली आहे. तरीही त्यांचे समाधान होत नाही. अर्थात आपणाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर प्रकरणात माहिती पुर्णपणे गैरअर्जदाराला दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी काल्पनिक नकाशाच्या द्वारे माहिती मागितलेली आहे त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)  अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७८४/२००८**

**१) श्री भजोरेमना मारोती मून,**
**चेरपल्ली रोड, कुंभार वार्ड नं.५,**
**मु.पो.ता.अहेरी, जिल्हा गडचिरोली. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांचे कार्यालयात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांचे पत्र क्रमांक ४६८/०७, कार्यालय प्रकल्प अधिकारी यांनी चौकशी अहवाल दिनांक ५.६.२००७ रोजीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घरपोच घेणार असे नमूद केले आहे. अर्जाप्रमाणे दिनांक ६.६.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली. प्राप्त झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात मुद्दा क्रमांक ३ बध्दलची माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक १५.५.२००८ रोजी माहितीचा खर्च रुपये ४३/- भरना करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ४३/- चा भरना केलेला आहे व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, अहवालावर कार्यवाही न केल्याचे कारण द्यावे. परंतु अहवालावर कार्यवाहीसाठी अप्पर आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर

केले आहे व त्या प्रकरणाच्या संदर्भातील कागदपत्रे व स्मरणपत्रे ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे कार्यवाहीचे कारण त्यांना सादर झालेले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिधियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७/२००९**

**१) श्री शंकरराव बाजीराव कुलसंगे(से.नि.शिक्षक)**
**जी.बी.एम.एम.हायस्कुल, हिंगणघाट, जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद हिंगणघाट यांचेकडे "मेरे नियुक्त बाबत की वास्तविक जानकारी मिलने बाबत" या विषयाचे अनुषंगाने माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १४.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी त्यांचे समाधान झाले असे लेखी दिलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे. तरी सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्यावर त्यावेळेस अन्याय झाला आहे. व त्याची चौकशी व्हायला पाहिजे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अशा प्रकारची कार्यवाही करण्याची तरतुद अधिनियमात नसल्यामुळे अपीलकर्ता

//२//

यांना माहिती उपलब्ध झाली असून त्यांचे समाधान झालेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश.**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८२/२००९**

**१) श्री शिवकांत जैयस्वाल,**
**१४७, अंबाझरी ले आऊट, हिल टॉप, रामनगर,**
**अमरधन लक्ष्मी अपार्टमेंट, नागपूर-४४००१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**द्वारा संचालक, सैनिक कल्याण विभाग, म.रा.,**
**रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारक समोर, घोरपडी,**
**पुणे-४११००१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**द्वारा संचालक, सैनिक कल्याण विभाग, म.रा.,**
**रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारक समोर, घोरपडी,**
**पुणे-४११००१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक,सैनिक कल्याण यांचेकडे एकुण ९ पानांमध्ये वर्णन केलेली माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.८.२००८ रोजी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी नुसार सार्वजनिक प्राधिकरणा मध्ये ज्या साहिज्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, परिपत्रके इ.स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे माहिती संकलीत करुन अर्जदारास पुरविण्याची तरतुद नाही. आपला सदरचा अर्ज नऊ पानांचा असून आपणास निश्चित काय हवे आहे याचा अर्थबोध होत नाही. तरी आपणास कोणती कागदपत्रे हवी आहे याबध्दलचा तपशिल कळविण्यात यावा जेणेकरुन सदर कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविणे सोईस्कर होईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अशा प्रकारचे कागदपत्राचे वर्णन न करता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १६.८.२००८ रोजी दाखल केलेले आहे.

३. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१०.२००८ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आक्षेप घेणारे पत्र दिले व त्या पत्रास दिनांक ३०.१२.२००८ रोजी उप संचालक(प्रशासन) यांनी उत्तर दिलेले दिसून येते. व त्यामध्ये उर्वरित माहिती हवी असल्यास आपल्याला खर्चाचा भरणा करावा लागेल. व आपणास दिनांक १०.९.२००८ रोजी रुपये ६०६८/- भरावे असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे आपण भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल. मात्र त्यानंतर आपण सदरची रक्कम न भरता दिनांक १.८.२००८ चे पत्र पाठविले वगैरे.. असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती हवी असल्यास त्यांनी दिनांक १०.९.२००८ च्या पत्राने कळविल्याप्रमाणे खर्चाचा भरणा करणे आवश्यक आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अधिनियमाच्या कलम ७(६) प्रमाणे माहिती विलंबाने उपलब्ध होत असल्यास त्याकरीता विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १०.९.२००८ रोजी जी खर्चाची रक्कम कळविलेली आहे ती त्यांना मुदतीतच कळविलेली असल्यामुळे व त्यांनी स्वतःच अपील अर्जात माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी लागणारी रक्कम कळविण्यात यावी असे नमुद केलेले असल्यामुळे त्याप्रमाणे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरच्या खर्चाची रक्कम भरल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२/२००९**

**१) श्री नंदू डोमाजी सायरे,**
**मु.नगरधन, ता. रामटेक, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यपालन अधिकारी,**
**(ग्रा.पं.विभाग), जि.प. नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय, नगरधन, ता.रामटेक,**
**जिल्हा नागपूर** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी सदरचे अपीलाचे संदर्भात आयोगास त्यांचे निवेदन सादर केले असून त्यात ..मी आपणांकडे अपील दाखल करुन आपणांस झालेल्या त्रासापोटी व पत्रव्यवहाराकरीता मी आपली क्षमा मागतो व केलेली अपील मागे घेतो. ..आता आमची कोणत्याच प्रकारची तक्रार नाही असे गृहित धरावे, अशी आयोगास लेखी विनंती केली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८/२००९**
**अपील क्रमांक ९९/२००९**

**१) श्री किशोर विनायकराव सोनटक्के,**
**शिवकृपा बी-९, गायत्रीनगर, आठवडी बाजार,**
**कारगिल चौक, गडचिरोली-४४२६०५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक,**
**उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर, सिव्हील लाईन,**
**नागपूर रोड, चंद्रपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(योजना),**
**उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. वरील दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक १५.१०.२००८ व ४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, उत्तर चंद्रपूर वनवृत्त यांचेकडे गट क संवर्गातील वनपाल, वनरक्षक, लिपिक-टंकलेखक इ.पदाच्या भरती प्रक्रियेच्या संदर्भातील एकुण १२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे दोनही अर्जामध्ये नमुद केले आहे.

३. दिनांक १५.१०.२००८ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ७.११.२००८ रोजी माहिती देण्यात आली आहे व दिनांक ४.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००८ रोजी माहिती देण्यात आली आहे. दोनही उत्तरांमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अनुक्रमे दिनांक १०.११.२००८ व दिनांक १७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दोनही प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दिनांक १०.१२.२००८ व दिनांक १५.१२.२००८ रोजी उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील दोनही द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

४.    अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु उमदेवारांच्या तोंडी परीक्षेतील प्रत्येक अधिका-यांनी दिलेल्या गुणांची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही. तसेच मुख्यालयाकडून सुध्दा सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या परीक्षेमध्ये गोंधळ झालेला असल्यामुळे ही माहिती त्यांना आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना लेखी व तोंडी परीक्षेतील माहिती व एकुण गुण हे कळविण्यात आले आहे असे त्यांनी मान्य केले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष सर्व नस्ती दाखविण्यात आल्या होत्या. त्या नस्तीची एक दिवस पाहाणी केली व त्यानंतर मात्र पाहाणी केली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी पुन्हा संपूर्ण नस्तींची पाहाणी करणे आवश्यक राहील व त्यातून त्यांना आवश्यक असतील त्या उमेदवारांच्या संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१)    अपीलकर्ता यांचे दोनही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून, जन माहिती अधिकारी यांनी त्या दिवशी अपीलकर्ता यांना कर्मचा-याच्या उपस्थितीत सर्व अभिलेखे पाहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यातून अपीलकर्ता यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२)    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक  ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९६/२००९**

**१) श्री उमेश बहादुरजी तुरकर,**
**मु.देवरी देव, पो. चुल्हाड, ता.तुमसर, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, तुमसर, जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे नारायण आसाराम पटले, रॉकेल विक्रेता यांच्या रॉकेल विक्रीबाबतची माहिती तपशिलात मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती दिनांक १७.१.२००८ रोजी देण्यात आली आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. व त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रॉकेल विक्रेत्यास दिनांक १५.११.२००८ रोजी पत्र दिले होते. त्यानंतर दिनांक ४.१२.२००८ रोजी सुध्दा पत्र दिलेले होते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिनांक ३०.६.२००९ रोजी निर्णय घेवून श्री पटले यांचा केरोसिन परवाना तात्काळ निलंबीत करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे व त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल

केला होता. व ही सर्व माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे द्वितीय अपीलांमध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही, ही अपीलाची कारणे योग्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

यावरुन, प्रथम अपीलाच्या निर्णयावरुन सर्व कार्यवाही झालेली दिसून येते व अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५/२००९**

**१) श्री नत्थू रामचंद्रराव तळेकर,**
**मु.पो. तारणा, ता. कुही, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. कुही,**
**ता. कुही, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**गट ग्राम पंचायत वडेगांव (मांढळ),**
**ता. कुही, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडे स्व. रामचंद्र महादेवजी तळेकर हयांचे मकानाचे फेरफार फक्त कृष्णा रा. तळेकार हयांचेच नांवे कोणत्या आधारावर केले त्याची झेरॅाक्स प्रत मिळण्याबाबत, अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २०.३.२००८ रोजी गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. याबाबतची माहिती कार्यालयास सादर करावी व त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्याप्रमाणे दिनांक १.१०.२००८ रोजी गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहाण्याची नोटीस देण्यात आलेली दिसून येते. मात्र निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

// २ //

४. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३१.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जे फेरफार घेतलेले आहे ते चुकीचे आहे. व ते दुरुस्त करुन मिळावे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती मिळते. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तकार -**

**तक्रार क्रमांक १४०/२००९**

**१) श्री धनंजय अंबादास धाबे,**
**२४७, बजाज नगर, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य,**
**ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय,**
**क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता,**
**ईश्वर देशमुख शारिरिक शिक्षण महाविद्यालय,**
**क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १९.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये, अपूरी माहिती मिळाली या कारणास्तव तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे होते की, नियमाप्रमाणे प्राचार्य यांच्या स्वयंमुल्य निर्धारण अहवालाची प्रत त्यांना मिळाली नाही. परंतु संबंधीत प्राचार्य यांनी स्वयंमुल्या निर्धारण अहवाल दरवर्षी सादर केलेला नसल्यामुळे तो उपलब्ध करुन देता आला नाही. यावरुन जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ११६/२००९
अपील क्रमांक ११७/२००९

**१) श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा,**
**सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,**
**व्ही.आय.पी.रोड, धरमपेठ, नागपूर-४४००१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय),**
**नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(प्रशासन)**
**नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे दोनही अपील मागे घेत असल्याचे त्यांच्या द्वितीय अपील अर्जावर आयोगापुढे लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे दोनही अपील खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ११०/२००९
अपील क्रमांक १११/२००९
अपील क्रमांक ११२/२००९
अपील क्रमांक ११३/२००९
अपील क्रमांक ११४/२००९

**१) श्री राधेश्याम परसरामजी काबरा,**
**शिवाजी वार्ड, मु.पो.ता.देसाईगंज(वडसा)-४४१२०७,**
**जिल्हा गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

अपील क्रमांक ११०/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.** **उत्तरवादी**

अपील क्रमांक १११/२००९ व अपील क्रं. ११२/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

अपील क्रमांक ११३/२००९ व अपील क्रं. ११४/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(नझुल)**
**ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९, १७.२.२००९,२. २.२००९, २.२.२००९ व १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ११०/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे लोकशाही दिनी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भाने २००४ ते

// २ //

३१ जुलै, २००८ असा कालावधी दिलेला आहे. परंतु माहितीच्या तपशिलामध्ये लोकशाही दिन १९९८ असेही नमुद केले आहे. तसेच लोकशाही दिन ९९, १००, ६३, ६६ व ६४ याबध्दल सुध्दा त्यांनी अनेक मुद्यांच्या माध्यमातून माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००८७ रोजी व दिनांक ५.५.२००८ रोजी झालेल्या लोकशाही दिन १९९८ मधील एकुण ४० प्राप्त तक्रारींची तपासणी केली असता आपण दर्शविलेल्या तक्रारीची नोंद झाल्याचे दिसून येत नाही. लोकशाही दिनाच्या दिवशी विहित वेळेत तक्रार प्राप्त न झाल्यामुळे टोकन क्रमांक आपणांस मिळालेला नाही, असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर मुद्यांच्या संदर्भात सुध्दा तसेच उत्तर दिलेले दिसून येते. व त्या लोकशाही दिनात टोकन क्रमांक त्यांना दिलेला नाही त्याबध्दलची माहिती त्यांना दिलेली दिसून येते. तसेच प्रत्येक अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाहीची माहिती वगैरे त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी जे स्पष्टीकरण दिलेले आहे ते योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अत्यंत व्यापक प्रमाणात आहे व ती १० वर्षापासूनची माहिती आहे. व त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यास निश्चित विलंब होईल व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १११/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे वर्ष २००६ मध्ये झालेल्या देसाईगंज नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारांना ई.टी.व्ही.वर निवडणुक प्रचार केल्यासंबंधाने दिलेल्या परवानगीचीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ७.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

६. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.९.२००८ रोजी देण्यात आला असून अपील मान्य करण्यात येवून उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांना आदेशित करण्यात येते की, देसाईगंज नगर परिषदेच्या २००६ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ई.टी.व्ही.वर निवडणुकीच्या

प्रचारासंबंधाने परवानगी पत्र व केलेल्या अर्जाचे संबंधाने माहिती देण्यात यावी असा निर्णय अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

७. जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५.४.२००८ रोजी श्री बी.झेड. झुरे, लिपिक, निवडणुक शाखा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्राच्या अनुषंगाने माहिती ही निवडणुक शाखेत असल्याने व निवडणुक लिपिक हे रजेवर असल्यामुळे ते रुजू होताच आपणास माहिती संकलीत होताच कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. दिनांक १६.४.२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद देसाईगंज यांना सुध्दा निवडणुकीच्या बाबतचे सर्व दस्तऐवज आपणाकडे पाठविण्यात आलेले असल्यामुळे उक्त मागणी केलेल्या दस्तऐवजाचा शोध घेवून या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा जेणेकरुन अर्जदारास मागितलेली माहिती देण्यास साईचे होईल असे कळविलेले दिसून येते. दिनांक २१.४.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी व्यवस्थापक, ई.टी.व्ही. यांना सुध्दा माहे नोव्हेंबर, २००६ मध्ये नगर परिषद देसाईगंजच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराकरीता उमेदवारांना परवानगी दिलेली असल्यामुळे सदरच्या फाईल वरील माहिती सादर करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक १६.५.२००८ रोजी श्री बी.झेड. झुरे यांना व मुख्याधिकारी यांना सुध्दा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यावर मुख्याधिकारी नगर परिषद, देसाईगंज यांनी उपविभागीय अधिकारी यांना सन २००६ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणुकीच्या प्रचाराकरीता दूरध्वनी/ई.टी.व्ही. राजकिय पक्षाच्या उमेदवारांना परवानगी देण्यात आलेली नाही अशी माहिती कळविलेली दिसून येते. तसेच फौजदार लिपिक, उपविभागीय दंडाधिकारी यांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १६.७.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्ता यांना तपशिलामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, दोनही अधिका-यांच्या उत्तरामध्ये विसंगती असल्यामुळे प्रथम अपीलात तसा निर्णय घेण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक १५.११.२००८ रोजी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, देसाईगंज सध्या कार्यरत उपविभागीय अधिकारी, साकोली यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयात बोलाविण्यात आलेले आहे. तरी उक्त माहिती उपलब्ध होताच माहिती पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. त्यावर पुन्हा पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. यावरुन निश्चितच परवानगी दिली आहे किंवा नाही हे कळून येत नसल्यामुळे अपीलकर्ता

यांनी सदरच्या निवडणुकीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांची स्वत: पाहाणी करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

८. अपील क्रमांक ११२/२००९ मध्ये दिनांक ३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे आपले कार्यालयीन पत्र दिनांक २८.८.२००८ चे संदर्भात व अर्जदाराने दिनांक ११.९.२००८ व दिनांक १२.९.२००८ रोजी आपल्या कार्यालयातील टपाल शाखेत दाखल केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झ ालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१२.२००८ रोजी देण्यात आला असून मुद्या क्रमांक ३ मध्ये नमुद केल्या तक्रारीचे अनुषंगाने काही कार्यवाही केलेली असल्यामुळे त्या कागदपत्राच्या प्रती १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना पुरविण्यात याव्या असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे दिनांक ६.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ अन्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व मुद्या क्रमांक ३ नुसार नझुल शाखेकडून माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही असे कळविलेले दिसून येते. दिनांक १०.४.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी नझुल शाखा यांना पत्र दिलेले दिसून येते.

९. यावरुन उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे व माहिती देण्यास टाळाटाळ केलेली नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांचा माहितीचा जो अर्ज आहे तो अर्ज हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. त्यात विश्लेषणच अधिक आहे. व त्यामुळे दिनांक ७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

१०. अपील क्रमांक ११३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचेकडे अर्जदाराने उविअ कार्यालयात दिनांक ८.५.२००६ रोजी दाखल केलेल्या अर्जासंबंधाने झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती एकुण २२ मुद्ये व उप मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना दिनांक ८.५.२००८ रोजी दाखल केलेल्या अर्जाचे संबंधाने काय कार्यवाही केली या अर्जाची तपासणी केली असता आपली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत व्याख्या २(च)(झ)(क)(ख)(ग)(ध) या संज्ञेत बसत नसल्यामुळे

व याबाबत या कार्यालयात सदर अधिनियमाच्या व्याख्या २ मधील उप नियम (च)(झ)(क)(ख)(ग)(ध) नुसार दस्तऐवज उपलब्ध नाही, त्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

११. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.११.२०८ रोजी देण्यात आला असून उपविभागीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणा-या अर्ज प्रकरणावर नियमामध्ये लक्ष देवून विहित मुदतीत माहिती अगर यथोचित उत्तर देण्याकडे लक्ष पुरवावे. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात पत्रव्यवहाराचे टप्पे करीत करुन प्रक्रिया गतीमान करावी. उत्तरवादीने दिनांक १४.१२.२००८ प्रमाणे माहिती पुरविण्यात यावी असा निर्णय देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे दिनांक २१.१.२००९ रोजी या कार्यालयातील अभिलेखागारात मागणी केलेल्या दस्तऐवजाची पाहाणी केली असता दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.५.२००८ च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र अपीलकर्ता यांनी एकुण २२ मुद्यांमध्ये प्रवचन केलेले आहे त्याची माहितीच्या अधिकारात आवश्यकता नाही. व तशी माहिती सुध्दा उपलब्ध होत नाही. माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते. याबाबतची नोंद अपीलकर्ता यांनी घ्यावी व तसे निश्चित वर्णन कागदपत्रांचे केल्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध होऊ शकते याची नोंद घेण्यात यावी. प्रश्न विचारुन व अधिका-यांवर आरोप करुन माहिती उपलब्ध होत नाही याबाबतचीही नोंद घ्यावी. त्यानंतर अपीलकर्ता यांचा अर्ज मिळून येत नाही अशा प्रकारे उत्तर सुध्दा दिलेले दिसून येते. तसे असेल तर उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

१२. अपील क्रमांक ११४/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, देसाईगंज यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २००८ रोजी उविअ देसाईगंज यांनी ना.तह.नझुल दे.गंज यांना पाठविलेले पत्र क्रमांक कावि/उविअ/प्रसतु-१/७१४/२००८ च्या संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक १४.२.२००८ च्या अर्जावर काय कार्यवाही झाली अशी माहिती एकुण ५ मुद्यांमध्ये व उपमुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००८ रोजी मागणी केलेली माहिती या कार्यालयाशी संबधीत नसून तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख या

कार्यालयाशी संबंधीत आहे. उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांचे पत्र दिनांक १६.४.२००८ अन्वये तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, देसाईगंज यांना माहिती सादर करण्यास कळविले आहे. माहिती प्राप्त झाल्यावर कळविण्यात येईल असेही कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.११.२००८ रोजी दिलेला असून उपविभागीय अधिकारी यांनी नायब तहसिलदार, देसाईगंज हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता आले नाही व माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. दिनांक २३.१.२००९ रोजी नायब तहसिलदार यांनी दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे कळविलेले दिसून येते. दिनांक १.१.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी शासकिय माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार नझुल यांना अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११०/२००९ खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १११/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना नगर परिषद देसाईगंज च्या निवडणुकीच्या संदर्भामध्ये निवडणुक अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी यांनी सर्व कागदपत्रे मख्याधिकारी, नगर परिषद देसाईगंज यांचेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पाहाणीकरीता हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांना पत्र देवून व त्यात तारीख व वेळ कळवून त्या तारखेस व वेळेस कार्यालयीन कर्मचा-याच्या उपस्थितीत सर्व कागदपत्रे अपीलकर्ता यांना अवलोकनाकरीता सादर करण्यात यावे व त्याची अपीलकर्ता यांनी स्वतः तपासणी करुन आवश्यक असलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.

३) अपील क्रमांक ११२/२००९ खारीज करण्यात येत आहे.

४) अपील क्रमांक ११३/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ८.५.२००६ च्या तक्रार अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्ज उपलब्ध होत नसल्यास पोलीसात तक्रार करावी.

५) अपील क्रमांक ११४/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १४.२.२००८ च्या अर्जावर काय कार्यवाही झाली याबाबत हा निर्णय प्राप्त झाल्यापासून २० दिवसांचे आंत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, देसाईगंज यांचेकडून माहिती मागणी करुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३१/२००९**
**अपील क्रमांक १३२/२००९**
**अपील क्रमांक १३३/२००९**

**१) श्री हिशोद पत्रुजी तुरे, स.शि.,**
**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मारडा (मोठा),**
**ता.जि. चंद्रपूर-४४२४०२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**प्राथमिक शिक्षण विभाग, जि.प. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १३१/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे श्री मनोज पवार, वरिष्ठ लिपिक यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या संदर्भातील आदेशाच्या प्रती मागितलेल्या दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिनांक ६.९.२००८ चे उत्तर श्री मनोज पवार, जेष्ठ सहाय्यक यांचेवर शिस्त व अपील नियम, १९६४ च्या तरतुदीनुसार कार्यालयीन कामात गैरशिस्त व गैरवर्तणुक करणे, नियत कर्तव्यात कसूर करणे, माहितीच्या अधिकारातील अर्जाचा निपटारा विहित मुदतीत न करणे व पत्रे गहाळ करणे इ.च्या संदर्भात विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे. व त्यामुळे सदर पत्रावरील कार्यवाही कळविता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. तसेच सदर पत्राची प्रत श्री पवार यांना सोपविण्यात आलेली दिसून येते. दिनांक ११.९.२००८ चे पत्र हे मनोज पवार, जेष्ठ सहाय्यक हे नियत कर्तव्यात कसूर करीत असल्याबाबत पत्र दिलेले व पत्राची

प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी प्रथम अपील



दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी श्री मनोज पवार वरिष्ठ लिपिक यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाही आदेशाची प्रत मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र श्री मनोज पवार यांनाच प्रतिलीपी करुन दिलेले आहे व त्यामुळे त्यांना सदरची माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. वास्तविक, शिस्तभंगाची कार्यवाही जर प्रस्तावित केली असेल तर आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे म्हणून ती उपलब्ध करुन दिलेली नाही व श्री मनोज पवार यांना निर्देशित केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना शिस्तभंगाच्या प्रस्तावाच्या कार्यवाहीच्या आदेशाची प्रत व निलंबनाची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००८ रोजी माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद चंद्रपूर यांना प्राथमिक शिक्षकांची दिनांक २६.६.२००३ ते १०.१०.२००३ पर्यंतची ६६ शिक्षकांचे वेतन थकबाकी बध्दलची माहिती, तसेच मुद्या क्रमांक ४ व ५ मध्ये बिंदू नामावलीची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व त्याकरीता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.३.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक १३३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००८ रोजी माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचेकडे दिनांक २५.८.२००८ व दिनांक ७.६.२००८ च्या निवेदनाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या पत्राचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००८ रोजी उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली



नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना श्री पवार यांना अपीलकर्त्यांच्या पत्रावर कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु त्यांनी कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे, असा खुलासा करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या निवेदनाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३१/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना श्री मनोज पवार यांच्या विरुध्द प्रस्तावित केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या आदेशाची व निलंबन आदेशाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३२/२००९ यामधील माहिती उपलब्ध करुन घेण्याकरता जन माहिती अधिकारी यांचेशी अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपर्क साधून विना मुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३३/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३४/२००९**
**अपील क्रमांक १३५/२००९**

**१) डॉ. सुरेन्द्र वामनराव सावरकर,**
**बी-३७/३८, मानवसेवा नगर,**
**सेमिनरी हिल्स, नागपूर-६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**सेमिनरी हिल्स, नागपूर-६.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**सेमिनरी हिल्स, नागपूर-६.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी , महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर-६. यांचेकडे एकुण दोन मुद्यांमध्ये तपशिलात संपूर्ण विद्यापीठातील भरतीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना सदर अर्जात मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) अन्वये नाकारण्याची कार्यवाही माहिती अधिकारी यांनी करावयास पाहिजे होती. परंतु कार्यवाही केली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही. मात्र, अपीलकर्ता यांना दिनांक ४.५.२००९ रोजी एकुण ६६८ पाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. प्राप्त झ ााल्याची स्वाक्षरी पृष्ठ क्रमांक १ वर आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

"अपीलार्थीने विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण कार्यकारी परिषदेची सभा सुरु असतांना सभा कक्षात धुमाकुळ घालून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. कार्यकारी परिषदेच्या व मा. कुलगूरु महोदय यांचे निर्णयानुसार त्यांना त्वरीत सेवेतून बडतर्फ करण्यात आले. त्यामुळे अपीलार्थीचे विविध प्रकारे विविध कारणास्तव विद्यापीठाचे कामकाजात व्यत्यय निर्माण करण्याची मानसिक प्रवृत्ती झाली आहे.

मा. उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रं.२७१८ मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७.७.२००८ च्या आदेशान्वये फेटाळून लावलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे विद्यापीठाने तंतोतंत पालन करुन अर्जदारास माहिती पूरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अपीलकर्त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती, विविध प्रकारे दबावतंत्र अवलंबविणे तसेच विद्यापीठाने बडतर्फ केल्यामुळे चिडून जाऊन द्वेषभावनेने विद्यापीठाचे सूरळीत कामकाजात व्यत्यय निर्माण करणे व वरिष्ठ कार्यालयाकडे विद्यापीठा विरुध्द वारंवार खोटय

तक्रारी करणे. वरील बाबी लक्षात घेऊन मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांनी द्वितीय अपील खारीज करावी."

३. यावरुन अपीलकर्ता हे त्यांना सेवेतून बडतर्फ केल्यामुळे त्रास देण्याच्या उद्येशाने अनेक अर्ज करुन माहिती मागवित आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. यापूर्वी सुध्दा अपीलकर्ता यांचे अनेक अपीले महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे संदर्भात आयोगाकडे सुनावणी झालेली आहे व खारीज करण्यात आले आहेत. अपीलकर्ता जी माहिती मागतात ती संपूर्ण विद्यापीठातील कर्मचारी/अधिकारी व संपूर्ण विद्यापीठाच्या स्थापनेपासून नियुक्तीच्या संदर्भातील माहिती मागत असतात व त्यात भ्रष्टाचार झालेला आहे म्हणून माहिती मागत आहे असा युक्तीवाद आयोगाकडे करतात. माहितीचा अधिकार हा प्रशासनात पारदर्शकता आणण्याकरीता आहे हे निश्चित. परंतु अर्जदारास बडतर्फ केलेले आहे व तेही कार्यकारी परिषद सुरु असताना धुमाकुळ घालून हल्ला करण्याचा प्रयत्न केला या कारणास्तव. अशा अर्जदाराने जर शेकडो अर्ज करुन माहिती मागितली असेल तर ती माहिती सुध्दा सूड उगविण्याच्या दृष्टीने मागत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता अधिनियमाच्या तरतुदींचा वापर करणे गैर आहे. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता येण्यापेक्षा नैराश्य पसरेल व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३५/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांचेकडे नागपूर येथे २२ सप्टेंबर २००८ रोजी झालेल्या विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त सर्टीफाईड झेरॉक्स तसेच या सभेमध्ये ठेवलेल्या सर्व विषयांची टिपणी व अजेंडासह सर्टिफाईड झेरॉक्स देण्यात यावी. तसेच गृह निर्माण संस्थेचा ठराव व प्रस्ताव शासनास सादर केलेला असल्यास त्या प्रस्तावाची झेरॉक्स दयावी अशी माहिती मागितली आहे. पुन्हा ९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर सुनावणी झाली नाही व माहिती मिळाली नाही. यापूर्वी अपीलकर्ता यांना दिनांक ४.५.२००९ रोजी ६६८ पाने माहिती विनामुल्य देण्यात आली आहे. व वर अपील क्रमांक १३४/२००९ मध्ये विवेचन केल्याप्रमाणे अर्जदारास बडतर्फ केलेले आहे व तेही कार्यकारी परिषद सुरु असताना धुमाकुळ घालून हल्ला करण्याचा प्रयत्न केला या कारणास्तव. अशा अर्जदाराने जर शेकडो अर्ज करुन माहिती मागितली असेल तर ती माहिती सुध्दा सूड उगविण्याच्या दृष्टीने मागत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता अधिनियमाच्या तरतुदींचा वापर
करणे गैर आहे. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता येण्यापेक्षा नैराश्य पसरेल व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३४/२००९ व १३५/२००९ खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२७/२००९**

**१) श्री भाष्कर मिठूजी डोंगरे,
कस्तुरबॉं वार्ड, गोंदिया (पंचशिल झेंडयाजवळ)
पो.ता.जिल्हा गोंदिया.४४१६०१** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

अपील क्रमांक १२८/२००९/अपील क्रमांक १२९/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १२७/२००९ मध्ये दिनांक १२.५.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी म्हणून उपशिक्षणाधिकारी (मा.) यांचेकडे श्री भरदे मुख्याध्यापक यांच्या संदर्भामध्ये ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.५.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.९.२००८ रोजी देण्यात आला असून पुन्हा मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी

असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही शाळा स्तरावर असल्यामुळे मुख्याध्यापक यांना माहिती अधिकारी म्हणून माहिती मागणे आवश्यक होते. परंतु तसे न करता उपशिक्षणाधिकारी यांना मागितली व त्यामुळे उपशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना पत्र देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे. परंतु मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणात आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणात मागणे आवश्यक असते व अनुदानित शाळा ही स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांनी त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागणे आवश्यक होते. परंतु ती तशी मागितली नसल्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही व त्यास ते स्वत: जबाबदार आहेत. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांचेकडून माहिती घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १२८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपशिक्षणाधिकारी यांचेकडे Maharashtra Educational Institutional Transfer of Management Act, १८७१ च्या अंतर्गत कलम ३,४,५ प्रमाणे संस्थेच्या हस्तांतरणा बध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.८.२००८ रोजी आपणास ज्या शाळेच्या आदेशाच्या प्रती पाहिजे आहेत त्याबाबत संस्थेचे नांव व शाळेचे नांव आदेशाचा दिनांक व क्रमांक या कार्यालयास कळविल्यास उपलब्ध माहिती आपणास देता येईल असे कळविलेले दिसून येते. मात्र, अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती शाळा हस्तांतरणाच्या अंतर्गत झालेल्या निर्णयाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र



त्यांनी Maharashtra Educational Institutional Transfer of Management Act, १८७१ संबंधाने माहिती मागितली होती व ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. जन

माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे जी माहिती आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांना पुन्हा शोध घेवून अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे संस्थेचे हस्तांतरण झालेले असल्यास ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्या करीता अपीलकर्ता यांचे अपील अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक १२९/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांचेकडे शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग दिनांक ३१.१२.२००२ अन्वये उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयात त्यांच्या नियंत्रणात असलेल्या संपूर्ण जिल्हयाचे अनुकंपा अंतर्गत प्रलंबित असलेल्या अर्जांची जिल्हावार माहितीच्या प्रमाणित प्रती मागितलेल्या दिसून येतात. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.९.२००८ रोजी माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षणाधिकारी (मा.) सर्व, नागपूर विभाग, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली यांचेकडे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते व प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येतात. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती शिक्षणाधिकारी (मा.) यांच्या अखत्यारित असल्यामुळे माहिती अधिकारी यांचे प्रतिपादन वास्तवास आधारित आहे. अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त करण्यासाठी ज्यांचे अभिरक्षेत आहे त्यांना संपर्क साधणे आवश्यक होते, ते साधल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

७. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रत्येक जिल्हयातील शिक्षणाधिकारी यांचेकडे असल्यामुळे व त्यांना तसे पत्र सुध्दा दिलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांची कार्यवाही केलेली आहे. परंतु, सदरची माहिती उपसंचालक यांच्या नियंत्रणाखालील अधिका-यांकडे असल्यामुळे ती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे हे जास्त संयुक्तिक झाले असते व



त्याप्रमाणे ती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२७/२००९ अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत मुख्याध्यापक यांचेकडून माहिती संकलीत करुन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपील क्रमांक १२८/२००९ हे अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांचेशी अपीलकर्ता यांनी संपर्क साधून त्यांच्या दिनांक ११.८.२००८ च्या अर्जातील माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२९/२००९ अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १०.९.२००८ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती संकलीत करुन विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक १३०/२००९**

**१) श्री गजानन दाजीबा गोन्नाडे,**
**मु.ब्रम्हपूरी, देलनवाडी वार्ड, हॅाटेल संस्कृती बार जवळ,**
**पो.ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग,**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे वरिष्ठ श्रेणीतील आदेशातील चुका दुरुस्तीबाबत माहिती देणे त्याकरीता ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाद्वारे द्यावी असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.९.२००८ रोजी उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ च्या प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगास नियमाचे पुस्तक दाखविले व त्यामध्ये त्यांच्या वेतन श्रेणीच्या संदर्भात त्यांच्यावर अन्याय कसा झाला आहे हे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यांची नियुक्ती झाल्यापासून १२ वर्षाच्या सेवेचा लाभ देण्यात यावा असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. ते १९७३ मध्ये डि.एड. झाले होते व डि.एड. नंतर १२ वर्षाची सेवा झाली असेल तर त्यांना बी.एड. समजण्यात यावे असे नियम आयोगास दाखविले. त्यांनी बी.एड. सुध्दा केलेले होते. त्यांनी बी.एड. केल्यामुळे त्यांना १२ वर्षाचा फायदा मिळणे आवश्यक आहे असे त्यांनी आयोगास



सांगितले. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे प्रकरण पुन्हा तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या माहितीच्या मागणी संदर्भात पुन्हा तपासणी करुन त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत तपशिलात माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४४/२००९**

**१) श्री देवाभाऊ बी. उराडे,**
**मु. विद्याविहार कॅालनी सिंदेवाही,**
**ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(आस्थापना)**
**विकास शाखा, आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी (प्रशासन)**

**आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन८ आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे वर्ग ३ कर्मचा-यांच्या संदर्भामध्ये सन २००० ते २००८ पर्यंतच्या टिपणीच्या सत्यप्रती वगैरे .. एकुण १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.१.२००९ रोजी दिलेला दिसून येतो. व जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दिनांक २७.११.२००८ रोजी पोस्टाने प्राप्त झाला आहे व त्यामुळे विहित मुदतीत म्हणजेच दिनांक २२.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचा अतिरिक्त खर्च रुपये ४५६/- जमा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याच्या संदर्भात कळविण्यात आले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतलेली नाही.



सदरची कार्यवाही ही विहित मुदतीत केलेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश जर असेल तर अपीलकर्ता यांनी सदरची माहिती करीताचे शुल्क भरलेले नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी मागितलेले अतिरिक्त शुल्क रुपये ४६५/- चा भरणा केल्यावर १५ दिवसांचे आंत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४६/२००९**

**१) श्री विरेन्द्र चंपालाल संकलेचा,**
**गणपती वार्ड, मु.पो.ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर पालिका आर्वी, ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, नगर पालिका आर्वी,**
**ता. आर्वी, जिल्हा वर्धा.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर पालिका आर्वी यांचेकडे करमरकर चौक ते गांधी चोक (जुना वर्धा रोड) शिवाची चौक ते गांधी चौक नगररचनाकार प्रमाणे या रोडची लांबी, रुंदी रेकॉर्डसह देण्यात यावी व त्या रेकॉर्डचा नकाशा देण्यात यावा. व रेकार्ड प्रमाणे इतर विवरण देण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. सहाय्यक माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती बांधकाम विभाग कार्यालयात शोधली असता ती सापडली नाही. सदरची माहिती शोधण्याकरीता २० दिवसांचा कालावधी निघून गेला. त्यानंतर निलंबित न.प.कनिष्ठ अभियंता श्री सुरेंद्र छांगाणी यांना सदर माहिती विचारली असता त्यांचेकडून असे कळले की, ही माहिती बांधकाम विभाग कार्यालयात उपलब्ध नाही. श्री सुरेंद्र छांगाणी त्यांच्या निलंबनानंतर पुण्याला राहात असल्याने त्यांचेशी संपर्क साधण्यांस १२ दिवसाचा कालावधी लोटला त्यामुळे ही माहिती ३० दिवसांच्या आंत देवु शकलो नाही. परंतु नंतर दिनांक ५.१२.२००८ ला स्वत: श्री सुरेंद्र छांगाणी हे कार्यालयात येवून सदर माहिती कार्यालयात दाखविले व त्याच दिवशी श्री विरेंद्र



संकलेचा यांना माहिती देण्यात आली, असा खुलासा केलेला आहे. व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले असा आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मागितलेली माहिती मिळालेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती उपलब्धच नाही त्यामुळे तशी देता येत नाही. तसे असल्यास अपीलकर्ता यांना सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली रस्त्याच्या संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १४५/२००९

१) श्री हरिदास नानाजी वायगोकर,
प्लॅाट नं.४३/अ, विश्वकर्मा नगर,
रोड नं.३, नागपूर-४४००२७.	अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त,
महानगर पालिका, नागपूर.	उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखा वित्त अधिकारी,
महानगर पालिका, नागपूर.	उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, महानगरपालिका नागपूर यांना माझ्या स्वतःच्या पेन्शन केसची ऑफीस नोट तथा कार्यालयीन कागद पत्र या सर्वांची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१२.२००८ नुसार माहिती देण्यात आली त्यात अर्जदाराच्या सेवा निवृत्तीबाबतची नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडून या विभागास प्राप्त झाली नाही. तसेच अर्जदाराने दिनांक १०.१०.२००८ ला सादर केलेला अर्ज हा माहितीच्या अधिकारा अंतर्गत विहित नमुन्यात सादर केलेला नव्हता. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १९.१.२००९ ला ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला होता. परंतु दिनांक १६.१.२००९ ला अर्जदाराला माहिती पुरविली आहे असे दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांच्या पेंन्शनच्या नस्तीची कागदपत्रे मिळाली नाही. त्यांच्या दिनांक १०.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांच्या सेवा निवृत्तीच्या नस्तीच्या संदर्भातील कागदपत्रांचा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता

(पान २ वर..)



यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या पेंन्शनच्या संदर्भातील नस्तीचा शोध हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत घेण्यात येवून संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकिय कारवाई करण्यात यावी. व

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२)    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४९/२००९**

**१) श्री महेंद्र नामदेवराव तोटावार,**
**गुरुदेव वार्ड, चिमुर, ता.चिमुर, जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे कार्यालयामध्ये त्यांचे पत्र दिनांक २६.५.२००८ व २०.८.२००८ च्या संदर्भात झालेल्या चौकशीची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.३.२००९ रोजी देण्यात आला असून कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या सत्यप्रती त्यांना सदरच्या निर्णयासोबत पुरविण्यात येत आहे. तक्रार अर्जाच्या संदर्भात वेगळी कार्यवाही सुरु आहे. व त्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.११.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक १६०/२००९**

**१) श्री राजेश पोचम रादंडी,**
**मु.सिरोंचा, ता.सिरोंचा, मन्नेराजाराम मोहल्ला वार्ड क्रं.४,**
**मु.पो.ता. सिरोंचा-४४२५०४, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, सिरोंचा, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती, सिरोंचा, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे डी.पी.ई.पी. अंतर्गत शाळा बांधकाम बाबत सविस्त माहिती एकुण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.११.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती १८ वर्षे ९ महिने एवढया कालावधीतील माहिती विहित कालावधीत पुरविणे शक्य होत नाही. शाळा इमारती बांधकाम ग्राम शिक्षण समिती मार्फत केल्या जात असल्यामुळे बांधकामांचा हिशोब शाळा स्तरावर ठेवल्या जातो. त्यामुळे बांधकाम करणा-या संबंधीत शाळांना माहिती पुरविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी दिनांक २५.१०.२००८ रोजी केंद्र प्रमुख सर्व केंद्र सिरोंचा/ आरडा/ नदिकुडा/ अंकिसा/ आसरअली/ झिंगानूर/ रंगयापल्ली/ टेकडाताला/ रेगुंठा तसेच संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती सिरोंचा यांना सुध्दा पत्र दिलेले आहे व पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली आहे. त्यानंतर दिनांक २४.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र नोट शिट वर माहिती अपीलकर्ता यांच्या पत्यावर तामील करण्यास पाठविणे योग्य राहील असे नमुद केलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे उपलब्ध झालेली माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांच्या पत्यावर पाठविण्यात आली होती. परंतु



अपीलकर्ता यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. व त्यांना संपूर्ण माहिती पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु इतरांकडून माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे ती आजही उपलब्ध करुन देता येत नाही. अपीलकर्ता यांची माहिती मुळात १८ वर्ष ९ महिन्याची असल्यामुळे व वेगवेगळया शाळेकडे असल्यामुळे संकलीत करणे हे जिकरीचे आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता परंतु संपर्क होऊ शकला नाही असे नमुद केले आहे. अर्जदारांला कळविले होते परंतु अपीलकर्ता माहिती घेण्यास आले नाही. व माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती घेण्यास जाणे आवश्यक होते. परंतु

अपीलकर्ता यांनी ३० दिवसांचे आंत कोणत्याही प्रकारचा संपर्क साधलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १६३/२००९

**१) श्री रामचरण कुसनाजी कुंभरे,**
**ह.मु. नागभिड, परधान मोहल्ला,**
**ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी, पं.स. नागभिड,**
**ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,**
**ग्राम पंचायत वलनी, ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत वलनी यांचेकडे सौ. रेखाताई दयाराम मडावी यांचे अतिक्रमण कोणत्या गट सर्वे नं. मध्ये आहे. त्यांनी केलेले अतिक्रमण कोणत्या तारखेस काढण्यात आले. सौ.रेखाताई दयाराम मडावी हयांनी अतिक्रमण केलेल्या जागेवर सभामंडपाचा पाया कोणत्या तारखेस बांधण्यात आला अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु सदर इसम गांवात राहात नाही त्यामुळे पत्र देता आले नाही असा शेरा ग्राम पंचायत शिपाई यांनी दिलेला दिसून येतो. विहित मुदतीत माहिती प्राप्त झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१२.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश सूचना ग्राम पंचायत यांना दिलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते स्वतः त्याच गावात राहातात परंतु जन माहिती अधिकारी तथा सचिव हे त्यांचे कार्यालयात कधीही उपलब्ध होत नाही. व कोणत्याही प्रकारची कामे असली तर त्यांचे मागे फीरावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी ते मिळणार असे कळल्यावर त्या ठिकाणी ते कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकुण घेण्यास नकार देतात व काय

( पान २ वर..)



करायचे ते करा असेही म्हणतात असे सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची व इतरांची कोणतेही कामे या ग्राम पंचायत कडून होत नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १७.१०.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिलेल्या पत्यावर पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १४.७.२००९** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक १६२/२००९**

**१) श्री प्रकाश दादु शहारे,**
**मु. तुमसर, पो. तेढा, ता.गोरेगांव, जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. गोरेगांव,**
**ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,**
**पंचायत समिती, गोरेगांव, ता. गोरेगांव,**
**जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी यांचेकडे ओटीएसपी योजने अंतर्गत लाभार्थांना कोणकोणता लाभ दिला जातो. त्याचप्रमाणे वर्ष २००७-०८ या काळात वरील योजने अंतर्गत तालुक्यातील किती लाभार्थ्यांना किती विहिर व साहित्य वाटप करण्यात आले त्याची नावाची यादी मिळणेबाबत. तसेच एकाच गटासाठी विहिर व साहित्य वेगवेगळे नांव असल्यास साहित्य पुरविल्या वा योजना दिल्या जातात काय याची संपूर्ण माहिती व्यक्तीशः घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध इ ाली नाही म्हणून दिनांक १७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ५.१२.२००८ रोजी  कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग, नागपूर यांनी सदरचे प्रथम अपील हे परत करुन मुळ अर्जासोबत परत करण्यात आलेले आहे. व प्रथम अपील हे त्याच कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल करणे आवश्यक असते असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.१२.२०८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी प्रकाश दादु शहारे यांना माहितीचा खर्च रुपये ९००/- होतात. त्याचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अर्जदार हे

( पान २ वर ..)



बी.पी.एल. असल्यामुळे माहितीच्या खर्चाची आकारणी करता येत नाही असे शेरे दिलेले दिसून येते. त्यानंतर मात्र माहिती प्राप्त झाली असे दिनांक १७.३.२००९ रोजी प्रकाश दादु शहारे यांचे सहिने शेरे दिसून येतात. त्यावरुन माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)  अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १६१/२००९

१) सौ.विशाखा मनोज मेश्राम,
मु.पो. कनहाळगांव, ता. मोहाडी, जि. भंडारा. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पं.स.मोहाडी, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कन्हाळगांव, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.१००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी त्यांचे निवेदन दिनांक ६.७.२००९ अन्वये तक्रार मागे घेत आहे असे आयोगास लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास प्राप्त आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ८६५/२००८
अपील क्रमांक ८६६/२००८

**१) श्री विष्णु राधेश्याम चौधरी,**
**१०४, अष्टविनायक आस्था, WCL Rescue Station समोर,**
**कल्पना नगर, नारी रिंग रोड, नागपूर-४४००२६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२..११.२००८ व दिनांक ११.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००८ रोजी सदरची दोनही प्रथम अपीले जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे तात्पुरता परमिट कायमचा करण्याबाबत मौजा सावंगी देवली प.ह.नं.६२, ता. हिंगणा, खसरा नं. १८६ च्या संबंधात दिनांक १.४.२००५ पासून आजपर्यंत किती दिले अशी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक २८.५.२००८ व दिनांक ३०.५.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु उपलब्ध माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.८.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून अपीलार्थीने ज्या नमुन्यात माहिती मागितली आहे त्या नमुन्यामध्ये माहिती उपलब्ध नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २ (च) अन्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे अपील नामंजूर करण्यात आले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जो नमुना दिलेला आहेत त्या नमुन्यामध्येच

( पान २ वर ..)



त्यांना माहिती हवी आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी ज्या नमुन्यात माहिती मागितली त्या नमुन्यात माहिती उपलब्ध नाही. तसेच नमुन्यामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास कार्यालयाचा वेळ अधिक खर्च होऊ शकतो. तसेच नमुनयामध्ये माहिती तयार करुन दिल्यावर पुन्हा अपीलकर्ता यांचे समाधान होत नसते व ते खोटी माहिती दिली म्हणून आरोप

करीत असते व त्यामुळे जशी माहिती उपलब्ध आहे तशी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना यापेक्षा अजून माहिती हवी असल्यास सदरची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्तायांची दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांची दोनही अपीले माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४७०/२००८**

**१) श्री मुरलीधर पुंडलीकराव सहारे,**
**द्वारा श्री अशोक पानपावणे, बिनाकी मंगळवारी,**
**सिध्दार्थ विद्यालयासमोर, पोस्ट डॅा.आंबेडकर मार्ग,**
**नागपूर-१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन,**
**नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**पोलीस स्टेशन पाचपावली, नागपूर, जि. नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. सदरच्या द्वितीय अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.४.२००९ रोजी आयोगाने दिलेला आहे. अपीलाच्या निर्णयाच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब देवलकर हजर होते. व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री नामदेव माळवी हजर होते.अपीलाच्या निर्णयाच्या आदेशामध्ये अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती आयोगाची नोटीस आल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे जे अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय्य माहिती नंतर उपलब्ध करुन देण्यास घेण्यात आले त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार) ची शास्ती लादण्यात आली आहे. त्यावर पोलीस उपआयुक्त, श्री ज.कृ.कानडे यांनी दिनांक १५.६.२००९ रोजी खुलासा दाखल केला आहे. व त्यामध्ये खुलासा करताना अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीचा अर्ज हा पोलीस निरीक्षक पाचपावली यांचेकडे केलेला नव्हता तर तो जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेला होता. तसेच प्रथम अपील त्यांनी पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य पोलीस खाते नागपूर शहर यांचेकडे केलेला होता. याचा अर्थ माहिती ही जर पोलीस निरीक्षक यांचेकडे आहे तर निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज व अपील मात्र पोलीस आयुक्त यांचेकडे म्हणजेच अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणताही अर्ज किंवा अपील सादर केलेले नव्हते.

आयोगाचे कार्यालयातून पोलीस उपआयुक्त व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना जन माहिती अधिकारी म्हणून व प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून जरी नोटीस काढण्यात आलेली तोती तरी ती नोटीस ही अपीलकर्ता यांनी त्यांच्या राज्या माहिती आयोगाचे कार्यालयात दिलेल्या अपील मेमोमध्ये नमुद केल्याप्रमाणे काढण्यात आलेली होती. यावरुन अपीलकर्ता यांनी पुन्हा तीसरी विसंगती केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडून सदरचा अर्ज हा विलंबाने जन माति अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकडे प्राप्त झालेला होता. व त्यामुळे सदची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब मात्र अपीलकर्ता यांनी मान्य केली. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकडे सुध्दा अर्ज केला होता. परंतु त्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती दिली नाही.



याचा अर्थ अपीलकर्ता हे एकुणच माहिती ही अनेक अधिका-यांकडून मागत आहे असे दिसून येते. व त्यावरुन ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे तंतोतंत पालन करीत नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

उपआयुक्त यांच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविले आहे असे दिसून यते. ते पुन्हा जून्या कागदपत्रांची छाननी केली असता अर्जदारास आवश्यक असलेली माहिती मिळाल्याने अर्जदारास फोन क्रं.९९७०९१३४६६ वर संपर्क करुन माहिती घेवून जाण्यास सांगितले असता त्यांनी म्हटले की, मैं नही आ सकता, व त्यामुळे दिनांक २४.४.२००९ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आली. यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी व शोध घेण्यासाठी अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे होत नाही, असा खुलासा त्यांनी दाखल केलेला असल्यामुळे व मुळातच अपीलकर्ता यांनी ज्या अधिका-याकडे माहिती मागितली त्या अधिका-यांकडे

माहिती नसल्यामुळे उपआयुक्त यांचा खुलासा मान्य करण्यात येत असून अपील क्रमांक ४७०/२००८ मधील निर्णयातील आदेश क्रमांक १ हा रद्य करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपील क्रमांक ४७०/२००८ मधील दिनांक २३.४.२००९ च्या निर्णया मधील आदेश क्रं. १ हा रद्य करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५६/२००८**

**१) श्री मोहनकुमार (संतोष) नत्थुजी ठाकरे,**
**रा.ब्राम्हणटोली (महालगांव) पो. बपेरा,**
**ता. तुमसर, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत देवरी देव, ता. तुमसर, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे मार्फत सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे ग्राम सभा व मासिक सभा यांचे प्रोसेडिंग नकल प्रत, ग्रामसभा उपस्थितांच्या हजेरी पटाची झेरॉक्स प्रत यासह एकुण चार मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालील दाखल जोडलेला आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १८.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. वास्तविक दिनांक ९.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी जे अपीलकर्ता यांना पत्र दिलेले आहे ते स्वयंस्पष्ट आहे व पत्राचे अनुषंगाने प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा विचार न करता निर्णय दिलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक १६७/२००९**

**१) श्री शांताराम दशरथ पौनीकर,**
**बी.एस.एन.एल.क्वार्टर क्रं.३, जयंत टॉकीज मागे,**
**चंद्रपूर-४४२४०२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी , पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक१२.२.२००९रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय

अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी यांना आयोगाकडून नोटीस दिलेली नसल्यामुळे ते उपस्थित नाही. नोटीस ही पोलीस अधीक्षक कार्यालय यांना काढण्यात आलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती घेवून सादर केली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले.

२. अपीलकर्ता यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रामनगर, चंद्रपूर यांचेकडे अर्ज दाखल केला होता. परंतु प्रथम अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे पोलीस अधीक्षक कार्यालय अशा प्रकारचे नमुद केलेले असल्यामुळे नोटीस तशी काढण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, पोलीस स्टेशन रामनगर चंद्रपूर यांचेकडे दिनांक २.२.२००५ रोजी श्री प्रकाश मुर्लीधरराव मोगरे यांनी माझे विरोधात पोलीस स्टेशन, रामनगर चंद्रपूर येथे दाखल केलेल्या तक्रारीची तसेच त्यांचे लेखी बयान व त्यांनी पैसे मिळण्याबाबत पो.स्टे.मध्ये लिहून दिलेल्या व समझोत्यावर सही केलेली व घटनेची माहितीच्या सविस्तर सत्यप्रती मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.१०.२००७ रोजी पोलीस निरीक्षक यांनी आपला अर्ज दिनांक १५.२.२००७ तसेच दिनांक २.७.२००७ अन्वये पोलीस स्टेशन रामनगरला मागितल्याप्रमाणे पोलीस स्टेशन रामनगर जावक क्रमांक ५०४/२००७ दिनांक ७.३.२००७ अन्वये तसेच जावक क्रमांक १५५६/२००७ दिनांक २०.७.२००७ अन्वये आपण मागितलेली माहिती आपणास पाठविली आहे. करीता आपणास माहितीस पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक २.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००७ व दिनांक १४.२.२००८ अशा प्रकारचे अर्ज केलेले दिसून येतात. व त्यामुळे त्यांना आपल्या विरुध्द प्रकाश मुर्लीधरराव मोगरे यांनी पोलीस स्टेशन रामनगर येथे दिनांक २.२.२००५ रोजी तक्रार दिल्याची नोंद नाही. तसेच श्री माधव पंचम भानारकर यांनी दिलेल्या रेकार्डवर प्रकाश मोगरे यांनी सही केलेली आहे परंतु त्यांनी आपल्या विरुध्द तक्रर केल्याची नोंद दिसून येत नाही. आतापर्यंत आपण मागितलेली माहिती दिनांक ७.३.२००७, २०.७.२००७ व दिनांक २६.१०.२००७ अन्वये आपणास दिलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीले सुध्दा बरेच दाखल केलेले दिसून येते. व त्या अनुषंगाने दिनांक ५.५.२००८ रोजी सुध्दा शासकिय माहिती अधिकारी तथा पोलीस



उपअधीक्षक, चंद्रपूर यांनी दिनांक १७.४.२००८ च्या अपील अर्जान्वये दिनांक २.२.२००५ रोजी कोणत्याही प्रकारे तक्रार दिल्याची नोंद दिसून येत नाही. तसेच अर्जदार माधव पंचम भानारकर यांनी आपल्या विरोधात दिनांक ७.१.२००५ रोजी तक्रार दिल्याची नोंद आहे. श्री माधव भानारकर यांनी दिलेल्या तक्रारीची व समझोत्याची प्रत पाहिजे असल्यास या कार्यालयात संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना वारंवार चुकीची माहिती दिल्या जाते.

४. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांची सुनावणी सुध्दा झालेली आहे. त्यात दिनांक ३.११.२००८ रोजी संपूर्ण चौकशी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यात दिनांक २.२.२००५ रोजी प्रकाश मोगरे यांनी आपल्या विरोधात दिलेली लेखी तक्रार व त्याबाबतचा समझोता अशी कोणतीही तक्रार अगर गुन्हा दाखल नसल्यामुळे रेकार्डवर उपलब्ध नाही वगैरे.. कळविण्यात आले आहे. दिनांक ३१.१०.२००८ रोजी सुध्दा नोटीस पाठविलेली दिसून येते. दिनांक ४.७.२००८ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांनी उप पोलीस अधीक्षक श्री रुडे यांनी अर्जाच्या संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५.	द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक २.२.२००५ रोजी पोलीस स्टेशन मध्ये बोलाविण्यात आले होते व त्यांच्याकडून रुपये ३०,०००/- घेण्यात येवून समझोता करुन त्यांचेकडून रुपये ३०,०००/- घेण्यात आले. तसेच सदरचा समझोता सुशील पंत यांनी त्यांचे फाईलला लावून बॅग मध्ये टाकला व श्री मागरे यांची सही त्या समझोत्यावर आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल केली नाही व म्हणून त्यांनी सदरची माहिती मागितलेली दिसून येते.

६.	परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध होते. जी माहिती उपलब्ध नाही ती उपलब्ध करुन देता येत नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००५ ची तक्रार मागितली होती. दिनांक ७.१.२००७ च्या तक्रारीची चौकशी त्या दिवशी झालेली असावी असे अपीलकर्ता यांचे युक्तीवादावरुन दिसून येते व त्यामुळे दिनांक २.२.२००५ रोजी कोणत्याही प्रकारची तक्रार झालेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे.अपीलकर्ता यांचे म्हणणे क्षणभर मान्य केले तरी जी माहिती अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक १६८/२००९**

**१) श्री केशव गोविंद तिजारे**
**मोदी नागसेन नगर, कामठी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय

अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयामध्ये श्री के.के. बावणे, सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ नागपूर यांचे प.क्रं.दिनांक ३०.११.२००६ च्या पत्राची प्रमाणित प्रत देण्यात यावी . तसेच शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी तरी संबंधीतावर त्वरीत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी व कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा असा दिनांक ४.१२.२००६ च्या पत्रात आहे. त्या पत्राप्रमाणे अहवालाची प्रमाणित प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१०.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालयामध्ये सदरचा अर्ज पाठविला आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ११.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१.२००९ रोजी देण्यात आला आहे व त्यात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज

( पान २ वर ..)



करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

नागपूर

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १६९/२००९

**१) श्री एस.एस. रोकडे,**
**१३२, सम्यकनगर, नारी रोड, नागपूर-२६.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**नवप्रतिभा हायस्कुल, गोठणगांव, ता. कुही, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नवप्रतिभा हायस्कुल, गोठणगांव यांचेकडे शिपाई श्री दहाट यांचे बध्दलची माहिती एकुण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी सुध्दा एकुण ५ मुद्यांमध्ये मागितली होती. त्यासंदर्भातील अपील क्रमांक ९/२००९ हे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते. परंतु त्या अपीलाची सुनावणी दिनांक २.७.२००९ रोजी होऊन सदरचे अपील हे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात आले होते. परंतु ही बाब अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणलेली नाही. तसेच मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगाचे निदर्शनास आणलेली नाही. परंतु अपीलकर्ता एकच माहित वारंवार निरनिराळया अर्जांचे माध्यमातून मागून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना वेठीस धरीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व तसेच आयोगास सुध्दा वेठीस धरत आहे, असाही निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७९/२००९**

**१) श्री हरी दाजीबा लंजे,**
**दांडेगांव, पो. भागडी, ता. लाखांदूर, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण कार्यालय,**
**बोकारे बिल्डींग, रामनगर, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण कार्यालय,**
**बोकारे बिल्डींग, रामनगर, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, चंद्रपूर यांचेकडे एस.टी.सी.मु.नं.१६/९९ मध्ये दाखल केलेल्या पुरावा पत्राकडे व तोंडी माहितीकडे व युक्तीवादाकडे डोळेझाक व पदाचा दुरुपयोग करुन माझी केस बेकायदेशिरपणे खारीज केल्याबाबत. माहितीचा कालावधी सन ९९ ते ४.१२.०७ व ३०.७.०८ पर्यंत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन एकुण १० मुद्यांमध्ये केले आहे. सदरच्या सर्व मुद्यांमध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या शाळा न्यायाधिकरणाकडे केलेल्या अपीलात दाखल केलेल्या कागदपत्रांची दखल कां घेण्यात आली नाही व तसेच पुरावा पत्रावर वेळोवेळी कोणते आदेश पारित केले व कोणता निर्णय घेण्यात आला याची तपशिलात विस्तृत माहिती प्राप्त व्हावी. तसेच सदर पुरावा पत्राचा आपल्या निकाल पत्रात कशाप्रकारे कोणत्या अर्थाने वापर करण्यात आला व कोणत्या कारणाने वापर करण्यात आला नाही. मला माझे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे की नाही. याची मुद्येनिहाय व तपशिलवार माहिती प्राप्त व्हावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आपणास आवश्यक माहिती तयार करण्यात आली असून आपण या कार्यालयात प्रत्यक्ष येवून माहिती पुरविण्याची योग्य फी भरुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी माहिती देण्यात आली नाही या कारणास्तव प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.२.२००९ रोजी देण्यात आला असून वरील आदेशात नमुद केल्याप्रमाणे दिनांक ११.१२.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ ते ११ ची माहिती घेण्याकरीता या कार्यालयाचे पत्र क्रमांक १४, दिनांक ७.१.२००९ नुसार आपणास कळविण्यात आले होते. ते या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच अपील अर्जातील अनुक्रमांक १ मधील १ ते ११ ची कागदपत्रे विहित शुल्क भरुन घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी एस.टी.सी. मु.नं.६६/९९ मध्ये कागदपत्रे

( पान २ वर ..)



दाखल केली होती, त्या कागदपत्रांची पुरावा म्हणून दखल न घेता निर्णय दिलेला आहे व त्यामुळे त्यांनी तशा प्रकारे माहिती मागितलेली आहे व जी माहिती मिळाली आहे ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती अतिरिक्त शाळा न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या संदर्भात असल्यामुळे विश्लेषण देता येत नाही. मात्र कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये सुध्दा अपील दाखल केले होते परंतु सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे असे अपीलकर्ता यांनी सुध्दा सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे हे त्यांचे म्हणणे मान्य करण्यात येवून त्यांना नोकरी मिळावी असे दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८०/२००९**

**१) श्री देह राजेरामजी खेडकर,**
**मु. आकोली, पो.ता.कुही, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**ता. उमरेड, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**कुही, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुही यांचेकडे दिनांक २०.४.२००८ रोजी इस्तगासा क्रं.७७/०८ कलम, १०७,११६((८) जा.पो.प्रमाणे इ

ालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.११.२००८ रोजी देण्यात आला असून आपणास हवी असलेली माहिती या कार्यालयात उपस्थित होऊन प्राप्त करुन घ्यावी. तसेच आपले संदर्भिय दोनही अर्ज हे माहितीच्या अधिकारांतर्गत मोडत नसल्यामुळे दोनही अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००८ रोजी एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न
झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत इसमाच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवही अजूनपर्यंत झालेली नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, पोलीस कार्यालयातून तहसिलदार यांचेकडे इस्तगासा प्रकरण आल्यानंतर संबंधीत व्यक्तीस समन्स पाठविले जातात. परंतु संबंधीत व्यक्ती त्या पत्यावर राहात

( पान २ वर ..)



नाही म्हणून पत्र परत आलेले आहे. व त्यानंतरही प्रत्यक्ष समन्स पाठविला तरीही त्या पत्यावर राहात नाही असा शेरा आलेला आहे व त्यामुळे इस्तगासा प्रकरणात त्यांच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही आतापर्यंत करता आली नाही. मात्र त्याबाबतची कागदपत्रे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली आहे. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे कार्यवाही झालेली नसल्यामुळे समाधान
झालेले नाही. आयोगापुढे सुध्दा अपीलकर्ता यांनी कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली. परंतु तहसिलदार यांच्या कार्यालयातून जी कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यावरुन सदरचे इसम त्या पत्यावर राहात नसल्यामुळे पुढील कार्यवाही होत नाही असे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, या सर्वांचे संगनमत आहे. असे असेल तर त्या प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची चौकशीचे आदेश देता येत नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)    अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७७/२००९**

**१) श्री विवेक मुरलीधरराव खोब्रागडे,**
**नन्नाशाह वार्ड, चोखा प्रा. शाळेजवळ, हिंगणघाट,**
**ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा, ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२.    अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे माहिती अधिकारी यांचेकडे जाहिरात देऊन संपूर्ण भरती प्रक्रिया पुर्ण केली, त्या शिपाई या पदाच्या

संदर्भातील माहिती मिळण्याबाबत एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१२.२००८ रोजी उपरोक्त अनुक्रमांक १,२,५ बाबतची माहिती महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ कलम ७(क) अन्वये देता येणार नाही. अनुक्रमांक ३ व ४ मधील परिपत्रक न्यायालयीन विभागास लागू होत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१.२००९ रोजी देण्यात आला असून प्रथम अपील हे खारीज करण्यात आले आहे . प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आदेश पारित केले असले तरी अपीलकर्ता सदरची माहिती घेण्यास उपलब्ध झाले नसल्यामुळे त्यांना त्या आदेशाची प्रत सुध्दा दिलेली नाही असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये पुन्हा पुरेसे स्टँम्प लावलेले नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. व तसेच अधिनियमाचे कलम ८(ज) प्रमाणे माहिती देता येणार नाही असे विवेचन केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरच्या परिक्षेमध्ये महिला भरती बाबत असले तरी एकही महिलेची निवड करण्यात आली नाही व त्यामुळे त्यांनी सर्व महिलांच्या संदर्भात माहितीच्या अधिकारात माहिती मागितली आहे व ती माहिती देण्यात आली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व महिलांची माहिती, नांवे व पत्ते इ. दिल्यास त्याचा गैरउपयोग होण्याची शक्यता आहे व त्यामुळे ते देता येणार नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, महिलांना ३० टक्के आरक्षण देण्यात यावे असे शासनाचे निर्दे असतांना ते निर्देश न्यायालयाच्या प्रशासकिय बाजूला लागू आहे किंवा नाही याबध्दलची चौकशी होणे आवश्यक आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या

( पान २ वर ..)



तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध होऊ शकतात. मात्र कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या युक्तीवादातील मागणी मान्य करता येत नाही. मात्र मा. न्यायालयामध्ये माहिती मागितली असताना न्यायालयातील माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा निरसित झालेला आहे याची जाणिव दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मा. न्यायालयाचे स्वतंत्र नियम आहे याबध्दलची माहिती अपीलकर्ता यांना सुध्दा नाही. तसेच कोणत्याही अर्जदारास अशा प्रकारची माहिती आहे अशा प्रकारचे दिसून येत नाही. त्यामुळे न्यायालयाच्या संदर्भातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमांच्या संदर्भामध्ये वेगळे नियम आहे याची जाणिव म्हणून जनतेला माहिती देणे आवश्यक आहे. व त्याबध्दलची प्रसिध्दी न केल्यामुळे अर्जामध्ये त्याबध्दलच्या त्रुटया काढणे हे कितपत योग्य आहे याचाही विचार न्यायाधिकरणाने करणे आवश्यक आहे.

असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित दिसून येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १६.७.२००९** **(विलास पाटील)**

राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८/२००९**

**१) श्री रामचरण कुशनाजी कुमरे,**
**परधान मोहल्ला नागभिड, ता.नागभिड, जि.चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, ब्रम्हपूरी यांचेकडे अ.जा.ज.अत्याचार प्रतिबंधक कायदयानुसार गुन्हयाचा तपास कोणी करायचा असतो. नागभिड गुन्हा रजिस्टर नं. ५४/२००८ क.

५०९, २९४, ५०४ भा.द.वि. सह क. ३(५) (१४) अट्रासिटीमध्ये रिमांड अप्लीकेशनची प्रत. रिमांड अप्लीकेशन लिहिणा-या अधिका-याचे नांव हुद्या अशी माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ५.१२.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपूरी यांनी मुद्या क्रमांक १ मध्ये पोलीस उपअधीक्षक या दर्जाचे अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास करणे कायदयान्वये बंधनकारक आहे असे कळविले. तसेच कलम ८ प्रमाणे माहिती पुरविता येत नाही असे मुद्या क्रमांक २ व ३ च्या संदर्भात कळविले. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारची गुप्तता राखण्याची आवश्यकता नाही व तसेच कलम ८ मध्ये देण्यात आले नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले

( पान २ वर ..)



की, अपीलकर्ता यांचा अर्ज ज्यावेळेस आला त्यावेळेस तपास सुरु होता त्यामुळे कलम ८ (६) चे अनुषंगाने तसे उत्तर दिलेले आहे. आता आरोप पत्र दाखल केलेले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही. व त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने त्यांच्या दिनांक ६.११.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९३/२००९**
**अपील क्रमांक १९४/२००९**

**१) श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर,**
**रामनगर वार्ड क्रं.९, गडचिरोली. ता.जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलांमध्ये अनुक्रमे दिनांक २७.१०.२००८ रोजी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली व दिनांक १७.११.२००८ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे शाखा अभियंता अरविंद बहादुरसिंग चौव्हाण, पं.स.गडचिरोली यांचे १० वी ची टी.सी. जातीचे प्रमाणपत्र व जातपडताळणी प्रमाणपत्र बाबत १९९६ ते आजतागायत. तसेच ४ थी, ७ वी व १० वी ची टी.सी. वैद्यता प्रमाणपत्र इ. माहिती मागितलेली दिसून येते. माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. दोनही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना त्या त्या कार्यालयामध्ये व ज्या कार्यालयामध्ये श्री चव्हाण हे होते त्या कार्यालयामध्ये त्यांची १० वी ची टी.सी. व जातीचे

प्रमाणपत्र उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच श्री ए.बी. चौव्हाण यांना सुध्दा पत्र दिलेले आहे, असे कळविलेले दिसून येते. दिनांक ३१.१०.२००८ अन्वये कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद गडचिरोली यांना सुध्दा कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे दिनांक १४.११.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयातून माहिती उपलब्ध नाही असे प्राप्त झाले. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद, चंद्रपूर, संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, मुल, शाखा अभियंता श्री ए.बी. चौव्हाण, पंचायत समिती, गडचिरोली यांना कळविण्यात आलेले होते व पत्राची प्रत ही अर्जदारास देण्यात आली. दिनांक ३१.३.२००९ अन्वये कार्यकारी अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना कळविण्यात आले. दिनांक १३.३.२००९ व २३.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली वगैरे.. यांना कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे कोणत्याही कार्यालयात सदरचे प्रमाणपत्र नाही असे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे दिनांक ९.१.२००९ व दिनांक २७.१.२००९ रोजी द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २७.९.२००९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले व दूस-या अर्जाच्या संदर्भातील प्रथम अपीलाच्या दिवशीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.१.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यात अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकुण ४५०० पानांसाठी रुपये ९,०००/-

( पान २ वर ..)



(रुपये नऊ हजार फक्त) भरणा करण्यासाठी कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीत रुपये ९,०००/- चा भरणा करतो असे अपीलकर्ता यांनी सांगितले. व तशा प्रकारे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येतो. दूस-या अपीलात एकुण २६ पाने व त्यासोबत सेवा पुस्तकाच्या प्रथम पान व आतील पानांच्या सत्यप्रती दिनांक २६.११.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिसून येते. मात्र, १० वी ची टी.सी., जातीचे प्रमाणपत्र, जात वैद्यता प्रमाणपत्र या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु दिनांक १२.३.२००९ रोजी अतिरिक्त आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी जात पडताळणी संदर्भात दिलेल्या निर्णयाची प्रत पुरविण्यात आली आहे असे दिसून येते.

४. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असली तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८९/२००९**

**१) श्री वल्लभदास दीपचंदजी डांगरा (माहेश्वरी),**
**एल.आय.जी.क्वार्टर नं. एल ३०(५०),**
**विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॅालनी, शांतीनगर, नागपूर-२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.आयुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त/वार्ड अधिकारी,**
**सतरंजी पुरा झोन,महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ रोजी सहा. आयुक्त तथा माहिती अधिकारी/वार्ड अधिकारी, महानगरपालिका यांचेकडे शांतीनगर वसाहतीतील गाळे धारकांनी गडर लाईनवर तसेच इतरत्र केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक

११.९.२००८ रोजी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी सुध्दा मुख्य माहिती अधिकारी/वार्ड अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला दिसून येतो. व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही प्रवर्तन विभागातील असल्यामुळे दिनांक २.६.२००७ रोजी प्रवर्तन विभागास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र देण्यात आले. अपीलकर्ता यांनी अतिक्रमण निवारण करण्याकरीता तक्रार केली होती व त्या तक्रारीची माहिती मागितली होती. त्याप्रमाणे दिनांक १२.६.२००७ रोजी त्यांना उत्तर देण्यात आले आहे. परंतु अजूनपर्यंत सुध्दा सदरची कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पाणी हे संस्थेच्या घरामध्ये शिरत असले तरी सर्व

( पान २ वर ..)



प्राधिकरणे हे टाळाटाळ करीत आहे, व एकाची जबाबदारी दूस-यावर टाकत आहे व कार्यवाही मात्र करीत नाही.

४. अपीलकर्ता यांना प्रवर्तन अधीक्षक यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी सुध्दा संदर्भातील अर्जाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येत आहे की, विभागीय लोकशाही दिनामध्ये शांतीनगर वसाहतीतील अतिक्रमण काढण्याबाबत म्हाडा व महानगरपालिका तर्फे संयुक्त कार्यवाही करण्याचे ठरविले. दिनांक २८.११.२००८ रोजी कार्यवाही करण्यासाठी सूचना नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना देण्यात आलेल्या आहेत, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी अतिक्रमण केव्हा हटविण्यात येईल असे विचारलेले असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात ते केव्हा हटविले जाईल यासंदर्भात माहिती विचारता येत नसली तरी महानगरपालिका व म्हाडा यांनी संयुक्तपणे कार्यवाही करण्याचे ठरविलेले असल्यामुळे तशी कार्यवाही त्वरीत करणे आवश्यक राहील व अपीलकर्ता यांना त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १४.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने संपुर्ण कार्यवाही करण्याच्या संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १०

दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९१/२००९**

**१) श्री शंकर सितकुराजी उपासे,**
**सहकार कॅालोनी, गणेशपूर, भंडारा, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**प्रादेशिक दुग्ध शाळा व्यवसाय विकास अधिकारी,**
**तेलंगखेडी रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, भंडारा,**
**ता.जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, भंडारा यांचेकडे भंडारा जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघाचे पत्र क्रमांक १८६/२००६ दिनांक २२ मे, २००६ चे पत्राची प्रमाणित प्रत न्यायालयीन कामाने आवश्यक आहे. दिनांक २६.८.२००८ ला आपण मागितलेली माहिती न देता अनावश्यक माहिती दिली आहे,

अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घेणार असेही नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.१२.२००८ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, भंडारा यांचेकडे मागितलेली माहिती सद्यस्थिती उपलब्ध नाही व दस्तऐवजाचा उगम भंडारा जिल्हा दुध उत्पादक संघ यांचेकडे असून सदर माहिती अर्जदाराने स्वतः माजी कार्यकारी संचालक, भंडारा जिल्हा दुध उत्पादक संघ या नात्याने जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, भंडारा येथे पाठविली आहे. सबब माहिती विचारण्याचा हेतू स्पष्ट नाही. सदर माहिती जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, भंडारा येथे उपलब्ध नसल्याबाबत अर्जदाराला अपीलाचे सुनावणी दरम्यान अवगत करण्यात आले आहे. विचारलेल्या

( पान २ वर ..)



माहितीचा उगम श्री उपासे हे व्यवस्थापकिय संचालक भंडारा जिल्हा दुध उत्पादक संघ या पदावर कार्यरत असतांना दिनांक १ जानेवारी, २००६ ते जून २००७) जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय भंडारा येथील आहे. व यासंबंधाने अपीलादरम्यान सविस्तर चर्चा झालेली असल्यामुळे अपीलकर्त्यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. प्रथम अपीलाचा निर्णय स्वयंस्पष्ट आहे. व त्यामुळे सदरच्या पत्राच्या संदर्भात पोलीस तक्रार करणे आवश्यक आहे. तसेच संपूर्ण चौकशी करणे सुध्दा आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी पोलीस तक्रार करुन सदरची माहिती उपलध झाल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करणे आवश्यक आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या पत्राच्या संदर्भात ती उपलब्ध नसल्यास व प्रामुख्याने ती भंडारा जिल्हा दुध उत्पादक सहकारी संस्थेचे पत्र असल्यामुळे त्याबाबतची पोलीस तक्रार करण्यात येवून पोलीस चौकशी अंती माहिती उपलब्ध झाल्यास ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. पोलीस तक्रार हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

दिनांक १७.७.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक १९२/२००९

**१) सौ. सत्यभामाबाई बी. मेश्राम,**
**सुभाष वार्ड (दत्त मंदीराजवळ) भंडारा रोड,**
**मु.पो. वरठी, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**नोंदणी उप महानिरीक्षक/मुद्रांक उपनिबंधक,**
**नागपूर विभाग, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सहजिल्हा निबंधक/मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१(नि.श्रे.)**
**भंडारा. ता.जि. भंडारा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी माहिती अधिकारी, जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ भंडारा यांचेकडे श्री बी.बी. मेश्राम, शिपाई कार्यरत दु.नि.को. तुमसर यांचे मासिक वेतन कोणत्या महिन्यापासून देण्यात आले नाही, रक्कम नमुद करावी यासह एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. स्वतः व्यक्तीगत अर्ज देणार आणि स्वतः आपल्या ऑफिसला येवून अर्जाचे उत्तर घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.१२.२००८ रोजी श्री बी.बी. मेश्राम शिपाई यांना दिनांक १.८.२००८ पासून वेतन देण्यात

आले नाही. एकुण वेतन रुपये २७०९५/-. रजा मंजूर करणारे प्राधिकारी याची पूर्व परवानगी न घेता परस्पर रजेवर गेल्यामुळे त्यांची दिनांक १.८.२००८ चे वेतन देण्यात आले नाही. व दिनांक २.८.०८ पासून कार्यालयीन उपस्थिती अहवाल प्राप्त न झाल्यामुळे पुढील कालावधीचे वेतन या स्तरावरुन अदा करण्यात आलेले नाही. दुय्यम निबंधक यांचेकडून वेळे पर्यंत रुजू अहवाल प्राप्त न झाल्याने, वेतन स्थगीत ठेवण्यात आले. परंतु जास्त विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे हजेरी बुकाची झेरॉक्स मागवून प्रत्यक्ष हजर असलेल्या कालावधीचे वेतन काढून त्यांचे वैयक्तिक खाजी जमा केल्यामुळे भूखमारीची समस्या निर्माण

झाली म्हणण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या

( पान २ वर ..)



माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून सदर निर्णयात अपीलार्थीचे समाधान झाल्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णय सुध्दा योग्य आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०६/२००९**

**१) श्री गुरुदास बापुरावजी पाटील,**
**मु.पो. लुंबीनी नगर, नाचणगांव रोड,**
**पुलगांव, ता. देवळी, जिल्हा वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),**
**जिल्हा परिषद, वर्धा, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत विभाग,**
**जिल्हा परिषद, वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००८ दिनांक २.६.२००८रोजी लोकशाहीदिनी नागरीकांनी ग्रामपंचायत कार्यालय, नाचणगांव बाबत सादर केलेली नाकरीक तक्रार (टो.क्रं.१५२७) ची आपल्या ऑफिसने केलेला तपासणी अहवाल आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती एकुण ५ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.१२.२००८ रोजी आपण माहितीचा अधिकारात ग्रामपंचायतनी तयार केलेल्या बनावट दस्ताऐवजाच्या पुराव्यासह तक्रार नोंदविली असता आजवर त्यांच्यावर फौजदारी दाखल करण्याबाबत पोलीस विभागाला शिफारस कां करण्यात आली नाही याबाबत आपण प्रश्न केलेला आहे. माहितीच्या अधिकारात आपण दस्तऐवजाची मागणी करु शकता

परंतू हयाबाबतचे प्रश्नाचे उत्तर देवू शकत नाही. सदर प्रकरणात कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही होताच आपणास माहिती दिली जाईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.२.२००९ रोजी देण्यात आला असून वरिष्ठ अधिकारी योग्य तो निर्णय देईल असे सूचविण्यात आले. वरिष्ठांकडे अहवाल सादर केला आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही होईल असे आदेश देवून सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. अर्ज केला

( पान २ वर ..)



त्यावेळेस अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीच्या संबधात माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु आता दिनांक २३.३.२००९ रोजी सदरच्या अहवालाप्रमाणे विभागीय आयुक्त, नागपूर यांनी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. चौकशी अहवाल व विभागीय आयुक्त यांचा निर्णय उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना चौकशी अहवाल व विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०९/२००९**

**१) श्री नारायणलाल गजानन पशीने,**
**टिळक वार्ड, महाल रोड, भंडारा, ता.जि.भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
**नगर परिषद, भंडारा, ता.जि.भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी, नगर परिषद, भंडारा यांचेकडे जितेंद्र आणि विवेक केमलकर यांना आपण दिलेल्या बांधकामाचे परवानगीबध्दल एकुण ११ मुद्यामध्ये प्रश्नाचे स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.९.२००८ रोजी माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.१.२००९ रोजी दिलेला असून उपअभियंता बांधकाम श्री ढवळे यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न

झाल्यामुळे अपीलीकर्ता यांनी दिनांक राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु जी प्रश्नांची उत्तरे दिलेली आहे ती समाधानकारक नाही व नकाशा जो दिलेला आहे तो चुकीचा आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कार्यालयात जो नकाशा उपलब्ध आहे तो उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच अपीलकर्त्यांच्या सर्व मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, ती प्रश्नार्थक असल्यामुळे काही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देता आली

( पान २ वर ..)



नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे तसेच उपलब्ध करुन दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे उपलब्ध असते तशी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या जाते. त्यात गुणवत्तेच्या बाबत कोणत्याही प्रकारची तपासणी ही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे कोणतेही शहानिशा न करता माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे ठोकळेबाज निर्णय दिलेला आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल होतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती देता येईल किंवा नाही किंवा माहिती दिलेली आहे याबाबतची शहानिशा करणे आवश्यक असते. कनिष्ठ कर्मचा-याने लिहून आणलेला निर्णयावर सही करणे असे अपेक्षित नाही. यापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचे विश्लेषण करुन निर्णय देणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक २०७/२००९

**१) श्री  धनंजय मधुकरराव गद्रे,**
**गद्रेवाडा, हर्षा वरणान आखाडा, कोठा रोड,**
**महाल, नागपूर-४४००३२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक,**
**(स्लम विभाग), महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रकल्प संचालक (स्लम विभाग) यांचेकडे एकुण ५ मुद्यांवर स्लम एरियाबध्दल माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.१२.२००८ रोजी देण्यात आलेला असून ८ दिवसांचे आंत माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१२.२००८ रोजी स्लम साईट बध्दलची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, १९७६ च्या नोटीफिकेशन प्रमाणे नकाशा नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना नोटिफिकेशनची प्रत दिलेली आहे व त्याच वेळेस तयार केलेल्या नकाशाची प्रत दिलेली आहे. त्यामुळे माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यात अपीलकर्ता यांना जर चुक वाटत असेल तर त्यांनी सक्षम प्राधिका-याकडे तक्रार केल्यास सदरच्या नकाशाची दुरुस्ती होऊ शकते. परंतु माहितीचा

( पान २ वर..)



अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती उपलब्ध आहे तशी ती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास प्राप्त आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०३/२००९**

**१) श्री डॉ. मिलींद पंढरीनाथ जीवने,**
**नवा नकाशा, स्वास्तिक शाळेसमोर,**
**लष्करीबाग, नागपूर-४४००१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय,**
**भंडारा. ता.जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२०८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडे आपणाकडे महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक वसाहत कायदा १९६५ अंतर्गत कलम ३०९ अन्वये अर्ज दिनांक ६.५.२००८ आणि स्मरणपत्र दिनांक २६.९.२००८ ला सादर केले. आपल्या कार्यालयाकडून हयासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे अर्ज करण्यात येत आहे., अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ४.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, डॉ. मिलींद जिवणे संस्थापक अध्यक्ष जीवक वेलफेअर सोसायटी, नागपूर यांनी दिनांक ५.२००८ ला जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०९ अन्वये त्यांनी नगर परिषद तुमसर येथे नाली सफाई करुन त्यातील निघणारा कचरा उचलण्याची रक्कम रुपये ८,१८,२२०/- नगर परिषद तुमसर कडून घेणे असल्याने ती मिळण्याबाबत अपील स्पीड पोस्टाने दाखल केल्याची तक्रार दिनांक २६.९.२००८ ला केलेली आहे. सदरचे प्रकरणातील ६.५.२००८ चे त्यांचे कलम ३०९ अंतर्गत अपील अर्ज या कार्यालयास प्राप्त झ ालेला नाही.

सदरचे पत्राची छायांकित प्रत या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणात नगर परिषद तुमसरचा संबंध असल्याने मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांना या कार्यालयाचे पत्र क्रं.कार्या १२/अका-२/नपाप्र/काvि/१०६०/२००८ दिनांक ३०.९.२००८ व यानंतरचे पत्र क्रं.कार्या-१२/अका-

२/नपाप्र/कावि/१२२७/२००८ दिनांक १०.१२.२००८ अन्वये अहवाल मागविण्यात आला, परंतु त्यांचेकडून दिनांक ८.७.२००९ पर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणात सुनावणी ठेवता आली नाही. नगर परिषद तुमसर यांचा अहवाल त्यांचे पत्र क्रं.तुन/साप्र/१०९/२००९, दिनांक २ जुलै, २००९ चे पत्र हया कार्यालयास दिनांक ८.७.२००९ ला

(पान २ वर ..)



प्राप्त झाले आणि त्वरीत कलम ३०९ अंतर्गत सदरचे प्रकरण सुनावणीसाठी ठेवण्यात आले व सुनावणीची तारीख २१.७.२००९ निश्चित करुन संबंधीत पत्र डॉ. मिलींद जिवणे संस्थापक अध्यक्ष जीवक वेलफेअर सोसायटी, नागपूर यांना पाठविण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०६ ते ३१२ पर्यंत राज्य शासनाला नियंत्रण ठेवण्याचे अधिकार कायदेशिर प्राप्त झाले आहे आणि याच कायद्यातील कलम ७४ नुसार जिल्हाधिकारी यांचे नगर परिषद प्रशासनावर नियंत्रण आहे. डॉ. मिलींद जिवणे संस्थापक अध्यक्ष जीवक वेलफेअर सोसायटी, नागपूर यांनी जो अर्ज सादर केला त्यामध्ये त्यांना रुपये ८,१८,२२०/- घेणे आहे. अशा उल्लेख आहे. परंतु मुख्याधिकारी यांचेकडून नुकताच प्राप्त झालेला अहवालानुसार रुपये ३,८३,५५५/- देणे आहे असे कळविले आहे. त्यामुळे सदरचा प्रकरणात जिवणे यांना नगर परिषदेकडून घेणे आहे व नगर परिषदेचा संपूर्ण रेकॉर्ड तसेच श्री जिवणे यांचेकडे असलेला रेकॉर्ड तपासणे आणि त्यानंतरच कायद्यतील तरतुदीनुसार निर्णय घेणे अभिप्रेत आहे.

डॉ. मिलींद जिवणे, संस्थापक अध्यक्ष जीवक वेलफेअर सोसायटी, नागपूर यांचे अर्जावर महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०९ अंतर्ग निर्णय घेण्याकरीता कार्यवाही करणे आवश्यक असल्याने श्री जीवणे यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती देता आली नाही. कारण सदरचे प्रकरणात अद्यापही निर्णय व्हायचे आहे. सुनावणीमध्ये निर्णय झाल्यानंतर त्यांना या प्रकरणातील माहिती आपोआपच मिळणार आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ३ अंतर्गत श्री जीवणे यांनी मागितलेली माहिती ही जिल्हाधिकारी यांना कलम ३०९ अन्वये कार्यवाही करण्याचा अधिकार आहे किंवा कसे या प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याने व याबाबतीत निर्णय घ्यावयाचा असल्याने संबंधीतास सदरहू कायद्याअंतर्गत ठरवून दिलेल्या मुदतीत माहिती देता आली नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणात माहिती अधिकारी दोषी नाहीत तथापी अर्जदार श्री जिवणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अर्ज डाकेने पाठविले असून माहिती कशाने पाठवावयाची आहे हे सुध्दा अर्जात नमुद केलेले नाही. त्यांनी या प्रकरणात अद्याप पावेतो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रथम अपील सुध्दा केलेले नाही असे दिसून येते. "

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक २१०/२००९
अपील क्रमांक २११/२००९

**१) श्री संजयकुमार एच. खोब्रागडे,**
**प्लॉट नं.१६/१८१, हुडको कॅालोनी, जरीपटका नागपूर-१४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(नि.),**
**म.रा.विज निर्मिती कं.मर्या.औष्णिक विज केंद्र कोराडी,**
**पो. कोराडी कॅालनी, ता. कामठी, जि. नागपूर-४४१११११. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि.) समन्वय,**
**म.रा.विज निर्मिती कं.मर्या.औष्णिक विज केंद्र, कोराडी, उर्जाभवन,**
**पो. कोराडी कॅालनी, ता. कामठी, जिल्हा नागपूर-४४११११. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी वरील दोनही अपीलाचे संदर्भात त्यांना माहिती मिळालेली असून पूर्णपणे समाधान झालेले असून माहिती मिळण्यासंबंधाने कसलीही तक्रार राहीली नाही असे, आयोगास त्यांचे निवेदन दि. १४ जुलै, २००९ अन्वये, लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे दोनही अपील खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे दोनही अपीले खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१५/२००९**

**१) श्री डॅा. सुरेन्द्र वामनराव सावरकर,**
**बी-३७, मानवसेवा नगर, सेमिनरी हिल्स, नागपूर-६. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,**
**पशु विज्ञान व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**सेमिनरी हिल्स, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ चे अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ यांचेकडे नियुक्त्या संदर्भात व इतर या विषयावर एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार दिनांक ३.३.२००९ रोजी दिनांक २०.२.२००९ च्या अर्जान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना दिनांक ४.५.२००९ रोजी एकुण ६६८ पाने विनामुल्य माहिती देण्यात आली ती प्राप्त झाल्याची स्वाक्षरी पृष्ठ क्रमांक ६ वर आहे असे खुलाशात म्हटले आहे. दिनांक ६.२.२००९ रोजी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आलेली आहे. अपीलार्थीने विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण कार्यकारी परिषदेची सभा सुरु असतांना सभा कक्षात धुमाकुळ घालून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. कार्यकारी परिषदेच्या व मा. कुलगूरु महोदय यांचे निर्णयानुसार त्यांना त्वरीत सेवेतून बडतर्फ करण्यात आले. त्यामुळे अपीलार्थीचे विविध प्रकारे विविध कारणास्तव

( पान २ वर ..)



विद्यापीठाचे कामकाजात व्यत्यय निर्माण करण्याची मानसिक प्रवृत्ती झाली आहे.

मा. उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रं.२७/०८ मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७.७.२००८ च्या आदेशान्वये फेटाळून लावलेली आहे. अपीलकर्त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती, विविध प्रकारे दबावतंत्र अवलंबविणे तसेच विद्यापीठाने बडतर्फ केल्यामुळे चिडून जाऊन द्वेषभावनेने विद्यापीठाचे सूरळीत कामकाजात व्यत्यय निर्माण करणे व वरिष्ठ कार्यालयाकडे विद्यापीठा विरुध्द वारंवार खोटय तक्रारी करणे हेच एक मात्र अपीलकर्त्याचे प्रयोजन दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे विद्यापीठाने तंतोतंत पालन करुन अर्जदारास माहिती पूरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांचे आयोगाकडे १५-२० अपीले आहे व अपीलकर्ता यांनी आतापर्यंत विद्यापीठ स्थापन झाल्यापासून सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या वेळोवेळी झालेल्या नियुक्तीच्या संदर्भात जाहिरातीपासून तर पदोन्नतीपर्यंत संपुर्ण महाराष्ट्रातील माहिती मागितलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१/२००९**

**१) श्री उमाकांत राजन्नाजी तिरपल्लीवार,**
**बालाजी वार्ड, बल्लारपूर, ता. बल्लारपूर,**
**जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि.चंद्रपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
**नगर परिषद बल्लारपूर, ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांचेकडे गोल पुलीया (रेल्वेपुल) पासून ते कॅालरी गेट पर्यंतच्या डांबर रोडचे रुंदीकरणाबाबत व खडीकरणबाबत व त्यावरील अतिक्रमणाबाबत.. या संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात अर्जदारास सुनावणीस बोलाविले परंतु हजर झाले नाही म्हणून निर्णय देण्यात आला नाही असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी लेखी बयाण दाखल केले आहे. तसेच तोंडी युक्त्ीवादामध्ये मात्र दिशाभूल करणारी व अपूरी माहिती प्राप्त झाली असे म्हटलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये तांत्रिक मान्यतेकरीता प्रकरण पाठविले आहे. सदर कामाची सुरुवात करण्यापूर्वी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आलेले असल्यामुळे माहिती त्यांना उपलब्ध करुन

( पान २ वर ..)

दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरची माहिती दिनांक २२.१०.२००८ रोजी कळविली आहे. दरम्यानच्या कालावधीत जर तांत्रिक मान्यता झाली असेल तर त्यावरील जी कार्यवाही अपेक्षित आहे त्याबाबतची सर्व माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना पुढील कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी अन्यथा जन माहिती अधिकारी तथा संबंधीत अधिकारी/कर्मचारी शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६८९/२००८**

अपील क्रमांक ६९०/२००८
अपील क्रमांक ६९१/२००८

**१) श्री  राजु किसन वानखेडे,**
**श्रीराम वार्ड, बल्लारपूर, ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकिय अधिकारी,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

अपील क्रमांक ६९०/२००९ व अपील क्रमांक ६९१/२००९

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद, बल्लारपूर, ता.बल्लारपूर, जि. चंद्रपूर. उत्तरवादी
३) जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,
नगर परिषद बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. उत्तरवादी.

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८, १८.१०.२००८ व १८.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ६८९/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे चंद्रपूर जिल्हयातून आपल्या कार्यालयात आलेल्या वैद्यकिय प्रतिपुर्ती देयकावर प्रमाणपत्राबाबत अहवाला संबंधाने प्रपत्रात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने मागण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांना दिनांक निरंक रोजी माहिती ज्या प्रपत्रामध्ये मागितली आहे त्या प्रपत्रामध्ये माहिती या कार्यालयात नाही त्यामुळे त्या प्रपत्रात माहिती देता येणार नाही. त्याऐवजी संपूर्ण वैद्यकिय देयकांच्या कार्यालयीन प्रतीची छायांकित प्रती पुरविणे शक्य आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००८ रोजी आपणास माहितीच्या अर्जाचे उत्तर देण्यात आले आहे. यापुढील माहितीचा अर्ज माहिती अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांचेकडे करावा असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक ८.७.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत दिलेल्या निमुन्यात माहिती देण्याचे प्रयोजन नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) अन्वये माहितीच्या व्याख्येत मोडत असलेले उपलब्ध साहित्य/दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती ( २ रुपये प्रती पान) प्रमाणे रकमेचा भरणा करुन मागणी करण्याचे अधिकार आहेत, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे परंतु त्यात स्पष्टीकरण देताना माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे अशा प्रकारचे कथन केले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे

( पान २ वर ..)



म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे. आवक जावक नोंदवहीत सुध्दा स्वतंत्र अशी वैद्यकिय देयकांची नोंद नाही. तर संपूर्ण कार्यालयात आलेल्या पत्रव्यवहाराची नोंद असते. त्यामुळे तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

वैद्यकिय देयकांची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास सदरचे देयक १०००० मध्ये आहे व प्रत्येक देयकामध्ये ३ ते ४ पाने आहेत. तसेच संपूर्ण माहिती ही प्रपत्रामध्ये तयार करुन द्यावयाचे झ ााल्यास सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागणार व त्याकरीता २ ते ३ लिपिकांना ती माहिती काढावी लागणार व त्यानतर ती प्रपत्रात द्यावी लागणार व त्यानंतरही अपीलकर्ता हे माहिती चुक आहे असा आक्षेप घेणार. त्यामुळे सदरची माहिती त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे शक्य नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी निश्चित कोणत्या वैद्यकिय देयकाची माहिती त्यांना पाहिजे असे दिल्यास ती माहिती उपलब्ध करुन देता येईल व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ६९०/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद यांचेकडे श्री भाऊराव क्रिष्णाजी कोतपल्लीवार यांचे बाबत दिनांक १५.१.२००८ च्या तक्रारपत्राबाबत अहवाल मागितलेला दिसून येतो. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद बल्लारपूर यांनी आपल्या तक्रारी नुसार दिनांक ८.२.२००८ ला प्रत्यक्ष मोका तपासणी करण्यात येवून तक्रारीचे अनुषंगाने पाहाणी करण्यात आली. त्यानुसार कोतपल्लीवार यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २०.२.२००८ अन्वये पत्र देण्यात आले, त्याची प्रत आपणास सुध्दा देण्यात आली.

श्री कोतपल्लीवार यांचे रस्त्याचे जागेवरील पाय-या नगर परिषदेतर्फे काढण्यात आल्यास पावसाचे पाणी/सांडपाणी वाहून जाण्याकरीता नगर परिषदेने भुमिगत नाल्याचे बांधकाम सुध्दा केलेले आहे. आपण स्वत: मोक्यावर सांगितले होते की, नालीचे बांधकाम केल्यास या ठिकाणी पाण्याचा वाद निकाली निघेल. अनाधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, असे दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचे अनुषंगाने अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे निर्णय दिला नाही असा खुलासा केला आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २०.१.२००९ रोजी श्री कोतपल्लीवार यांना अनाधिकृत बांधकामाबाबत दिनांक २०.११.२००८ पर्यंत वार्डातील अनाधिकृत बांधकाम बंद करुन केलेल्या अवैध बांधकाम पाडून टाकण्याकरीता सूचना करण्यात आली होती. सदरचे बांधकाम ७ दिवसांचे आंत स्वत:चे खर्चाने काढून घ्यावे अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे नियम ५३ अन्वये आपणा विरुध्द फौजदारी खटला दाखल करण्यात येईल असे स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगामडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांना कार्यवाही करुन अहवाल पहिजे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीच्या अधिकारा अंतर्गत कोणत्याही प्रकारच्या कार्यवाहीचे आदेश देता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना सत्य परिस्थितीची माहिती ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक ६९१/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे बल्लारपूर शहरात १ जानेवारी, २००१ ते १६ मे २००८ पर्यंत

झालेल्या व सुरु असलेल्या बांधकामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी

( पान ३ वर..)



रुपये ३६०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांना ३० दिवसांचे मुदतीनंतर खर्चाचा भरणा करण्यास सांगितले असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. दिनांक १८.६.२००८ रोजी त्यांना काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व प्रथम

अपीलाचा निर्णय दिनांक १९.७.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना टपाल खर्च व माहितीचे शुल्क रुपये ४४०/- जमा करण्याच्या सूचना देवूनही अपीलार्थी यांनी शुल्क जमा केले नाही. त्यामुळे माहिती पाठविता आली नाही, अशी माहिती, माहिती अधिकारी यांनी दिली. त्यावर अपीलार्थीने मला माहितीची गरज नाही असे सांगितले. यावरुन अर्जदारास माहितीची आवश्यकता नाही असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु तयार झालेली माहिती पोस्टाचा कोणताही खर्च वसुल न करता श्री राजु वानखेडे यांना पाठविण्यात यावी असा निर्णय देवून प्रकरण निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

७. अपीलकर्ता यांनी सांगितले की, खर्चाचा भरणा मुदतीच्या नंतर सांगितलेला असल्यामुळे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. इतर जी माहिती उपलब्ध झालेली असेल तर ग्रीन बेल्ट संबोधल्या जाणा-या भागाची नांवे, कमर्शिअल बेल्ट संबोधल्या जाणा-या भागाची नांवे व रेशिडेन्शीअल बेल्ट संबोधल्या जाणा-या भागाची नांवे इ. माहिती मागितलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, विकास आराखडा उपलब्ध असतो परंतु त्यात त्या जागेची नांवे दिलेली नसतात. त्यामुळे अपीलकर्ता यांना विकास आराखडयाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६८९/२००८ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना, हवी असलेल्या वैद्यकिय देयकाची निश्चित अशी माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्या देयकाची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६९०/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक २८.११.२००८ नंतर श्री कोतपल्लीवार यांच्या अनाधिकृत बांधकामा विरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५९१/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विकास आराखडयाची छायांकित प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यातय ावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक २२३/२००९**

**१) श्री रामलाल गणुजी तिबुडे,**
**बोसनगर, तुमसर, ता. तुमसर,जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, ता. तुमसर, जि. भंडारा.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**(सा.बां.विभाग), नगर परिषद, तुमसर, जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, नगर परिषद तुमसर यांचेकडे सन २००७ ते २००८ चे दरम्यान झालेल्या नालीचे बांधकामा संदर्भात एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितली आहे. माहिती व्यक्तीशः हवी आहे असे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००७ रोजी सुध्दा माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती मागितली होती व ५ मुद्यांमध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००८, १६.६.२००८ व २०.१०.२००८ रोजी पुन्हा अर्ज दाखल केलेले दिसून येतात. व त्या सर्व अर्जांचे अनुषंगाने दिनांक ८.१२.२००८ रोजी, दिनांक ५.७.२००७ नुसार माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच श्री जगतराम लांजेवार ते कचरापेटी पर्यंतचे बांधकाम सन २००४-०५ या आर्थिक वर्षात झाले असून सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सदरहू कामाचे आदेश देण्यांत आलेले नाही असे कळविलेले दिसून येते. दिनांक १.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १५.१२.२००८ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती उशिरा प्राप्त झाली हे अर्जदार अपीलार्थी यांनी कबूल केलेले आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. परंतु त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरची माहिती ही पुर्वीच दिनांक ५.७.२००७ रोजी कळविण्यात आलेली आहे. व त्यामुळे त्यानंतर त्यांनी मागितलेली माहिती ही पुरविण्यास विलंब झालेला आहे. अपीलकर्ता हे प्रत्येक वेळेस अर्ज करुन

( पान २ वर..)



तीच ती माहिती मागत असतात असे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रत्यक्ष बांधकाम झाले याची मला वैयक्तिक माहिती आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, नगर परिषदेच्या अभिलेख्यामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नाही. त्यावर अपीलकर्ता

यांचेकडे सन २००७-०८ या कालावधीत बांधकाम झाल्याचा पुरावा आहे का असे विचारले असता ते पुरावा सादर करु शकले नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक २२२/२००९

**१) श्रीमती अंजली एम. जांभुळकर,**
**मु.पो.ता. आमगांव, पावर हाऊस जवळ-४४१९०२.**
**जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**

जिल्हा परिषद, गोंदिया. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया. उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयामध्ये औषध निर्माता यांच्या जागा भरती व निवड प्रक्रियेची नस्त्यांच्या झेरॉक्स सत्यप्रतीसह एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती मिळत नाही म्हणून दिनांक १८.८.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांनी अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर दिनांक १७.९.२००७ रोजी सुध्दा अर्ज दाखल केला आहे. व त्यानंतरही माहिती मिळत नाही म्हणून दिनांक १.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यापुर्वी अपीलकर्ता यांना दिनांक ७.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जाहिरातीत १५ पदे दिलेली होती. परंतु १६ पदे भरलेली आहे म्हणून माहिती मागितली आहे. परंतु त्याबाबत कोणतीही तशी माहिती त्यांना देण्यात आलेली नाही व जी माहिती उपलब्ध झाली आहे ती दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा"मी डी.एस. लोहबरे, कक्ष अधिकारी या पदावर जि.आ.अ.जि.प.गोंदिया या कार्यालयात कार्यरत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मला मा.मु.का.अ.जि.प. गोंदिया यांचे आदेश क्रं.जिपगो/आवि/अ-१/१३९५/०८ दि. ६.२.२००८ अन्वये जन माहिती अधिकारी पदाची जबाबदारी सोपविली आहे. दि. ६.२.२००८ रोजी या पदाचा कार्यभार स्विकारताना मला यापुर्वीचे जन माहिती अधिकारी डॉ. एफ.ए. मेश्राम अति.जि.आ.अ. यांचे कडून कोणताही प्रभार हस्तांतरीत करण्यात आला नाही.

अर्जदार श्रीमती अंजली एम जांभुळकर यांचे प्रकरण ऑगष्ट २००७ चे आहे. कार्यालयातील आवक जावक विभागाच्या अभिलेख्याची पडताळणी केली असता श्रीमती जांभुळकर यांचे माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती मिळण्याबाबतचे अर्ज या कार्यालयास दिनांक ८.८.२००७ रोजी प्राप्त झाले असून संबंधित लिपिक श्री एन.के. फुंडे यांनी ते दि.९.८.०७ रोजी स्विकारले आहे व पत्र क्रं.५०८० दि. ७.९.०७ अन्वये माहिती दिली असल्याचे

( पान २ वर..)



नमुद आहे. वरील मुद्याचे अनुषंगाने पुन्हा अर्जदाराचे दि. २८.८.०७ ला अर्ज प्राप्त झाले, ते श्री एन.के. फुंडे व.स. यांनी ३१.८.२००७ ला स्विकारले आहे. त्यानंतरचे अर्ज १७.९.२००७ रोजी प्राप्त झाले व श्री एन.के. फुंडे यांनी १९.९.२००७ ला स्विकारले आहे. त्यानंतरचे पत्र दि. ३.१०.२००७ रोजी प्राप्त झाले व श्री एन.के. फुंडे यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी स्विकारले आहे या सर्व अर्जांना उत्तर दिल्याचा क्रं.५०८० दि. ७.९.०७ असाच नोंदविला आहे. त्यानंतर श्री एन.के. फुंडे या कार्यालयातून बदलून गेले. सद्यस्थितीत श्री एन.के. फुंडे यांचा कार्यभार ज्या लिपिकाकडे आहे,

असे श्री एम.बी.राफत यांचेकडे सदर प्रकरणाची नस्ती त्यांना प्राप्त झालेल्या कार्यभारात देण्यात आली नसल्याचे त्यांनी लिहून दिले आहे.

श्रीमती अंजली एम. जांभुळकर यांनी माहिती न मिळाल्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील केले असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. त्यानंतर त्यांनी आपलेकडे दुसरे अपील केल्याची प्रत या कार्यालयास दिनांक २५.५.२००९ रोजी प्राप्त झाली. माझेकडे या संदर्भात कोणतेही अभिलेख नसल्यामुळे मी श्रीमती अंजली एम. जांभुळकर यांना या कार्यालयाचे पत्र क्रं.जिपगो/आवि/अ-१/३५३९/दि. २७.५.०९ अन्वये कोणती माहिती मागितली होती. माहितीचा विषय काय होता,याबाबत त्यावेळी केलेल्या अर्जाची प्रत मागितली होती. परंतु त्यांचेकडून या पत्राचे उत्तर अप्राप्त आहे."

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ते आताच बदलून आलेले आहे. व त्यांना प्राप्त झालेल्या कार्यभारामध्ये सदर प्रकरणाची नस्ती देण्यात आलेली नाही असे त्यांनी लिहून दिलेले आहे. असे असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सदरची नस्ती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्यात जिल्हा आरोग्य अधिकारी, गोंदिया यांनी सहकार्य करणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नस्तीचा शोध घेवून संपूर्ण माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरची नस्ती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास जिल्हा आरोग्य अधिकारी हे शास्तीस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.७.२००९** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक २२०/२००९

**१) श्री गोवर्धन हरीभाऊ खोब्रागडे,**
**मु.पो.ता. सडक अर्जूनी, जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
**सडक अर्जूनी, ता.सडक अर्जूनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,**

**ता. सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सन २००७-०८ पर्यंतच्या कालावधीतील मौजा परसोडी(रैयतवाडी), मौजा-कोकण, मौजा-सहाकेपार, मौजा खोबा येथील विदर्भ पाणलोट अभियानाअंतर्गत तयार करण्यात आलेले सिमेंट नाला बांधकामाबाबत एकुण १२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१२.२००८ रोजी आपल्याला दिनांक २३.१२.२००८रोजी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन तसेच कुटूंब विवरणपत्र या कार्यालयास सादर केले होते. परंतु ती प्रत ही ग्राम पंचायत सडक अर्जूनी या कार्यालयाची सादर केली आहे. संदर्भिय पत्र दिनांक २२.१२.२००८ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे पत्रान्वये दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे प्रमाणपत्र हे महसुल विभागाच्या उपजिल्हाधिकारी किंवा पंचायत समितीचे असावे अशा लेखी सूचना या कार्यालयास प्राप्त झाल्यामुळे व आपण दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडलेले असल्यामुळे संबंधीत प्रमाणपत्र जोडल्यानंतरच आपल्या अर्जावर विचार करण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १०.२.२००९ ला दुपारी १२.०० वाजता या कार्यालयात येवून पाहावे व आवश्यक असलेल्या झेरॉक्स प्रती घ्याव्या. त्यासाठी ५०००/- रुपये खर्च येणार असून झेरॉक्स

( पान २ वर..)



करीता लागणा-या खर्चाच्या रकमेची मागणी वरिष्ठ कार्यालयास करण्यात आलेली आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून रक्कम प्राप्त होताच आपणास झेरॉक्स प्रत देण्यात येईल. तरी विलंब टाळण्याचे दृष्टीने आपण स्वतः दि. १८.२.२००९ ला या कार्यालयात येवून आवश्यक माहितीची झेरॉक्स स्वतः करुन घ्याव्यात, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.१२.२००८ रोजी उपविभागीय कृषि अधिकारी, देवरी यांना जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता

यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नसून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात येणा-या खर्चाच्या बाबत असमर्थता व्यक्त केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना हवी असलेली माहितीच्या नस्तीचे निरीक्षण करुन स्वत: नोंद करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी कळविलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१४/२००९**

**१) श्री जी. पी. धुंडे,**
**सोमवारी पेठ,क्वार्टन नं. २१४/२, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य,**
**शरद पवार कॅालेज ऑफ फामर्सी, वानाडोंगरी,**
**हिंगणारोड, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**शरद पवार कॅालेज ऑफ फामर्सी, वानाडोंगरी,**

**हिंगणारोड, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी ४ थ्या आणि ५ व्या वेतन थकबाकीची माहिती प्रा. शरद पवार कॅालेज ऑफ फामर्सी, हिंगणा यांचेकडे न मागता जिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला दिसून येतो. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य, शरद पवार कॅालेज ऑफ फामर्सी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. पी.डी. मेघे यांनी युक्तीवाद केला व सदरचा अधिनियम हा विना अनुदानित महाविद्यालय असल्यामुळे लागू होत नाही व माहिती देवू शकत नाही असे म्हटलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे् आहे की, सदरच्या महाविद्यालयाचे कार्यालयास सवलतीच्या दरात जमीन शासनाकडून मिळाली आहे. तसेच शासनाचे आदेशानुसार सदरचे महाविद्यालयास परवानगी मिळालेली आहे. तसेच महाराष्ट्र विधान मंडळाच्या विद्यापीठ अधिनियमाप्रमाणे ते विद्यापीठाशी संलग्न आहे व विद्यापीठाचे अभ्यासक्रम त्यांना राबवावा लागतो. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे सुध्दा त्यांना अटी मान्य कराव्या लागतात व त्यामुळे

( पान २ वर ..)



सदरचे महाविद्यालय हे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे म्हणण्यामध्ये तथ्य असल्यामुळे सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात यत असून हा निर्णय मिळाल्यापासून त्यांना १० दिवसांचे आंत मागितलेली माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक २२४/२००९

**१) श्री विजय झुंगराजी देठे,**
**मु.पो. विरुर (स्टे.),ता.राजूरा, जि.चंद्रपूर-४४२९०५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**तालुका कृषि अधिकारी कार्यालय, राजूरा,**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कषि अधिकारी यांचेकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना व आपल्या विभागाअंतर्गत असलेल्या कामाच्या नियोजनाबाबत माहिती. कालावधी १ एप्रिल, २००७ ते आतापर्यंत अशी मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उलपब्ध झाली नाही म्हणून दिनांक ४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र, दिनांक १७.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात, अशी आयोगाची खात्री झाली आहे व जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

( पान २ वर ..)



त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियामचे कलम २०(२) अन्वये विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ३ महिन्याचें आंत करण्यात यावी.

२) सदरची विभागीय चौकशी ही जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, चंद्रपूर यांनी करावयाची आहे व त्याकरीता निर्णयाची एक प्रत त्यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३)	प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.

४)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक ३९/२००९

**१) श्री एच.आर. पाहुजा,**
**१५/१६ चिटणवीस नगर, बैरामती टाऊन,**
**नागपूर-४४९९१३.** **तक्रारकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी ,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी अपील क्रमांक २३५४ मधील निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे आयोगाकडे तक्रार केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार यांना संपुर्ण माहिती दोन दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश देण्यात अले होते. व त्याकरीता तक्रारदार यांनी जहन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे तक्रारदार यांना सांगितले होते. अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी असे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक ६३५/२००८**

**१) श्री विरेंद्रकुमार सि. बैद,**
**बैद निवास, भानापेठ वार्ड, चंद्रपूर- ४४२४०२.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**नगरपालिका प्रशासन, नागपूर.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी यांचेकडे माहितीचा कालावधी १९९७ ते ३१ डिसेंबर, २००७ रेगुलर सिव्हील सुट नं.६६४/२००० मध्ये नगर परिषद ब्रम्हपुरीला श्री एम.एच. टंडन, ॲडव्होकेट, चंद्रपूर यांनी (न.प.ब्रम्हपूरी यांना) पाठविलेली सर्व पत्रे (वर उल्लेखित कालावधीत) व नगर परिषदेच्या वतीने पाठविण्यात आलेली सर्व पत्रोत्तरे यांच्या प्रमाणित प्रती (with seal, signature and designation) मला पाठविण्यांत यावी. या व्यतिरिक्त रेगुलर दरखास्त नं. २८/२००७ सदरील दरखास्त मध्ये ब्रम्हपुरी न.प.चे वतीने ॲड.श्री एम.एच. टंडन यांना पाठविण्यात आलेली पत्रे व त्यांच्या कडून (श्री एम.एच.टंडन ॲडव्होकेट यांचे कडून) प्राप्त झालेली एकुण सर्व पत्रे यांच्या प्रमाणित प्रती (with seal, signature and designation) मला पाठविण्यात यावी. प्रमाणित प्रतींची आवश्यक फी ची रक्कम आपणाकडून मागणी प्राप्त होताच मनिऑर्डरने पाठविण्याची हमी देत आहोत, असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.३.२००८ रोजी अपीलकर्ता यांना नगर परिषदेनी वकीलाना पाठविलेले पत्र व वकीलांनी नगर परिषदेला पाठविलेले सर्व पत्रे एकुण घडून आलेला पत्रव्यवहार गोपनिय माहिती असल्यामुळे माहिती Evidence Act. चे कलम१२९ मध्ये तरतूदीनुसार देता येणार नाही. तसेच माहिती अधिकार कायदा २००५ चे कलम ८ मध्ये (d) आणि (c) नुसार उपरोक्त माहिती देणे बंधनकारक राहाणार नाही, असे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.५.२००८ रोजी देण्यात आला असून सदर माहिती अपीलार्थीला उपलब्ध करुन दिल्यास प्रतिवादीच्या न्यायालयीन प्रकरणातील स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(घ) नुसार अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती उघड करणे प्रतिवादींवर बंधनकारक नाही. व त्यामुळे माहिती अधिकारी यांचा दिनांक १२.३.२००८ अन्वये अपीलार्थीस कळविलेला निर्णय योग्य आहे व अपील फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांचे वकील ॲड.श्री पी.सी. खजांची यांनी

( पान २ वर..)



युक्तीवाद केला होता व युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी भारतीय पुरावा कायद्याचे कलम १२९ हे फक्त वकीलांना लागू आहे. ते पक्षकारांना लागू होत नाही. व नगर परिषद हे पक्षकार आहे, त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील असे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नगर परिषदेने वकीलांना सदरच्या दाव्यामध्ये जी माहिती दिलेली आहे ती दाव्याच्या संदर्भात विश्वासाने दिलेली माहिती आहे व त्यास व्यावसाकिय गुपीते सुध्दा म्हणता येईल. कारण कोणतीही माहिती ही विरुध्द पक्षकाराला उपलब्ध करुन देणे हे कोणत्याही पक्षकाराला स्वत:चे नुकसान करुन घेण्यासारखे आहे. व त्यामुळे सदरची व्यावसायिक गुपीते आहे व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १०६/२००९

१) डॉ. सौ.वि.वि. भुतडा,
रा.महाराष्ट्र बॅंकेच्यावर अयोध्यानगर,
१६, जुना सुभेदार लेआऊट, शारदाचौक, नागपूर. — तक्रारदार

वि रु ध्द

२) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,
महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, तिसरा मजला,
डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई-४०००१२. — गैरतक्रारदार

(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी तक्रार क्रमांक ८१४/२००८ च्या आदेशानुसार माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मागितलेल्या माहितीचा शोध घेणे सुरु आहे परंतु माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ते नवीन आहे व नक्की माहितीचा शोध घेवून माहिती पुरविण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास ते शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

३. निर्णयाची प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०२५/२००८**

**१) श्री केशव गोविंदा तिजारे,**
**मोदी नागसेन नगर, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**मोदी क्लब कामठी, ता. कामठी, जि. नागपूर.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**मोदी क्लब, कामठी, ता.कामठी, जि. नागपूर.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय

अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष, मोदी क्लब,कामठी यांचेकडे एकुण १७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.७.२००८ रोजी आपण मोदी क्लब कामठी या संस्थेचे सुरुवातीपासून कार्यकारीणी सदस्य असून संस्थेद्वारे करण्यात येणा-या कार्यवाहीमध्ये आपला सक्रिय सहभाग आहे. त्यामुळे आपणास माहितीच्या अधिकारात माहिती मागण्याची आवश्यकता वाटत नाही. आपणास संस्थेविषयी माहिती पाहावयाची असल्यास संस्थेच्या कार्यालयात येवून माहिती घ्यावी व संस्थेस सहकार्य करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न
झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगास सांगितले. संस्थेच्या वतीने वकील श्री एस.एस. तांबुलकर यांनी उत्तरवादी यांचा खुलासा दाखल केला व त्या खुलाशामध्ये अपीलकर्ता हे संस्थेचे कार्यकारीणीचे सदस्य आहे असे नमुद केले आहे. व त्यांना संस्थेचे कार्यकारीणी सदस्य म्हणून कार्यकारीणीच्या बैठकीमध्ये माहिती मागण्याचे

( पाना २ वर .. )



अधिकार आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, मला कार्यकारीणीच्या बैठकीमध्ये बोलाविण्यात येत नाही. परंतु संस्थेचे सचिव यांनी कार्यकारीणीच्या बैठकीची नोंदवही आयोगास दाखविली व त्यात अपीलकर्ता यांना बैठकीच्या नोटीसच्या प्रती मिळाल्या आहेत व त्यांची सही दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणण्यामध्ये तथ्य दिसून येत नाही. तसेच मुद्या क्रमांक १४ च्या संदर्भामध्ये मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रं.१२८६/२००८ मध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे शिक्षण उपसंचालक यांचेकडे प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे त्यांचे म्हणणे आहे. ते केव्हाही संस्थेत येवून माहिती उपलब्ध करुन घेवू शकतात असे सांगितले व तसे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०२४/२००८**

**१) श्री डॉ. मनोहरसिंह गोविंदसिंह गौर,**
**द्वारा श्री गोडसे क्वार्टर नं.३१, प्रशांत नगर,**
**(ॲड. नागले यांचे घराजवळ), अजनी, नागपूर-१५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय

अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माझ्या विरोधात प्रस्तावित करण्यात आलेली विभागीय चौकशी संबंधी कागदपत्रे सोबत जोडलेल्या यादीनुसार विभागीय चौकशी संबंधी, एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक यांनी आपल्या विरुध्द शिस्त व अपील नियमांतर्गत सुरु असलेल्या विभागीय चौकशी संबधी कागदपत्रांची मागणी केलेली आहे. परंतु, म.ना.से. शिस्त व अपील नियम १९७९ चे नियम १० नुसार खाते चौकशी संबधीत अभिलेखे दाखविण्याचे व त्याच्या प्रती देण्याचे अधिकार शिस्तविषयक प्राधिका-याला आहे. तसे अधिकार या कार्यालयाला नसल्यामुळे आपण मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यास हे कार्यालय सक्षम नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२००८ रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. दिनांक २३.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता अपील अर्जासोबत रुपये २०/- फी रोख भरावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक २६.२.२००८ रोजी अपीलीय अधिकारी यांनी

(पान २ वर..)



आपल्या प्रकरणाविषची माहिती यासह जोडून देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामध्ये एमुण ६ मुद्यांचे संदर्भात विवेचन केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जे विवेचन दिलेले आहे ते त्यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे नाही. त्यांना प्रत्यक्ष कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती हवी आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता ज्या कार्यक्रमाची माहिती मागत आहे तशा प्रकारचे कार्यक्रम झालेले नाही. व त्यामुळे त्यासंदर्भातील निमंत्रण पत्रिका वगैरे.. अस्तित्वात नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संपूर्ण कार्यक्रमाचा माझा संबध नसून सुध्दा माझ्या विरुध्द शिस्तभंग केल्याचा त्यांनी आरोप लावलेला आहे. त्यामुळे मी ही माहिती मागत आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.१२.२००७ च्या अर्जासोबत

दिलेल्या सहपत्रामधील ६ मुद्यांचे संदर्भात कागदपत्रांचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीत सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २४.१२.२००७ च्या अर्जासोबत दिलेल्या ६ मुद्यांच्या संदर्भात उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे रुपये २५,०००/- चे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधियिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३५/२००९**

**१) श्री अरविंदकुमार चंद्रसेन शिंदे,**
**द्वारा- तालुका कृषि अधिकारी, मोहाडी यांचे कार्यालय,**
**ता. मोहाडी, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
**कुही, ता.कुही, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी, कुही यांचेकडे साळवा गट क्रं. ड्ड व १/३ नाला बांध सिमेंटचे अंदाजपत्रक मंजूरी क्रमांक व दिनांक व मंजुरी रक्कम तसेच दोन्ही कामांना मिळालेली प्रशासकिय मान्यता मंजुरी क्रमांक व दिनांक व मंजुरी रक्कम, प्रकल्पनस्ती अनुदानाची उपलब्धता कामाचा प्रगती अहवाल व इतर दस्ताऐवज अशी माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.८.२००८ रोजी माहितीचा उद्येश नमुद केलेला दिसत नाही. माहितीचा उद्येश कळविल्यास या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती आपणास देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचे प्रथम अपील विभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी,कुही यांचेकडे करावे याकरीता परत पाठविलेले दिसून येते. दिनांक ५.५.२००९ रोजी अभिलेख पाहाणी केलेल्या व आपणास आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती आपणास देण्यात येत आहे. तरी पोच देण्यात यावी. त्यावर श्री शिंदे यांनी रेकार्ड घेतला नाही असा शेरा दिलेला दिसून येतो. त्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी उपविभागीय कृषि अधिकारी, उमरेड यांना अपीलकर्ता हे सदरच्या प्रकरणात माहिती घेवून गेले नाही अशा प्रकारचा अहवाल सादर केला आहे. त्यावर दिनांक १६.२.२००९ रोजी तालुका कृषि अधिकारी, कुही यांनी जन माहिती अधिकारी, कार्यालय जिल्हा कृषि अधिक्षक, नागपूर यांना असे कळविले आहे की, सौ. अे.अे. शिंदे यांनी माहितीच्या अधिकारात श्री शि.बा. राजवाडे, तालुका कृषि अधिकारी यांचे कालावधीतील अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत झालेल्या कामांचे सिमेंट कामे, माती कामे, मजगी, शेततळे इ. कामाची माहिती मागितलेली आहे. अर्जदाराचे पती श्री ए.सि.शिंदे कृषि सहायक याच कालावधीत तालुका कृषि अधिकारी कुही यांचे अंतर्गत कार्यरत होते व त्यांनी स्वतःचे नावे माहितीच्या अधिकाराअंतर्गत सन २००५ अन्वये माहिती मागितली होती. या कार्यालयाचे पत्र क्रमांक १०९७/२००८ दिनांक ७.८.२००८ रोजी सदर माहिती मागण्याचा उद्येश नमुद करण्याबाबत कळविले होते. परंतु त्यानंतर याबाबत या कार्यालयास काहीही कळविले नाही. श्री ए.सी. शिंदे कृषि सहाय्यक तालुका कृषि अधिकारी यांचेकडे

(पान २ वर..)



कार्यरत असतांना संपूर्ण माहिती त्यांचेकडेच उपलब्ध आहे व तशा प्रकारचे अनुदान मागणी पत्र या कार्यालयास दिनांक ३१.१०.२००८ रोजी कळविलेले आहे. त्यांना आपण केलेल्या कामाबाबतचे देयके पारित करण्याकरीता कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी यांचे मार्फत तपासणी अहवालासह सादर करण्यांस सांगितले परंतु त्यावर त्यांनी कोणतीही कार्यवाही न करता एक शासकिय कर्मचारी असून पदाधिका-यांकडे जावून या कार्यालयांस दडपण आणत आहे व शासकिय कामाची गोपनियता भंग करीत आहेत. सध्यास्थितीत या कार्यालयात अपूरे कर्मचारी असल्यामुळे सदर माहिती देण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्याकरीता संपूर्ण माहिती पुरविण्याकरीता एकुण खर्च रुपये ७,०००/- चलनाद्वारे भरना करुन चालानाची प्रत या कार्यालयास सादर करावी, असे कळविलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक ९.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रुपये ७,०००/- खर्च भरण्याबाबत कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ५.५.२००९ रोजी सौ. शिंदे यांना मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिसून येतात. तरी सुध्दा दिनांक २३.३.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये स्वतः अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्या पतीने सुध्दा सदरची माहिती मागितली होती परंतु उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी सुध्दा मागितली आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध आहे परंतु ती देण्याचे टाळाटाळ करीत आहे असे दिसून येते. अर्थात माहिती उपलब्ध असेल व त्यासाठी रुपये ७,०००/- खर्च येणार असेल तर अर्ज

आल्यानंतर ३-४ दिवसाच्या कालावधीत तसे कळविणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्या अर्जाचा उद्येश विचारण्यात आलेला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(२) प्रमाणे उद्येश विचारता येत नाही, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना दिसून येत नाही. ते विचारण्याऐवजी खर्च कळविणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे अपीलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीत सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत मागितलेली माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

**अपील क्रमांक २४८/२००९**

**१) श्री भाष्कर आनंदराव मडावी,**
**पंचायत समिती सभापतीचे निवासस्थान,**
**रेल्वे स्टेशन जवळ, हिंगणघाट, जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्रा.),**
**जिल्हा परिषद, वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद, वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८(अर्ज प्राप्त दिनांक २०.११.२००८) रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे केंद्रप्रमुख श्री सुरेश दौलतकार, केंद्र वडनेर यांनी ९ सप्टेंबर, २००८ रोजी शाळेला सील लावून शाळा बंद ठेवल्याबाबत. त्यावर कोणती कार्यवाही झाली त्या कार्यवाही अहवालाची प्रत पूरविण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.  अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना केंद्र प्रमुख श्री सुरेश दौलतकार यांच्या प्रकरणात कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. स्पष्टीकरण अप्राप्त आहे. चौकशी पुर्ण होईपर्यंत मागितलेला दस्तऐवज देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात कागदपत्रांची पाहाणीसाठी प्रत्यक्ष दिनांक २०.१.२००९ रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे सदरचे अपीलाचा निर्णय झालेला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी असा खुलासा केला आहे की, दिनांक १६.१.२००९ ला मा.शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद वर्धा यांनी श्री भाष्कर मडावी यांचे समाधान झाल्यामुळे ते येणार नाही असा संदेश त्यांना प्राप्त झाला. त्यामुळे दिनांक १६.१.२००९ चे त्यांचे तोंडी आदेशानुसार प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले आहे. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु अर्ज करते वेळेस प्रकरणाची कागदपत्रे ज्या स्तरावर असते त्याच स्तरावर माहिती उपलब्ध होत असते. चौकशीची प्रक्रिया ही ३० दिवसांत पुर्ण होत नाही. त्यामुळे चौकशीची प्रक्रिया
झाल्यानंतर संपुर्ण अहवालाची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. अपीलकर्ता यांना उत्तर दिल्यानंतर आज ६ महिन्याचा कालावधी झालेला असून चौकशीच्या संदर्भात काय झाले असे विचारले असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, चौकशी पुर्ण होऊन त्यांची एक वेतन वाढ थांबविण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती मला उपलब्ध झालेली नाही. माहितीचा

( पान  २ वर ..)



अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक अर्जाची मुदत ३० दिवसाची असते व त्या ३० दिवसाच्या मुदतीपर्यंतची माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यावेळेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे सांगण्यात सुध्दा आले होते. परंतु असे असून सुध्दा ते आयोगाशी वाद घालत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू नाही असे त्यांना वाटते व त्या इतरांना लागू आहे असे त्यांचे म्हणणे दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांना चौकशी अहवालाची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली आहे किंवा नाही ही बाब फक्त आयोगाकडून तपासली जाते. व अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. तरीही अपीलकर्ता यांना चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु, अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांना ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक २३.७.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -

तक्रार क्रमांक ५/२००९

१) श्री गोपाल बालाजी झाडे,
८, पुरोहित लेआऊट, अंबाझरी,
नागपूर-४०००३९. तक्रारदार

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव,
दुग्ध पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय मुंबई-३२. गैरतक्रारदार

३) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पदम-६,
पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय मुंबई-३२. गैरतक्रारदार

(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)

<u>नि र्ण य</u>

तक्रारदार यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सु-नावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या उपरोक्त तक्रारीचे संदर्भात अत्यावश्यक असलेली माहिती दिनांक २५.७.२००८ व २३.६.२००९ रोजी प्राप्त झालेली असल्याने माझे समाधान झाले.. करिता माझी वरील सर्व अपीले निकाली काढण्याची नम्र विनंती आहे, असे आयोगास त्यांचे निवेदन दिनांक २३.७.२००९ अन्वये लेखी दिलेले असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक २३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 997/2008, 998/2008, 999/2008, 1000/2008.

**अपील क्रमांक 997/2008**

श्री सुरेश बी. गोयनका
ए 204, कांचन सरीता, 16 फार्मलॅन्ड
रामदासपेठ नागपूर 10

..... अपिलकर्ता

**अपील क्रमांक 998/2008**

श्री भारत अवलानी
बी 401, कांचन सरीता, 16 फार्मलॅन्ड
रामदासपेठ नागपूर 10

..... अपिलकर्ता

**अपील क्रमांक 999/2008**

श्री अजय लखोटीया
बी 101 कांचन सरीता, 16 फार्मलॅन्ड

रामदासपेठ नागपूर 10

..... अपिलकर्ता

**अपील क्रमांक 1000/2008**

श्रीमती लिला बेलानी
बी 104 कांचन सरीता, 16 फार्मलॅन्ड
रामदासपेठ नागपूर 10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर शहर 1,
185 आयुर्वेदिक लेआऊट भांडे प्लॉट चौक
उमरेड रोड नागपूर.

2) श्री रमेश शंकर मुलमुले
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, कांचन को.ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.
प्लॉट नं. 8 अ, फार्मलॅन्ड कांचन किरण अपार्टमेंट,
रामदासपेठ नागपूर 10 ..... **उत्तरवादी**





**( आदेश पारित दिनांक 1.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. वरील सर्व अपीलकर्ता यांनी उत्तरवादी कांचन को.ऑप. सोसायटी यांच्या सचिवांना अनुक्रमे दि. 4.8.2008 दि. 8.8.2008 व दि. 4.8.2008 रोजी सदरच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील वेगवेगळया प्रकारची माहिती माहिती मागितलेली दिसून येते. परंतु तत्कालीन सचिव यांनी वरील सर्व अर्जदारांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.9.2008 रोजी अर्जदारानी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक असते. परंतु कांचन

को.ऑप. सोसायटी लि. ही शासकीय कार्यालय नसल्याने शासनाचा प्रशासकीय विभाग नसल्याने जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली नाही. व त्यामुळे अर्जदारांनी केलेले अर्ज हे योग्य नसल्याने सदरचे अर्ज निकाली काढण्यात येतात असे उत्तर दिलेले दिसून येतात. वरील प्रमाणे उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2008 रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदर प्रथम अपीलाचा निर्णय उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी दि. 1.11.2008 रोजी देण्यात आलेला असून संस्थेला शासनाकडून प्रत्यक्ष सहाय्य मिळाले नसेल तरी अप्रत्यक्ष सहाय्य मिळाले आहे काय याची शाहानिशा करणे गरजेचे आहे. कारण अप्रत्यक्ष सहाय्य मिळाले असल्यास सदरचा अधिनियम लागू होतो. सर्व प्रकारच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाबाबत शासनाने मुद्रांक शुल्कास सुट दिलेली आहे व ही बाब सर्वज्ञात आहे. सहकारी संस्थांना शासनाकडून मिळणारे हे एकप्रकारचे अप्रत्यक्ष अर्थसहाय्यच आहे. त्यामुळे सदरचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 संस्थेला लागू होतो याबाबत कोणतीही शंका नाही. व अपील मंजुर करण्यात येवून आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाचे आंत अर्जदाराने 3



मागणी केलेली व उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तत्कालीन पदाधिकारी तथा सचिव यांनी कोणत्याही प्रकारची माहिती वरील सर्व अपीलकर्ता यांना दिलेली नाही. व त्यामुळेच वरील सर्व अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. सर्व अपीलकर्ता यांचे तर्फे श्रीयुत गोयनका यांनी युक्तीवाद केला. युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की गृहनिर्माण सहकारी संस्था ही महा. विधानमंडळाने पारीत केलेल्या महा. को.ऑप. सोसायटी ॲक्ट 1960 या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे गठीत करण्यात आलेली आहे. तसेच सुरुवातीपासूनच म्हणजे गठीत करण्यापासून शासनाच्या सहकारी विभागाचे त्यावर नियंत्रण असते. सहकारी संस्था गठीत करतांना अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ज्या अटी व शर्ती दिलेल्या आहेत त्या पूर्ण केल्याशिवाय सहकारी संस्था गठीत करता येत नाही व त्या पूर्ण केल्यावर संबंधीत शासनाचे अधिकारी हे सदरची सहकारी संस्थेची नोंदणी झाली असा आदेश काढतात. यावरुन सदरचा आदेश हा शासनाचा आदेश असतो असे त्यांचे म्हणणे आहे. सहकारी संस्थेच्या निवडणूका हया

अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सहकारी विभागाच्या अधिका–याच्या देखरेखीखालीच घ्याव्या लागतात. सहकारी संस्थेचे दरवर्षीचे लेखा अंकेक्षण करुन घ्यावे लागते. तसेच कोणत्याही प्रकारचा बदल संस्थेच्या पदाधिका–यामध्ये झालेला असला तर तो बदल सहकारी विभागाच्या अधिका–यांना कळवावा लागतो व कोणत्याही प्रकारची तक्रार संस्थेच्या विरुध्द करावयाची झाल्यास ती सहकारी विभागाच्या अधिका–याकडूनच करावी लागते व त्याबाबत नियमाप्रमाणे चौकशी सहकारी विभागाकडूनच होते. सहकारी संस्थेच्या कोणत्याही कामकाजामध्ये अनियमितता असल्यास किंवा अफरातफर असल्यास सहकारी विभागास प्रशासक नेमण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे सहकारी विभागाचे संपूर्ण नियंत्रण हे सहकारी संस्थेवर आहे व ते अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे आहे. सहकारी संस्थेच्या बाय लॉज जरी सहकारी संस्थेने केले असले तरी त्यास मान्यता ही सहकारी विभागाच्या अधिका–याकडून म्हणजे शासनाकडून घ्यावी लागते. व त्यामुळे सहकारी संस्थेवर शासनाचे नियंत्रण असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे गृहनिर्माण सहकारी संस्था ही ‘‘सार्वजनिक प्राधिकरण‘‘ या संज्ञेच्या





व्याख्येमध्ये येते. व त्यामुळे संस्थेमध्ये माहिती अधिकारी नियुक्त करणे हे आवश्यक आहे व सहकारी संस्थेनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व तशी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. परंतु निर्णयामध्ये सुध्दा सहकारी संस्थाना स्टॅम्प डयुटीमध्ये सुट दिली असल्यामुळे अप्रत्यक्षपणे ती शासकीय मदत आहे असा निष्कर्ष काढून उपनिबंधक सहकारी संस्था यांनी गृहनिर्माण सहकारी संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे असा निर्णय दिलेला आहे. परंतु तरीही तत्कालीन पदाधिका–यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. दरम्यान संस्थेवर प्रशासकाची नियु**क्ती** करण्यात आली होती. त्यानंतर निवडणूका झाल्या. नवीन पदाधिकारी निवडून आले. त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास तयारी दर्शविलेली आहे. परंतु तत्कालीन पदाधिका–यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रशासकानीसुध्दा दि. 8.4. 2009 रोजी श्रीयुत ढेमळे, श्रीयुत टावरी व श्रीयुत पिंपलवार यांना माहिती उपलब्ध करुन

न देण्याच्या संदर्भामध्ये पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्रामध्ये सदरची बाब ही गंभीरतेनी घ्यावी. 5 वर्षाचे अंकेक्षण करुन घेतलेले नाही ही बाब त्यांचे निदर्शनास आलेली दिसून येते. सदरच्या पत्रावरुन असे दिसून येते की सदर संस्थेच्या कामकाजामध्ये अनियमितता भरपूर आहे व त्यामुळे तत्कालीन सचिव यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे तत्कालीन पदाधिकारी हे दोषी आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची सर्व अपीले ही मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 4.8.2008 तसेच दि. 8.8.2008 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान पदाधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करुन माहिती





उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध असलेले अभिलेख हे सर्व अपीलकर्ता यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येवून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) तत्कालीन पदाधिकारी, सचिव तसेच संस्थेचे अध्यक्ष यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे आयोगाकडे खुलासा करावा अन्यथा त्यांचे विरुध्द महा. को.ऑप. सोसायटी ॲक्ट 1960 च्या तरतुदीप्रमाणे उपनिबंधक सहकारी संस्था यांना त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्याचे आदेश काढावे लागतील याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 1.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1015 / 2008, 1016 / 2008 व 1017 / 2008.**

श्री भरत झिंगरजी राऊत
मु. पो. पाहार्णी
ता. नागभिड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 1015 / 2008</u>**

1) श्री एम. आर. वैद्य
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागभिड
ता. नागभिड जि. चंद्रपूर

2) श्री एम. एस. मालाधारी
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागभिड

ता. नागभिड जि. चंद्रपूर

..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 1015/2008 व 1017/2008</u>**

1) श्री किशोर सोंकुरवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व)
ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

2) श्री जी. एन. करलुके
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार
तहसिल कार्यालय नागभिड
ता. नागभिड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

2

2

**( आदेश पारित दिनांक 2.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 12.12.2008 रोजी व दिनांक 30.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले अशी एकुण तीन अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1015/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2008 रोजी खालीलप्रमाणे माहिती तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून मागितलेली दिसून येते.

1. दि. 12.8.08 चे माझे अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाचे प्रती माहिती पुरवण्याबाबत.

2. मोजणी सुचीत व मौक्यावर वहीवाटी प्रमाणे कच्चा रस्ता उपलब्ध असतांनी कोणाचे आदेशान्वये दुरस्ती आदेशाचे नकाशात नोंद दर्ज करण्यात आली नाही त्या टिपणीसह आदेशाची प्रत माहिती पुरवण्याबाबत.

3. भुमापन क. 501 चे क्षेत्र आराजी व वहीवाट आराजी मौक्यावर तपासुन मोजणी किती तारखेला करण्यात आली. हद्यदुरुस्तीच्या वेळीची वहीवाट आराजीची चतुर्थसिमा लांबी रुंदी मिटर मध्ये किती आहे. हद्यदुरुस्ती केलेली जमीन तलाठी पुर्नमोजणी नकाशा प्रमाणे कोणते गटाची आहे व त्या गटाची आराजी किती आर ने कमी झाली. क्षेत्र आराजी पेक्षा वहीवाट आराजी किती आर ने वाढली आहे. पुर्वी क्षेत्रआराजी किती आर ने कमी होते त्या अहवालाचे टिपणीसह माहिती पुरवण्याबाबत.

4. भुमापन क. 501 चे हिस्सा फार्म 4 (4 गुनाकार बुक) मधील मुळमालकाचे नाव पुर्नमोजणीचे 7/12 मधुन कोणाचे आदेशान्वये कमी केलेल्या आदेशाची प्रत जाहीरनामा प्रसिध्द केल्याची प्रतीची माहिती पुरवण्याबाबत.

5. भुमापन क. 501 हद्यदुरुस्ती साठी कोणी कार्यालयात अर्ज किती तारखेला सादर





केला. त्याबाबत नोटीस कोणते इसमाला तामील केले आहे. त्याची मोजणी फि दुरुस्ती साठी किती आकारणी केली त्याची पावती कमांक किती आहे. अर्जासोबत कोणत्या वर्षापासुन 7/12 जोडले आहे त्या संपूर्ण दस्तऐवजाची प्रती माहिती पुरवण्याबाबत.

6. दुरुसती आदेशाचे नकाशा प्रत वरील भु. क. 266/2 ची दुरुस्ती कोणाचे आदेशान्वये कमी करण्यात आली त्या आदेशाचे प्रतीचे व कमी करणा—या कर्मचा—याचे नाव व पदनाम बाबत माहिती पुरवण्याबाबत. माहितीचा कालावधी हा पुर्नमोजनी प्रख्यापन केलेल्या वर्षापासुन आज रोजीपर्यंतचा आहे. सदरची माहिती रजिस्टर पोष्टाने टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी दि. 3.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. परंतु राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूरकडे द्वितीय अपील सादर करण्यास कळविलेले आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे असे सांगितले की संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी त्यांच्या दि. 30.8.2008 च्या अर्जाप्रमाणे मुद्या क. 1 व 2 प्रमाणे माहिती दिली परंतु मुद्या क. 3,4,5,6 ची माहिती अपुर्ण

व चुकीची दिली. तसेच दि. 19.9.2008 ला पत्र देवून तपशिलाचे मुद्याप्रमाणे माहिती पुरविण्यात आली नाही. तसेच माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी वाटत असल्यास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे पुन्हा खुलासा दाखल केलेला आहे.

दि. 21.4.09 ला मौका चौकशीत मा. उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांनी ग.नं. 265 चे तक्रार क्षेत्र दुरुस्तीचे दि. 13.3.08 पासून पारीत केलेल्या प्रमाणे मौक्यावर ग.नं. 265 च्या नमुना 'क' प्रतीवरील ग.नं. 501 चे हद्य दुरुस्तीप्रमाणे मौक्यावर चतूर्थ सिमा मोजी करण्यात आली. नमुना 'क' प्रतीवरील हद्य दुरुस्ती व मौका वहीवाटीत तफावत निर्माण झाली आहे. हे मौका जोणीचे वेळी पंचासमोर निदर्शनास आले आहे. मौक्यावर





ग.नं. 501 ची पूर्वे बाजुची उत्तर दिशेची वहीवाट आराजी 32 मीटर दि. 27.5.06 ला उपलब्ध होती व आजही उपलब्ध आहे. परंतू नमुना 'क' प्रतीवर वहीवाट आराजी नसतांना 38.50 मीटरची हद्य दुरुस्ती करण्यात आली आहे. ग.नं. 501 चतुर्थ सिमा बद्यल दि. 19.12. 08 ला आयोगाला चुकीची माहिती पुरवून आयोगाची दिशाभूल केली आहे. हे दि. 21.4.09 चे मौका मोजणीवरुन निदर्शनास आले आहे.

जन माहिती अधिकारी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख नागभिड यांनी ग.नं.265 चे तक्रार क्षेत्र दुरुस्ती नमुना 'क' प्रतीवर ग.नं. 501 चे अभिलेखाची खात्री व पडताळणी न करता जाणूनबुजुन निष्काळजीपणा करुन ग.नं. 501 ची हद्यदुरुस्ती केल्यामुळे मला माहिती पुरविण्यास दुष्ट हेतुने नाकारली असुन कर्तव्यात कसुर करुन उर्वरीत माहिती नष्ट केल्याचे दिसून येत असल्यामुळे हयाचेवर दंडात्मक व शिस्तभंगाची कार्यवाही करुन मला तपशिलाचे मुद्याप्रमाणे विनामूल्य घरपोच माहिती देण्याचे आदेश द्यावे हि नम्र प्रार्थना आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती तर दिली नाही उलट राज्य माहिती आयोगाकडे आहे म्हणून दबाव आणतात असे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी बोलतात असे आयोगास त्यांनी सांगितले. वास्तविक मागील अपीलामध्ये अधिक्षक भुमी अभिलेख यांनी मान्य केले होते की पुर्नमोजनीमध्ये त्यांचे कार्यालयाकडून चुक झालेली आहे तरी त्याची

दुरुस्ती करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यामुळेच सदरची अपीले प्रलंबित ठेवून निर्णय होवून अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध होईल ही अपेक्षा होती. कोणत्याही शेत जमीनीवर कोणत्याही व्यक्तीचे नाव लावणे ही गंभीर बाब आहे व त्यामुळे ती दुरुस्त न करता अपीलकर्ता यांचे विरुध्द कार्यालयातील जर अधिकारी कर्मचारी वर्तन करीत असतील तर ही गंभीर बाब आहे. वास्तविक अपीलकर्ता हे या कार्याल्यात असल्यामुळे आतापर्यंत सर्व अपीलामध्ये अधिका–यांना सवलती मिळाल्या. अन्यथा त्यांना केव्हाच दंड झाला असता याबाबतची नोंद घ्यावी. व अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल.





4. अपील क्र. 1016/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2008 रोजी मौजा पाहार्णी येथील बंदोबस्त नं. 178/1 त्याला एकत्रीकरण ग.नं.290 त्यालय प्रचलीत पुर्नमोजणी भुमापन क्र. 501 चे भुमीधारी हक्काने वाटप करण्यात आले त्या पटयाचे दस्तऐवजाचे प्रती व गावनमुना 1 क चे दस्तऐवजाचे प्रती वर्षवार माहीती पुरविण्याबाबत.

माहितीचा कालावधी 1. करीता सन 1964 ते 1973पर्यंत अनुक्रमांक 2. करीता सन 1974 ते 1984पर्यंत अनुक्रमांक 3. करीता 1984 ते 1994पर्यंत. याप्रमाणे अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या छायांकीत प्रती नोंदणीकृत टपालानेद्वारे उपलब्ध करुन देणे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.1.2008 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाशी संपर्क साधून माहीती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच आपल्या प्रकरणात दि. 14.1.2008 रोजी आदेश पारीत करण्यात आला असून पुढील कार्यवाही करण्यासाठी तलाठी पहार्णी यांना कळविण्यात आलेले आहे असेपण कळविलेले दिसून येते. आपणास आदेशाच्या प्रती आवश्यक असल्यास आपण या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.2.2008 रोजी देण्यात आलेला असून सदर प्रकरणात तहसिलदार नागभीड यांचेकडून प्रकरणाचा शोध घेण्यात आला परंतु तो मिळाला नाही व अद्यापही शोध घेण्याचे

काम त्यांचे स्तरावर सुरु आहे व प्रकरणाचा तपास लागताच माहिती पुरविणार असल्याचे तहसिलदार यांनी कळविले आहे असे त्यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

5. द्वितीय अपीलाच्या सुनावणीपर्यंत संबंधित अभिलेख उपलब्ध झाले नाही असे आयोगापुढे सांगितले होते. परंतु जर संबंधित कागदपत्रे उपलब्ध होत नसतील तर ती त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पोलीसकडे तक्रार करणे आवश्यक आहे. कारण कागदपत्रे किंवा अभिलेखे ही जतन करुन ठेवण्याची जबाबदारी शासकीय कार्यालयाची आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती देण्याकरीता पुन्हा शोध घ्यावा किंवा पोलीसाकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. 6



6. अपील क्र. 1017/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2008 रोजी मौजा पाहार्णी येथील जन माहिती अधिकारी तहसिलदार तहसिल कार्यालय नागभिड यांचेकडे मौजा पाहार्णी ता. नागभिड तहसिल कार्यालय नागभिड येथील रेव्हेन्यु मामला क्र. 240/एमआरसी 81/86–87 चे प्रकरण मा. कोर्ट विद्यमान तहसिलदार साहेब यांचे कोर्टात सुरु होते त्या दस्तऐवजाची माहीतीचे प्रती आवश्यक असल्यामुळे मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी 1986 ते 1987 असा आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

7. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती पुरविण्यास टाळाटाळ करुन शोध घेणे सुरु आहे अशी दिशाभूल करीत असल्याचे सिध्द होत आहे. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व नस्तीबध्द करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांन मौजा पाहार्णी ता. नागभिड तहसिल कार्यालयातील रेव्हेन्यु मामला क्र. 240/एमआरसी 81/86–87 चे प्रकरणातील 1. अर्जदाराचे दि. 7.10.86 चे अर्ज व सनद (पट्टानगल) प्रत 2. तलाठी यांनी दि. 21.9.87 ला दिलेला अहवाल प्रत 3. आदेशपत्रावर (टिपणी) दि. 21.1.87 पासून 9.10.87पर्यंत वरील प्रकरणात चालवलेल्या आदेशपत्राच्या (टिपणीच्या) प्रतीची माहिती मिळण्याबाबत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

त्याकरीता अपीलकर्ता यांचे वरील तीनही अपीले हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.



7

**आ दे श**

1) अपील क्र. 1015/2008 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.8.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 3,4,5,6 ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपील क्र. 1016/2008 व अपील क्र. 1017/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 12.12.2008 च्या दोनही अर्जातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 16/2009.**

श्री ज्ञानेश्वर गो. हटवार
(सरचिटणीस महा.राज्य पुरोगामी प्राथ.शिक्षक चिूर)
जि.प.शाळा मांगलगाव केंद्र जांभुळघाट
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जे. जी. तेलकापल्लीवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री एस. एच. राठोठ
जन माहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2



2. अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती चिमूर यांचेकडे काही एल.टी.सी.देयके अदा न केल्याबाबत सन 2005–2008 या कालावधीतील ज्या शिक्षकांची एल.टी.सी.देयके मंजुर केले त्या शिक्षकांची यादी अशी एकुण 4 मुद्यांवरची माहिती स्वतः घेवून जाणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरची माहिती दि. 6.4.2009 रोजी मिळाली व त्यांचे समाधान झाले असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 3.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 13/2009.**

श्री मेजर निशांत आर. गुप्ता
3331 मिसाईल रेजीमेंट
के.ऑफ 56 ए पी ओ पीन 923331 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका
बाबा नानक सिंधी हिंदी हायस्कूल
गरोबा मैदान नागपूर 08 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध झालेली आहे व सदरचे अपील हे रद्द करावे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 3.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 14/2009.**

सौ. इंदुबाई दामोधर हटवार
रा. पो. तारसा
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डब्ल. एस. पंचबुध्दे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
राजस्व निरीक्षक/मंडळ अधिकारी
निमखेडा पो. निमखेडा
ता. मौदा जि. नागपूर
2) श्री श्रीकांत राळे
जन माहिती अधिकारी तथा
तलाठी (त.सा.क.63)
तारसा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री सुदाम आत्माराम मस्के हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.10.2008 रोजी तलाठी तारसा यांचेकडे मौजा तारसा त.सा. क.63 ता. मौदा जि. नागपूर येथील जुना भूमापन क. 477/1 चा सा.नं.क.7, 7 अ व 12

(756) चा भू.मा.क्र. व सन 2005–2006, 2006–07 व 2007–08 चा भूमापन क्र. 477/1 आ.1.14 हे जमा 5.54 नवीन 756 ची माहिती पेरेपत्रकासह मिळण्याबाबत मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 23. 10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दि. 18.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.12.2008 रोजी देण्यात आलेला आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती सर्व सात बारा पेरेपत्रकासहीत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरचे 7/12 हे त्यांचे नावाने नसल्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की पुर्नमोजणी नंतर इंदुबाई दामोधर हटवार यांच्या नावाचा 7/12 तयार केलेला नाही. परंतु त्या कारणामुळे त्यांना या सर्वे नंबरचा नवीन 7/12 तलाठी देवू शकला नाही. या प्रकरणा संबंधी मा. नायब तहसिलदार मौदा यांचे कोर्टात प्रकरण सुरु आहे. आपण मागणी केलेल्या स.न. 477/1 नविन स.न. पुर्नमोजणीमध्ये आपल्या नावाचा 7/12 तयार नसल्यामुळे आपणास 477/1 नविन 7/12 पुरवू शकत नाही. हया संबंधात स.न.771/1 व 771/2 चा 7/12 व चर्तुसिमा दर्शविलेला नकाशा पुरविण्यात येत आहे. सदर रेकॉर्ड भूमी अभिलेख मौदा यांचेकडून आपल्या नावाच्या वहिवाट प्रमाणे 7/12 वेगळा करुन घ्यावा असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज केलेले होते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.



**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 18/2009 व 19/2009 .**

श्री बळीराम डोमाजी ढोबाळे

पो. नारा

ता. कारंजा (घा.) जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कारंजा (घा.)
ता. कारंजा (घा.) जि. वर्धा
2) श्री एम. डी. घोडे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत कार्यालय नारा
ता. कारंजा (घा.) जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.





2. दोनही अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2008 रोजी अनुक्रमे सुशिला डोमाजी मुर्खे यांचे घर ओपन फेसवर आहे व ते घरकुल आहे तरी ग्रा.पं.ने ओपन फेसवर घरकुल बांधण्यास परवानगी कशी काय दिली. अशी परवानगी ग्रा.पं.ला देता येते काय. तसेच ओपन फेसवर किती घरे बांधण्यात आली. व शंकर आजनकर यांचे घरकुल प्लॉट नं. 24 व

25 यामध्ये रस्ता आहे. व त्या रस्त्यावर घरकुल बांधले आहे. तरी या घरकुलाला ग्रा.पं.ने कशी परवानगी दिली अशी माहिती सचिव ग्रा.पं. यांना  मागितलेली दिसून येते. वरील दोन्ही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.10.2008 रोजी सचिव ग्रा.पं. यांनी सदरच्या दोन्ही घरकुलाच्याबाबत ग्रा.पं. मध्ये माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. तसेच लेआऊटची माहिती ही महसुल विभागाकडे मिळु शकेल. तसेच सदरच्या लेआऊटची हस्तांतरण ग्रा.पं.स झालेले नाही व ती माहिती महसुल विभागाकडे मिळेल. तसेच घरकुल मंजुर प्रकरण झालेले असल्यामुळे ती माहिती पं. स. ला मिळेल अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व ओपन फेसमध्ये बांधकाम करण्यास परवानगी दिलेली नाही असेही त्यांना कळविलेले आहे. वरील उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 5.11.2008 रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये  सदर प्रकरणी अपीलकर्ता व उत्तरवादी यांचेशी चर्चा झाली व वरीलप्रमाणे माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. त्या चर्चेवर समाधान झाले मला पाहिजे असलेली माहिती आज रोजी मिळाली व याबाबत माझी खात्री झाली असून कोणताही उजर राहिलेला नाही असे त्यांनी लेखी दि. 12.12.2008 रोजी दिलेले आहे. यावरुन सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा अपीलकर्ता यांच्या सहमतीने झालेला असला तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. दोन्ही द्वितीय अपीलाच्या बाबत वरीलप्रमाणे संपुर्ण चर्चा करुन अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भामध्ये तपशिलात समजावून सांगितले. सदरची माहिती ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नाही ते विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.



3

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2)     अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 17/2009.**

श्री नरेश माणिकराव तलमले
मु. पो. खात
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2008 रोजी जिल्हा भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे सहपत्रात नमुद केल्याप्रमाणे एकत्रिकरण खात्याचे सर्वेक्षक यांनी भुमापन क्र. 189/190/3 जुने याचे परीवर्तन करुन नविन भुमापन क्र. 671/1 असे केले त्यांचे नाव पत्ता अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर प्रकरणाची पुन्हा पुर्वप्रक्रिया करण्याकरीता विभागाशी संबंधित अधिका—याशी संपर्क साधावा लागेल त्याचे विभाग

नाव पद कळवावे अशा प्रकारे एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरचा अर्ज कार्यालयात दि. 15.9.2008 रोजी प्राप्त झाला. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.9.2008 रोजी मौजा खात प.ह.नं.59 ता.मौदा येथील तक्रार अर्ज दुरुस्तीचा या कार्यालयाचे पत्र दि. 4.1.2007 ला फेरचौकशीस तालुका निरीक्षक भूमी अभिलेख मौदा यांचेकडे पाठविलेले आहे. आपण संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावे. सबब माहितीस रवाना असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अर्जदाराचे प्रकरणी अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्याने सदर अपील प्रकरणात सुनावणी कामी इकडील प्रतिनिधीने हजर राहण्याची जरुरी वाटत नाही असे आयोगास कळविलेले दिसून येते. दि. 20.11.2008 रोजी सदरचे अपील हे अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे हस्तांतर केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय अधीक्षक भूमी अभिलेख यांनी दिलेला नाही. त्याबाबत त्यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांना दि. 26.9.2008 रोजी कळविल्याप्रमाणे त्यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे संपर्क न साधता प्रथम अपील उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे केले. व त्यामुळे प्रथम अपील जरी हस्तांतर केले होते तरी त्याबाबत निर्णय देण्याची आवश्यकता वाटली नाही. अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनीसुध्दा संपर्क साधला नाही असेच उत्तर दिले. तरीही अपीलकर्ता यांनी दि. 31.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचा एकत्रिकरणाच्या पुर्नमोजणीनंतरचा दुरुस्तीचा अर्ज आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरच्या दुरुस्तीच्या संदर्भामध्ये तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे चौकशी होते व त्यानंतर अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे सदरचे प्रकरण पाठविले जाते. परंतु त्यानंतर पुन्हा सदरचे संपूर्ण प्रकरण हे फेरचौकशीस दि. 4.1. 2007 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख मौदा यांचेकडे पाठविले आहे व त्यामुळे त्याबाबतची संपूर्ण माहिती ही तालुका निरीक्षक भूमी अभिलेख

3

यांचेकडेच मिळेल व त्याअनुषंगाने अपीलकर्ता यांना तसे कळविलेले होते. त्याबाबत अपीलकर्ता यांना असे सांगितले की त्यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी म्हणजे त्यांना योग्य तो न्याय मिळेल. यावरुन त्यांचे अर्जासंबंधीची माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 27/2009.**

श्री धरमसिंग सरजूसिंग महंत
ना.सु.प्र.भुखंड क्र. 34 घर नं. 386 वार्ड नं.14
दाक्षिणी रिंग रोड विश्वकर्मा नगर
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल गुज्जेलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास
नागपूर
2) श्री आर. के. पिंपळे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2007 रोजी अध्यक्ष नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून दि. 22.4.1999 पासून आजतागायत दि. 22.4.1999 रोजी दुसरे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्थर नागपूर यांनी दिवानी दावा 1699/93 निकाली काढल्यानंतर कारवाई कां नाही. नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे

नमूद केलेले आहे. सदरच्या अपीलाच्या अनुषंगाने आपण दाखल केलेली अपील आर.सी.ए. क्रमांक 319/1999 तसेच आर.सी.ए.क्रमांक 1699/1993 न्यायालयीन कोर्ट केस खारीज केलेली आह असे कळविलेले दिसून येते. त्यावर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.6.2008 रोजी देण्यात आलेला असून मागितलेली माहिती ही माहिती अधिकारी अंतर्गत अभिप्रत नसली तरी माहिती अधिकारी यांनी या संदर्भात नासुप्रचे विधी अधिकारी यांचेशी सल्लामसलत करुन एक महिन्यामध्ये निर्णय घ्यावा व अपीलार्थीस संयुक्तिक उत्तर पाठवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी ज्या दिवाणी दाव्याच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे तो मुळातच खारीज झाली असल्यामुळे त्याबाबतची पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता राहात नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्ता यांनीच सदरचा दावा दाखल केला होता व तो रद्द झाला आहे. त्याविरुध्द अपील दाखल केले होते तेही रद्द झालेले आहे व त्यामुळे कार्यालयाकडून कार्यवाहीची आवश्यकता असण्याचे कारण नाही व तसे त्यांना कळविलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना स्वतः सर्व माहिती असली तरी त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 29/2009 व 30/2009.**

श्री राधेश्याम मंगलचंद अग्रवाल
मनोहर चौक फुलचूर रोड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (महसुल)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
2) श्री ए. आर. पांढरे
जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस (महसुल शाखा)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 29/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दि. 9.1. 2008/10.1.2008 माहिती मागितलेली दिसून येते. मा. आयुक्त नागपूरच्या नावाने दिलेली दिलेली तक्रारीचे बद्यल करण्यात आलेली पुर्ण कार्यवाहीची माहिती एक प्रत

तसेच त्याप्रमाणे झालेली कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.7.2008 रोजी उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडून अहवाल प्राप्त करण्यात आला असून प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.11.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती कळविलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्याबाबतच्या चौकशा अजुनपर्यंत झालेली नसल्यामुळे व त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी दि.9.1.2008 च्या संदर्भात कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. त्यावर कार्यवाही अहवाल प्राप्त आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याबाबत मात्र अपीलकर्ता यांना अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मात्र तुर्तास अपीलकर्ता यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे काय कार्यवाही झाली ही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे मागितलेली कार्यवाही पूर्ण करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. अर्ज केल्याच्या वेळेसची वस्तुस्थिती उपलब्ध होवू शकते. त्याकरीता अहवालाची प्रत देणे अपेक्षित आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 30/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे श्री आर.आर.कुंभारे तत्कालीन एस.डी.ओ. गोंदिया यांचे संदर्भामध्ये 3 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. व पुन्हा एकुण 5 मुद्दे त्यांनी उपस्थित केलेले

3

दिसून येते. त्यातही त्यांनी प्रश्न विचारलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.6. 2008 रोजी अपीलकर्ता यांना माहितीकरीता रु.22/– टपाल खर्चाचे रु.10/– असे एकुण रु. 32/– भरावे असे कळविलेले होते. व मुद्या क्र. 1,3 बाबत कोणत्या कालावधीची व नेमकी कोणती माहीती अपेक्षित आहे याबाबत बोध होत नाही तसे सविस्तर व सुस्पष्ट कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे रु.22/– हे माहितीकरीता भरलेले आहे व टपालाने पाठवू नये असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 29.8.2008 रोजी आक्षेप घेतलेला दिसून येतो व त्यात श्री कुंभारे यांचेविरुध्द आलेल्या सर्व तक्रारीची माहिती मागितलेली होती. परंतु मागितलेली माहिती जाणुनबुजुन लपवून ठेवलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्याकरीता त्यांनी दि. 6.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.8.2008 रोजी मुद्या क्र.1 अन्वये श्री कुंभारे यांचे सी.आर.म्हणजे सर्व्हीस बुकची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेशी संबंधीत असल्याने आपण जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेशी संपर्क साधावा व मुद्या क्र. 3,4,5 च्या अनुषंगाने कळविण्यात येते की आपण मागितलेल्या माहितीचा अधिनियमातील कलम 2 (च) मध्ये नमुद केलेल्या माहितीच्या व्याख्येत समावेश होत नाही त्यामुळे सदरची माहिती आपणास
देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.8.2008 रोजी देण्यात आलेला असून वरीलप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

5. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्री कुंभारे यांचेविरुध्द अनेक तक्रारी दाखल झालेल्या होत्या अशी त्यांची माहिती आहे व त्या तक्रारीची माहिती त्यांना देण्यात आलेली नाही. मात्र तक्रारी कोणत्या दाखल केलेल्या आहे याबाबतचा पुरावा हा 4

अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सादर केलेला नाही व त्यामुळे मोघम अपीलकर्ता यांचे वैयक्तीक माहितीच्या आधारे माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. माहिती ही कार्यालयात जी उपलब्ध असते तीच मिळते व त्याकरीता सुध्दा निश्चित वर्णन असावे लागते. ऐकीव माहितीवर माहिती मागितल्यास ती उपलब्ध करुन देता येणे शक्य होत नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 29/2009 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडून आलेल्या अहवालाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 30/2009 हे खारीज करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 34/2009 व 35/2009.**

श्री सुधीर तुळशीरामजी धुर्वे
दोसर भवन चौक सेंट्रल एव्हेन्यू
नागपूर 18. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
(मेडीकर) नागपूर.
2) डॉ. प्रमोद सोनुने
जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
(मेडीकर) नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांचेकडे दोन अर्ज माहिती मागण्यासाठी केलेला आहे. एका अर्जामध्ये रेडीओ थेरपी विभागातील फिजीसीस्ट ब्लॉक बाबद एकुण 10 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. व दुस–या अर्जामध्ये रेडीओ थेरपी विभागातील प्रकल्पाबाबत एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या रेडीओ

थेरपी विभागातील फिजीसीस्ट ब्लॉक बाबद अपीलकर्ता यांना अपीलकर्ता यांना दि. 30. 9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु रेडीओ थेरपी विभागातील प्रकल्पाबाबत मागितलेल्या 8 मुद्याच्या बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 28.10.2008 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. मात्र दोन्ही प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की रेडीओ थेरपी विभागातील माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची उपलब्ध करुन दिलेली आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे प्राध्यापक व विभाग प्रमुख रेडीओ थेरपी विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांचेकडून जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. जन माहिती अधिकारी हे संपूर्ण महाविद्यालय व रुग्णालयाकरीता माहिती अधिकारी आहे. व त्यामुळे त्या त्या विभागातील माहिती उपलब्ध करुन घेवून ती माहिती उपलब्ध करुन द्यावी लागते व तशी ती देण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दाखल केलेली प्रथम अपीले यांची आवक नोंदवहीत नोंद आहे परंतु ती संबंधीत लिपीकानी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेपर्यंत सादर केले नसल्यामुळे प्रथम अपीलात सुनावणी झाली नाही. संबंधीत लिपीकाचे विरुध्द कारणे दाखवा नोटिस देण्यात आली असून कारवाई सुरु आहे. अपीलकर्ता यांच्या रेडीओ थेरपी विभागातील प्रकल्पाच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या अर्जाबरोबर जोडपत्र हे जोडलेले नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडून दोन्ही अपीलाची नोटीस काढल्या नंतर दि. 10.6.2009 रोजी संबंधित रेडीओ थेरपी विभागाशी दि. 15.9.2008 व 28.10.2008 च्या अनुक्रमे अर्ज व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. व त्यामध्ये रेडीओ थेरपी विभागाचे विभाग प्रमुख व प्राध्यापक यांनी अपीलकर्ता यांचे अर्ज व प्रथम अपील त्या विभागास केव्हाही प्राप्त झालेले नाही व त्यामुळेच या पूर्वी माहिती 3

सादर करता आली नाही असे दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते व त्यातून जोडपत्रातील प्रश्नासंबंधाने एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. व तीच माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यावरुन अपीलकर्ता यांना अपील क्र. 34/2009 मध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपील क्र. 35/2009 मध्ये अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नव्हती किंवा त्या विभागाकडून ती माहिती मागविलेली नव्हती. परंतु आता जी उपलब्ध झालेली आहे ती सर्व माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपील क्र. 34/2009 खारीज करण्यास पात्र आहे. व अपील क्र. 35/2009 अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. 34/2009 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येते.

2) अपील क्र. 35/2009 मध्ये अपीलकर्ता यांच्या अजार्च्या अनुषंगाने प्राध्यापक व विभाग प्रमुख रेडीओ थेरपी विभाग यांचेकडून दि. 30.6.2009 रोजी उपलब्ध झालेली माहिती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 47/2009.**

श्री भाऊराव झिंगूजी गोहत्रे
59 बंडू सोनी ले आऊट परसोडी
नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त
आयुक्त आदिवासी विकास
गिरीपेठ नागपूर

2) श्री एच. एन. गेडाम
जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रकल्प अधिकारी
आयुक्त आदिवासी विकास
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे कु. वैशाली भाऊराव गोहत्रे, माजी आदिवासी विकास निरीक्षक यांच्या संदर्भामध्ये एकुण 14 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.11.2008 रोजी आपण मागितलेली माहिती संबंधित शाखेकडून प्राप्त झालेली असून प्रती पृष्ठ 2 रु. प्रमाणे 44 रु. भरणा करण्यात यावा व माहिती उपलब्ध करुन दिली जाईल असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना 22 पूष्ठे मिळाली असे त्यांनी लेखी दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 3.12.2008 रोजी अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित झाल्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शंकाबाबत विचारणा केल्यानंतर त्यांनी मिळालेल्या माहितीबाबत समाधान व्यक्त केलेले आहे व तसे लेखी दिलेले आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या अपील मेमोमध्ये त्यांनी माहिती अपुर्ण, अप्राप्त अशी दिलेली आहे तसेच दि. 3.12.2008 चे सुनावणीत समाधान झाले असहेही दिलेले आहे द्वितीय अपीलाच्या संदर्भात त्यांना विचारले असता त्यांनी मुद्या क्र. 3 व 4 ची माहिती मिळालेली नाही असे आयोगापुढे सांगितले. परंतु त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येत नाही असे विश्लेषण करुन सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी विनाकरण द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 49/2009.**

श्री शालीकराम तानबाजी बोरकर
शांतीनगर हाऊसिंग कॉलनी
क्वार्टर नं. एल आय जी अे 5
पो. नायापुरा नागपूर 440 002. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त –1 (प्रशा.)
महानगर पालिका अमरावती
ता. जि. अमरावती
2) श्री आर. एफ. डोगरे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (प्र.क्र.4)
महानगर पालिका अमरावती
ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.10.2008 रोजी अपीलकर्ता यांनी महानगर पालिका अमरावती मध्ये राजस्व अधिक्षक यांना सम्राट रामदास वंजारी गुरुपुष्पा बिल्डींगमध्ये राहात असल्या बद्यलची घराच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. त्यावर विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 1.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 5.1.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती का उपलब्ध करुन देण्यात आली याबद्यल जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती विचारलेली आहे ती इमारत अस्तित्वातच नाही. त्याऐवजी गुरुकृपा इतमारत आहे. त्या इमारतीतील फ्लॅटच्या संदर्भामध्ये महानगर पालीकेच्या रेकॉर्डला नोंद केली नाही व त्या फ्लॅटमध्ये सम्राट रामदास वंजारी राहतात किंवा नाही याची माहिती नाही. वसुली अधिकारी यांना प्रत्येकवेळी तो फ्लॅट बंद आढळला अशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 48/2009.**

श्री डॉ. अशोक बी जाधव
702 विक्रांत आठ रस्ता चौक
लक्ष्मी नगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगांबर मेहर
जन माहिती अधिकारी तथा
संचालक ( नगर रचना )
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे त्यांच्या दि. 5.1.2007 च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये एफआयआर दाखल झाल्यानंतर सदरचे व्यापारी दुकान सिल का करीत नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 16.10.2008 रोजी

.. 2..

प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.11.2008 रोजी देण्यात आलेला असून विभागाने अपीलार्थीस 8 दिवसात माहिती द्यावी व अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 10.11.2008 रोजी माहिती देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती झोनकडे असल्यामुळे विलंबाने प्राप्त झाली. परंतु मागितलेली माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्नाची असल्यामुळे ती कार्यालयात उपलब्ध नसते. व अपीलकर्ता यांच्या तक्रारीवर जी कार्यवाही झालेली आहे त्याबाबतची त्यांना मात्र माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी विचारलेले प्रश्न वि दिलेले उत्तर हे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 43/2009.**

श्री वसंत शालीकराम पोहणकर
गजानन नगर उपवन हॉटेलचे मागे
संत तुकडोजी वार्ड मु. पो. ता. हिंगणघाट
जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. के. परतेकी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी
पंचायत समिती भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर
2) श्री ज्ञानेश्वर बकाराम शेंद्रे
जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, नांद
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.9.2008 रोजी श्रीमती कृष्णाबाई शालीकराम पोहनकर व श्रीमती कौसल्याबाई रामचंद्र पोहनकर यांचे संपुर्ण जागेचा घराचा नमुना 8 अ नुसार माहिती संबंधित 1950 ते 1 आक्टोबर 2008 पर्यंत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.10.2008 रोजी माहिती या कार्यालयात उपलब्ध नसून राजस्व विभागाकडे आहे असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 19.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही परंतु अपीलकर्ता यांची वाट पाहूनही अपीलकर्ता उपस्थित न झाल्यामुळे आपणास मागीतलेली माहिती श्री पोहनकर यांना उपलब्ध करुन द्यावी व त्याचे शुल्क आकारुन त्यांना कळवून त्यांना दस्तऐवज देण्यात यावे अशा आपणास सुचना करण्यात येत आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी आदेश दिलेले दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अर्जामध्ये मागितलेली माहिती किंवा जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर याबाबत चौकशी केलेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अर्थहीन असा निर्णय दिलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ग्रामपंचातीकडे नमुना 8 असतो व नमुना 8 अ हा तलाठी यांचेकडे असतो व त्यामुळे त्यांना तसे उत्तर दिलेले आहे. मागील आयोगाचे आदेशाप्रमणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असेही अपीलकर्ता यांनी सांगितले होते. परंतु त्यावेळेस आयोगाचे आदेश हे जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेले नव्हते. तरीसुध्दा माहिती प्राप्त करुन घ्यावयास बालाविण्यात आले होते परंतु त्यांनी माहिती घेतली नाही. यावरुन अपीलकर्ता एकच माहिती अनेक अर्जामधून मागतात असे दिसून

येते. अपीलकर्ता यांनी मुळात माहितीचे वर्णन चुकीचे दिलेले असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडील जी माहिती देण्यास तयार होते ती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परंतु तशी त्यांनी घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना माहिती घेण्यापेक्षा राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्यातच रस दिसून येतो. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 45/2009.**

श्री सचिन गजाननराव यनगंदलवार
मु. पो. ता. गडचिरोली सुभाष वार्ड क्र. 1
बाजार चौक जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे सन 1995 ते 2008 या कालावधीतील विशेष मागास प्रवर्गातील प्राथ., माध्यमिक शिक्षण सेवक, शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार अधिकारी यांच्या यांच्याबाबत आरक्षणानुसार व 100 बिंदु नामावलीनुसार मंजुर पदे, कार्यरत पदे व रिक्त पदे अशा तक्त्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले

आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 2.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. 3.

अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली ती 17 वर्षाची माहिती आहे व सदरची माहिती संकलीत करण्याकरीता श्री मनोज पवार जेष्ठ सहा. शिक्षण विभाग यांना शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी पत्रे दिलेली दिसून येतात. परंतु श्री पवार यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यामुळे 15 जुन 2009 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी श्री पवार यांना निलंबीत करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असे सांगितले व त्याबाबतचे आदेश आयोगाकडे सादर केलेले आहे. परंतु आता अद्यावत अशी माहिती उपलब्ध झालेली आहे. व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी जी जुनी माहिती मागितलेली ती संकलीत करणे हे अत्यंत जिकरीचे काम आहे व त्याकरीता स्वतंत्रपणे एका लिपीकास काम करावे लागेल व नियीमत काम हे बंद करावे लागेल. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही तर अद्यावत माहिती मात्र वर नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यावर व जुनी माहिती मागण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे जनहित आहे असे दिसून येत नसल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने किंवा व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन दिलेली द्यावी व तशी त्यांची पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 54/2009.**

श्री चंद्रगुप्त रामदास जगताप
मु. पो. आर्वी (छोटी)
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एन. कोल्हे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) श्री ज्ञानेश्वर वाट
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत आर्वी (छोटी)
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत यांचेकडे एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.8.2008 रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रु. 100 चा भरणा केलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना एकुण 16 पाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. व उर्वरीत रु. 68 परत घेवून जावे असे दि. 12.10.2008 रोजी कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी नस्तीचे अवलोकन सुध्दा केलेले आहे असे सचिव ग्रामपंचायत यांनी सादर केले. परंतु त्यानंतर दि. 17.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना अपुर्ण माहिती मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 29.8.2008 च्या अर्जात मागितलेल्याप्रमाणे माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध असेल त्यांच्या छायांकीत प्रती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडे संपर्क साधून कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन घ्याव्या. व त्यांना रु. 68/– हे परत करण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 56/2009.**

श्री वामनराव राघोबाजी गाणार
अजनी चौक वर्धा रोड पो. विवेकानंद नगर
नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय जाती पडताळणी समिती
सोमलवार बिल्डींग सदर नागपूर
2) श्री एस. एम. कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा सचिव
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
सोमलवार बिल्डींग सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.5.2007 रोजी सचिव तथा माहिती अधिकारी जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचेकडे निखील गाणार यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी. आम्ही आपणास जी प्रमाणपत्रे आणि माहिती दिली त्याची झेरॉक्स यादी पुरविण्यात यावी स्पष्टीकरण करावे. केवळ सचिव म्हणजे समिती होते काय स्पष्ट करावे

अशी माहिती टपालाने द्यावी असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 3. 7.2007 रोजी श्री गाणार यांनी समितीने मागणी केलेली कोणतीच कागदपत्रे वैयक्तिक दिलेले नाहीत. फक्त निखीलचा जन्मदाखला दिला होता त्यामुळे सदर दाखला त्यांना देण्यात येत आहे असे टिपणीमध्ये नमूद केलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 16. 10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उपरोक्त अपीलाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की अर्जदार वामणराव राघोबाजी गाणार यांनी दि. 30.5.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती समितीकडे उपलब्ध असलेली माहिती दि. 30.7.2007 रोजी देण्यात आलेली आहे. सदर माहितीने अर्जादाराचे समाधान न झाल्याने प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उपसचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मुंबई यांचेकडे अपील दि. 16.10.2008 रोजी सादर केले आहे. सदर अपील अर्जदाराने तब्बल 15 महिन्यानंतर दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर अपील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये मुदतबाहय असल्याने प्रथम दर्शनी खारीज करण्यास पात्र आहे.

अर्जदाराचे प्रकरण पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन सक्करदरा नागपूर यांचे मार्फत जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करुन रिपोर्ट मिळणेसाठी या कार्यालयास प्राप्त झाले होते. समितीने संपूर्ण प्रकरणाचे अवलोकन करुन समितीच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार निर्णय देता येत नसल्याने प्रकरण पोलीस स्टेशन सक्करदरा यांना समितीचे पत्र क्र. 5199 दि. 18 सप्टेंबर 2006 अन्वये परत करण्यात आलेले आहे.

तसेच अर्जदार वामणराव राघोबाजी गाणार यांना वरीलप्रमाणे या समितीचे पत्र क्र. 69 दि. 12 एप्रिल 2007 अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये अर्जदारास दि. दि. 30.7.2007 समितीकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. याशिवाय अर्जदार यांची कोणतेही अतिरीक्त दाखले या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत.

वरील विवेचनावरुन अर्जदार यांना या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. त्यांनी केलेले प्रथम व द्वितीय अपील त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व मुदतबाहय असल्यामुळे प्रथ्म दर्शनी अपील खारीज करण्यास पात्र आहे.

परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे परत करण्यात आलेले नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना कागदपत्रे परत करणे आवश्यक आहे. परंतु त्याकरीता अपीलकर्ता यांनी कागदपत्रे दिली होती याबद्यलचा पुरावा सादर करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.5.2007 च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्राच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत कागदपत्रे दिल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांना द्यावा व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे दिल्याचा पुरावा दिला असेल त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 6.7.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 74/2009.**

श्री नानाजी जैदास रामटेके
जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. जी. सुपके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी मोर.
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया
2) श्री महेंद्र लक्ष्मण नंदागवळी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
जि. प. शाळा जानवा
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी मोर. यांचेकडे मौजा जानवा येथील जि.प. प्राथ. शाळा वर्ग खोल्याचे बांधकामाच्यां ठेक्याचया संदर्भातील दि.11.12.2007 ला दिलेल्या अर्जाबद्यल

काय कार्यवाही झाली अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.12.2007 तसेच दि. 9.4.2008 रोजी कळविण्यात आलेले होते. तरीही अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. व त्या प्रथम अपीलाच्या निर्णयप्रमाणे 9.4.2008 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये वेळोवेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व आयोगापुढे सुध्दा त्यांचे पुर्वी अपील याच मुद्यांवर निर्णय झालेला आहे. अपीलकर्ता यांना बांधकामाचा ठेका का मिळत नाही असा त्याचा मुद्या आहे व ग्राम शिक्षण समितीला तो अधिकार आहे ती ग्राम शिक्षण समिति निर्णय घेवून ठेका देतात वारंवार त्यांना कळवून सुध्दा वारंवार ते माहिती मागतात. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 78/2009.**

श्री फाल्गुन नामदेव गिरडकर
मु. पो. गिरगाव
ता. नागभिड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री टेकाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री एस. के. निपाणे
जन माहिती अधिकारी तथा
प्र. मुख्याध्यापक
सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव
ता. नागभिड जि. चंद्रपूर 441223 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सावित्रीबाई फुले विद्यालय गिरगांव यांचेकडे एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही दि. 16.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.12.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशाप्रकारचे आदेश मुख्याध्यापक यांना दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 29.12.2008 तसेच दि. 3.3.2009 रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्य अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु मुद्या क्र. 4 ची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 12.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये प्रशासनिक अडचण आहे ती कळविण्यात आलेली होती तसेच माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल अधिनियमाच्या तरतुदीत काहीही असले तरी संस्थेच्या पदाधिका–यांना विचारावेच लागते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती नंतर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर मुद्या क्र. 4 च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मागितलेली माहिती ही व्यापक आहे. तीस–या वर्गातील मुलांची माहिती आहे त्यामुळे ती 300 मुलांची माहिती एकत्रित नाही. तसेच मुलांचे पत्तेसुध्दा त्यांचेकडे उपलब्ध नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की टी.सी.वर ती माहिती उपलब्ध असते व टी.सी.ची प्रत दिल्यास अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध होवू शकेल. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की टी.सी.वरुन माहिती काढून देणे हे अपेक्षित नाही व टी.सी.ची प्रत

3

द्यावयाची असल्यास 300 प्रती छायांकीत प्रतींचा खर्च येईल व ती संस्था देण्यास तयार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जर ती माहिती हवी असेल तर त्यांनी खर्चाचा भरणा करणे आवश्यक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 20.11.2008 च्या अर्जातील मुद्दा क्र. 4 च्या संदर्भामध्ये मुलांची संख्या किती होते व प्रती पृष्ठ रु. 2 प्रमाणे एकुण पुष्ठ संख्या अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः कळवावे व त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून व खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 81/2009.**

डॉ. मिलिंद पंढरीनाथ जीवने
जीवक वेलफेअर सोसायटी परिसर
नवा नकाशा स्वास्तीक शाळेसमोर
नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगंबर मेहेर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक ( नगर रचना विभाग )
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त महानगर पालिका यांचेकडे त्यांच्या दि. 21.9.2008 रोजी दिलेल्या अर्जावार केलेली कार्यवाही तसेच मॉडेल टावून मधील प्लॉट धारकांना बिल्डींग नकाशा मंजूर केला किंवा नाही हयां संदर्भात माहीती देवून मंजुर नकाशाची प्रत देण्यात यावी इत्यादी माहिती

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.12.2008 रोजी देण्यात आलेला आहे. व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 13.1.2009 रोजी संपुर्ण माहिती पुन्हा दिलेली आहे. परंतु सदरच्य उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांच्या दि. 29.9.2008 च्या अर्जामधील मुद्या क. 3 च्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्यलची माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दि. 17.11.2007 व 2.6.2008 ये पत्राद्वारे खुलासा करुन आपणास माहिती पुरविली असल्याने आपला दि. 21.1.2008 च्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व त्यामुळे मुद्या क. 3 च्या संदर्भात सुध्दा कोणतीही कार्यवाही करावयाची आवश्यकता नव्हती. याबाबत अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियमच्या तरतुदी व महानगर पालिकेच्या अधिनियमच्या तरतुदी याबाबत एकत्रितरित्या उत्तर अपेक्षित करीत असल्यामुळे त्याबाबतचा निर्णय हा आयोगास देता येणार नाही व त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 75/2009.**

श्री सुधीर ठाणेकर
मु. पो. पारडी
ता. कोरपना जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एम. किडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ चंद्रपूर
2) श्री के. डी. पाडेवार
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2
मुल रोड चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तसेच सहा. जन माहिती अधिकारी उपविभाग क्र.2 यांचेकडे नाक्याच्या वसुली संदर्भात व इतर. 2006 ते आजपर्यंत व 2006 ते 2008पर्यंत इतर कामे. अशी माहिती एकुण 5 मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.7.2008 रोजी मागितलेल्या माहितीच्या करीता आवश्यक खर्च रु. 86/- भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 2.8.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.12.2008 रोजी देण्यात आलेला असून मुद्या क्र. 1 ते 4 बाबतची विभागात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपीलकर्त्याकडून आवश्यक शुल्क घेवून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.12.2008 रोजी संपूर्ण माहितीकरीता रु. 4515/- भरावे असे कळविलेले दिसून येते. व त्यमुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामध्ये रक्कम भरण्याचे आदेश नियम क्र. 7 चे पोटकलम 6 प्रमाणे अपील करण्याचे कारण दिलेले दिसून येते.

3. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 चे पोटकलम 6 प्रमाणे विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद असतांना शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय का देण्यात आला असे विचारले असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की प्रथम अपील हे मुदतीच्यानंतर दाखल केले होते व त्यासोबत विलंबाने अपील दाखल करण्याचे कोणतेही कारण नव्हते. परंतु माहिती उपलब्ध करुन देणे हे मुख्य उद्येश

लक्षात घेवून सदरचे अपील हे मंजुर करुन माहिती मात्र शुल्क भरुन द्यावी असा निर्णय दिला. अधिनियमाच्या तरतुदी हया अर्जदार अपीलकर्ता यांना सुध्दा लागू असल्यामुळे दिलेली मुदत ही अर्जदाराने पाळणे आवश्यक असते. अपील विहित मुदतीत दाखल केले असते तर मात्र विनामुल्य माहिती द्यावी लागली असती असे पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 28/2009.**

श्री महेंद्र रामकृष्णराव शेंडे
दयाल नगर, चंदन एस.टी.डी.जवळ
मेन देवळी रोड पो. वर्धा गंज रोड
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री दिपक शिवाजी कारंडे
जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.





2. अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2008 रोजी आर.टी.एस.64/2/07–08 च्या संदर्भामध्ये एकुण 22 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.10.2008 रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही आर.टी.एस. 64/2/07–08 शी संबंधीत असल्यामुळे अर्जदारानी कार्यालयात येवून सदर प्रकरणाची तपासणी करावी व आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती घेवून जावे असे कळविले. सदर पत्राप्रमाणे अर्जदार श्री शेंडे यांना दि. 5.11.2008 रोजी मिळालेले दिसून येते व त्याच दिवशी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याअनुषंगाने दि. 15.11. 2008 रोजी अर्जदारास पुर्वसुचना देवून सदर प्रकरण पाहणीकरीता उपलब्ध करुन दिले व सदर प्रकरणातील आदेशासह 1 ते 4 पृष्ठे संपूर्ण प्रकरणाची छायांकीत प्रत (1 ते 288 पृष्ठे) अर्जदारास दि. 15.11.2008 रोजी निःशुल्क उपलब्ध करुन दिले. त्यानंतर दि. 18.12. 2008 च्या आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उर्वरीत मुद्याची माहिती दि. 22.12. 2008 रोजी निःशुल्क दिलेले आहे. असे असले अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्या शपथपत्रामध्ये प्रत्येक मुद्याचे संदर्भामध्ये त्यांनी गुणवत्तेच्याबाबत आक्षेप घेतलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

विषयांकीत अधिनियमा अंतर्गत अर्जदार श्री महेंद्र रामकृष्णराव शेंडे रा. वर्धा यांनी दि. 24.9.2008 चे अर्जाद्वारे 22 मुद्यांवरील माहिती मिळण्यासाठी राज्य जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय वर्धा यांचेकडे मागणी केलेली होती. सदर अर्जातील माहिती ही माझे कोर्टात सुरु असलेल्या राजस्व प्रकरणाशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी दि. 3.10.2009 चे पत्रान्वये





माझ्याकडे प्राप्त झाला होता. अर्जातील मुद्ये बहुतांशपणे हे माझे कोर्टात सुरु असलेल्या प्रकरण क्र. आर.टी.एस.64/2/07–08 चे संबंधीत असल्यामुळे व सदर प्रकरणात दि. 11. 8.2009 रोजी आदेश पारीत झालेला असल्यामुळे तसेच मागितलेली माहिती ही प्रश्नाचे स्वरुपात असल्यामुळे लेखी स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी स्वतः किंवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून उपरोक्त प्रकरणाची तपासणी

करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती प्राप्त कराव्यात अथवा माहिती अधिकारा अंतर्गत आवश्यक त्या कागदपत्रांची मागणी वेगळया अर्जाद्वारे करावी अशा आषयाचा समावेश असलेले उत्तर सदर अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी श्री डी.एस.कारंडे नायब तहसिलदार वर्धा यांचेकडे दि. 4 आक्टोबर 2008 चे पत्रान्वये सादर करण्यात आले. अपीलकर्त्याचे सदर अर्जाचे अनुषंगाने वस्तुस्थिती दर्शक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

अपीलार्थी महेंद्र रामकृष्णराव शेंडे विरुध्द कलावती रामकृष्णराव शेंडे यांचे मौजा सालोड येथील अकृषिक भूखंडाचे वादग्रस्त फेरफाराचे प्रकरण आर.टी.एस.64/2/07–08 हे माझे कोर्टात सुरु होते. सदर प्रकरणात दि. 11.8.2008 रोजी आदेश पारित करण्यात आला आहे. प्रकरणातील आदेशाची प्रत अर्जदारास डाकेने पाठविण्यात आली आहे. सदर प्रत प्राप्त झालेली नसल्याचे अर्जदार यांनी दि. 19.9.2008 रोजी सांगितले. त्यांना आदेशाची प्रमाणीत प्रत देखिल देण्यात आली आहे.

अपीलार्थीचे भूखंडाचे उपरोक्त प्रकरण या कार्यालयात दि. 13.3.2008 पासून सुरु होते. सदर प्रकरणी प्रकरणातील दोनही पक्षांना आवश्यक कागदपत्रे व रेकार्ड सादर करण्याची वेळोवेळी संधरी देण्यात आली आहे. प्रकरणात दि. 11 ऑगस्ट 2008 रोजी आदेश पारीत करण्यात आले आहे. अर्जदार यांनी तहसिलदार वर्धा यांचेकडे सादर केलेल्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने प्रकरणात उपलब्ध असलेल्या संपूर्ण कागदपत्रांच्या 288 छायाप्रती देखिल देण्यात आलेल्या आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार महेंद्र रामकृष्णराव





शेंडे यांचे विरुध्द निकाल लागल्यामुळे त्यांचेवर अन्याय झाला असल्यास आदेशा विरुध्द सक्षम वरीष्ठ अधिका–याकडे अपील करण्यास देखील दि. 3.10.2008 ला दिलेल्या माहिती अधिकाराचे अर्जाचे अनुषंगाने दि. 24.10.2008 चे पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले आहे.

उपरोक्त प्रकरणी दि. 11.8.2008 रोजी आदेश झालेला असतांना व त्याविरुध्द सक्षम अधिका–याकडे अपील दाखल न करता प्रस्तुत प्रकरणाचे संबंधात अनावश्यक व कार्यालयाशी संबंधीत नसलेल्या बाबीचे संबंधात आधि प्रश्नाचे स्वरुपात वारंवार माहितीच्या अधिकारा अंतर्गत व लोकशाही दिनामध्ये माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केले आहे. हेतुपुरस्सर त्रास देण्यासाठी अपील प्रकरणातील अर्जानंतर अर्जदाराने दि. 5.11.2008 रोजी पुनश्च वेगळा अर्ज करुन माहिती मागितली होती. त्यास उत्तर देण्यात आले. अपीलार्थी हा माझे समक्ष हजर राहून तुम्हाला पाहून घेईल अपील करुन तुम्हाला जन माहिती अधिकारी व तहसिलदार वर्धा यांना दंड ठोकल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारच्या धमक्या दिलेली असून असभ्य वर्तन केलेले आहे. इतकेच नव्हेतर दि. 16.1.2009 चे तक्रार अर्जान्वये मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे माझेविरुध्द 4 पृष्ठांचा तक्रार अर्ज सादर केलेला आहे. सदर तक्रार अर्जाची प्रत आपले माहितीस्तव यासोबत सादर करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता अपीलार्थी हा शासकीय अधिका–याशी गैरवर्तणुक व दबाव तंत्राचा वापर करुन माहितीच्या अधिकाराअंतर्गत वारंवार अज्र सादर करुन विनाकारण प्रशासनाची वेळ खर्च करीत आहे.

यावरुन अपीलकर्ता यांचे आर टी एस अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे प्रत्यक्ष हजर होते. मात्र निर्णयाच्या बाबत त्यांना तारीख माहित नव्हती व म्हणून त्यांनी माहितीचा अर्ज केला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी एकुण 22 जे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्यापैकी कोणतीही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005





च्या कलम 2 (च) मधील ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या माहितीचे उत्तर देण्याची आवश्यकता नव्हती. आर टी एस अपीलाचे सुनावणीस जर अपीलकर्ता प्रत्येक वेळेस हजर होते तर दोन्ही बाजुची कागदपत्रे दाखल झाले असल्यास त्या कागदपत्राची माहिती त्यांना होती. त्यामुळे संपूर्ण नस्तीची त्यांना आवश्यकता नव्हती. आर टी एस अपीलाच्या सुनावणीच्या

विरुध्द अपीलकर्ता यांना अपील करता आले असते. परंतु प्रत्येक मुद्याच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्याबाबत आक्षेप घेवून त्यांना न्याय मिळेल अशी त्यांची अपेक्षा असेल तर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे हे अपेक्षित नाही. व त्यामुळे मुळातच त्यांचा अर्ज हा फेटाळण्यासारखा दिसून येतो. व त्यामुळे एच.एम.लोखंडे नायब तहसिलदार वर्धा यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे तो खुलासा हा योग्य आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 397/2008.**

श्रीमती सिंधुताई उत्तमराव पाटील
रा. 651, नेहरु नगर, म.न.पा.नागपूर
पालीका कर कार्यालय झोन (5) जवळ
सक्करदरा नागपूर 9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी
गिरीपेठ नागपूर 10
2) श्री एस. बी. बडीये
जन माहिती अधिकारी तथा
नोंदणी अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
गिरीपेठ नागपूर 10 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2



2. अपीलकर्ता यांनी दि. 27.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा नोंदणी अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे दि. 1 जाने. 1991 पासून दि. 27.2. 2008 पर्यंतच्या कालावधीत प्रत्येक वर्षाला किती व कोणकोणत्या नाव पत्त्याच्या अर्थ सहायता देणा–या खा. संस्था किंवा खा. मर्यादित संस्थाचा नाव पत्त्याची नोंदणी झाली आहे. याबद्यलची एकुण तीन मुद्यांवर त्यांनी संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 12.4.2008

रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.5.2008 रोजी देण्यात आलेला असून अर्जदारानी मागितलेली माहिती अर्जदारास देण्यात यावी

असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांना दि.9.5.2008 रोजी एकुण 287 पानाकरीता रु. 574/- त्वरीत भरावे असे कळविले व त्यांनी त्या रकमेचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कायद्याचा अभ्यास करुन निर्णय देणे आवश्यक होते. परंतु कोणत्याही प्रकारे कारणमिमांसा देणारा निर्णय दिलेला नाही व अपीलकर्ता यांनासुध्दा कळविलेले नाही. ही प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची प्रशासकीय अकार्यक्षमता आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीच माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अंतीम अधिकारी म्हणून योग्य तो निर्णय घेवून माहिती उपलब्ध करुन दिली असती तर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता राहीली नसती. अर्जदारास माहिती ही त्यांनी अर्ज केल्याच्या तारखेपासून 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद अधिनियमाच्या कलम 7 (1) मध्ये आहे व 30 दिवसात उपलब्ध करुन दिली नसेल तर





विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद कलम 7 (6) मध्ये आहे. परंतु जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबतचे कोणतेही आकलन करुन न घेता निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 88/2009.**

श्री मिलींद दिगांबर गजभिये
प्लॉट नं. 196 कबीर नगर
नारी लेआऊट नागपूर 440026 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल
सिव्हील लाईन्स नागपूर 1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल यांचेकडे एप्रिल 2007 ते 2008 मार्च हया कालावधीत मुलींकडून/पालकांकडून घेण्यात आलेली एकुण स्कूल फी व कॉम्प्युटर फी बाबतची सविस्तर आकडेवार माहितीचा तपशिल व्यक्तिशः लेखी स्वरुपात घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.10. 2008 रोजी स्कूल फी ची माहिती आपल्याला कोणत्या वर्गाची हवी आहे.





हयाबद्यल खुलासा होत नाही. कॉम्प्युटर फी बाबत आम्ही शासनाच्या निर्णयानुसार फी सांगितलेली आहे असे कळविलेले दिसून येते. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा न करता अपीलकर्ता यांना दि. 10.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना नोटिसेस काढल्या होत्या. परंतु स्वतः मुख्याध्यापिका हया हजर झाल्या नाहीत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्यांना दि. 16.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देण्यात आले होते परंतु कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्रीयुत एस.एम.उके यांनी युक्तीवाद केलेला आहे. युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज हा मोघम

असल्यामुळेच त्यांना स्पष्टीकरण मागितलेले होते. त्यांना विशिष्ट इयत्ताची माहिती पाहिजे असल्यास तशी आम्ही देण्यास तयार आहे किंवा सर्व मुलींची माहिती हवी असल्यास त्या 3000 मुली आहे ती सुध्दा आम्ही द्यावयास तयार आहे. परंतु त्यांनी तसे स्पष्ट करावे. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की इयत्ता 1 ते 10 वी पर्यंतची सर्व मुलींची माहिती पाहीजे आहे व ती जन माहिती अधिकारी द्यावयास तयार असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती कागदपत्राच्या छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 व्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः उपस्थित होवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 90/2009.**

श्री हरदास किसन पाटील

136 बजाजनगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

पोलीस उप आयुक्त

परिमंडळ क्र. 1 नागपूर शहर

2) जन माहिती अधिकारी तथा

सहा. पोलीस आयुक्त

एम.आय.डी.सी.विभाग

परिमंडळ क्र. 1 नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.11.2008 रोजी मदन किसन पाटील या मृत व्यक्तीबद्यल दि. 20.11.2008 रोजी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.1.2009 रोजी माहिती ही पुरविण्यात आली. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि. 5.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आतापर्यंत मेयो हास्पीटल व पोलीस यांचेंकडे याच प्रकरणात

...2...



तीन वेळेस वेगवेगळया पध्दतीने माहिती मागितलेली दिसून येते. वास्तविक रस्त्यावर बेशुध्द पडलेल्या व्यक्तीच्या संदर्भात पोलीस यांचेकडे माहिती उपलब्ध असेल ती संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता हे त्यांना झालेल्या दुखापतीबद्यल तसेच त्यांना मारहाण करणा–या आरोपी विरुध्द कोणती कार्यवाही केली असे विचार आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्याबाबत कोणतीही तक्रार नव्हती. आरोपी नसल्याबद्यल नव्हती त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उदभवत नाही अशी माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता वारंवार ती माहिती मागत आहे. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांचेकडे संबंधित इसमाच्या संदर्भात रुग्णालयात दाखल झाला नाही रुग्णालयातून त्यांना सोडण्याची जी कागदपत्रे असतील ती माहिती रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देणे

संयुक्तिक राहिल. माहिती जशी असते तशीच मिळते याची नोंद अपीलकर्ता यांनी घेणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मदन किसन पाटील या इसमाच्या संदर्भात रुग्णालयात दाखल झाला नाही ते रुग्णालयातून सुटी देण्यापर्यंतची जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 93/2009.**

श्री प्रमोद भेदीराम हरडे
मु. पो. नवेझरी ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. जी. बारापात्रे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
गोंदिया पाटबंधारे विभाग गोंदिया
2) श्री व्ही. बी. बैस
जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय अधिकारी
पाटबंधारे उपविभाग तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी

पाटबंधारे उपविभाग तिरोडा सन 2006–07 ते 2008–09 या आर्थीक वर्षात चोरखमारा जलाशयाच्या नहराचे नविन बांधकाम व जुने बांधकाम कोणत्या योजने अंतर्गत आणि

2



त्याची सत्यप्रती माहितीबाबद एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.
अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे नंतर हजर झाले व त्यांनी असे सांगितले की दि. 6.9.2008 ची माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे व ती मुद्येनिहाय नसुल विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रत्येक नोटीसीप्रमाणे ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे हजर झालेले होते परंतु प्रत्यंक वेळेस प्रथम अपीलीय अधिकारी हे कार्यालयात हजर नसल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. व त्यामुळे त्यांना

जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती अपुर्ण व दिशाभूल करणारी असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समोर सादर करता आले नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले होते की माहिती ही दि. 6.9.2008 ला देण्यात आली परंतु विलंबाचे कारण कार्यालयात अधिकारी कर्मचारी कमी आहेत असे त्यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी तपशिलामध्ये आयोगाकडे माहिती कशी अपुर्ण आहे याबाबचा युक्तीवाद केलेला आहे व त्याबाबत अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. जी माहिती शाखा कार्यालयाशी निगडीत नाही असे सांगितलेले आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेवून पुरविणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना उर्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.





**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 25.7.2008 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही मुद्येनिहाय संकलीत करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **<u>अधिक्षक</u>**

अभियंता पाटबंधारे विभाग गोंदिया यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 89/2009.**

श्री देवाभाऊ बी. उराडे
विद्याविहार कॉलनी सिंदेवाही
ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एस. धोपटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य
ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र सिंदेवाही
ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर

2) श्री आर. के. खनके
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र सिंदेवाही
ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ..2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2



2. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2008 श्री धोपटे अधिव्याख्याता बदली वाहतुक भाडयाचे बिल ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र सिंदेवाही येथे सादर केले काय आणि बिलाची उलच केली काय याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर माहिती अधिकारी अधिक्षक ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र यांनी आपण मागितलेली माहिती ही वैयक्तिक द्वेशभावनेतून मागितलेली आहे. करीता सदर माहिती तुर्त देता येत नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

श्री देवाभाऊ बी. उराडे विद्याविहार कॉलनी सिंदेवाही तह. सिंदेवाही हे विस्तार अधिकारी पं. पंचायत समिती सिंदेवाही या पदावर कार्यरत होते ते निलंबित झाल्यामुळे सद्यास्थितीत त्यांची पदस्थापना पं.स.भद्रावती येते आहे.

श्री उराडे विस्तार अधिकारी माहितीच्या अधिकारात श्री अरुण मादेशवार यांचे मार्फतीने मागवितो व स्वतः सुध्दा वारंवार माहिती मागवितात.

शासकीय अधिकारी/कर्मचारी हयांचा तक्रारी करणे हा त्यांचा उद्योग आहे. ते कार्यालयीन कामे करीत नसून नुसत्या कर्मचारी/अधिकारी हयांच्या तक्रारी करतात. हयामुळे त्यांचेवर तत्कालीन संवर्ग विकास अधिकारी श्री धोपटे हयांनी विभागीय चौकशीचा प्रस्ताव पाठविल्यामुळे श्री धोपटे प्राचार्य यांच्या वारंवार तक्रारी करतात.

श्री उराडे यांनी स्वतः व श्री मादेशवार यांच्या वतीने माहितीच्या अधिकारात पंचायत समिती सिंदेवाही येथे 26 वेळा माहिती मागविली आहे व ती त्यांना दिली आहे. तसेच माहितीच्या अधिकारात त्यांनी श्री धोपटे प्राचार्य यांच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत 48





तासात मागविली व ती तत्कालीन प्राचार्य हयांनी दिली.

श्री उराडे विस्तार अधिकारी पं. स. हे भांडखोर स्वभावाचे असल्यामुळे त्यांना अपीलासाठी बोलविण्यात आले नाही. श्री उराडे हयांचा उद्येश माहितीच्या अधिकारात माहिती मागवून विनाकारण तक्रारी करीत असतात त्यामुळे त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही.

श्री उराडे हयांच्या वर नमुद केलेल्या कृत्यामुळे त्यांचेवर खात्याची विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी त्यांचे निणय दि. 24.3. 2009 अन्वये प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना निलंबित केलेले असल्यामुळे ते वारंवार तक्रारी करीत आहे व माहिती मागत आहे. अपीलकर्ता यांच्या पुर्वीच्या अपील क्र. 42/08 व 43/08 हे खारीज करण्यात आलेले आहे. यावरुन

अपीलकर्ता हे कोणत्याही व्यापक जनहिताकरीता माहिती मागत नसून त्यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीवर चिडून जावून त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व हा अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 109/2009.**

श्री नंदलाल हरिलाल बाटबरैया

रा. रोहा पो. बेटाळा

ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपविभागीय दंडाधिकारी

भंडारा ता. जि. भंडारा

2) श्री जगणीक

जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी दंडाधिकारी मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी तहयिल कार्यालय मोहाडी यांचेकडे बहुउद्येशिय वैनगंगा मत्स्यपालन सहकारी संस्था येथील स्वस्त धान्य दुकानाची माहिती मिळण्याबाबत एकुण 12 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित

..2..



मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 12.1.2009 रोजी माहिती उपलब्ध झाली असली तरी सदरची माहिती अपुर्ण आहे या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांना मुद्या क्र. 10, 11 ची माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती बहुउद्येशिय वैनगंगा मत्स्यपालन सहकारी संस्था यांचेकडील असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले होते व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. तसेच अपीलकर्ता यांना दि. 22.6.2009 रोजी संस्थेकडूनच माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे संस्थेनी कळविलेले होते. परंतु अपीलकर्ता

यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. कारण संस्थेनी त्यांना माहितीचा खर्च भरण्याकरीता कळविलेले होते. असे असले तरी आता संस्थेकडून दोन मुद्याची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध झालेली आहे. व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले. तशी माहिती त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणली. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत मुद्या क्र. 10 व 11 ची माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 106/2009.**

श्री राजेंद्र मोतीरामजी बावनकर
गौतम नगर वार्ड पवनी
के.ऑफ राज जनरल स्टोअर्स बाजार चौक
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वा. स. मानकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख भंडारा

2) श्री आर. बी. फडतरे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख पवनी
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

.2.



2. अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांचे कार्यालयात शिट क्र. 16 न.भु.मा.901 ची नकाशा व 'क' प्रत मिळण्याबाबत तसेच क्षेत्र दुरुस्ती व आखिव पत्रिका करुन मिळावी अशी माहिती मागितलेली दिसून येते.
विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून पुन्हा त्यांनी प्रथम अपील हे अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातच दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 16.10.08 च्या अर्जाच्या अनुषंगाने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख पवनी यांनी दि. 12.11.2008 रोजी वस्तुस्थिती कळविलेली आहे. अपीलकर्ता यांची तक्रार आहे व त्या तक्रारीची चौकशी ही सुरु आहे व त्याबाबत अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांचेकडे दुरुस्ती करीता प्रस्ताव पाठविले असून त्यांचेकडून आदेश प्राप्त होताच आखीव पत्रिका दुरुस्ती क्षेत्र करुन

पाठविण्यात येईल तसे आपणास कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले आहे. त्यानंतर दि. 7.1.2009 रोजी अधिक्षक भूमी अभिलेख यांनी प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा ज्या स्थितीत माहिती आहे त्या स्थितीची माहिती नियमानुसार पुरविण्यात येते व त्यामुळे आपले प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 22.10.2008 रोजीसुध्दा अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांनी त्यांच्या तक्रार अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी दि. 19.1.2009 रोजी अर्ज अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांचेकडे केलेला दिसून येतो. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन मिळते. कोणत्याही प्रकारची गुणवत्तेच्या बाबत कार्यवाही करुन मिळत नाही व अपीलकर्ता यांना तशा





प्रकारे दरुस्तीची अपेक्षा आहे असे दिसून येते. त्यांच्या तक्रार अर्जाच्या संदर्भामध्ये वस्तुस्थिती त्यांना कळविलेली आहे. तक्रार अर्जाचा निर्णय हा महा. जमीन महसूल अधिनियम 1966 च्या प्रमाणे निर्णय घेवून कळविणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे कळविण्यात येईल असेही कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**

दि. 9.7.2009

राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 108/2009.**

श्री अजय विठठलराव भोयर
डॉ. खडसे लेआऊट बॅचलर रोड,
आर्वी नाक्याजवळ वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

2) श्री विजय मुन
जन माहिती अधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे तलाठी पदाच्या नियुक्तीबाबत (आपले कार्यालयातील जाहिरात क्र. 1/2007) च्या प्रमाणे एकुण पाच मुद्यांवर टपालाद्वारे माहिती घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. मात्र अपीलकर्ता यांना दि. 30.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. विलंबाचे कारण आस्थापना लिपीक यांनी माहितीचा अर्ज विलंबाने ठेवल्याने व प्रथम अपीलाचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सादर न केल्यामुळे विलंब झालेला आहे असा खुलासा केलेला आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये आस्थापना लिपीक यांचे सहाय्य घ्यावे लागते. व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 5 (4) व (5) प्रमाणे संबंधित आस्थापना लिपीक यानासुध्दा माहिती अधिकारी समजणे आवश्यक आहे. व

2..



त्यामुळे संबंधित लिपीक यानी अपीलकर्ता यांच्या अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे व प्रथम अपीलाचीसुध्दा दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 23.6.2008 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये तसेच दि. 17.9.2008 च्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये ज्या आस्थापना लिपीकाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजून शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी यांनी करावयाची असून सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी वर्धा** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 103/2009.**

श्री मंगेश रुपचंद मेश्राम
मु. पो. पाहार्णी
ता. नागभिड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. बी. मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. (स व सु विभाग क. 1)
ब्रम्हपूरी ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

2) श्री संजय महादेवराव श्रृंगारे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.
उपविभाग नागभिड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी सब डिव्हीजन विभाग विद्युत वितरण कंपनी यांचेकडे दि. 1.7.2008 पासून सुरु झालेल्या धडक मोहीमेअंतर्गत दि. 15.7.2008पर्यंत संपुर्ण नागभिड तालुक्यात किती विद्युत चो–या पकडण्यात आल्या. त्या सर्वांची यादी त्यांचेवर आकारण्यात आलेल्या दंड तसेच विजचोर ग्राहकांची स्थळ निरीक्षण अहवाल इत्यादी माहिती साध्या पोष्टाद्वारे द्यावी असे

..2..



नमुद करुन मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती अपुर्ण आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दि. 10.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांना दिलेली माहिती सादर केलेली असल्यामुळे माहिती अपुर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांना जी 12 व्यक्तींची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्या व्यतिरिक्त इतर विद्युतचोरी करणा–याची स्थळ निरीक्षण अहवालाची प्रत आयोगाकडे दाखल केलेली आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना अपुर्ण उपलब्ध करुन दिली असे दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांनी स्थळ निरीक्षण अहवालाची प्रत दाखल केलेली आहे त्यात विजचोरीचा उल्लेख नाही. मात्र तपासणी केलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे मिटर तपासले परंतु चोरी आढळुन आली नाही त्याची माहिती दिलेली नाही. त्याबाबतची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे दिसून येते. त्याकरीता मात्र अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिलेल्या माहितीपेक्षा अधिक विजचोरी असल्यास ती यादी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्यानंतर त्याबाबतची माहिती देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या जवळ असलेली विजचोरी पकडलेल्या व्यक्तींची यादी द्यावी व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्याबाबतची संपूर्ण माहिती कागदपत्राच्या छायांकीत प्रतीसह विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 105/2009.**

श्री विनोद माहेश्वरी
125 इंदिरा नगर तुमसर 441912
जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप संचालक
नगर रचना विभाग
नागपूर विभाग नागपूर
2) श्री रा. से. राऊत
जन माहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार
नगर रचना विभाग
नागपूर विभाग नागपूर
जुने सचिवालय सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 9.7.2009 )

नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2..

..2..

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी उप संचालक नगर रचना विभाग यांचे कार्यालयात Govt. Circular concerning service road on classified roads dt. 10.6.2004 यु.पी.सी.ने उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या करीता रु. 4 एवढी रक्कम चलानाद्वारे भरुन उक्त परीपत्रकाची प्रत प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2008 रोजी मनिऑर्डरने रु. 4 चा भरणा केलेला दिसून येतो. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.1.2009 रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे दि. 23.1.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व तरीही खर्चाचा भरणा करुन घेतला व त्यानंतरही विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता आज गैरहजर असला तरी अपीलकर्ता याच्या दि. 6.10.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध दिलेली नाही तसेच दि. 20.10.08 अशी टाकून जरी पत्र दिलेले असले तरी ते पत्र दि. 4.11.2008 रोजी पोष्टात टाकलेले

असल्यामुळे व त्यांना दि. 7.11.2008 रोजी मिळाल्यानंतर त्यांनी रु. 12 ची मनीऑर्डर दि. 14.11.2008 ला केली व ती कार्यालयाला दि. 20.11.2008 ला मिळाली असे त्यांनी अपील मेमोमध्ये नमुद केले आहे. यावरुन अपीलकर्ता यांच्या संदर्भामध्ये 30 दिवाचे आत
सर्व प्रक्रिया पूर्ण करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला नाही. उलट दि. 4. 11.2008 ला पत्र हे पोष्टात टाकून दि. 20.10.2008 ला पत्र दिले आहे असे दाखविण्यात आले. त्याबद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

या प्रकरणातील अपीलकर्ता श्री माहेश्वरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम

..3..



2005 अंतर्गत दि. 10.6.2004 रोजीच्या शासन परिपत्रकाची प्रत अपेक्षीली होती. याबाबतचा त्यांनी सादर केलेला अर्ज कार्यालयास दि. 6.10.2008 रोजी प्राप्त झाला होता. सदर अज्र कार्यालय प्रमुखांनी स्वाक्षरी करुन सहा. माहिती अधिकारी यांना दि. 13.10.2008 रोजी हस्तांतरीत केला होता. या अर्जात नमूद शासन परिपत्रक कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असल्यामुळे सदर परिपत्रकाच्या प्रतिकरीता येणा–या खर्चाची रक्कम चलान द्वारे भरणा करण्याबाबत आवेदकास कार्यालयीन पत्र क्र. 2682 दि. 20.10.2008 अन्वये कळविण्यात आले होते.

व्रील प्रमाणे िचा भरणा करण्यास आवेदकास कळविल्यानंतर आवेदकाने सदर रककम मनी और्डर ने कार्यालयास पाठविली व सदर रककम कार्यालयास दि. 20.11.2008 रोजी प्राप्त झाली आहे. फी ची रककम प्राप्त होण्याच्या कालावधीतच सहा. माहिती अधिकारी यांची बदली झाली असल्यामुळे व त्यांच्या जागेवर रुजू होणारे सहा. माहिती अधिकारी काही कारणास्तव दि. 31.12.2008पर्यंत कार्यालयात रुजू होवू न शकल्यामुळे सदर प्रकरणात फी चा भरणा करण्यात आला असल्याची बाब सहा. माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देता आली नाही. याच कालावधीत माहिती अधिकारी यांना चंद्रपूर शाख कार्यालयाच्या तपासणी करीता चंद्रपूर येथे पाठविण्यात आले व त्यानंतर काटोल नगर परिषदेच्या कर आकारणीच्या कालाकरीता काटोल येथे जावे लागले. त्यामुळे या कालावधी दरम्यान आवेदकाने माहिती मिळण्याकरीता फी चा भरणा केला असल्याची बाब माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आली नाही व अनावधानाने ही बाब लक्षात येवू शकली

नाही. त्या नंतर दि. 28.11.2008 रोजी उपसंचालक नगर रचना कार्यालयात नगर रचनाकार या पदावर नियमित नगर रचनाकार रुजू झाल्यामुळे पूर्वीच्या माहिती अधिका–यांनी त्यांचा कार्यभार नव्याने रुजू झालेल्या नगर रचनाकार यांना हस्तांतरी केला.

या प्रकरणात आवेदकाने फी चा भरणा केल्यानंतरच्या कालावधीतच सहा. माहिती अधिकारी व माहिती अधिकारी यांची बदली झाली असल्यामुळे प्रकरणात माहिती पाठविण्याची कार्यवाही अनावधानाने करता आली नाही. तथापि सदर बाब आवेदकाने निदर्शनास आणून दिल्यानंतर अर्जदारास सदर माहिती दि. 23.10.2009 च्या पत्रान्वये उपलबध करुन देण्यात आली आहे. ..4..



या ठिकाणी नम्रपणे नमूद करण्यात येते की माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक 1. 10.2008 ते 28.11.2008 या कालावधीत त्यांच्या नियीमत पदाव्यतीरीक्त अतिरिक्त पदाचा कार्यभार असल्यामुळे दोन पदांचा कार्यभार सांभाळतांना आवेदकाने फी चा भरणा केल्याची बाब लक्षात न आल्यामुळे आवेदकास माहिती पाठविण्यास विलंब झाला आहे. आवेदकाने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे त्याबाबतची फी चा भरणा करण्यास आवेदकास विहीत मुदतीत व तातडीनेच कळविण्यात आले होते. त्यामुळे सदर माहिती आवेदकास त्वरीत उपलब्ध करुन देण्याचाच उद्येश होात. परंतु आवेदकाने फी चा भरणा केल्याची बाब नजन चुकीने लक्षा न आल्यामुळे आवेदकास तातडीने माहिती पाठविणे शक्य झाले नाही. या प्रकरणात आवेदकास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात ला असून अर्जदारास माहिती न देण्याचा किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा कोणताही उद्येश नव्हता ही बाब विचारत घेता आवेदकास माहिती प्राप्त होण्यास झालेल्या विलंबाबात कृपया क्षमा करावी यापूढे अशा प्रकरणात काळजीपूर्वक दक्षता घेण्यात येईल. वरील खुलाशावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी व सहा. माहिती अधिकारी यांच्या बदली किंवा रजेच्या संदर्भामध्ये त्याच कालावधीत बदल झाला असला तरी कार्यालयातील संबंधित कर्मचारी यांनी याबाबत अधिनियमात दिलेल्या मुदतीचे पालन करणे आवश्य आहे व तसे ते केलेले नसल्यास व जन माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आलेले नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे संबंधित कर्मचा–यास जन माहिती अधिकारी समजण्यात येते. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अर्ज दाखल झाल्यास तो स्वतंत्र

आवक नोंदवहीमध्ये घेण्यात येतो. त्या अर्जाच्या संदर्भामध्ये सर्व प्रक्रिया त्या नोंदवहीमध्ये नोंद केल्यास वरील प्रकारे कोणत्याही प्रकारची परिस्थिती उदभवणार नाही. परंतु सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख हे अतिशय बेजबाबदार आहे असे दिसून येते. व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या अंमलबजावणीकरीता कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय स्वतंत्र व्यवस्था करीत नाही असे दिसून येते. व त्यामुळेच अशा प्रकारे मुदतीत माहिती द्यावयाची तरतूद असली तरी त्याबाबत मुदीतत माहिती दिली जात नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या

..5..



प्रथम अपीलाच्या सुनावणीनंतर सुध्दा माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सहाय्य करणा—या कर्मचा—याच्या विरुध्द जोपर्यंत कार्यवाही केली जात नाही तोपर्यंत अशाप्रकारची परिस्थिती सुरु राहील व प्रत्येक वेळेस जन माहिती अधिकारी यांना आयोगापुढे माफी मागावी लागेल व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कर्मचा—याच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिका—यास माहिती मागण्याच्या अर्जाच्या संदर्भात ज्या कर्मचा—याचे सहाय्य घ्यावे लागते त्यांनासुध्दा अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे संबंधित कर्मचा—याच्या विरुध्द त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

2) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **उप संचालक नगर रचना विभाग नागपूर यांनी करावयाची असल्याने सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.**

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 9.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 125/2009, 126/2009, 980/2008, 981/2008.**

श्री अरुण डी. मादेश्वार
मु. गुंजेवाही ता. सिंदेवाही
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी (पं.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री आर. जी. पुरी
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक (पं.)
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 125/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे

1. ग्रामसेंवक, ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आलेल्या आहेत. त्याचे आरोपपत्राची प्रती मागितलेल्या दिसून येतात. माहितीचा कालावधी 2003





ते 2008 पर्यंतचे दिसून येतो. व सदरची माहिती रजिष्टर्ड पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना सदरची माहिती सन 2003 ते 2008 या कालावधीतील असल्यामुळे त्या कालावधीतील संबंधीत नस्तीची तपासणी करुन कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आपणास पुरविण्यास अंदाजे तीन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.3.2009 रोजी करण्यात आली व सुनावणी दरम्यान आपणास नेमक्या कोणत्या ग्रामसेवकांची, गा.वि.अ., वि.अ.पं. यांची माहिती पाहिजे याबाबत टिपणीवर नमुद करण्यास सांगीतले. त्यानुसार टिपणीत सदर ग्रामसेवक, गा.वि.अ., वि.अ.पं. यांचे नावे नमुद करण्यात आली असून त्यावर आपली स्वाक्षरी घेण्यात आली. परंतु सदर माहिती ही एकुण 13 कर्मचा–यांचे असून सदर माहितीचा शोधाशोध घेण्यास विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर माहितीपैकी या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यास 1 महिन्याची मुदत देण्यात यावी असे पत्र दि. 30.3.2009 रोजी देण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 28. 4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी दि. 19.12. 2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही अतिशय जुनी व ती तपासून देणे आवश्यक असल्यामुळे माहिती देण्यास विलंब लागणे हे सहाजिक होते. प्रथम अपीलाकरीता उपस्थित राहण्याकरीता दि. 10.1.2009, 29.1.2009, 2.3.2009, दि. 16.3.2009 रोजी नोटिसेस काढण्यात आल्या होत्या. परंतु अपीलकर्ता हे उपस्थित न राहिल्यामुळे विलंब झालेला आहे. मात्र दिनांक 16.3.2009

रोजी जी नावे दिली त्याच्या बद्यलची नावे त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.



3

4. अपील क्र. 126/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे पुन्हा निलंबीत ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती श्री सव्वालाखे यांच्या काळापासून ते ऑगस्ट 2008 पर्यंतची असून माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरची माहिती पुन्हा अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 20.10.2008 रोजी माहिती पुरविण्यास विलंब लागेल असे कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 18.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस दि. 19.12.2008, दि. 10.9.2009, दि. 4.2.2009, दि. 2.3.2009 उपस्थित राहण्यास कळविलेले होते. परंतु अपीलकर्ता दि. 16.3.2008 रोजी उपस्थित झाले. त्यामुळे त्यांना 72 पुष्ठामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 980/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2008 रोजी बि.जे.मेश्राम माजी ग्रामसेवक यांचे जात वैधता प्रमाणपत्रामध्ये व ग्रा.वि.अ.पदाची विभागीय स्पर्धात्मक परीक्षेचे निकालाची प्रत 2000–2008 पर्यंतची टिपणीची प्रत व आयूक्त नागपूर यांचे पत्र दि. 27.1994 ची आदेश माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दि. 18. 10.2008 रोजी मुद्या क्र. 1,5,व 6 ची देण्यात आली. मुद्या क्र. 3,4,7 मध्ये मागितलेली माहिती संबंधाने अर्थबोध होत नसल्याने पुरविता येत नसल्याने तसे त्यांना कळविले. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांना वारंवार बोलाविण्यात आले होते. परंतु ते उपस्थित न झाल्यामुळे व खुलासा न केल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन

माहिती अधिकारी यांनी असे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 981/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2008 रोजी माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे पी.डब्लू. अल्लीवार माजी ग्रा.वि.अ. यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली केलेल्या





कार्यवाहीची टिपणीची प्रत आणि इतर संपुर्ण कागदपत्राची प्रती मागितलेली दिसून येते. परंतु सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्दा क्र. 1 ची माहिती त्या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्दा क्र.2 च्या संदर्भामध्ये नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख होत नसल्यामुळे माहिती देण्यास अडचण निर्माण झालेली आहे असे दि. 7.11.2008 अन्वये कळविलेले आहे. परंतु स्पष्टीकरण न करता अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या करीता वारंवार नोटीसेस काढण्यात आल्या होत्या. दि. 16.3.2009 रोजी अपीलकर्ता उपस्थित झाल्यानंतर मुद्दा क्र. 1 ची माहिती ॲटी करप्शन ब्युरो अंतर्गत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने ॲटी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचेकडून मार्गदर्शन मागविल्यानंतर संबंधीताला माहिती पुरविण्यात येईल असे अपीलकर्ता यांना सांगितले. व अपीलकर्ता यांनी त्याबाबत तशी सही नोटशिट वर केलेली आहे. त्याप्रमाणे दि. 25.3.2009 रोजी पोलीस उपअधिक्षक ॲटी करप्शन ब्युरो यांचेकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्राची माहिती दि. 26. 3.2009 रोजी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. 23.6. 2009 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांनी वरील सर्व अपीलावरील अर्ज हे दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडून केलेले आहे. व त्यामुळे विनामुल्य माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व तशी ती दिलेली सुध्दा आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाने त्यांच्या दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या संदर्भात खंड विकास अधिकारी पं.स.सिंदेवाही

यांना चौकशी करण्यास आदेश दिले होते व त्याप्रमाणे खंड विकास अधिकारी पं.स. सिंदेवाही यांनी प्रमाणपत्र खालील प्रमाणे दिलेले आहे.



5

प्रमाणित करण्यात येते की श्री अरुण डी. मादेश्वार मु. गुंजेवाही ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर हे सन 2002–2007 च्या दारीद्रय रेषेखालील यादीत मोडत नाही करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे असे दि. 8.6.2009 रोजी चे प्रमाणपत्र दिसून येते. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सादर केलेले आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 125/2009, 126/2009, 980/2008, 981/2008 हे माहिती उपलब्ध झाल्यामुळे खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 119/2009.**

श्री जनार्दन गुलाबराव मून
791 नागसेन वन
नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री के. टी. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2.	अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद यांचेकडे पेंशन संबंधाने स्वस्तीक माध्यमिक विद्यालय तसेच शिक्षण उपसंचालक दि. 14.10.2008 करीताची माहिती मागितलेली दिसून येते.



सदरची माहिती रजिस्टर्ड पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.11.2008 अन्वये मुख्याध्यापक यांचेकडून माहिती मागविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 3.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी ही दि. 17.1.2009 रोजी घेण्यात आली असून अपीलकर्ता यांना त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दि. 17.6.2009 रोजी पुन्हा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. व त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना पूर्वीही माहिती होती. त्याबाबतची दि. 15.11.2008 चे पत्र त्यांना मुळात दिलेले होते व त्यावरुनच त्यांनी माहिती मागितली असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन अपीलकर्ता यांना या संपूर्ण प्रकरणाची माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु त्यांनी जी माहिती मागितली त्यात कोणत्याही प्रकारचे निश्चित अशी माहिती नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1)	अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 140/2009.**

श्री इमरात इन्नयतुल्लाह चिस्ती
हॉटेल अल जम जमच्यामागे, आझमशहा चौक
मस्जीदच्या बाजुला सेंट्रल एव्हेन्यू रोड
नागपूर 2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
स्थावर अधिकारी
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे त्यांचा दि. 6.8.2008 च्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोष्टने



घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 31. 12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12. 1.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 9.1.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर दि. 17.1.2009 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांच्या कार्यवाही झालेली आहे ही माहिती उपलब्ध झाली तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे अपीलाच्या सुनावणीस कार्यालयात विलंबाने आलेला होता. माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटलेले आहे. मात्र कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा आरोग्य अधिकारी यांचेकडे केला होता. विषय हा स्थावर अधिकारी यांचे अधिकारातील आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांना अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यास स्वतः अर्जदाराच कारणीभूत आहे. परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भातील माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 13.7.2009

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 143/2009.**

श्री भाष्कर आनंदराव मडावी
पंचायत समिती सभापतीचे निवासस्थान
रेल्वे स्टेशन जवळ हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विवके एस. बोंदरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री हेमंत चं. भोयर
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे श्री विजय धापके गट विकास अधिकारी पं. स. यांचेविरुध्द केलेल्या दि. 16.5. 2008 च्या संदर्भात केलेल्या चौकशी व झालेल्या कार्यवाहीच्या झेरॉक्स प्रती मिळण्याबाबत. एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. ... 2...



सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.11.2008 रोजी प्रथम अपील हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांना दि. 6.12.2008 अन्वये माहिती पुरविण्यात आली. त्यानंतर पुन्हा दि. 29.12.2008 ला माहितीच्या अर्जामध्ये माहिती मागितली ती त्यांना दि. 17.1.2009 ला पुरविण्यात आली. परंतु सदरची माहिती अर्धवट, अपुर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे म्हणून अपील केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 10.12.2008 रोजी देण्यात आलेला आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्याबद्यल अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अहवाल समाधानकारक नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती असते तशी माहिती उपलब्ध होते. व त्यामुळे चौकशीमध्ये जी बाब समोर आलेली आहे तीच अहवालामध्ये दिलेली आहे. सदरचा अहवाल मान्य नसल्यास अपीलकर्ता यांनी वरीष्ठांकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. त्यातही संबंधित खंड विकास अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्याबाबतचा चौकशी अहवाल हा अपीलकर्ता यांना चौकशी पुर्ण झाल्यावर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 136/2009.**

श्री मुकेश हेमराजजी बोंबाटे
पडोळे नगर वाठोडा रोड
नागपूर 8 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र अनिमल ॲन्ड फिशरीज सायन्सेस
युनिव्हर्सीटी नागपूर सेमिनरी हिल्स नागपूर 6
2) जन माहिती अधिकारी तथा
रजिस्ट्रार
महाराष्ट्र अनिमल ॲन्ड फिशरीज सायन्सेस
युनिव्हर्सीटी नागपूर सेमिनरी हिल्स नागपूर 6 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.





2. अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार महाराष्ट्र अनिमल ॲन्ड फिशरीज सायन्सेस यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. महाराष्ट्र अनिमल ॲन्ड फिशरीज सायन्सेस युनिव्हर्सीटी नागपूर ही युनिव्हर्सीटी महाराष्ट्र शासनाचे अधिपत्याखाली चालते काय या युनिव्हर्सीटीला महाराष्ट्र शासनाचे निर्बंध आहेत काय

2. दि. 31.10.2008 रोजी उघडण्यात आलेले निविदे मध्ये राष्ट्रीय विकास सेवा सहकारी संस्था नागपूर या संस्थेचा निविदेचा लिफाफा का उघडण्यात आला नाही.

3. आपली युनिव्हर्सीटीला महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक लागू होत नाही काय.

सदरच्या माहितीचा कालावधी दि. 31.10.2008 ते 7.11.2008 आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19. 11.200 रोजी मुद्यावरील मते, कोणती कार्यवाही केली जाईल इत्यादीचा समावेश माहिती अधिकाराच्या व्याख्येत होत नाही. तसेच प्रश्नांची उत्तरे देण्याची तरतुद अधिनियमात नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले आहे. उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती कळविलेली असल्यामुळे अपील अर्जाची सुनावणीची कार्यवाही माहिती अधिकारी यांचे द्वारे करण्यात आलेली नाही असे कुलसचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा सादर केलेला आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की कमीत कमी मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. आतापर्यंत बरेच अर्ज केलेले आहे. परंतु त्या अर्जाची तरतुद दिलेली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अर्ज करावा लागला. अपीलकर्ता यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात जरी माहिती मागितलेली असली तरी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी काय कार्यवाही झालेली असते त्या कार्यवाहीची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. प्रश्न





विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर विचारता येत नाही असेच ढोबळ उत्तर देणे हे कोणत्याही प्रकारचे आकलन न करता उत्तर देणे आहे. माहितीचा अर्ज हा योग्यरित्या वाचून त्यावर विचार करुन मगच माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. व या प्रकरणामध्ये माहिती देण्यापेक्षा ती देता कशी येणार नाही अशा प्रकारचा प्रयत्न केलेला दिसून येतो. प्रथम अपीलाची तरतुद ही अर्जदार यांना जरी माहिती मिळालेली नसली तरी त्याकरीता दिलेली आहे व प्रथम अपीलाची कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करावयाची असते. प्रथम अपील हे माहिती अधिकारी यांच्या निर्णयाच्या विरुध्द असते. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे म्हणून अपीलाची सुनावणी घेतली नाही हा अडाणीपणा आहे. व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दि. 12.11.2008 रोजीचा आहे व साफसफाई कामगार ठेकाबाबत अपीलकर्ता यांचा दि. 4.11.2008 साध्या पत्राप्रमाणे दि. 18.12.2008 रोजी त्यांना ठेक्याबाबत कळविण्यात आलेले आहे. यावरुन त्यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कामकाजातील विसंगती लक्षात घेणे आवश्यक आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे व त्यामुळे अपीलकर्ता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 139/2009.**

श्रीमती कांचन केशवराव मंडलीक
द्वारा केशवराव आबाजी मंडलीक प्लॉट नं. 117
बपूनगर उमरेड रोड
नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एच. मुज्जेलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर

2) श्री आर. के. पिंपळे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे लोक आवास गृह योजनेखाली गाळयासाठी दि. 14.10.2006 ला अर्ज करुन बुकींग अमाऊट म्हणून रु. 25000/- जमा केले परंतु 15 दिवसही झाले नाही तोच दरमहा 195000/- रु. प्रमाणे 7 लाख 80 हजार रुपये भरण्यांची ना.सु.प्र.कडून मागणी सुचना आली. परंतु सदरच्या रकमेची त्वरीत व्यवस्था होणे शक्य नव्हते म्हणून बुकींग रद्य करण्यासाठी अर्ज केला व त्याप्रमाणे रु. 25000/- हे परत करण्याची





विनंती केली परंतु ते परत करण्यात आले नाही म्हणून माहितीचा अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.9.2008 रोजी सर्व मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व सोबत गाळे वाटपाच्या अटी व शर्ती अर्जदारानी मान्यता दिलेली प्रत सुध्दा त्यासोबत दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 20.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.11.2008 रोजी देण्यात आलेला असून सदरचे अपील हे माहितीच्या अधिकारा अंतर्गत तक्रारीचे निराकरण करणे अभिप्रत नाही या कारणास्तव खारीज करण्यात आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच दि. 18.11.2007 रोजीच त्यांना आपले दि. 15.11.2006 व 12.12.2006 च्या पत्रानुसार आपली गाळा नोंदणी रद्य करण्यात आली असून विश्वस्त मुडळाचे ठरावानुसार व आवेदन पत्रातील अट क्र. 11 नुसार जमा केलेली रक्कम रु. 25000/- हे परत करता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. तरीसुध्दा माहितीचा अर्ज दाखल केला. व राज्य माहिती आयोगाकडेसुध्दा माहिती दिली नाही म्हणून अपील दाखल केले. सदरच्या प्रकरणी अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती पुर्वीपासूनच आहे परंतु त्यांची रु. 25000/- परत करण्याची मागणी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकारची कारवाईची विनंती मान्य करता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 141 / 2009.**

सौ. शोभाताई हिंमतराव आठवले
मु. पो. भारसिंगी
ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. जलालखेडा
ता. नरखेड जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. भारसिंगी
ता. नरखेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2008 रोजी कनिष्ठ अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. भारसिंगी यांना माहिती अधिकार त्यांचे दि. 21.5.2007 ते 30.6.2008 च्या अर्जाच्या संदर्भात विद्युत तारा टाकल्यापासून ते आजपर्यंत विद्युत तारा काढून टाकण्याबाबतची माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा

..2.



निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दि. 15.10. 2008 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी हे आज आयोगापुढे हजर झाले नाही. यावरुन त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे. प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय द्यावयाचा असतो. परंतु सहा. अभियंता किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय न देता पुन्हा कनिष्ठ अभियंता यांनी उत्तर दिलेले आहे. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. दिनांक 15.12.2008 रोजी सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाल्यावर आपल्या प्लॉट वरुन गेलेल्या तारा काढण्याबाबत स्थानांतरीत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे कळविल्यानंतर आतापर्यंत जी कार्यवाही झालेली आहे ती जन माहिती अधिकारी यांनी त्वरीत अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. तशी ती कळविली नाही तर जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25 हजाराची शास्ती लादण्यात येईल याची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत झालेल्या पुढील कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 138/2009.**

श्री अशोक श्रीराम गायकवाड
मु. पो. शेगांव (बुजरुक)
ता. वरोरा जि. चंद्रपूर 442906 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेश पु. वनरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. उपनिबंधक
सहकारी संस्था वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा यांचेकडे अपीलकर्ता यांच्या दि. 16.8.2008 च्या लेखी अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये धान विक्रीचे

..2..



पैसे न मिळाल्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 13.12.2008 रोजी प्रथम अपील हे सहा. उपनिबंधक सहकारी संस्था वरोरा यांचेकडे केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळेराज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहे परंतु सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा हे हजर नाही. तसेच सहा. उपनिबंधक सहकारी संस्था यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता दि. 18.12.2008 ला पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्याही सुनावणीस ते हजर झालेले नाही. व अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे त्यांनी माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन सचिव तथा माहिती अधिकारी कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती लादण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेणे जरी बंधनकारक असले तरी जन माहिती अधिकारी यांना दि. 18.6. 2009 रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटिस काढण्यात आलेली होती. यावरुन त्यांना संधी देण्यात आली होती. परंतु ते हजर राहीलेले नसल्यामुळे त्यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी घेतलेली आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणेसुध्दा आवश्यक आहे. व अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली

माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

3

3

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10. 11.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाही व आयोगा पुढे सुध्दा हजर झाले नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000रु/– शास्ती लादण्यात येत आहे. **सदरची शास्तीची वसुली सहा. उपनिबंधक सहकारी संस्था वरोरा यांनी करावयाची आहे.**

2) अपीलकर्ता यांना सहा. उपनिबंधक सहकारी संस्था वरोरा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा यांचेकडून माहिती उपलब्ध करुन पुरविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**

खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 153/2009.**

श्री यशवंत ग्यानीराम बोरसरे

मु. घोटी

ता. गोरेगाव जि. गोंदिया 441801 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

खंड विकास अधिकारी

पंचायत समिती गोरेगाव

ता. गोरेगाव जि. गोंदिया

2) श्री पी. आर. फटींग

जन माहिती अधिकारी तथा

सचिव

ग्रामपंचायत घोटी

ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी ग्रामपंचायत कार्यालय घोटी यांचेकडे दि. 7. 11.99 ला श्रीमती सरस्वता मनिराम बोरसरे या बाईला मृत्यू दाखविले त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे.





सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी ग्रामपंचायत घोटी यांनी सरस्वता बाई यांचे मृत्यू नोंद रेकॉर्ड झेरॉक्स, त्याप्रमाणे मालकीचे घर फेरफार करीता आलेले अर्ज व स्टॅम्प पेपर झेरॉक्स, कर आकारणी नमूना 8 ची झेरॉक्स, फेरफार करण्यात आलेले ग्रा.पं.चे ठराव, मतदार यादीचे ओळखपत्र यांची छायांकीत प्रती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 24.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.3.2009 रोजी देण्यात आलेला असून संबंधित ग्रामसेवकानी लेख्यामध्ये असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असा निर्णय दिला. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना कागदपत्रे उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी मान्य केले परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की सरस्वताबाई जिवंत असतांना मृत घोषित केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की एका व्यक्तीला दोन पत्नी होत्या. व दोन्हींची नावे सरस्वताबाई होते. एक पत्नी 1999 मध्ये मयत झाली व त्या मृत्युची नोंद होवून मालकीचे घराच्या संदर्भामध्ये तीच्या मुलीनी फेरफाराचा अर्ज दिला व त्याप्रमाणे फेरफार करण्यात आला. दुस–या पत्नीचे नाव सरस्वताबाई होते व ती जानेवार 2009 मध्ये वारली व त्यामुळे श्री यशवंत बोरसरे हे त्या संदर्भात तक्रार करुन कारवाई करावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये तसेच अपीलकर्ता यांच्या म्हणण्यानुसार फेरफार बदलता येत नाही. परंतु त्यांना माहिती मात्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 14.7.2009

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 154/2009.**

श्री राकेश यशवंत लंजे
मु. पो. ता. अर्जुनी/मोरगाव
जि. गोंदिया 441701 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. सी. गन्नात्रा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग गोंदिया
2) श्री के. के. शेंडे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी
उपवनसंरक्षक कार्यालय
गोंदिया वनविभाग गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2008 रोजी माहिती अधिकारी उपवनसंरक्षक कार्यालय गोंदिया यांचेकडे आर्थीक वर्ष 2003–04 या कालावधीत गोंदिया वनविभागात साग जडी खरेदी मोठया प्रमाणात अनियमितताच्या संदर्भामध्ये तयार केलेली रकमेचे खोटे बील

..2..



(प्रमाणके) व तयार करण्यामध्ये कोणते अधिकारी व किती रकमेचा अपहार केला याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 22.10.08 रोजी एकुण 81 पृष्ठांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यामध्ये माहिती अधिकारी यांनी श्री वाढई यांनी केलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल पाठविलेला आहे. परंतु अहवालाची मला आवश्यकता नाही. त्या अहवालावरुन मागितलेली माहिती काहीच कळत नाही. त्यामध्ये जर तर ची भाषा वापरलेली आहे असे अपीलाचे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.1.2009 रोजी देण्यात आलेला असून अपील अर्जानुसार अर्जात नमुद केलेली माहिती पुरविण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळालेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी खोटी बीलाच्या छायांकीत प्रती मागितलेल्या आहे त्या आधारावर चौकशी होवून संबंधितांना शिक्षासुध्दा झालेली आहे व त्या चौकशीचा अहवाल अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना देयके हवे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की देयके ही अे. जी. कडे पाठविण्यात आलेली आहे व ती त्यांना परत मिळालेली नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांना खोटी बीलाच्या छायांकीत प्रती हवी आहे. माहितीचा अधिकार

अधिनियमाचा उद्येश हा पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याचा आहे. अपीलकर्ता यांना जी देयके पाहिजे आहे त्या आधारावर चौकशी होवून संबंधितांना शिक्षा झालेली असली तरी त्या देयकाच्या संबंधात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देवून त्या माहितीच्या आधारे कोणत्या प्रकारची पारदर्शकता त्यांना अपेक्षित आहे हे कळून येत नाही. कारवाई केलेली नसती तर त्यादृष्टीने उपलब्ध करुन





देणे आवश्यक होते. परंतु कारवाई झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 14.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 151/2009.**

श्री प्यारेलाल आर. गवळी
20 एम आय जी 5/3 रासंत तुकडोजी महाराज मार्ग
सुपर सेशालिटी हॉस्पीटल समोर
नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ
नागपूर

2) श्रीमती कंगाले
जन माहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांचेकडे 20 एमआजी रीज रोड इमारत क्र. 5 मधील झालेल्या व क्षेत्र असलेल्या अनधिकृत बांधकामाचे संबंधित काय कार्यवाही केली याबाबतची माहिती.

माहितीचा कालावधी 6.4.1994 चे पुर्वी व पुढील कार्यवाही व त्यात कारवाई केली किंवा करणार आहेत अशा प्रकारचे प्रश्न विचारुन 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

..2..



सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यात काही माहिती दिलेली आहे व विकीपत्राचे फॉरमेट हवे असल्यास रु. 4/- प्रतिपेज या प्रमाणे भरणा केल्यास फॉरमेटच्या प्रती उपलब्ध होवू शकेल असे कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 20.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.12.2008 रोजी दिलेला दिसून येतो. व त्यामुळे पुन्हा व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना कार्यवाहीची अपेक्षा असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा केलेल्या कार्यवाहीबद्यल संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांची कार्यवाहीची विनंती मान्य करता येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर **( विलास पाटील )**

दि. 14.7.2009

राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 156/2009, 157/2009 व 158/2009.**

श्री अजय आर. मिश्रा
61 रतन नगर मानकापुर
नागपूर 30 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 156/2009</u>**
1) श्री प्रकाश बोकड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर

2) श्री विकास कावळे
जन माहिती अधिकारी तथा
प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 157/2009 व अपील क्रमांक 158/2009</u>**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर

2) श्री एस. एस. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा
नगर यंत्री

महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

3) श्री यु. बी. आकोजवार
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता
(हॉट मिक्स प्लांट)
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

..2..



**( आदेश पारित दिनांक ..2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 156/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2008 रोजी दि सी.ए.ॲन्ड एफ.ओ. तथा माहिती अधिकारी तथा महानगर पालिका नागपूर Certified copies of bill paid to contractor of the enclosed list under B.I.353 2. Test report submitted with bill & its certified copy if submitted & if not submitted then give specific information give uunder Sec. 7 (1) of RTI 2005. यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.11.2008 रोजी नगरयंत्री, विकास यंत्री, कार्यकारी अभियंता (बांधकाम) व कार्यकारी अभियंता (स्लम) यांना अर्जाची प्रत अर्जदाराला त्वरीत माहीती पुरविण्याकरीता पाठविण्यात आला व तसे अर्जदाराला कळविण्यात आले. नगरयंत्री झोन क्र. 5 यांचेकडून दि. 28.11.2008 ला प्राप्त माहिती अर्जदाराला दि. 1.12.2008 ला पुरविण्यात आली. मंगळवारी झोन क्र. 10 ची माहिती दि. 5.12.2008 ला प्राप्त झाली असून त्याच दिवशी पुरविण्यात आली. झोन क्र.6 बाबतची माहिती दि. 11.12.2008 ला प्राप्त झाली व दि. 12.12.2008 ला अर्जदाराला दिली. झोन क्र.8 ची माहिती दि.16.12.08 ला प्राप्त झाली

असून अर्जदाराला दि. 18.12.2008 ला पुरविण्यात आली. वित्त विभागाद्वारे अर्जदाराला व्यय पद क्र. 353 अंतर्गत देयकाच्या झेरॉक्स प्रती दि.17.12.08 ला पुरविण्यात आल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे दिनांक 23.12.2008 रोजी प्रथम अपील केले. त्यानंतर अपीलकर्ता यांना नगरयंत्री झोन क्र.3 बाबतची माहिती दि. 2.1.2009 ला प्राप्त झाली दि. 3.1.2009 ला पुरविण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.1. 2009 ला देण्यात आलेला आहे. व त्यामध्ये अपीलकर्ता





यांना माहिती उपलब्ध झाली याकारणास्तव सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येवून जी माहिती उपलब्ध झालेली नाही ती पुन्हा 10 दिवसात पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दुस–या अर्जाप्रमाणे जी माहिती मिळालेली आहे ती माहिती व या अर्जाप्रमाणे मिळालेली माहिती यात विसंगती आहे. कोणतीही माहिती तयार करुन देण्यात आलेली नाही. यावरुन माहिती जशी आहे तशीच ती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलात वरीलप्रमाणे युक्तीवाद केलेला असला तरी कोणत्याही माहितीच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत निर्णय देण्याची तरतुद अधिनियमात नसल्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती जशी आहे तशीच मिळालेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. विलंबाच्याबाबत माहिती मागतांनाच ती अनेक झोनकडून असलेली माहिती आहे व माहिती अधिकारी यांनी वेळेतच माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता संबंधित झोनला पत्र दिलेले आहे. व तसे अपीलकर्ता यांनासुध्दा कळविलेले आहे. यावरुन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 157/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2008 Manwhole cover manufacture च्या संदर्भात शहर नगर अभियंता यांचेकडे एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.12. 2008, दि. 7.12.2008, दि. 1.1.2009 व दि. 9.2.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.1.2009 रोजी प्रथम अपील

दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.1.200 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी परिशिष्ट 'अ' ची प्रत द्यावी. त्याप्रमाणे अपुर्ण माहिती पुरवावी. माहिती अधिकारी यांनी झोनकडून वारंवार माहिती मागवुन देखील माहिती येत नाही करीता अति. उपायुक्त साप्रवि यांनी सर्व झोन ला मुख्यालयातील माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती त्वरीत पाठविण्यास कळवावे असा निर्णय

4

4

दिलेला दिसून येतो. व त्यामुळे दि. 9.2.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन दिली तसेच चुकीची माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु या प्रकरणात सुध्दा त्या त्या वेळेस जी कागदपत्रे तयार केलेली आहे त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जशी माहिती उपलब्ध आहे व झोन कडून आलेली आहे तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र प्रथम अपीलात सुध्दा सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. त्यामुळे ज्या झोन कडून माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे त्या झोन मधील अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 158/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2008 एस.डी.ई डेप्यु.ई. हॉट मिक्स प्लॅन्ट यांचेकडे dtails of 20 mm & 10 mm metal supplied to

various zones N.M.C. from 27.8.2008 to the date of information माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. तसेच 4 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.1.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु त्यातही माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज

करण्यात आलेले आहे व त्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कारणे विचारलेली आहेत व तशा प्रकारचे उत्तर त्यांना मिळालेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.



5

## आ दे श

1) अपील क्र. 156/2009 व 158/2009 खारील करण्यात येतात.

2) अपील क्र. 157/2009 अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली ती दिशाभूल करणारी व विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे संबंधित झोन अधिकारी, कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **आयुक्त नागपूर महानगर पालिका** यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 14.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 858/2008.**

श्री जितेंद्र आर. कळंबे कार्याध्यक्ष
म.रा.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
चतुर्थ श्रेणी कर्मचारी महासंघ
नागपूर विभाग नागपूर रा. नगर परिषद गार्डन जवळ
स्विमींग टॅक पो. ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. क. वी. बुटले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय नागपूर
2) श्री एस. व्ही. राठोड
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय यांचेकडे व्यवसाय प्रशिक्षण खात्याचा लेखाशिर्ष 2230 चा सुधारीत आढावा. दि. 30 सप्टेंबर 2006 ते 21 फेब्रु. 2008 या कालावधीतील शासन निर्णयानुसार कर्मशाळा परिचर व भांडार परिचर पदे समर्पित झाल्याचे ज्या परिपत्रकामध्ये

नमुद करण्यात आले आहे त्या पृष्ठाची साक्षांकीत सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जानुसार दि. 26.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दि. 22.9.2008 रोजीसुध्दा अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या निर्णयामध्ये स्पष्टपणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही शासन निर्णयात नमुद नसल्याने पुरविणे शक्य नाही पण अपीलकारास औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील मंजुर पदांची माहिती हवी असल्यास व

2

तशी मागणी केल्यास पुरविण्यात यावी व जी पदे शासन निर्णयात मंजुर पदे म्हणुन नमुद नाहीत ती व्यपगत झालेली आहेत किंवा अस्तीत्वात नाहीत असे समजण्यात यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.5.2008 रोजी रु. 318/– माहितीच्या अतिरिक्त खर्चाकरीता भरणा करण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक 8.5.2008 रोजी रु. 582/– चा भरणा करावा असेही कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरच्या निर्णयाच्या प्रतीची आवश्यकता नाही फक्त कर्मशाळा परिचर व भांडार परिचर पदे समर्पित झाल्याचे ज्या परिपत्रकामध्ये नमुद करण्यात आले आहे त्या पृष्ठाची साक्षांकीत सत्यप्रत द्यावी. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना संबंधित शासन निर्णयामध्ये तशा प्रकारची तरतुद नाही व त्यामुळे तरतुद असेल त्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी आयोगास सांगितले. परंतु तरीही जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी जे निर्णय घेतलेले आहे ते निर्णय हे संबंधित शासन निर्णयाप्रमाणेच आहे. यावरुन अपीलकर्ता यांचा मुद्या हा शासन निर्णयाच्या विश्लेषणाच्या बाबतचा असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत येत नाही. अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयात जावून न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 862/2008.**

श्री अशोक महादेवराव खंडागळे
ह. मु. खरबी पो. चापेगडी
ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
उमरेड ता. उमरेड जि. नागपूर
2) श्री पाजनकर
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कुही
ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.7.2007 रोजी हरीदास रामा गायधने व मायाबाई व बारुबाई गायधने यांना सिलींग जमीन वाटप कोणत्या नियमात दिला. खरेदी व्यवहार व फेरफार कोणत्या नियमानुसार झाला. एस.डी.ओ. यांचा आदेश 1 जुन 2001 च्या आदेशावर कोणत्या नियमात स्टे दिला वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.8.2007 रोजी माहिती ही वरीष्ठ न्यायालयाचा अधिक्षेप करणारी असून वरीष्ठ न्यायालयाने दिलेला स्थगनादेश कुठल्या नियमाने दिला हे विचारणा करण्याचा अधिकार माहिती कायदा अधिनियमानुसार नाही त्यामुळे आपला उपरोक्त अर्ज माहितीचा अधिकाराचा दुरुपयोग करणारा असल्यामुळे व मागितलेली माहिती न्यायालयीन कार्यवाही संबंधित असल्यामुळे आपले अर्जानुसार मागितलेली माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना दि. 21.5.2007 रोजी तहसिलदार कुही यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांना सदरच्या प्रकरणात दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत मिळालेली आहे. दि. 12.12.2007 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांच्या दिनांक 22.11.2007 च्या निवेदनाप्रमाणे उपोषण मागे घेण्यास तहसिलदार कुही यांनी अपीलकर्ता

यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे प्रकरणात 1 जुन 2001 उपविभागीय अधिकारी यांनी आदेश पारीत केला आहे त्या आदेशाची माहिती अपीलकर्ता यांना आहे. अपीलकर्ता यांनी लोकशाही दिनात सदरच्या प्रकरणात तक्रारी केलेल्या आहेत. त्याबाबतही त्यांना दि. 1.9.2007 रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. यावरुन या संपूर्ण प्रकरणामध्ये नियमानुसार कार्यवाही होवून निर्णय देण्यात आलेला असून सुध्दा अपीलकर्ता हे वेगवेगळया मार्गानी अर्ज करुन त्यांच्या बाजुनी निर्णय मिळेल अशा प्रकारचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे त्यांना स्वतः जी माहिती आहे तीच माहिती पुन्हा पुन्हा मागत आहे असे दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 166 / 2009.**

श्री नत्थू रामचंद्र तळेकर
मु. पो. तारणा
ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
उमरेड ता. उमरेड जि. नागपूर
2) श्री पाजनकर
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2008 रोजी मौजा वडेगाव प.ह.नं.51 मध्ये झालेल्या स्वर्गिय रामचंद्र तळेकर हयांचे जमिनीचा फेरफार बेकायदेशीर मार्गाने झाल्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 12.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20. 1.2009 रोजी देण्यात आलेला असून फेरफार बेकायदेशीर झाला असून तो पुर्ववत करण्यात यावा अशी विनंती केली असल्यामुळे अपीलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 नुसार अपील अर्ज दाखल करावा व न्याय मिळवून घ्यावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. नायब तहसिलदार यांनीसुध्दा दि. 11.6.2008 रोजी कळविलेले दिसून येते. तहसिलदार कुही यांनी खुलासा दाखल करतांना अपीलकर्ता यांना दि. 270502008 रोजी माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दि. 30.5.2008 ला माहिती प्राप्त केली आहे असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 857/2008.**

श्री मुकुंदराव तुकाराम सेलोकर
रा. पो. बोपाबोडी
ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार सडक अर्जुनी
जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
तलाठी
तलाठी सा.क्र.5 बोपाबोडी
ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता दि. 15.6.2009 रोजी हजर होते. परंतु आज गैरहजर आहे. उत्तरवादी यांनीसुध्दा खुलासा दि. 15.6.2009 रोजी दाखल केलेला आहे परंतु आज गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2008 रोजी श्री जांभुळकर तलाठी यांचेकडे मौजा बोपाबोडी प.ह.नं.5 7/12 चे उता–यात जमीन कसण्याचे रकान्यात 2000–01 मध्ये नाव दर्ज आहे. 2007–08 मध्ये नाव का दर्ज झाले नाही याची माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे अपीलकर्ता हे व्यक्तिशः माहिती घेण्यास गेलेले दिसून येत नाही व त्यामुळेच त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर तहसिलदार यांनी तलाठी सा.क्र.5 यांचेकडून दिनांक 29.8.2008 नुसार माहिती मागविण्यात आली ती दि. 4.9.2008 रोजी तलाठी यांनी सादर केली. माहिती घेवून जाण्यासाठी अपीलकर्ता यांना पत्र दिले परंतु अपीलकर्ता यांनी प्रतिसाद दिलेला नाही. राज्य माहिती आयोगाकडे अपील सुनावणी असल्यामुळे पुन्हा तलाठी सा.क्र.5 यांना दि. 2.6.2009 रोजी संपूर्ण माहितीसह बोलाविण्यात आले. तहसिलदार स. अर्जुनी पुर्ण माहिती गोळा करुन हया कार्यालयाचे पत्र दि. 26.5.2009 ला अर्जदार यांना माहिती घेवून जाण्यासाठी पत्र देण्यात आले. सदर अर्जदार नोटीस

2

घेण्यास तयार नाही असे तीन साक्षदारांनी आपली साक्ष दिलेली आहे. सदर नोटीस प्रकरणात जोडलेली आहे असा खुलासा तहसिलदार स. अर्जुनी यांनी आयोगाकडे सादर केलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांना माहिती घेवून जाण्याकरीता दि. 3.10.2008 रोजी प्रती पेज रु. 2 चा भरणा करावा असेही कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता माहिती घेवून जात नाही त्या करणास्तव सदरची माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांना सदरची माहिती पोष्टाने पाठविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 174/2009.**

श्री सुधीर मनोहर डांगे
21 रेणुकामाता नगर पुर्व हुडकेश्वर रोड

नगपूर 34 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर
2) डॉ. देवेन्द्रनाथ मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक तारीख 14.1.2008 ला Eligibility प्रमाणपत्राबाबत काय प्रगती झाली ते कळविण्याबाबत. पी एच डी दृष्टीने.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.1.2009 रोजी आपण वरील अर्जामध्ये दि.14.1.2008 ला पावती क्र. 2974 द्वारा 200/– रुपये प्रवेश पात्रता प्रमाणपत्र मिळावे हया करीता शुल्क भरल्याचे नमुद केले आहे परंतु Eligibility संबंधीचा आपला अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला नाही. तेव्हा आपण मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गतची माहिती आपणास उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि. 28.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 8.1.2009 रोजी निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी सदर अर्जावर त्वरीत कार्यवाही घेवून अर्जदाराने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यालयीन वस्तुस्थिती अर्जदाराला विनामुल्य कळविण्यात यावी. तसेस या अर्जावर अद्यापपर्यंत का कार्यवाही घेण्यात आलेली नाही. त्यासाठी जबाबदार असलेल्या विभागाकडून त्वरित स्पष्टीकरण मागवून प्र–कुलगुरुकडे अहवाल सादर करावा. अर्जदाराला अपील करण्यास भाग पाडले ही बाब सुध्दा अधिनियमाचे उल्लंघन या सदरात मोडणारी आहे असा निर्णय दिलेला दिसून





येतो. त्यानंतरच दि. 28.1.2009 चे पत्र दिलेले आहे. व त्यानंतर दि. 21.3.2009 रोजी सुध्दा अपीलकार्ता यांना निर्धारीत शुल्क जमा केले असल्यास द्वितीय पावतीची छायांकित प्रत आणि प्रवेश पात्रतेसंबंधी गुणपत्रीकेची साक्षांकित प्रती विद्यापीठाला त्वरीत सादर करावे जेणेकरुन आपल्या पात्रता प्रवेशपत्राचे अर्जावर प्रमाणपत्राबाबत कार्यवाही पूर्ण करता येईल

असे कळविलेले दिसून येते. तत्पूर्वी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दिनांक निरंक असलेल्या माहितीच्या अर्जात सहपत्र तारीख 14.1.2008 ला पैसे भरलेल्या रशीदची झेरॉक्स प्रत सादर केलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या अर्जासंबंधी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे जोडले नाही व ती आताही नस्तीमध्ये नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी कागदपत्रे सादर केले परंतु त्यांच्या अर्जामध्ये गुणपत्रीकेची साक्षांकित प्रत सादर केलेली नाही असे दिसून येते. ती त्यांनी सादर करणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की नागपूर विद्यापीठामध्ये कोणताही अर्ज स्विकारतांना त्यावर पोच देण्याची पध्दत नाही व त्यामुळे कागदपत्रे दाखल केली तरी दाखल केली नाही असे बेजबाबदारपणाचे पत्र विद्यापीठाच्या कर्मचा–याकडून मिळते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. वास्तविक ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये प्र–कुलगुरु यांचे निदर्शनास आणणे आवश्यक होते. त्यावरुन प्र–कुलगुरु यांना प्रशासकीय सुधारणा करता आली असती. असे असले तरी अपीलकर्ता यांनी पुन्हा पैसे भरल्याची रशीदची झेरॉक्स प्रत त्वरीत उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे अपीलावर कार्यवाही करता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. असे असले तरी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये प्र–कुलगुरु यांनी जो निष्कर्ष काढलेला आहे त्याबाबत प्र–कुलगुरु यांनीच प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक होते परंतु त्यांनी प्रशासकीय कार्यवाही करण्याचे टाळलेले आहे व कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात विवेचन केलेले आहे. त्यामुळे प्र–कुलगुरु यांचा निर्णय हा निरर्थक दिसून येतो. विद्यापीठात अपीलकर्ता यांचे म्हणणे प्रमाणे जर प्रशासकीय शिस्त नसेल तर त्याबाबतची जबाबदारी प्र–कुलगुरु यांची आहे. त्यांनी याबाबत जबाबदारी स्विकारणे आवश्यक आहे. परंतु माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अर्जाची दखलच घेतलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. त्यात जे अधिकारी कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांना शास्ती लादणे आवश्यक राहिल व ही प्रक्रिया प्र–कुलगुरु यांनी करावयाची आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.



3

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी पुन्हा आवश्यक ती कागदपत्रे विद्यापीठाकडे सादर करावी व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी किंवा इतर अधिकारी कर्मचारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही प्र–कुलगुरु यांनी करावयाची आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 872/2008.**

डॉ. जैनेंद्र कुमार विजयकुमार बडजाते
39 एस.ई.रेल्वे कॉलनी, सेकंड लेआऊट

राणाप्रताप नगर नागपूर 440022. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. टी. राणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त प्रबंधक
लोक आयुक्त कार्यालय
नविन प्रशासन भवन 1ला मजला
मादाम कामा रोड, मुंबई 400 032.
2) श्री सी. डी. औरंगाबादकर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रबंधक
लोक आयुक्त कार्यालय
नविन प्रशासन भवन 1ला मजला
मादाम कामा रोड, मुंबई 400 032. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय Special report of Lokayukta in respect of Dr. Badjate dt0 8.4.2002 placed before both the houses by Governor of Maharashtra acceptance on 8.12.2004.
सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.7.2008 रोजी सदर अर्जातील माहितीचा विषय शासनाच्या लोक आयुक्त कार्यालयाचे विषयाशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील नियम क्र.6 (3) (दोन) अन्वये त्या विभागाकडे पुढील उचित कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करण्यात येत आहे. तरी यासंबंधातील पुढील पत्रव्यवहार आपण कृप्या राज्य जन माहिती अधिकारी लोकायुक्त व उपलोकायुक्त यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा ही विनंती व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्याअनुषंगाने दिनांक 22.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना सहा. प्रबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी मा.

2



लोक आयुक्त यांनी सादर केलेला विशेष अहवाल स्विकारण्यात आलेला नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.8.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे अपील

खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. अे. आर. शर्मा यांनी युक्तीवाद केला. युक्तीवादामध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी महाराष्ट्र विधान मंडळामध्ये विशेष अहवाल मा. राज्यपालांनी सादर केल्यानंतर सदरचा अहवाल हा मान्य झाला आहे किंवा नाही याबाबतची माहिती मागितलेली होती. परंतु मा. लोक आयुक्तांचा विशेष अहवाल हा शासनानी मान्य केला नाही असे त्यांनी उत्तर दिले व त्यामुळे सदरचे उत्तर हे चुकीचे आहे. तसेच महाराष्ट्र विधान मंडळामध्ये विशेष अहवाल हा सामान्य प्रशासन विभागानी सादर केला होता व त्यामुळे त्यांना माहिती मागितलेली होती. मा. लोक आयुक्त हे महाराष्ट्र विधान मंडळामध्ये स्वतःचा अहवाल सादर करीत नाही. व त्यामुळे सदरचे पत्र सामान्य प्रशासन विभागाच्या अवर सचिवानी हस्तांतर करण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनीच सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्यामुळेच पुढील सर्व जी प्रक्रिया अर्थातच चुकीची प्रक्रिया झालेली आहे व त्यामुळेच त्यांना प्रथम अपील सुध्दा प्रबंधक प्रथम अपीलीय अधिकारी लोक आयुक्त कार्यालय यांचेकडे दाखल करावे लागले होते. महाराष्ट्र विधान मंडळानी सदरचा अहवाल सादर केला किंवा नाही याबाबतची माहिती मा. लोक आयुक्त यांना असणे शक्य नाही. व त्यामुळे त्यांचेकडे माहिती मागितलेली नव्हती असे पुन्हा अपीलकर्ता यांनी सांगितले. यावरुन या संपुर्ण प्रकरणामध्ये सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी तसेच मा. लोक आयुक्त यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा गांभीर्याने विचार केलेला दिसून येत नाही व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागलेले आहे. ज्या विभागानी महाराष्ट्र विधान मंडळामध्ये अहवाल सादर केलेला असेल त्याच विभागास तो मान्य झाला किंवा नाही याची माहिती असणे आवश्यक आहे व तशी माहिती नसल्यास त्यांनी महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचेकडे विचारणा करणे आवश्यक होते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना उत्तर देणे आवश्यक होते. परंतु ही दुदैवाची बाब आहे की मंत्रालयीन अधिका–यांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीची जाण आहे असे दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना कारण नसतांना द्वितीय अपील दाखल करावे लागत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

3



**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती

अधिकारी मा. लोक आयुक्त कार्यालय यांनी सदरचे संपूर्ण प्रकरण हे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे हस्तांतर करुन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग यांनी अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाकडून माहिती मागून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव **सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई 32** यांचेकडे माहितीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 173/2009.

श्री अशोक मारोतराव रामटेके, संचालक
माधुरीताई देशमुख शिक्षण संस्था खापरखेडा
वार्ड नं. 5 खापरखेडा

ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विरेंद्र सिंग बैस
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था सचिव
इंदिरा अध्यापक विद्यालय खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री प्रविण गेडाम
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
इंदिरा अध्यापक विद्यालय खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे नविन इमारती बांधकाम संबंधातील संपूर्ण बिले व एकुण खर्च माहितीचा कालावधी सन 2007 ते 2008. सदरची माहिती युपीसी नें घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.2.2009 रोजी इमारतीचे बांधकाम संस्थेद्वारे करण्यात येते व आपण संस्थेचे संचालक असल्यामुळे आपण केव्हाही संस्थेच्या कार्यालयाकडून आवश्यक असलेल्या माहितीचे निरीक्षण करु शकता. शिवाय खर्चाच्या व इमारतीच्या बांधकामाच्या खर्चाच्या बिलांच्या संदर्भात संस्थेचे अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी यांच्या सभा घेवून माहिती प्राप्त करु शकता. संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष व सचिव यांच्याद्वारे आपण आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.
24.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6. 3.2009 रोजी देण्यात आलेला असून आपणास या पत्राद्वारे संस्थेच्या 2007—08 साली झालेल्या अंकेक्षण अहवाल आपल्याला देण्यात येत आहे. आपण मागितलेले बाकीचे कागदपत्रे कोर्टात केस सुरु असल्यामुळे संस्थेचे वकील यांचेकडे देण्यात आलेले असल्यामुळे संस्थेत ते उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

...2..



3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. अपीलकर्ता यांनी मुळात ते स्वतः संचालक असल्यामुळे त्यांनी संचालक मंडळाच्या बैठकीत किंवा सचिवांना सदरची माहिती मागणे आवश्यक होते. परंतु तशी ती त्यांनी न मागता प्राचार्य यांना अडचणीत आणण्याच्या दृष्टीने मागितलेली दिसून येते. प्रथम अपीलात संस्थेच्या सचिवानी अंकेक्षण अहवाल दिला त्याऐवजी बिलाच्या

छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. सदरचे देयके ही संस्थेच्या वकीलाकडे जर असेल तर ती संस्थेकडे आहे असे गृहीत धरले जाते व त्यामुळे वकीलाकडून नस्ती उपलब्ध करुन घेवून देयकाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत मागितलेल्या देयकाची माहिती विनामुल्य पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 171/2009.**

श्रीमती वंदना राजेंद्र खटी
द्वारा श्री भाऊरावजी वेखंडे छत्रपती नगर
प्लॉट नं. 102 जिजामाता उद्यानाजवळ
नगपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मनोज सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री संजय दैने
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील क्र./08 मौजा अलिपुर (अभिजीत खटी अधिक 12 विरुध्द वंदना राजेंद्र खटी अपील मेमोच्या पान क्र. 3 च्या परिच्छेद क्र. 3 विक्रीपत्राची तथा 7/12च्या प्रती पुरविणे बाबत माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.9.1.09 रोजी उपविभागीय अधिकारी यांनी मागणी केलेले कागदपत्रे प्रकरणात उपलब्ध नसल्याने आपणास माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.2.2009 रोजी देण्यात आलेला असून अपील खारीज करण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी दि.9.1.09 रोजी प्रकरणाची तपासणी केले असता विक्रीपत्राची प्रत व 7/12 उपलब्ध नाही असे नमूद केलेले आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी जे त्यांना कळविलेले आहे ते बरोबर होते व त्याच कारणावरुन प्रथम अपील नामंजुर करण्यात आलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

2

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरच्या प्रकरणातील अपील मेमोसोबत उल्लेख केलेली कागदपत्रे नसतील तर उपविभागीय अधिकारी यांनी अपील दाखलच करुन घ्यावयाची नव्हती असा युक्तीवाद केला. परंतु अपीलकर्ता यांचा युक्तीवाद हा योग्य नसल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. सदरचा युक्तीवाद त्यांनी त्या संबंधात अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस करणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्या अपीलाची सुनावणी होत नाही व तारखा दिल्या जातात. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही तातडीने घेतली जाईल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 185 / 2009.**

श्री माधव विश्वनाथ वैद्य
द्वारा रवि विश्वनाथ वैद्य
251/102 श्री अंबिका टॉवर्स
प्रो. यू.यू.मार्ग माटुंगा मुंबई 400019 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर

2) श्री कटयारमल
जन माहिती अधिकारी तथा
कर निर्धारक
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी/ कर निर्धारक नागपूर महानगर पालिका यांचेकडे 1. श्री माणिकम डी. लक्ष्मीनारायण वल्द शिवशंकर मुदलीयार (अ.पा.क्र.) अज्ञान पालन कर्ता देणुगोपाल मुदलीयार प्लॉट नं.120 पार्क ॲव्हेन्यू धंतोली नागपूर या करदात्याच्या फाईल मधील सन 1938 ते 41 सन 1998, 2002, 2007 व 2008 हया वर्षाची म्युटेशन सर्टीफीकेट देण्यात यावी

2. वरील करदात्याची 1927 पासून पूर्ण फाईल निरिक्षण व अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

अर्जदारास सूचना मिळाल्यावर स्वतः माहिती घेण्यास येईल असे नमूद केलेले आहे. माहिती मिळाली नाही या कारणास्तव दि. 3.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.12.2009 रोजी देण्यात आलेला असून

अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे असे माहिती अधिकारी यांनी सांगितले तरी विभागाने संबंधित माहिती पोष्टाने देखील द्यावी असा निर्णय देवून सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.11.2008 रोजी वार्ड अधिक्षक, सहा. आयुक्त, राजस्व निरीक्षक, कनिष्ठ निरीक्षक इत्यादी यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन झाल्यावर दि. 23.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की आपण प्लॉट नं.120 पार्क ॲव्हेन्यू धंतोली नागपूर या घराची सन 1927 पासूनची पुर्ण नस्ती अवलोकनाकरीता उपलब्ध करुन देण्याबद्यल अर्ज सादर केलेला आहे. आपणास याद्वारे सुचित करण्यात येते की कर आकारणी विभागामध्ये कर आकारणीची नस्ती सन 1964 पासूनची आहे व त्याचे अवलोकन आपण केलेले आहे. परंतू आपणास सतत अवलोकन करावयाचे असल्यास नस्ती आपल्या अवलोकनाकरीता उपलब्ध आहे. म.न.पा., कर आकारणी अभिलेखामध्ये घर क्र. 63 वार्ड क्र. 4 ची या व्यतिरिक्त कोणतीही नस्ती उपलब्ध नाही. नस्तीमध्ये 1998 पासून 2008पर्यंत कोणत्याच प्रकारचे नामांतरण झालेले नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच कर निर्धारक अधिकारी यांनी आयोगास सदरची नस्ती दाखविली व त्या नस्तीत कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे नाही. तसेच त्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची नस्ती नाही. अपीलकर्ता यांना म्युटेशन सर्टीफीकेट देता येणार नाही. व त्यामुळे 64 वर्षापूर्वीची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व ही बाब अपीलकर्ता यांनासुध्दा माहित आहे. वास्तविक अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये दिलेल्या मालकाच्या संदर्भात कोणताही संदर्भ आहे असे दिसून येत नाही व तरीसुध्दा अपीलकर्ता सदरचे म्युटेशन सर्टीफीकेटचा आग्रह धरत आहे. त्यावरुन त्यांचा हेतू वेगळा आहे असे दिसून येते. असे असले तरी माहिती उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व तशी आयोगाची सुध्दा खात्री झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 184 / 2009.**

श्री माधव विश्वनाथ वैद्य
द्वारा रवि विश्वनाथ वैद्य
251 / 102 श्री अंबिका टॉवर्स
प्रो. यू.यू.मार्ग माटुंगा मुंबई 400019 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधिश 2 व अतिरिक्त सत्र न्यायाधिश
जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर.
2) श्रीमती जे. डी. पाटील
जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा व सत्र न्यायालय यांचे कार्यालयात एकुण 10 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती अर्जदार स्वतः घेण्यास येईल असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.10.2008 रोजी मागितलेली माहिती अभिप्राय स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपील अर्ज नामंजुर केलेला दिसून येतो. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा अपीलकर्ता यांनी अभिप्राय स्वरुपात माहिती मागितलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्रत्येक मुद्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना



नियमाची माहिती नाही. त्यामुळे नियमाची प्रत देणे आवश्यक होते. तसेच नियमाच्या आधारे माहिती असेल ती पुस्तके निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे टिपण्या इत्यादी स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे असा ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेची व्याख्या आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 मध्ये दिवाणी न्यायालयाच्या कामकाजाच्या

कार्यपध्दती दिलेल्या आहे व सदरचा अधिनियम हा संसदेचा अधिनियम असल्यामुळे तो सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यातून नियमाची माहिती घेणे आवश्यक होते. मात्र सिव्हील मॅन्युअल सर्वत्र उपलबध नसल्यामुळे त्या संबंधित प्रश्न असेल त्या संबंधातील नियमाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची मुद्याच्या संदर्भात सिव्हील मॅन्युअलमध्ये जी कार्यपध्दती दिलेली असेल त्या नियमाची छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 188 / 2009.**

श्री देवाभाऊ बी. उराडे
मु. विद्याविहार कॉलनी सिंदेवाही
ता. सिंदेवाही जि चंद्रपूर ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
विकास शाखा आयुक्त कार्यालय
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (प्रशासन)
आयुक्त कार्यालय
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांना त्यांनी अपील मेमोमध्ये दिलेल्या पत्त्यावर पोष्टाद्वारे पाठविलेले सुनावणीचे पत्र या कार्यालयास परत आलेले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचेकडे एकुण 5 मुद्यांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवावर्ग 3 मधुन मविसे वर्ग 2 पदोन्नतीची 100 बिंदु नामावलीची सत्यप्रत वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी 2000–2008 पर्यंत. सदरची माहिती स्पिड पोष्टने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.12.2008 रोजी रु. 45 जमा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे रु. 45 जमा केले नाहीत. मात्र दि. 20.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.2.2009 रोजी देण्यात आलेला असून संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये आवश्यक ती रक्कम या कार्यालयात जमा करण्यास कळविण्यात आलेले होते. परंतु आपण रक्कम जमा न करता अपील अर्ज सादर केलेला असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांचा दि. 19.11.2008 चा अर्ज हा दि. 28. 11.2008 ला प्राप्त झाला. व त्यामुळे त्यांनी विहित मुदतीत अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्यास कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी





मागितलेली माहिती एकुण 9 वर्षातील आहे व त्यामुळे ती व्यापक प्रमाणात माहिती असल्यामुळे व त्यास खर्च येणार असल्यामुळे खर्च भरल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही. त्यामुळेच प्रथम अपीलाचा निर्णय त्या अनुषंगाने दिलेला आहे असे

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. सदरचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 186/2009.**

श्री कृष्णा उपासराव वाठ
684 मरारटोली रामनगर
नागपूर 33 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ क्र. 1 सिताबर्डी विभाग
नागपूर
2) श्री बाहेकर
जन माहिती अधिकारी तथा
सहा पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2008 रोजी सहा पोलीस आयुक्त यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून अपील क्र. 61/2007 दि. 21.4.2007 ला मा. माहिती आयुक्त यांचे समोर झालेल्या सुनावणीमध्ये पोलीस पक्षाने प्रस्तुत केलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित कॉपी अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. त्यावर दि. 3.10.2008 रोजी सदर कागदपत्राच्या प्रती माहिती आयुक्त कार्यालयात दिल्या आहेत. त्याची प्रत आपणास मिळालेली आहे त्या व्यतीरिक्त आमचेकडे काही नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.11.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ही अपील संबंधानी असून ती माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी माहिती आयुक्त यांचेकडे सादर केलेले आहे. ती त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना कळवून त्यांचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आदलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

..2..

3. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 61/2007 मध्ये जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राच्या प्रती मागितलेल्या आहेत. त्या प्रती आयुक्तांचे कार्यालयात नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु आज सुनावणीस असलेल्या अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी खुलाशाच्या प्रती अपीलकर्ता यांना देवू केल्या असता त्यांनी त्या घेतलेल्या नाहीत असे आयोगाचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावरुन अपीलकर्ता हे आयोगाच्या कार्यालयात सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे दिली असता स्विकारत नाही असे दिसून येते व असाच प्रकार अपील क्र. 61/2007 च्या सुनावणीच्या वेळेस झालेला असावा असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. बहुतांश अपीलकर्ता यांची मानसिकता दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कागदपत्रे द्यावयाचा प्रयत्न केला तर घेण्यास नकार देतात. त्यामुळे आयोगाकडे अपील दाखल करतात. तशीच तक्रार या संबंधात दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 190/2009.**

श्रीमती रेखा केवळराम बारसागडे
मु. पो. वासाळा ता. आरमोरी
जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय
गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा
कृषी उपसंचालक
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय
गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.12.2008 रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दि. 1.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय विभागीय कृषी सह संचालक नागपूर यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करतांना जन माहिती अधिकारी यांचेकडचा अर्ज किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले अपील हे योग्यरित्या दाखल केलेले नाही त्याकरीता अधिक्षक कृषी अधिकारी गडचिरोली यांनी खुलासा दाखल केलेला आहे. त्यात अपीलकर्ता यांनी दि. 1.4.2008 रोजी माहितीचा अर्ज केला होता. त्यानंतर दि. 28.5.2008, 4.8.2008 रोजी अर्ज केलेला होता असे दिसून येते. परंतु त्या अर्जाच्या प्रती अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या नाहीत. मात्र जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या आहेत. अधिक्षक कृषी अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलासा मध्ये निवड समितीच्या द्वारे पुर्नमुल्यांकनाची कार्यवाही नव्याने निवड यादी तयार केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र अपीलकर्ता यांना दि. 14.7.2009 ला प्रत्यक्ष माहिती पुरविण्यात आलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी मुद्याम टाळाटाळ करुन माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

2



**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 204/2009.**

श्री जनार्दन गुलाबराव मून, केंन्द्रिय अध्यक्ष,
नागरी हक्क संरक्षण मंच

नागसेन वन नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. आयोगाचे कार्यालयातून दि. 26.6.2009 रोजी दिनांक 18.7.2009 रोजीच्या सुनावणीची नोटिस काढलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर सदरच्या नोटिसीची दखल घेतलेली दिसून येत नाही व आज सुनावणीस गैरहजर आहे. त्या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे शिक्षक व कर्मचा–याच्या अप्रुव्हलची माहिती (अपंग शाळेतील) आरक्षणातील कॅटगरीवाईज. माहितीचा कालावधी जून 2005 ते आजपर्यंत. सदरची माहिती स्पिड पोष्टने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.1.2009 रोजी मागितलेली माहिती पुरविण्यास एक ते दिड महिन्याचा कालावधी लागेल. माहिती उपलब्ध होताच आपणास प्रचलीत नियमानुसार पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यानंतर विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 15.1.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच विलंबाने माहिती उपलब्ध करुन देणार असे कळविले तरीसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी





सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. वर नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने नोटिस काढलेली होती. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली होती परंतु ते हजर झालेले नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. यावरुन त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास

टाळाटाळ केलेली आहे हे निश्चित. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अपीलाची त्यांनी सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केले. तसेच शासन निर्णयाचेसुध्दा उल्लंघन केलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात व शास्ती लादण्याच्या संदर्भात सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 15.1.2009 च्या अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10000/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) आयोगाने नोटिस काढुनसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दखल घेतलेली नसल्यामुळे व कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेले नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 199/2009.**

श्रीमती पैकाबाई मोतीराम चनकापूरे
वारेगाव पो. बिना व्हया खापरखेडा
ता. कामठी जि. नागपूर ..... अपिलकर्ता

विरुध्द

1) श्री एस. डी. कुळमेथे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर
2) श्रीमती उषा तालेवार
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कामठी
जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तहसिलदार कार्यालय कामठी यांचेकडे दि. 18.12.2002 चा आदेश परीत होवून आज सहा वर्षे पूर्ण झालेले आहे. परंतु 7/12 वेगवेगळे दाखविण्यात आलेले नाही. त्याबद्यलची कार्यवाहीची माहिती मागितलेली असून सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.7.2009 रोजी मौजा चिखली सर्व्हे नं. 30 व 125 आपली वाटणी विभागनी करीता हया कार्यालयात प्रकारण सुरु आहे. सदर प्रकरणात 7/12 मध्ये श्रीमती पैकाबाई मोतीराम चनकापूरे याच आडनावाचा उल्लेख श्रीमती पैकाबाई मोतीराम चंद्रिकापूरे असा आहे. त्यामुळे नमुना 'अ' व 'ब' मध्ये नोटिस काढण्यास अडचण निर्माण होत आहे. करीता आपण खरे नावाबाबत पुराव्यासह दि. 20.7.2009 ला सकाळी 11.00 वाजता हजर राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. याचा अर्थ अपीलकर्ता यांच्या अर्जाची कोणतीही दखलच घेतलेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुनावणी घेवून देण्यात आलेला असून तहसिलदार कामठी यांना विहित मुदतीत कार्यवाही पुर्ण करावी असे आदेश दि. 20.11.2008 रोजी दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडून नोटिस गेल्यानंतर कार्यवाही सुरु असल्याच्या संदर्भात तहसिलदार कामठी यांचे कार्यालयातून अपीलकर्ता यांना





कार्यवाहीच्या संदर्भात कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 15.7.2008 च्या अर्जाप्रमाणे दि. 1.8.2008 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये चर्चा करण्यासाठी कार्यालयात दि. 11.8.2008 रोजी उपस्थित राहावे असे तहसिलदार कामठी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले होते. परंतु माहितीचा अधिकार

अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सदरच्या प्रकरणातील कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांना चर्चेस बोलाविण्याचे काहीही कारण नव्हते. व जरी चर्चेस बोलाविण्यात आले तरी सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीचा अर्ज दाखल करावा लागलेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. आयोगाची नोटिस आल्यानंतर मात्र प्रकरणात पत्र दिलेले दिसून येते. यावरुन सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. संबंधित जन माहिती अधिकारी तसेच सदरचे प्रकरण ज्या कर्मचा–याकडे प्रलंबित असेल ते कर्मचारी हे दोषी आढळून येतात व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्रुटीची पूर्तता करावी व त्यानंतर 30 दिवसाचे आंत कार्यवाहीची माहिती द्यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 15.7.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित तहसिलदार किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते. सदरची विभागीय चौकशी ही जिल्हाधिकारी नागपूर यांनी करावयाची असून त्याकरीता स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी नागपूर** यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 205 / 2009.**

श्री आनंदराव नरसिंहराव बुध्दालवार
द्वारा श्री महादेवराव अमृतकर समाधी वार्ड नं. 1
पठाणपुरा रोड हिवरे कोचिंग क्लासेस जवळ
चंद्रपूर 442402 ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त (विकास शाखा)
आस्थापना विभाग विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी ( आस्थापना विभाग )
विकास शाखा विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी आयुक्त (विकास शाखा) आस्थापना विभाग यांचेकडे त्यांच्या अनुकंपा निवृत्ती वेतनाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.11.2008 रोजी अनुकंपा निवृत्ती वेतन मंजुर करण्या प्रकरणी या कार्यालयाचे पत्र दि. 9.10.2006 व दि. 15.9.2008 अन्वये मुळ नस्ती संपूर्ण कागदपत्रासह या कार्यालयास सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु या प्रकरणी संपूर्ण कागदपत्र अद्यापही या कार्यालयास अप्राप्त आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.2.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही असा निर्णय देवून सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना अनुकंपा निवृत्ती वेतन मंजुर करण्याबाबतचा प्रसताव विभागीय आयुक्तांना सादर केलेला नाही अशा प्रकारचासुध्दा निष्कर्ष काढण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.





3. अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की अनुकंपा निवृत्ती वेतनाच्या संदर्भामध्ये दि. 28.7.1999 रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दि. 25.7.99 च्या पत्राचा संदर्भ देवून सहा. निबंधक उपलोकायुक्त यांचे दि. 19.1.99 अन्वये त्यांना अनुकंपा निवृत्ती वेतनाचा लाभ पारीत होण्यास मंजुरी प्रदान केल्या नुसार प्रकरणात या स्तरावरील आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन अनुकंपा निवृत्ती वेतन प्रकरण आपलेकडे सादर करण्यात येत आहे. कृपया प्रकरणात अनुकंपा निवृत्ती वेतन मंजूरी आदेश यथाशिघ्र निर्गमित होणेस विनंती आहे. सहपत्र 1. सेवापुस्तक एक भागात 2. निवृत्ती वेतन पुस्तिका दोन भागात असे कळविलेले

दिसून येते. व त्याची प्रत ही अपीलकर्ता, संवर्ग विकास अधिकारी पं.स.ब्रम्हपूरी, सहा. निबंधक उपलोकायुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले दिसून येते. तसेच दि. 25.8.1999 रोजी पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना दि. 21.8.99च्या पत्राच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांच्या प्रकरणामध्ये अनुकंपा निवृत्ती वेतन मंजुर करुन तसे आदेश पाठवावे म्हणजे संबंधितास अनुकंपा निवृत्ती वेतन अदा करण्याबाबत पुढील आदेश करणे सोयीचे हाईल असे कळवून सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. तसेच दि. 14 जुलै 2006 रोजी कक्ष अधिकारी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनीसुध्दा अपीलकर्ता यांना त्यांचे प्रकरण आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना पाठविल्याचे दिसून येते. यावरुन प्रकरण हे दि. 19.1. 99 पासूनच विभागीय आयुक्त कार्यालयात प्रलंबित आहे व असे असून सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव पाठविलेला नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे उत्तर जे दिलेले आहे ते अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे व तत्कालीन माहिती अधिकारी हे सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी हे सुध्दा बेजबाबदार दिसून येतात. त्यांनी दिनांक 13.2.99 रोजी आदेश पारीत केलेला असला तरी सदरच्या आदेशामध्ये अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या कोणत्याही कागदपत्राचा उल्लेख केलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही असाच कट केलेला दिसून येतो. व त्यामुळे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांचेविरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.





## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांनी करावयाची आहे

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्राची दखल न घेता निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 200/2009 व 201/2009.**

<u>अपील कमांक 200/2009</u>

श्री वामन माधोराव माकोडे
पोलीस कॉलनी तकीया वार्ड भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
भंडारा ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

<u>अपील कमांक 201/2009</u>

श्री देवराव राघोजी सावरकर
पोलीस कॉलनी तकीया वार्ड भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स (ॲनेक्स) सिताबर्डी नागपूर
2) श्री सुर्वे
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स (ॲनेक्स) सिताबर्डी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 200/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2008 रोजी जन माहिती

अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक कार्यालय भंडारा यांचेकडे पोलीस कर्मचारी सह. गृहनिर्माण संस्था भंडारा या संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेतील आपल्या कार्यालयाचा सहभाग 2000 पासून 2008पर्यंत झालेल्या निवडणुकांचा सविस्तर तपशिल मागितलेला आहे. दोन्ही अर्जाच्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 3.11.2008 व दि. 24.11.2008 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केली आहेत. दोन्ही प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अनुक्रमे दि. 29.11.2008 व दि. 24.12.2008 रोजी आदेश पारीत केलेले दिसून येते. त्यात माहिती अधिकारी यांनी कायदेशीर कार्यवाही नंतर प्राप्त झालेली माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच 7 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा करतांना माहिती ही संस्थेच्या संदर्भातील असल्यामुळे सदरचे अर्ज हे संस्थेकडे पाठविण्यात आलेले होते परंतु संस्थेनी माहिती दिली नसल्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे म्हटलेले आहे. अपीलाच्या सुनावणीमध्ये माहिती अधिकारी तसेच अर्जदारास माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने सुस्थेचे अध्यक्ष तसेच सदरची संस्था भंडारा येथील असल्यामुळे संस्थेची परिस्थिती जाणून घेण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना बोलाविण्यात आले. सदर सुनावणीस अर्जदार हजर झाले संस्थेच्या वतीने कोणीही हजर झाले नाही. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था भंडारा यांनी सदरच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे नेहमीचेच वर्तन असून कोणत्याही प्रकारचे पत्र घेत नाहीत किंवा माहिती पुरवित नाहीत. त्यामुळे संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 80 अंतर्गत रेकार्ड जप्तीची कार्यवाही करणेबाबतची कार्यवाही चालु आहे. सद्यस्थितीत अर्जदारास देणेबाबत संस्थेचा कोणताही रेकॉर्ड कार्यालयास उपलब्ध नसल्यामुळे अर्जदारास माहिती देता येणे शक्य नाही. त्यामुळे अर्जदारास माहिती देता येणार नाही. तसेच प्रथम अपीलाच्या कार्यवाहीच्या वेळेस अर्जदार हे हजर होते व त्यांना सर्व कार्यवाहीची माहिती असुनसुध्दा त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. व ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीत सुध्दा करण्यात आलेली आहे व त्याच कायदेशीर कार्यवाही नंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे व सदरचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 686/2008.**

श्री भैय्यालाल सुकलाल उईके
रा. नंगपुरा मुर्री
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदीप गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री डी. आर. लंजे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव ग्रामपंचायत नंगपुरा मुर्री
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2008 रोजी सचिव ग्रामपंचायत यांचेकडे सन 2007–2008 नमुना 9 ची झेरॉक्स प्रत व सन 2007–2008 वर्षाचा रेग्युलर व ग्राम सम्रुध्दी योजने व मई 2008 ग्राम सभेत घेतलेल्या ठरावाची प्रत व ग्राम सभेत जमा खर्चाची झेरॉक्स प्रतची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी अर्जासोबत तहसिलदार गोंदिया बीपीएल योजनेची अंत्योदय कार्डची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.7.2008 रोजी ग्राम विकास अधिकारी यांनी माहिती ग्रा. पं. दप्तरी तयार असून तयार असून सदर माहितीची रु. 352/– फक्त ग्रा. पं. कार्यालयात जमा करुन पावती व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात पैशाचा भरणा न करता दि. 14.8.2008 रोजी प्रथम अपील खंडविकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 20.9.2008 रोजी दि. 29.7.2008 च्या पत्राप्रमाणे नमुद केलेली रक्कम जन माहिती अधिकारी सचिव ग्रामपंचायत नंगपुरा मुर्री यांचेकडे भरणा केल्यानंतर 10 दिवसात माहिती अपीलकर्त्यास देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या
निर्णयानी समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

..2..

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की श्री उईके यांना दारिद्रय रेषेची दाखल्याची मागणी केली असता माझेकडे दाखल उपलब्ध नाही. सन 1997–98 च्या दारिद्रय रेषेच्या यादीत माझे नाव होते पण 2002 च्या सर्व्हेमध्ये माझे नाव दारिद्रय रेषेखाली आलेले नाही. त्याकरीता त्यांनी तहसिलदार यांचेकडे अपील दाखल केलेले असून त्यांचे म्हणणे मान्य केलेले आहे. परंतु पुरवणी यादी उपलब्ध झालेली नसल्यामुळे अर्ज करते वेळी दारीद्रय रेषेखालील यादीत नव्हते. मात्र अंत्योदय योजनेचे कार्ड हे सन 1997–98 च्या दारिद्रय रेषेच्या यादीवर आधारीत असुन शासनाने सन 97–98 ची दारीद्रय रेषेची यादी रद्य केलेली आहे व सन 2000 ची यादी सद्या अंमलात आहे. त्यामुळे अर्जदार यांचे म्हणणे मान्य करता येणार नाही व त्यामुळे त्यांना कळविलेली रक्कम भरल्याशिवाय त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी सांगितले तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यांनी असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की शासनाच्या धोरणाप्रमाणे पिवळे रेशन कार्ड मिळाले आहे परंतु ही बाब सुध्दा प्रथम अपीलाच्या निर्णयात स्पष्ट करण्यात आलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 687/2008.**

श्री मनोहर रामचंद्र पानघाटे
रा. हनुमान वार्ड वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शहा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री सुभाष भिवाजी माडेकर
जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लिपीक नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा यांचेकडे प्रयोगशाळा परीचरचे मंजुर पद भरणेबाबत आजपावेतो किती ठराव झाले व ते कोणकोणत्या तारखेस झाले आजपावेतो झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही एकुण तीन मुद्यांवर पुन्हा 7 उपमुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्याच दिवशी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 4.8.2008 रोजी देण्यात आलेला असून अपुर्ण दिलेली माहिती तीन दिवसाचे आंत देण्यात यावी असे आदेश दिलेले असून पुन्हा त्या दिवशीच दि. 4.8.2008 रोजी अपीलकर्ता यांना एकुण 7 मुद्यांवर पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना पुर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही. व जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. विलंबाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे

सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती न.प.ची असली तरी तीन शाळा संबंधातील असल्याने ती तीन शाळांमधून मागविण्यात आलेली होती व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 3,5,6,7 या मुद्यावर माहिती उपलब्ध झालेली आहे. मुद्या क्र. 3 चा 1 मध्ये किंती दिवसापासून पद रिक्त आहे ही माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मुद्या क्र. 3 (1) ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 992/2008.**

श्री टी. जी. नवलाखे
4 मिलिंद सोसायटी नरेंद्रनगर
नागपूर 440015 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. डी. रुडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक चंद्रपूर
2) श्री टी. के. शेय
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता दि. 29.6.2009 ला हजर होते परंतु आज गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2009 रोजी (कार्यालयात प्राप्त दि. 28.11.2006) जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर यांचेकडे दि. 12.8.2005 रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भातील कारवाई झालेली आहे. सदरची माहिती स्पिड पोष्टनी घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.12.2006 रोजी पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर कडे कोणतेच कागदपत्र उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 11.12.2006 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दि. 25.12. 2006 च्या उत्तरामध्ये दि. 12.8.2005 चा अर्ज प्राप्त नाही तसेच किरकोळ किंवा दिवाणी स्वरुपाचे अर्ज (अदाखलपात्र स्वरुपाचे) यांची मुदत 2 वर्ष कालावधीची असल्याने आपण पोष्टाद्वारे दि. 30.8.94, 28.10.94, 31.10.94, 6.5.95 (अर्जातील नमुद तारखानुसार) पाठविलेले नस्तीबध्द करण्यात आलेले असावे. यावरुन उपलब्ध रेकॉर्ड पडताळून पाहिला असता मिळुन आलेले नाही. तसेच सदर प्रकरणात काय कारवाई करण्यात आली याबाबत माहिती उपलब्ध नाही असे पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर यांचेकडून कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.





**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 20.7.2009

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 991 / 2008.**

श्री टी. जी. नवलाखे
4, मिलींद सोसायटी नरेन्द्रनगर
नागपूर 440015 ..... अपिलकर्ता

विरुध्द

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) श्री अशोक गेडाम
जन माहिती अधिकारी तथा
विशेष भुअर्जन अधिकारी क्र. 3
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.1.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.3.2006 (प्राप्त दि. 31.3.2006) रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात कलकुही येथील प.ह.नं.47 शेत नं. 5/6 नविन ख.नं. 124 नागपूर ग्रामीण येथील एकुण आराजी 2002 19 मे 1994 रोजी खरेदी केली आहे. फेरफार करण्याकरीता तलाठी यांना दि. 24.4.2000 रोजी अर्ज दिला. तसेच विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांना दि. 31.3.2000 रोजी सौ. शलीनी डी नवलाखे यांनी पत्र दिले होते. तसेच पटवारी ग्रा.पं.कलकुही त.जि.नागपूर यांना फेरफार करण्याकरीता दि. 5.4.2000 रोजी पत्र दिले होते. दि. 28.12.2001 च्या मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना दिलेल्या पत्रानुसार नावासह फेरफार करण्याकरीता अर्ज दाखल करण्यात आला होता. वरील संदर्भात सद्या आमचे नावे होणे आवश्यक होते. परंतु 7/12 वर अजुन फेरफार केलेला नाही तसेच सदर कार्गो हब प्रकल्पाशी संसपादित केला त्याची रक्कम आम्हाला मिळणे बंधनकारक आहे अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 9.4.2006 रोजी 1. मौजा कलकुही येथील प.ह.नं.47 शेत नं. 173/6 नविन खसरा नं. 124 नागपूर ग्रामीण





हद्दीतील एकुण आराजी 202 हे.आर. पैकी नाल्याकडील लागून 120 फूट x 220 म्हणजे 26400 चौ.फूट जागा आमचे नावे करण्याबाबत.— याबाबतची कार्यवाही या कार्यालयाकडून केली जात नाही याबाबत आपण तहसिलदार ग्रामीण यांचे कार्यालयाशी संपर्क करावा.

2. कार्गो हब मध्ये ग्रल्यामुळे मोबदला मिळण्याबाबत — भूसंपादन मामला क्र. 1/अ 65/1998—99 मौजा कलकुही मध्ये ख.क्र.124 हा सौ. शिला भाउराव नेरकर यांचे नावाने

असल्यामुळे त्याचा मोबदला त्यांना देण्यात आलेला आहे असे विशेष भूसंपादन अधिकारी क्र. 3 यांनी कळविलेले दिसून येते. दि. 3.1.2007 रोजी अपीलकर्ता यांचा दि. 29.12.2006 रोजीचा अर्ज हा अपील अधिकारी म्हणून आपलेशी संबंधीत असल्यामुळे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव आपणास सादर करण्यात येत आहे असे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले दिसून येते. दि. 6.1.2007 रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पुन्हा संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना कार्यवाहीची अपेक्षा असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 950/2008.**

श्री कृपाल भोयर, सचिव, अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद
शिवनगर खामला नागपूर 440025 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर

2) श्री एस. पी. पासेबंध
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा पदनाम विभाग सभापती ना.सु.प्रन्यास यांचेकडे मौजा खामला ख.नं.67 वर कोणाच्या आदेशावर अतिक्रमण हटविण्यात आले. दि. 25.5.2008 च्या दिवशी क्र. अेके/नझुल/कावि 879/91/12 नझुल अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर आवास योजनेसाठी भाडा पटटा लिजवर मिलने करीता मुख्य प्रवर्तक के. यू. भोयर नियोजी नागपूर भारत गृह निर्माण सहकारी संस्थेच्या कब्जात शिल्लक भुखंड होता. जबरदस्ती हटावून इतरत्र कब्जा कोणाच्या आदेशावर दिला. माहिती टपालाने पाहिजे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.9.2008 रोजी संदर्भाकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की आपल्या पत्रामध्ये उल्लेख केलेली जागा कोणती आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. या कार्यालयात उपलब्ध अभिलेख तपासून त्यातील अभिलेखाच्या प्रती मागीतल्यास त्या आपणास उचित शुल्क आकारुन देता येतील असे कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी सदरचे उत्तर प्रतिपुर्ती न केल्यामुळे दि. 15.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.10.2008 रोजी देण्यात आलेला असून ख.क्र.67 मौजा खामला या अभिन्यासाच्या नकाशाची व नगर भूमापन कार्यालयाची 'क' प्रत व इतर आवश्यक उपलब्ध दस्तऐवज कार्यकारी अभियंता (पश्चिम) तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावेत असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दि. 17. 10.2008 रोजी अधिकारी यांना ख.क्र.67 मौजा खामला या

..2..



अभिन्यासाच्या नकाशाची व नगर भूमापन कार्यालयाची 'क' प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना दि. 23.9.2009 ला सुध्दा ना.सु.प्र. नगर भूमापन अधिकारी नं. 3 नागपूर यांचेकडून ख.क्र.64 मौजा खामला यांनी मोजणी करुन त्यामधील भूखंड वाटप केलेले आहेत. आपण सादर केलेल्या दस्तऐवजामध्ये ख.क्र.67 मौजा खामलाचे दस्तऐवज जोडलेले आहेत. त्यामधील 7/12 च्या उता—यात ख.क्र.67 ही जागा सरकारी दशविली आहे. ख.क्र.64 मौजा खामला ही जागा ना.सु.प्र.ची असून नगर भूमापन अधिकारी यांनी या जागेच्या मोजणीनंतर दिलेल्या अंतिम नकाश्यानुसार त्यांच्या भुखंडांचे वाटप केलेले आहे. त्याची प्रत सोबत सलग्न आहे. आपण वरंवार मागणी करीत असलेली जागा ख.क्र.67 मौजा खामला पैकी आहे असे आपल्या पत्रावरुन समजते व ती जागा ना.सु.प्र.ची नसल्याने

किंवा त्या जागेच्या प्रत्यक्ष आखणीबाबत ना.सु.प्र. समुचित प्राधिकरण नाही. त्यामुळे आपल्या तक्रारीचे निराकरण ना.सु.प्र.ला करता येणार नाही. तरी आपणास अभिप्रत जागा नगर भूमापन कार्यालयाकडून निश्चित करुन माजणीचा नकाशा प्राप्त करुन घ्यावा असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 60/2009.**

श्री कृष्णा उपासाव वाठ
684 मरारटोली रामनगर
नागपूर 33 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधिश
न्यायमंदीर नागपूर
2) श्रीमती जे. डी. पाटील
जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता हे दि. 23.6.2009 ला उपस्थित होते व त्यांचे म्हणणे एकुन घेतलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांचेकडे न्या. श्री एस.एस.गुल्हाने यांची तक्रार सी–4/2007 दि. 2. 1.2007 तक्रारीची रिपोर्ट उच्च न्यायालय मुंबई ला पाठविलेली. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.10.2008 रोजी मागितलेला अहवाल हा गोपनिय असल्यामुळे देता येणार नाही असे नमूद केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 4.11.2008 रोजी देण्यात आलेला असून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे व्यथित राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता हे दि. 23.6.2009 ला उपस्थित होते व त्यांचे म्हणणे एकुन घेतलेले आहे. परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटिस प्राप्त झालेली नसल्यामुळे मुदत देण्यात आलेली होती. आज जन माहिती अधिकारी हजर झालेले आहेत. अपीलकर्ता यांनी असा युक्तीवाद केला होता की कोणकोणत्या कारणाखाली गोपनिय आहे व नाकारलेले आहे ते कारण दिलेले नाही किंवा अधिनियमाची कोणत्याही प्रकारची तदतुद दिलेली नाही.

..2..

अधिनियमाच्या कलम 22 प्रमाणे अधिनियमाचा अधीभावी परिणाम असणे अशी तरतुद आहे व त्यामुळे कोणत्याही कादद्याप्रमाणे गोपनिय असली तरी ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 22 प्रमाणे त्याचा आधार घेता येत नाही व त्यामुळे त्यांन जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तक्रारीची चौकशी करुन अहवाल पाठविलेला असल्यामुळे व ती चौकशीच्या प्रक्रियेत असल्यामुळे अपीलकर्ता यांना अहवाल दिलेला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या कलम 7 (3) (1) व (के) प्रमाणे दिलेला नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्यामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 चा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 हा दि. 12.5.2005 रोजी निरसीत करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी केलेला अर्ज हा दि. 22.9.2008 रोजी केलेला असून तो माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे करण्यात आलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा दि. 22.5.2005 रोजी मिळालेला आहे व याबाबतची माहिती ही न्यायालयातील अधिका–यांना असणे आवश्यक आहे. परंतु निरसीत अधिनियमाचा आधार घेवून अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. तो निर्णय योग्य नाही. व याबाबत जिल्हा व सत्र न्यायालय यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिका–यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीची माहिती करुन देणे हे जरुरीचे झालेले आहे. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 मध्ये माहिती प्रकट करण्यास अपवाद दिलेले आहे व त्यामधील कलम 8 मधील (1) (ज) प्रमाणे माहिती नाकारता आली असती. परंतु सदरच्या कलमाचा उल्लेख करणे आवश्यक होते. असे असले तरी सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 22.9.2008 रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हा न्यायाधिश जिल्हा दिवाणी व सत्र न्यायालय नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 694/2008, 695/2008, 696/2008, 697/2008.**

**<u>अपील क्रमांक 694/2008, 695/2008</u>**
श्री रमेश कुमार बाली मनोहरलाल बाली
फुटाना ओली कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 696/2008</u>**
3) जन माहिती अधिकारी तथा
कर अधिक्षक
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 697/2008</u>**
4) जन माहिती अधिकारी तथा
स्वास्थ निरीक्षक
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 22.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये एक व दिनांक 16.9.2008 रोजी तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांनी मुदत मागितलेली आहे. व कनिष्ठ लिपीक हे उपस्थित आहे. परंतु व कागदपत्रे काही दाखल केलेली नाहीत.

2. अपील क्र. 694/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नगर परिषद कामठी यांचेकडे 1. वनराई लगाने हेतु सरकार से कितना फंड मिला 2. बनराई की सुरक्षा व पालनपोषण मे कितना खर्च हुवा. 3. वनराई के झाड काटने संबंधी ज.इं. की रिपोर्ट

4. वनराई काटने संबंधी बांधकाम विभाग समिती के प्रस्ताव.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या दिनांक 12.5.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तसेच प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय दिलेला नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व ते शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 695/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नगर परिषद कामठी यांचेकडे एक्सप्रीमेंटल ॲन्ड टेस्टींग मिनरल वाटर लेबारट्री व पॅकेज ड्रिंकींग वाटर प्लांट का नाहरकत प्रमाणपत्र दि.8.10.2007 संबंधी माहिती मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 8.9.2008 रोजी देण्यात आलेला असून उपरोक्त संदर्भांकीत विषयी दि. 6.9.2008 रोजी होणा–या सुनावणीत आपण हजर होते. माहिती अर्जान्वये मागण्यात आलेले पत्र निर्गमीत झाले असून त्याची प्रत आठ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देण्यात आले. तरी आपण कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी संपर्क साधुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यावर अपीलकर्ता यांनी सोमवार 15.9.2008 तक रास्ता देखा न.प.गया लेकीन कोई बात करने को तयार नही अशाप्रकारचे नमूद केलेले दिसून येते. व त्यामुळे  राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. नगर परिषदेत ब–याच वेळा गेलो त्यांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रतिनिधी म्हणून कनिष्ठ लिपीक यांना पाठविण्यात आले. परंतु कागदपत्रे सादर केले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे. जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 696/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक यांचेकडे वर्ष 2007–2008 कितने मकानो का असेसमेंट किया गया. इसमे नये कितने है. रिपअरिंग किये कितने है. इनकी वार्ड वाईज जानकारी दि जावे. अशी माहिती टपालाद्वारेघेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.9.2008 रोजी कर अधिक्षक नगर परिषद यांनी शासन के आदेशानुसार कर विभाग के कर्मचारी मतदार यादी को दुरुस्ती करने का कार्य कर रहे है. तथा दो कर संग्राहक वैद्यकीय छुटटीपर होने की वजह से आपने माहिती अधिकार अंतर्गत अर्जी मे मांगी गयी माहिती उपलब्ध नही करा सकते अतः आपको एक माह के भितर माहिती दि जायेगी असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले

दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 8.9.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे. व आपण संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 12.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की वार्ड प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. वास्तविक त्यांना दिलेल्या तक्त्यामध्ये प्रत्येक वार्ड मध्ये किती नवे व किती जुने बांधकाम यासंदर्भात आकडे उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

6. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना वार्ड प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु तक्त्यामध्ये प्रत्येक वार्डच्या पुढे व नविन व जुने अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

7. अपील क्र. 697/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 22.5.2008 रोजी माहिती अधिकारी तथा स्वास्थ निरीक्षक नगर परिषद कामठी यांचेकडे सफाई विभागातील सन 1985 पासुन आजपर्यंत खरेदी केलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली डोजर गाडयाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 21.6.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.9.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना माहिती घेण्यास स्वास्थ विभाग कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित न झाल्यामुळे अर्जदाराने अर्जावर दिलेल्या पत्त्यावर हमदस्त मार्फत माहिती पाठविण्यात आली. परंतु अर्जदार सद्यस्थितीत बाहेर गावी गेले असल्याची माहिती त्यांचे नातेवाईकानी दिल्यामुळे माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. परंतु
दि. 6.9.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष माहिती देण्यात आली. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दोन प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु कोणत्या प्रकारची माहिती खरी आहे हे त्यांना कळुन येत नाही. मात्र त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी केलेला नाही. मात्र दि. 21.6. 2008 रोजी दिलेली माहितीची कागदपत्र दाखल केलेली आहे. यावरुन दि. 21.6.2008 ची माहिती ही खरी आहे असे समजण्यास हरकत नाही. व त्यामुळे सदरचे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 694/2008, 695/2008 मध्ये जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी यांच्या दि. 12.5.2008 व दि. 7.7.2008 च्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी करावयाची असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. तशी न केल्यास मुख्याधिकारी नगर परिषद यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येईल. तसेच अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपील क्रमांक 696/2008, 697/2008 यामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येतात.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 219 / 2009.**

श्री रमेश कुमार बाली मनोहरलाल बाली
फुटाना ओली कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति.जिल्हाधिकारी नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी तर्फे कागदपत्रे दाखल केलेली आहे व त्यांचे शिरस्तेदार हजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2008 रोजी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे कामठी तहसिलदारकी सरकारी वाहन लॉग बुक नयी व पुरानी च्या बद्यलची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी शिरस्तेदार यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती तहसिलदार कार्यालयातील माहिती आहे. माहिती अधिकारी यांना मागणे आवश्यक होते. तसेच अपीलकर्ता यांचे इतर 7 ते 8 अर्ज आहे त्या सर्व अर्जाची सुनावणी ही एकत्रित ठेवण्यात आली होती. परंतु उपविभागीय अधिकारी हे दौ–यावर असल्यामुळे सनावणी घेता आली नाही. मात्र सदरची माहिती पुढील तारखेस सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तहसिलदार कार्यालयातील असून जिल्हाधिकारी यांचेकडे मागितली व राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करतांना माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी दाखल केलेली असल्य सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 227 / 2009.**

श्री उल्हास ह. मोटघरे
अधिक्षक जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. व्ही. एन. कुमरे
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णलय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2008 रोजी वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णलय कोरची जि. गडचिरोली यांचेकडे पगार काढण्याबाबत सहा. अधिक्षक ग्रामीण रुग्णलय कोरची कालावधी 10 जानेवारी 03 ते 1 एप्रिल 03 पर्यंत पगार काढण्यात आलेला नाही. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.12.2008 रोजी वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णलय कुही जिल्हा नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.2.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी रजेचा अर्ज दिलेला होता. रजेचा अर्ज ग्राहय न धरता ते गैरहजर आहे असे दाखवून त्यांचे वरील कालावधीतील वेतन काढलेले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की ते कुही येथील कार्यालयात कोणत्याही प्रकारची माहिती न देता व रजेचा अर्जसुध्दा न देता दुस–या कार्यालयात हजर झाले होते. व सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.12.03 रोजी सुध्दा त्यांना उपसंचालक आरोग्य यांनी पत्राची प्रत दिलेली आहे व त्यातही संपूर्ण प्रकरणाची माहिती दिलेली आहे. परंतु कार्यवाहीची अपेक्षा आहे व सदरची कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे करता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 229/2009 व 230/2009.**

श्री अशोककुमार प्रल्हादराव अग्रवाल
पी.ए. मिल्स कंपाऊड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता (08एम सर्कल)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. गोंदिया (स व सु विभाग क्र. 1)
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचा गडचिरोली जिल्हयामध्ये दौरा असल्यामुळे उपस्थित राहता येणार नाही. परंतु मा. राज्यपालांचा दौरा हा रद्द झालेला आहे व तरीसुध्दा आज जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल झालेली नाहीत.

2. अपील क्र. 229/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी महा. राज्य विज वितरण कंपनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) Reading Security Deposit collected time to time with the date and amount paid since the date of connection till today.
2) RLC payments collected time to time with the date and amount paid
3) Interest credited on Security Deposit with the date and amount paid since the date of connection till today

| Sr. No. | Name of consumer | S/C No. | Date of Connection | S/C No. Computerised |
|---|---|---|---|---|
| 1 | Ashokkumar Rice Mills | IP 8138 | 01-01-76 | 430010081381 |
| 2 | Pramodkumar Rice Mills | IP 78444 | 01-01-76 | 43001007844 |
| 3 | Prahladrai Industries | IP 15077 | 30-10-86 | 430019053790 |
| 4 | Shantidevi Industries | IP 228475 | 13-11-95 | 430019053810 |
| 5 | Prahladrai Agro Industries | IP 23020 | 5-5-97 | 430010230203 |
| 6 | Prahladrai Agrawal | IP 4557 | 01-01-69 | 430010045571 |
| 7 | Shreeansh Food Ind. | IP | 01-01-05 | 430019053570 |
| 8 | Prahladrai Agro Industries Khatai | IP | 6-8-97 | 430430054303 |
| 9 | Prahladrai Agrawal Gaushala Ward | DL 00103940 B/0546 | 17-9-64 | 430010010394 |
| 10 | Shantidevi Agrawal Gaushala Ward | DL 0096370 B/0546 | 01-01-80 | 430010096370 |
| 11 | Prahladrai Agrawal Kudwa Rd | DL 02197 B/0567 | 17-9-64 | 430010002197 |
| 12 | Pramodkumar Agrawal Kudwa Rd | DL 167510 B/0567 | 1-7-91 | 430010167510 |
| 13 | Pramodkumar Agrawal | DL 209166 B/0546 | 4-11-05 | 430010209166 |
| 14 | Prahladrai Agrawal Old Gondia | DL 126791 B/273 | 01-01-83 | 430010126791 |
| 15 | Prahladrai Agrawal Govindpur Road Gondia | DL 15759 B/227 | 01-01-88 | 430010157590 |

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. मोबाईलवर कळवावे व बॅंकेचा रु. 200/— चा चेक अनामत म्हणून पाठविले असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने पुन्हा मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र सुरक्षा रक्कम व त्यावरील व्याज याबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यावर मुद्या क. 'क' मध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना रु. 200/— चेक द्वारे पाठविलेले आहे ते परत करणे संयुक्तिक राहिल. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दिलेल्या निर्णयामध्ये माहिती 15 दिवसाचे आंत देण्यात येईल अस कळविलेले असल्यामुळे व तशी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

3. अपील क. 230/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

One year before charging of 33 KV S/S Fulchur

A) Union Bone Mill Old Gondia Khamari upto Adasi were given to electric supplies on 11 KV lines from Suratola S/S Gondia its single line diagram

B) What had happened to these lines after energization of 33 KV S/S Fulchur

a) lines dismentalled

b) lines utilized in new infrastructure

c) kept idle/charged

d) Wheter utilized for back feeding/switching shifting of load of nearby feeders and its occassisons since the energization of 33 KV S/S Fulchur

सोबत 200 रु. चा चेक त्यांना पाठविलेला आहे व माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 5.12. 2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.3. 2009 रोजी देण्यात आलेला असून 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तसेच 11 KV line diagram and its status since energization of 33 KV S/S Fulchur till date of application ची माहिती उपलब्ध झाली नाही असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून येते. ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. तसेच अपीलकर्ता यांनी 200 रु. चा भरणा चेकद्वारे करण्यात आलेला असला तरी माहिती ही त्यांना एकाच पृष्ठामध्ये उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ती संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. व रु. 200 हे परत करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 229/2009 व 230/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलामध्ये आदेशित केल्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोन्ही अपीलातील त्यांनी जमा केलेली रक्कम रु. 200 + 200 = रु. 400 त्यांना परत करण्यात यावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**दि. 22.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1026/2008.**

श्री घनशाम बाबुराव तिगलवार
मु. पो. ता. सावली जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. डी. जी. गिरी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहयोग अधिष्ठाता (निम्न कृषी शिक्षण)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
अकोला ता. जि. अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
द्वारकाबाई हुंडीवाले कृषी विद्यालय
मु. पो. शिरला अंधारी ता. पातुर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.1.2008 रोजी अधिक्षक कृषी विद्यालय सर्व खाजगी कृषी विद्यालये यांचेकडे आपल्या कृषी विद्यालय कर्मचा—यांना माहे डिसेंबर 2007 ला देण्यात आलेले वेतनाचे पगारपत्रक मिळण्याबाबत. माहे डिसेंबर 2007 मध्ये कर्मचा—यांना देण्यात आलेल्या एका महिन्याचे कर्मचा—यांच्या सहीनिशी किंवा बॅकेतुन पगार होत असल्यास कर्मचा—यांच्या खाते क्रमांक सह झेरॉक्स प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. दि. 11.2.2008 रोजी अधिक्षक जे. डी. पाटील कृषी विद्यालय यांनी त्यांचेकडून त्यांचेकडे जेवढी माहिती उपलब्ध करुन देता येईल तेवढी माहिती लवकरात लवकर पोहोचवावे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 8.4.2008 रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहयोग अधिष्ठाता (निम्न कृषी शिक्षण) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सह अधिक्षक तथा माहिती अधिकारी निम्न कृषी शिक्षण डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांनी दि. 10.4.2008 रोजी विना अनुदानित तत्वावर चालु असलेल्या कृषी विद्यालयाचे व्यवस्थापन ही संपूर्ण खाजगी बाब असून त्यांचे व्यवस्थापन पूर्णपणे संस्था चालकाच्या अखत्यारीतील बाब आहे. तरी संबंधीत माहिती संबंधीत कृषी विद्यालयाकडूनच मिळू शकेल असे अपीलकर्ता यांनी कळविलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलासोबत त्यांनी एकुण 36 कृषी विद्यालयाकडून माहिती मागितलेली आहे असे सांगितले आहे. परंतु एकाही कृषी विद्यालयानी सदरची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. आयोगानी सर्व 36 कृषी विद्यालयाना नोटिस न काढता अधिक्षक द्वारकाबाई हुंडीवाले कृषी विद्यालय यांना नोटिस काढलेली होती व खुलासा मागितलेला होता परंतु त्या विद्यालयाचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी हे उपस्थित नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की कृषी विद्यालय ही त्यांच्या कर्मचा–यांना वेतन देत नाही त्यामुळे सदरची माहिती त्यांनी मागितलेली आहे. आज आयोगापुढे हजर असलेले सहयोग अधिष्ठाता (निम्न कृषी शिक्षण) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरची सर्व विद्यालये ही विना अनुदानित खाजगी विद्यालये असल्यामुळे त्यांचे सर्व प्रशासन हे त्यांच्या संस्थेकडे असते व कृषी विद्यापीठाचा प्रशासनाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. मात्र त्या कृषी विद्यालयान मान्यता विद्यापीठ देते त्यांच्या परीक्षा विद्यापीठ घेते तसेच अभ्यास क्रमाच्या संदर्भातील नियंत्रण विद्यापीठाचेच आहे व त्यांना परवानगी विद्यापीठ देते. त्यामुळे विद्यापीठाचे प्रबंधक हे त्या संदर्भातील नियंत्रण अधिकारी आहे. असे असल्यास विद्यापीठाच्या प्रबंधक यांना अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन सदरच्या विद्यालयाच्या संदर्भामध्ये जर आयोगानी एखादी कार्यवाही केली तर त्याबबातची प्रशासकीय कार्यवाही विद्यापीठाचे प्रबंधक यांना करता येईल. तसेच अर्जदारानी माहिती मागितल्यास त्यांना विद्यापीठाचे प्रबंधक हे माहिती उपलब्ध करुन देवू शेकते. अर्थातच याबाबत कृषी संचालक किंवा विद्यापीठाचे सक्षम अधिकारी यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 व 19 अन्वये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे असले तरी अधिक्षक/ प्राचार्य द्वारकाबाई हुंडीवाले कृषी विद्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अधिक्षक/प्राचार्य/अध्यक्ष द्वारकाबाई हुंडीवाले कृषी विद्यालय यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 27.1.2008 च्या अर्जा अनुषंगाने माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 226/2009.**

श्री नानाजी जयराम रामटेके
जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी मोर जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. आर. पारधी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती अर्जुनी मोर जि. गोंदिया
2) श्री नंदागवळी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक जि. प. प्राथ. शाळा
जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी मोर जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 (प्राप्त दि. 12.11.2008) रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जि. प. प्राथ. शाळा जानवा येथील शाळा वर्ग खोली बांधकाम दि. 30.8.08 ला झालेल्या बांधकामाची खर्चाची मटेरीय माहिती मिळण्याबाबत.
सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.12.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दि. 13.2.2009 रोजी सुध्दा गट शिक्षणाधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी आतापर्यंत तीच माहिती तीन वेळा मागितलेली
असून त्यांचे तीन अपीलाची सुनावणी आयोगाकडे झालेली आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती मिळाली परंतु बांधकाम करतांना ज्या व्यक्तीने टाईल्स बसविल्या त्या व्यक्तीचे नाव उपलब्ध करुन दिलेले नाही. सदरचे नाव उपलबध करुन द्यावे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या मधील बांधकामाच्या संदर्भात टाईल्स बसविलेल्या व्यक्तीचे नाव हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 228 / 2009.**

श्रीमती मिनाक्षीदेवी मोरेश्वर सोनेवाने
मु. खुर्शिपार पो. चिरचाळबांध
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त कार्यालय
(ग्रामपंचायत विभाग) नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
(ग्रा.रो.ह.यो.) जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे म.ग्रा.रो.ह.या.अंतर्गत खुर्शिपार गावातील मजुरांनी नमुना 4 चे फॉर्म भरुन काम मागितले असता काम न मिळाल्यामुळे आपणाकडे बेरोजगारी भत्त्यासाठी दि. 2.2.2008 ला मागणी केली होती त्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.2. 2008 च्या तक्रार अर्जावार कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. विभागीय आयुक्त यांचेकडून प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे हस्तांतर केल्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वारंवार चर्चेसाठी बोलाविण्याची नोटीस काढलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे हजर झालेले नाहीत. व त्यामुळे दि. 4.5.2009 रोजी सदर प्रकरणी आपण मागितलेली माहिती महत्वाची असून ती या कार्यालयास उपलब्ध झालेली आहे. सदर माहिती उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार आपणास पुरविण्यात येणार असून आपण सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता दिनांक 11 मे 2009 रोजी या कार्यालयात उपस्थित राहावे माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी दि. 28.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही असे कळविलेले असल्यामुळे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु अपीलकर्ता यांना झालेल्या कार्यवाहीची माहिती हवी असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामध्ये रोजगार हमी गावामध्ये दवंडी देवून कामाची जाहिरात देण्यात आली होती परंतु त्या दिवशी मजुर हजर झालेले नसल्यामुळे पुन्हा त्याच कामाची जाहिरात दिलेली होती. परंतु त्यानंतरही मजुर हजर झालेले नसल्यामुळे पंचनामा करुन काम बंद करण्यात आलेले होते अशी माहिती खंड विकास अधिकारी पं.स.आमगाव यांचेकडून उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांच्या तक्रार अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नव्हती असे सांगितले. सदर माहिती गट विकास अधिकारी यांचेकडून उपलब्ध झालेली आहे. व तीच माहिती अपीलकर्ता यांना घेवून जाण्याकरीता पत्र दिलेले आहे परंतु अपीलकर्ता आलेले नसल्यामुळे सदरची माहिती कार्यालयात आहे. व्यक्तीशः माहिती मागितलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्यास जाणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 242/2009.**

श्री मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड गोंडपूर चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सं.)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गडचिरोली ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गडचिरोली ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. परंतु उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांचेकडे कु. सुषमा अरुण उईके रा. चितेगाव यांना दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये सादर केलेल्या अर्जासहीत सर्व दस्तऐवजासहीत दक्षता पथकाच्या रिपोर्टची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या 29.9.2008 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 240/2009.**

श्री कवडू जनार्धन येनप्रेड्डीवार
मु. पो. मुल ता. मुल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद मुल
ता. मुल जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद मुल
ता. मुल जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याधिकारी नगर परिषद मुल यांचेकडे दलीत वस्ती अंतर्गत बांधकाम केलेल्या रस्त्याचे आयुष्यमान किती दिवसाचे आहे. तसेच सेकुरिटी डिपॉझीट जमा असल्याची कॉपी किंवा अनामत रकमेची कॉपी तसेच आजपर्यंत कोणकोणते काम झालेले आहे व ठेकेदाराला किती रक्कम देण्यात आलेले आहे त्याची तपशीलवार माहिती सन 1987 ते 2008पर्यंत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा झालेला दिसून येत नाही. मात्र दि. 1.1.2009 रोजी मुख्याधिकारी यांनी अपीलकर्ता यांना रस्त्याचे आयुष्यमान बाबत अंदाजपत्रकात नमूद नाही. तसेच कोणत्या कंत्राटदाराची अनामत रकमेची प्रत पाहिजे ते अर्जात नमुद नसल्याने प्रत देता आलेली नाही तरी कोणत्या कामाची व कंत्राटदाराची अनामत रकमेबाबत प्रत आवश्यक आहे कळविण्यात यावे. जेणेकरुन प्रत देता येईल. कंत्राटदारास किती रक्कम देण्यात आली त्याची माहिती दि. 5.12.2008 ला देण्यात आलेली आहे असे उत्तर दिलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 5.12.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 25. 11.2008 रोजी माहितीच्या करीता शुल्क भरण्यास कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेलेली आहे. परंतु ती अपुर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावरुन दि. 1.1.2009 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद मुल यांनी अपीलकर्ता यांना तीन्ही मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती जशी उपलब्ध आहे तशी मिळते व त्यामुळे रस्त्याचे आयुष्यमान बाबत अंदाजपत्रकात नमूद नाही असे कळविलेले

असल्यामुळे जी माहिती उपलब्ध नाही ती उपलब्ध होवू शकत नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. मुद्दा क्र. 3 व 4 च्या संदर्भामध्ये मोघम माहिती मागितलेली आहे असेमुख्याधिकारी नगर परिषद मुल यांनी असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी निश्चित अशी माहिती मागितल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत निश्चित कोणत्या ठेकेदाराची माहिती त्यांना पाहिजे त्या ठेकेदाराची निश्चित माहिती जन माहिती अधिकारी यांना अर्ज करुन द्यावी व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 243/2009.**

श्री विजय प्रभाकर सिध्दावार
द्वारा श्रमिक एल्गार, ताडाळ रोड मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एस. खामनकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा साधन गट प्रमुख
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे पद रिक्त आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 रोजी माहिती अधिकारी जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे सन 2007 ते आजतागायत जलस्वराज योजने संदर्भामध्ये एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहितीच्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे दि. 12.1.2009 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदीच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही तरी विनामुल्य द्यावी लागते असे त्यांचे निदर्शनास आणले. त्यानंतर पुन्हा दि. 28.1.2009 रोजी पुवीच्या अर्जाच्या संदर्भात दि. 27.11.2008 ला अर्ज करुन बीपीएल धारक नाही असे नमुद करुन अर्ज सादर केला व या कार्यालयाने दि. 1.12.2008 या कार्यालयाशी निगडीत माहिती तयार करुन पाठविली म्हणजे एका महिन्याचा कालावधी झालेला नाही. तसेच आपण पहिल्या अर्जावर 20 रु.ची तिकीट लावावयास पाहिजे होते परंतु आपण 10 रु.ची तिकीट लावलेली आहे. तसेच पहिल्या अर्जात झेरॉक्सची मागणी केलेली नाही वा तसा अर्जातसुध्दा उल्लेख नाही. त्यामुळे दिलेली माहिती बरोबर असल्याचे स्पष्ट होते. तसेच माहिती ही 30 दिवसाचे आत पुरविल्यामुळे आपणास मोफत माहिती देता येणार नाही किंवा त्यांच्या झेरॉक्स प्रती काढुन देता येणार नाही. याकरीता आपणास या कार्यालयात रक्कम जमा करावी लागेल असे कळविलेले दिसून येते. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिली ती माहिती अर्धवट व अपुर्ण आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ..

2..

3. अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की त्यांच्या दि. 6.11.2008 च्या अर्जामध्ये अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा कसे याबाबत त्याबाबत त्यांनी निरंक लिहिलेले आहे व असे असुन सुध्दा त्यांना दि. 7.11.2008 रोजी बीपीएल धारक आहे काय व असल्यास प्रमाणपत्र सादर करावे असे कळविलेले दिसून येते. यावरुनच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 चा अर्ज हा रु. 10 चे तिकीट लावूनच केला होता व तो नियमाप्रमाणे असूनसुध्दा 20 रु. चे तिकीट का लावले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारले. जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.11.2008 च्या अर्जाच्या नंतर बीपीएल धारक आहे काय असे विचारले नंतर दि. दि. 27.11.2008 रोजी बीपीएल धारक नाही असे कळविले. परंतु तो माहितीचा अर्ज होत नाही. मुळ माहितीचा अर्ज दि. 6.11.2008 चा आहे. याबाबतची माहिती हे प्रथम अपीलीय अधिकारी यांन असूनसुध्दा त्याबद्यल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. तसेच दि. 1.12.2008 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती निश्चित मुदतीनंतरच उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्याबाबत आयोगाचीसुध्दा खात्री झालेली आहे. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मुद्या क्र. 1,7 व 8 ची माहिती उपलब्ध झालेली नाही. ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.11.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्या क्र. 1,7 व 8 ची माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जामध्ये बीपीएल धारक आहे काय व त्यात निरंक असे लिहीलेले असूनसुध्दा अपीलकर्ता यांना त्याबाबत विचारणा केली ही बाब माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्याचीच आहे अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते.
3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीची माहिती करुन घ्यावी व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचे निर्णय द्यावे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 238/2009 व अपील क्रमांक 239/2009.**

श्री विष्णुदास इस्तारी पुरामे
मु. पो. ता. लाखांदूर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
साकोली ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 17.2.2009 व दिनांक 27.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 238/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली यांचेकडे दि. 8.5.96 चे अर्जदाराचे लेखी रिपोर्ट मध्ये 1 ते 10 लेखी दस्तऐवज पुरावे जोडण्यात आले होते. त्या आधारे मा. ठाणेदार साकोली नी चौकशी कां केली नाही अशी एकुण 11 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तसेच ठाणेदार पो.स्टे.लाखनी क्र. डी–9/5/109/98 दि. 26.11.98 चे संदर्भीय चौकशी अहवाल. पो.स्टे.लाखनी येथे दि. 8.5.96 व दि. 13.11.97 ला दिलेलया रीपोर्ट संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती डाकद्वारे, व्यक्तिशः खास दुताद्वारे तसेच दारीद्रय रेषेचा दाखला जोडलेला आहे असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.12.2008 रोजी सन 1996, 1997, 1998 वर्षाचे 'ब' अभिलेख पो.स्टे.लाखनी जा.क्र.1391/02 दि. 1.10.02 अन्वये मा. पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा येथे दिनांक 1.10.2002 ला नाश करणे कामी दाखल करण्यात आले आहे असे कळविण्यात आलेले आहे. आपणास मुदतबाहय व रेकॉर्ड अभिलेखाची यादी छायांकित प्रत आमचे कार्यालयीन जा.क्र.उविपोअसा/मा.अर्ज/652/08 साकोली दि. 6.8.08 अन्वये पुरविण्यात आलेली आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा
निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचा अर्ज आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.11.2008 रोजी पोलीस निरीक्षक पो.स्टे.लाखनी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी करीता पत्र पाठविलेले दिसून येते. त्यावर ठाणेदार लाखनी यांनी नाश करणे कामी दाखल करण्यात आले आहे असे उत्तर दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना तसे उत्तर दिलेले आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. असे असले तरी माहिती जुनी असल्यामुळे ती नियमानुसार नाश करण्यास पाठविले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटळ केलेली आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क. 239/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली यांना अपराधात्मक गुन्हा करणा–यांना व जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयाचे उल्लंघन करणा–यांना संरक्षण देवून पोलीस अधिका–यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याबाबत. पो.स्टे. लाखनी येथे दि.8.5.96 व 13.11.97 ला दिलेल्या रिपोर्ट संबंधी. सदरचे अर्ज किंवा रिपोर्ट हे नाश करण्याचे प्रयोजन काय आहे असे विचारले आहे तसेच मानवाधिकार आयोग नवी दिल्ली यांचे दि.21.1.98 चे आदेशानुसार मा.डि.वा.एस.पी. साकोली यांनी कोणती कारवाई केली अशा प्रकारे एकुण 11 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.12.2008 रोजी पोलीस निरीक्षक पो.स्टे.लाखनी यांना माहिती सादर करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. त्यावर ठाणेदार लाखनी यांनी नाश करणे कामी दाखल करण्यात आले आहे असे उत्तर दिलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 16.12.2008 च्या अर्जात मागितलेली माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.2.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती संकलीत करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला दिसून येतो. व त्यानंतर दि. 12.3.2009 रोजी अर्जातील माहिती संकलित करुन सोबत सलग्न केली आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 12.3.2009 रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

( विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व कलम १८ अन्वये अपील क्रमांक १०१२/२००८ व तक्रार क्रमांक १४९/२००८, अपील क्रमांक १०१३/२००८ व तक्रार क्रमांक १८८/२००८ व अपील क्रमांक ७/२००९.**

श्री. दयाराम बिसन देशभ्रतार,
रा. अमर ज्योतीनगर, प्लॉट नं. ११३,
भिमचौकाजवळ, नारा रोड, पो. जरिपटका,
नागपूर - ४४० ०१४.

श्री. प्रकाश महादेवजी पाटील,
रा. अमर ज्योतीनगर, प्लॉट नं. ११२,
भिमचौकाजवळ, नारा रोड, पो. जरिपटका,
नागपूर - ४४० ०१४.

श्री. अनिल प्रल्हाद दुर्गे,
रा. अमर ज्योतीनगर,
भिमचौकाजवळ, नारा रोड, पो. जरिपटका,
नागपूर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रविण वानखेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था (शहर - १),
१८५, आयुर्वेद ले आऊट, भांडे प्लॉट चौक,
उमरेड रोड, नागपूर.

श्री. बिहारी लक्ष्मण मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
अमर ज्योती सहकारी गृह निर्माण संस्था,
नारा रोड, नागपूर - ४४० ०१४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**नि र्ण य**

वरील तीनही अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ३१.१२.२००९ रोजी २ द्वितीय अपीले व दिनांक १७.१.२००८ रोजी १ द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या

कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत व कलम १८ अन्वये २ तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलाची व दोन तक्रारींची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १०१२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००८ रोजी अध्यक्ष तथा माहिती अधिकारी, अमरज्योती नगर गृह निर्माण सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे सन १९९८ ते २००८ या कालावधीत अ.क्र. १ ते २४ दानदात्यांनी रुपये ३९९७००/- रक्कम प्राप्त झाली.

रकमा कॅश बुकला जमा नोंद व बँकेत कधी जमा करण्यात आली, तारीख, व्हॉचर नंबर व रक्कमाचा सविस्तर तपशील, तारीख निहाय माहिती द्यावी. माहिती परस्पर व्यक्तिशः द्यावी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.९.२००८ रोजी रजि. नं. २९१/६८ या संस्थेला माहितीचा अधिकाराचे नियम लागू होत नाही. करिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपणांस माहिती देता येत नाही. हया संस्थेला सरकार तर्फे वित्तीय पुरवठा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी प्रथम अपील उपनिबंधक, सहकारी संस्था (शहर - १), नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.१०.२००८ रोजी देण्यात आला असून गैरअपीलार्थी संस्थेला आदेशित करण्यात येते की, आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसाचे आंत अर्जदाराला मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक ९.११.२००८ रोजी संस्थेचे सचिव श्री. बी. एल. मेश्राम यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता जो खर्च येणार हे शुल्क आपण ताबडतोब सचिवाकडे सोमवार ते शनिवार सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान त्यांचे १३४, अमरज्योती नगर मधील कार्यालयात हे पत्र मिळताच ताबडतोब जमा करावी व पावती घेऊन जावी. जर तुम्ही उपरोक्त शुक्ल जमा केले नाही तर असे समजण्यात येईल की, तुम्हाला मागितलेल्या माहितीची आवश्यकता नाही. परंतु दिनांक २१.११.२००८ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी सचिव तथा जनमाहिती अधिकारी यांना पत्र देऊन अपीलकर्ता यांच्या दिनांक १२.११.२००८ चे अर्जान्वये असे निदर्शनास आणून दिले की, गैरअपीलार्थी संस्थेचे सचिवांनी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता रुपये २०००/- इतकी अवास्तव खर्चाची मागणी केली असल्याने गैरअपीलार्थी संस्थेचे सचिवांनी अवाजवी खर्चाची केलेली मागणी योग्य नसल्याचे व त्याबाबत संस्थेस निर्देश देण्याची अर्जदाराने विनंती केलेली आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कॉन्ट्रक्ट बेसीसवर व्यक्तींची नियुक्ती करुन संस्थेचा रेकॉर्ड अद्यावत करणे ही संस्थेची अंतर्गत बाब आहे. त्याचा भुर्दंड अपीलार्थीकडून वसूल करणे संयुक्तिक नाही व त्यासंबंधाने माहितीचा अधिकार अधिनियम व नियम २००५

... ३

अंतर्गत तरतुद नसल्याने आपणास निर्देशित करण्यात येते की, माहितीचा अधिकार नियम २००५ चे नियम ४(ब) मध्ये शुल्क आकारणीबाबत नमुद तरतुदीनुसार शुल्क आकारुन अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्यावी व तसे या कार्यालयास अवगत करावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २६.११.२००८ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी सचिव यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे स्वत: वकील आहेत व त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २६.७.२००८ रोजी अध्यक्ष/सचिव, यांना दिनांक ३.८.२००८ रोजी होऊ घातलेल्या वार्षिक आमसभामध्ये लेखी प्रश्न स्वरुपात माहिती मागितली होती. परंतु अध्यक्ष/सचिव यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती किंवा त्यांच्या शंकाचे निरसन झाल्याबद्यल कळविले नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह कायदाचा कलम ३२ प्रमाणे माहिती मागण्याकरिता अर्ज केला होता. परंतु त्या अर्जाप्रमाणे सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही व त्यामुळेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागण्याचा अर्ज केलेला आहे. परंतु सचिव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सहकारी गृहनिर्माण संस्थेला लागू नाही. कारण कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनाकडून मिळत नाही. परंतु त्याकरिता प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळेस संस्थेस सवलतीच्या दरात जमिन उपलब्ध झाली आहे तसेच पंजीकरण करतांना स्टॅम्प डयुटीमध्ये सवलत मिळते असे निदर्शनास आणल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. त्यानंतर वर नमुद केल्याप्रमाणे संस्थेचे सचिव यांनी दिनांक ९.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अवाजवी रक्कमेची मागणी केली. त्याहीबाबत माहितीच्या तरतुदीची माहिती करुन दिली होती. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

४. जनमाहिती अधिकारी तथा संस्था यांचे तर्फे वकील हजर झाले होते. परंतु त्यांनी वकीलपत्र सादर केलेले नाही. मात्र संस्थेच्या सचिवांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे व त्या खुलाश्यामध्ये संस्थेला कोणत्याही प्रकारे नागपुर सुधार प्रन्यासने स्वस्त दरात जागा दिली नाही असे प्रतिपादन केलेले आहे. तसेच उपनिबंधक सहकारी संस्था यांची संस्थेवर नाममात्र देखरेख केलेली आहे असे ही नमुद केलेले आहे. संस्थे तर्फे हजर झालेले वकील यांनी संस्थेस कोणत्याही प्रकारच्या सवलतीच्या दरामध्ये जमिन मिळाली नाही किंवा स्टॅम्प डयूटीत सवलत मिळाली नाही व त्यामुळे सदरचा अधिनियम संस्थेस लागू होत नाही असा युक्तिवाद केला. सदरच्या युक्तिवादाचे संदर्भामध्ये त्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या निर्णयाचा संदर्भ दिलेला होता. परंतु त्याबाबतच्या निर्णयाची प्रत आयोगापुढे सादर केलेली नाही. सदरच्या निर्णयाप्रमाणे सहकारी संस्थेस जरी

शासकीय मदत नसेल तर सदरची सहकारी संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी मधील सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नाही असा निर्णय असल्यामुळे सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी सहकारी संस्थेस लागु होत नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यावर अपीलकर्ता यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा कमेटी ऑफ मॅनेजमेंट, शांती निकेतन इंटर कॉलेज, बरई, जि. गाझीपूर विरुध्द उत्तर प्रदेश शासन, सिव्हील मिसलेनिअस रिट पिटीशन नं. २१०५५/२००८ च्या निर्णयाची प्रत सादर केली. परंतु सदरच्या निर्णयामध्ये संस्थेस जर शासनाची मदत असली तरी माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. परंतु सदरची याचिका ही याचिकाकर्त्यांने मागे घेतली आहे असे निर्णयाचे परिच्छेद ७ मध्ये दिलेले आहे. त्यामुळे सदरचा निर्णय हा असंबंध आहे असे दिसून येते.

५. अपील क्रमांक १०१३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००८ रोजी अध्यक्ष यांना दिनांक ३.८.२००८ रोजी झालेल्या ४० वा वार्षिक आमसभेच्या प्रोसेडींगची (उपस्थित सभासदांची नांवे व त्यांची सही असलेली) संपूर्ण माहितीची व पास केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत स्वाक्षरी सहीत पुरविण्याबाबत. संस्थेच्या बँकेच्या पासबुकमध्ये १९९३ ते २००८ पर्यंत असलेल्या संपूर्ण नोंदीची झेरॉक्स प्रत पुरविण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.९.२००८ रोजी रजिस्टेशन नंबर २९१/६८ या संस्थेला माहितीचा अधिकाराचे नियम लागू होत नाही. करिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपणांस माहिती देता येत नाही. हया संस्थेला सरकार तर्फे वित्तीय पुरवठा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष केलेला नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.१०.२००८ रोजी देण्यात आला असून संस्थेला शासनाकडून अप्रत्यक्ष सहाय्य मिळालेले असल्यामुळे आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसांचे आंत अर्जदाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ९.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीकरिता एकूण खर्च रुपये ५०/- चा भरणा करावा व माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे तक्रार केली व त्या तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सचिव यांना खर्चाची मागणी ही अवाजवी आहे व ती नियमाप्रमाणे घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

६. अपील क्रमांक ७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी अध्यक्ष, अमरज्योती गृह

निर्माण सहकारी संस्था, नागपूर यांच्याकडे दिनांक ३.८.२००८ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल. तसेच गृहनिर्माण संस्थेला सवलग्न असेलेली कर्जपुरवठा, पतपेढी कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांनी मान्यता दिली त्याची संपूर्ण माहिती अशी माहिती मागितलेली दिसून येते. उपरोक्त माहिती व्यक्तिशः द्यावी असे ही नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.९.२००८ रोजी संस्थेला सरकार तर्फे वित्तीय पुरवठा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष केलेला नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.१०.२००८ रोजी देण्यात आला असून संस्थेला सवलतीच्या दरात जमीनी उपलब्ध झाली असल्यामुळे व स्टॅम्प डयुटीमध्ये सवलत दिलेली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागु होतो व त्याप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रकारचे आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे संस्थेचे सचिव यांनी दिनांक २१.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना रुपये २९०/-जमा करावे व पावती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरची रक्कम जमा केलेली दिसून येते. परंतु राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन संस्थेने अवाजवी रक्कम मागितली व माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे नमुद केलेले आहे.

७. डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अमरावतीचे संदर्भामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी सहकारी संस्थेस शासनाचे कोणतेही सहाय्य नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या सहकारी संस्थेच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर संस्थेस सवलती दरात जमिनी दिलेली आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. तसेच स्टॅम्प डयुटीमध्ये सुध्दा सहकारी संस्था म्हणून सवलती दिलेल्या असल्यामुळे अप्रत्यक्षरित्या शासनाची मदत मिळाली आहे हा निष्कर्ष काढला आहे व त्या आदेशानुसार सचिव सहकारी संस्था यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे व त्यामुळे सचिव सहकारी संस्था यांनी अधिनियमाचे तरतुदी सदरच्या संस्थेस लागू होतात ही बाब मान्य आहे असे दिसून येते. परंतु अधिनियमाचे नियमाच्या तरतुदी लागु आहेत व मान्य केल्यानंतर नियमाप्रमाणे खर्चाची आकारणी करणे आवश्यक असते. असे असुन सुध्दा सचिव सहकारी संस्था यांनी अवाजवी अतिरिक्त खर्चाची मागणी तिन्ही अपीलामध्ये केलेली दिसून येते. यावरुन सहकारी संस्थांचे पदाधिकारी ही सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. सहकारी संस्थेचे वकील यांनी युक्तिवाद करतांना अपीलकर्ता यांना महाराष्ट्र सहकारी संस्था

... ५

अधिनियम, १९६० च्या कलम ३२ च्या प्रमाणे माहिती मागता येईल असे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, अशी तरतुद त्यांनी केली होती. परंतु सचिव माहिती देत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज करावा लागला. यावरुन सचिव यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे सदरची तिन्ही अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०१२/२००८, अपील क्रमांक १०१३/२००८ व अपील क्रमांक ७/२००९, हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत तीनही अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये एका पृष्ठ संख्येकरिता प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे अतिरिक्त खर्चाची माहिती कळवावी. त्याप्रमाणे तीनही अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तशी ती उपलब्ध करुन न दिल्यास तीनही अपीलकर्ता यांनी आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८ प्रमाणे तक्रार केल्यास सचिव, अमरज्योती गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, नारा रोड, नागपूर यांचे विरुध्द माहिती अधिकारी म्हणून अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) तक्रार क्रमांक १४९/२००८ व तक्रार क्रमांक १८८/२००८ मध्ये या तीनही अपीलांचा निर्णय झाला असल्यामुळे हे खारीज करण्यात येत आहेत.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००८/२००८.**

श्री. पांडुरंग चिंतामण पराते,
मु. पो. पालांदूर (चौ.), ता. लाखनी,
जि. भंडारा - ४४१ ८११. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैनगंगा इंन्स्टीटयूट ऑफ ॲडव्हांस स्टडीज,
जमनापूर रोड, ता. साकोली, जि. भंडारा.

श्री. महेश चरणदास कनोजे,
जनमाहिती अधिकारी तथा
वैनगंगा इंन्स्टीटयूट ऑफ ॲडव्हांस स्टडीज,
जमनापूर रोड, ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून वैनगंगा इंन्स्टीटयूट ऑफ ॲडव्हांस स्टडीज, जमनापूर रोड, ता. साकोली, जि. भंडारा यांचेकडे डिप्लोमा इन ॲडव्हांस स्टडीज (अप्लाईड बाटनी) पी.जी.डी.ए.बी. सत्र २०००-२००१ च्या संदर्भामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या पत्त्यासहीत देण्यात यावी. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी नोंदणीकृत टपालाद्वारे पुरविण्यात यावी असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १३.५.२००९ रोजी व दिनांक २५.६.२००९ रोजी स्पीड पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले व तशी पोच अपीलकर्ता यांची मिळालेली आहे असे ही सांगितले. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००९/२००८.**

श्री. ए. वाय. कल्लूरवार,
कर्नल चौक, शिवाजी वार्ड क्र. ८,
आशिफाबाद रोड, ता. राजूरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. आर. देशट्टीवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
प्रशासकीय इमारत २ रा माळा,
बस स्टॉप समोर, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
ओमगृह निर्माण सहकारी संस्था,
पठानपूरा, वार्ड क्र. ४३, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. आयोगाची नोटीस हे अध्यक्ष, ओमगृह निर्माण सहकारी संस्था माहिती नाही म्हणून परत आलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ रोजी अध्यक्ष, ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूर यांच्याकडे मी ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूरचा सुरुवातीपासूनचा सदस्य असून मी पावती क्रमांक २०, दिनांक १२.११.१९७९ रुपये ११७१/- भरलेले आहे. त्यानंतर भुसुधार फंड सुध्दा भरलेले आहे. त्यांच्या मुळ पावत्या माझ्या जवळ नसल्यामुळे त्यांच्या स्थळ प्रतीच्या छायांकित प्रती देण्यात यावे ते सुध्दा उपलब्ध नसल्यास रोख पुस्तिकेच्या नोंदीच्या छायांकित प्रती देण्यात यावे. मुला अजून पर्यंत रुपये १००/- हिश्याचे मुळ प्रमाणपत्र व प्लॉट धारक सभासदाचे प्रमाणपत्राचे मुळ प्रमाणपत्र मिळालेले नाही ते प्रमाणपत्र सुध्दा पाठवावे. माझ्या नावांत बदल केल्याचे कळते आहे ते कशाच्या आधारे केलेले आहे. त्यांचे छायांकित प्रती देण्यात यावे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णया प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये अध्यक्ष, ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूर, पठाणपूरा वार्ड क्र.

४६, चंद्रपूर असा पत्ता दिलेला असल्यामुळे त्या पत्त्यावर आयोगाने नोटीस काढली होती. परंतु सदरची नोटीसच्या पाकीटवर Not known म्हणून परत आलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांना विचारले असता दिलेला पत्ता बरोबर आहे व त्यामुळे सदरचा निर्णय हा देण्यात आलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अध्यक्ष, ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अध्यक्ष, ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूर यांना मागितलेल्या माहितीच्या छायांकिंत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन न दिली व तशी अपीलकर्ता यांची तक्रार आल्यास अध्यक्ष/सचिव, ओम गृह निर्माण सहकारी संस्था, चंद्रपूर यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक :- २.७.२००९

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८/२००९.

श्री. मनिराम चिंधबाजी नासरे,
मु. पो. सावरगांव, ता. नरखेड,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जयंत मारोतराव तलमले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. नरखेड, जि. नागपूर.

श्री. वामन गणबाजी काळबांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
व्यवस्थापक,
विविध उद्येशीय सहकारी संस्था मर्यादित,
सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून मॅनेजर, विविध उद्येशिय सहकारी संस्था, सावरगांव यांचेकडे आज तारखेपावेतो कार्यकारणीची किती मासिक मिटींग झाल्या व किती मिटींगला किती सभासद हजर होते याबाबत माहिती. वरील प्रमाणे स्वस्त कापड दुकानाचे कापडा संबंधी विवरण द्यावे. संस्थेची निवडणूक झाली त्या तारखेपासून आज पर्यंत किती मासिक मिटींग झाल्या. सदरची माहिती प्रत्यक्ष व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ५.११.२००८ रोजी तीच माहिती मागितलेली दिसून येते. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२००९ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, विविध उद्येशिय सहकारी संस्था, सावरगांव यांनी अपीलकर्ता यांना आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २.२.२००९ रोजी माहिती घेऊन जाण्यासाठी पोष्टाने पत्र दिले होते. तरी पण माहिती न देता आपल्या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष माहिती घेऊन जाण्यासाठी सुचना बऱ्याच वेळी केलेली आहे. अपीलकर्ता आले नाही. गरज पडेल तेव्हा घेऊन जाईल असे प्रत्यक्ष सांगण्यात आले. दिनांक ५.३.२००९ रोजी पुन्हा स्मरणपत्र दिले होते. तरी ती माहिती घेऊन जात नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले बरेच वेळेस माहिती घेऊन जाण्याकरिता गेलो. परंतु माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र सदरच्या म्हणण्याप्रमाणे पुरावा सादर केला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा सादर केलेला आहे व जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती देण्यास तयार असून संस्थेस तयार करुन ठेवलेली आहे.

... २

तसेच अपीलकर्ता यांना पाठविलेल्या पत्राची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते. मात्र आयोगापुढे माहितीची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत व्यक्तिशः मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक :- २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०११/२००८.

श्री. मंगेश रुपचंद मेश्राम,
मु. पो. पाहार्णी, ता. नागभिड,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रमेश एकनाथ जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर.

श्री. रमेश पांडुरंग पिसे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
प्रायमरी सहकारी सेवा संस्था मर्यादित,
पाहार्णी, ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००८ रोजी माहिती अधिकारी प्रायमरी सहकारी सेवा संस्था मर्यादित, पाहार्णी यांचेकडे सन १९९० ते १९९७ या कालावधीतील कर्ज उचल केलेल्या सदस्यांची यादी तसेच त्यापैकी किती लोकांचे कर्ज माफ झाली व कुणाचे माफ झाली नाही यादी सकारण संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे नंतर दिनांक ११.११.२००८ रोजी सचिव, सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाहार्णी यांना सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नागभिड यांनी आदेश देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत व त्यानंतर दिनांक १०.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी ती विलंबाने उपलब्ध झाली आहे. तसेच अपूर्ण माहिती आहे असे त्यांचे म्हणणे आहे. विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याकडे एकूण ६ संस्थेचा अधिभार आहे. या संस्थेच्या कामकाजाच्या पध्दती प्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्याच्या संदर्भात त्यांना प्राधान्य द्यावे लागते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय जुनी व व्यापक प्रमाणात असल्यामुळे ती मुदतीत उपलब्ध करुन देणे शक्य नाही व आज सुध्दा अपीलकर्ता यांनी आज पावेतो मागितलेली आहे. त्या पावत्या हया रोजच्या व १० वर्षाच्या पावत्या हया अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हेही शक्य नाही. तसेच अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल केले आहे व तेही त्यांचे वडिलांचे आहे. तसेचही दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र खरे

असले तरी प्रत्यक्ष अपीलकर्ता हे आयोगापुढे हजर झाल्यावर ते दारिद्र्य रेषेखालील आहेत असे वाटत नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता हे त्याच गावात राहतात त्यांना माहिती हवी असल्यास त्यांनी अभिलेखाची पाहणी करावी व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. मात्र माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता संस्थेकडे कोणताही निधी नाही व तरी सुध्दा त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती पुरेशी माहिती आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विलंबाचे कारण योग्य आहे असे दिसते. तसेच मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती व्यापक प्रमाणात आहे व त्यामुळे ती संकलित करण्याकरिता निधी व यंत्रणा प्रमाणा बाहेर वळवावी लागते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१०/२००८.

श्री. सुरेश ताराचंद थोटे,
पोलीस कॉलनी, तकीया वार्ड,
भंडारा - ४४१ ९०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जि. भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
व्यवस्थापक,
पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, भंडारा यांचेकडे सभासदांच्या कर्जाची, खर्चाची माहिती दिनांक २५ डिसेंबर १९८० ते दिनांक ३१ मार्च २००८ पर्यंत याबद्यलची तपशीलवार माहिती नमुद केलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १९.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील हे मुदत संपण्याचे आंत दाखल केले असल्यामुळे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर मात्र दिनांक ८.१०.२००८ रोजी पुन्हा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अर्जदार श्री सुरेश ताराचंद थोटे यांना त्यांच्या दिनांक २८.८.२००८ अर्जाचे पत्रानुसार आवश्यक असलेली माहिती सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसाचे आंत विनाशुल्क माहिती प्राप्त करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.	प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, भंडारा यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे.  त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.  तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना दिनांक २८.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, भंडारा यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करण्यात यावा.  अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल व त्या शास्तीची वसुली जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, भंडारा यांचेकडे करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१४/२००८.

श्री. संजयकुमार प्रेमचंद तातेड,
मु.पो. खापा, वार्ड नं. १४, ता. सावनेर,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
प्लॉट नं. ८, सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर.

श्री. गौतम वालदे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. आर. एन. वसू, सहाय्यक निबंधक (प्रशासन) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००८ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सावनेर यांना दिनांक १.४.२००८ चे सहपत्राची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक १२.१०.२००६ रोजी दिनांक २१.९.२००६ व दिनांक ७.१०.२००६ ला दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी अहवालाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.८.२००८ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलार्थी तथा गैरअपीलार्थी दिनाक ११.८.२००८ रोजी अंतिम सुनावणीचे वेळी हजर झाले व सदर सुनावणीचे वेळी गैरअपीलार्थी सहाय्यक निबंधक, सावनेर यांनी अपील अर्जाची प्रत अपीलार्थीस मागितली व अपीलासंबंधाने खुलासा सादर करणेकरिता मुदत मागितली. त्याप्रमाणे अर्जाची छायांकित प्रत दिनांक १६.८.२००८ पर्यंत देण्यांस सांगितले व द्वितीय अपीलीय अधिकारी राज्य माहिती आयोग हे असल्याने सदर अपीलावर निर्णय देणे या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

... २

३. वास्तविक अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२००८ रोजी जे प्रथम अपील दाखल केलेले आहे त्या प्रथम अपीलाचा निर्णय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी देणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी जरी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले असले तरी प्रथम अपीलाचा निर्णय हा ३० दिवसात द्यावयाचा असल्यामुळे व तसा तो दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णयानंतर ती त्यांच्या अधिकार कक्षेत येत नाही अशा प्रकारचे कोणत्याही प्रकारचे आकलन न करता निर्णय दिलेला आहे. प्रथम अपीलाचा निर्णय जो दिनांक २८.८.२००८ रोजी देण्यात आलेला आहे तो मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे विवेचनात नाही. विवेचन दिलेले आहे ते निष्कर्ष काढलेला व हे हजर झाले नाही अशा प्रकारचे विवेचन आहे. याची माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने जबाबदारी टाळणे असा त्याचा अर्थ दिसून येतो. अपीलाचा निर्णयामध्ये प्रामुख्याने माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने निर्णय देणे आवश्यक असते. आजही जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे निवेदन सादर केलेले नाही. जे उपस्थित होते त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांची अनेक अर्ज आहेत असे उपस्थित झ ालेल्या अधिकाऱ्यांनी सांगितले. परंतु कागदपत्रे दाखल करतांना मात्र कोणत्याही प्रकारची आवश्यक कागदपत्रे दाखल केलेली दिसून येत नाही. आयोगाचे नोटीसमध्ये आवश्यक कागदपत्रांचा उल्लेख केलेला आहे. परंतु तेही कागदपत्रे दाखल न करता निर्थक अशी कागदपत्रे व खुलासा दाखल केलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांचया दिनांक ७.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.४.२००८ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५/२००९.

श्री. विनोद पांडुरंगजी पाटील,
मु.पो. पारडी, ता. कारंजा (घा.),
जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एस. आगरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी तहसीलदार,
कारंजा (घा.), जि. वर्धा.

श्री. के. एस. आगरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कारजां (घा.), जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैर हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कारंजा (घा.) यांचेकडे मौजा पारडी येथील केरोसीन परवानाधारकांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ााली नाही म्हणून दिनांक २४.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ६.९.२००८ रोजी एकूण आपण रुपये ५४०/- या कार्यालयात भरुन वरील प्रती हस्तगत कराव्या असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी दिनांक १७.७.२००८ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना मिळाल्याची प्रत शासन नियमाप्रमाणे रक्कम खजिना दाखल केल्यानंतर पुरविण्यांत येईल असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरच्या रक्कमेचा भरणा केलेला दिसून येतो व दिनांक ६.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन घेतली आहे असे दिसून येते. तरीही राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या माहितीचा अर्ज दिनांक १७.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००८ किंवा दिनांक ६.९.२००८ पर्यंत माहिती उपलब्ध कां करुन देण्यात आली नाही याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्ज प्राप्त झाल्या बरोबर दिनांक २१.५.२००८ रोजी पुरवठा विभाग श्री. वडूरकर यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिले होते. दिनांक ३०.६.२००८ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिले होते व दिनांक १७.७.२००८ रोजी माहिती या कार्यालयात उपलब्ध आहे. ती माहिती मिळण्याकरिता शासन नियमाप्रमाणे रक्कम खजिना दाखल केल्यानंतर पुरविण्यात येईल असे ही कळविले होते. दिनांक २८.८.२००८ व दिनांक १.९.२००८ रोजी नोटीसेस काढण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हजर झाले नाही. त्यानंतर दिनांक ६.९.२००८ रोजी त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली होती. परंतु ४ दिवसांनी ती सर्व माहिती परत आणून दिली असे तहसीलदार यांनी आयोगास सांगितले व आज अपीलकर्ता हजर नसल्यामुळे याबाबत कोणत्याही प्रकारची खात्री करुन घेतली येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७/२००९.

श्री. नारायण नत्थुजी धांडे,
प्लॉट नं. १६०, नागार्जुन कॉलोनी,
नारा रोड, जरिपटका, नागपूर- ४४० ०१४. .... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आपले कार्यालयात रा.मा.क्र. ५५/एम.आर.सी./ ८१/९९-२००० मध्ये फैसला न मिळाल्याबाबत. सदरहु प्रकरण तीन कोर्टात जाऊन निर्णय न होणे. रा.मा.क्र. ५५/एम.आर.सी./८१/९९-२००० आपले पत्र क्रमांक १८४६८, दिनांक २३.११.२००४ मध्ये श्री. गुल्हाने, एस.डी.ओ. नगरदंडाधिकारी यांचेकडून फैसला न मिळाल्याबाबत वारंवार चक्कर कापून फैसला न देणे. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन द्यावी व अर्जदार हे दारिद्रय रेषे खाली नसून राष्ट्रपती दरबारांत अपधार पीडीत आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले दिसून येते

३. अपीलकर्ता स्वतः हजर असून अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे विवेचन केलेले आहे. १) शपथेवर खरे सांगतो की, प्रतिज्ञ ार्थीची मौजा दहेगांव जोशी, प.ह.नं. ९, ता. पारशिवनी, जि. नागपूर येथील अल्पभुधारक शेतकरी आहो. आमचे वडीलोपार्जीत जमीन सर्व्हे नं. २७७ आराजी ५.५९ हे.५४.९० आर. वायदा रु. हक्क भुमीधारी होते. त्यानंतर सन १९५७ मध्ये आम्हा दोन भाऊ व आई मिळून असलेल्या जमिनीतून प्रतिज्ञ ार्थी स. नं. २७७/२ १ हे.२० आर. २७७/३ ० हे.६५ आर. अशा वाटण्या झाल्यात हा सर्व रेकॉर्ड सन १९१२-१३ च्या बंदोबस्त शासकीय एकत्री करण्यानुसार ही प्रतिज्ञार्थीची जमीन तलाठी रेकार्डला जुन्या रेकार्ड प्रमाणे बरोबर आहे. तसेच शेताच्या सिमा कायम आहे. (२) शासनाच्या तुकडे बंदी रेकार्ड प्रमाणे शेताचे सर्व्हे नं. वर बदलवून गट नं. दिलेले आहे. त्यांत गांव नमुना ८ (अ) धारण जमिनीची नोंद वही अ सामिवार व तावनी जमाबंदी पत्रकात भूमापन क्रमांक ६ वर ० हे.५७ आर. अशी जमिन दाखविलेली आहे. म्हणजे या ० हे. ०८ आर. जमीन कोणाचे शेतात सामिल करण्यांत आली हे अजून शासनाचे भूमापन अधिकारी, जिल्हाधिकारी, नागपूर हयांनी प्रतिज्ञार्थीला अजून पर्यंत माहिती देऊ शकले नाहीत. म्हणून प्रतिज्ञार्थी जनता दिन व लोकशाही दिनी मा. जिल्हाधिकारी, नागपूर हयांना जमिनी दुरुस्ती करुन मागितलेली आहे. पण शासन अधिकारी रेकार्ड दुरुस्ती करु शकले नाहीत. त्यामुळे मा.श्री.मनुकुमार श्रीवास्तव, जिल्हाधिकारी, नागपूर हयांचे मौखीक शब्दावरुन नागपूर उपजिल्हाधिकारी साहेब हयांचे कडे रा.मा.क्र. ५५/एमआरसी/८१/९९-२००० मध्ये प्रकरण दाखल केलेले आहे. (३) सदरील प्रकरण क्र. ५५/एमआरसी/ ८१/९९-२००० च्या प्रकरणात मा.उपजिल्हाधिकारी श्री. भिळे साहेब हयांनी माझे वकील व मला विचारपूस करुन युक्तिवाद ऐकूण

... २

घेतला. पण त्यांनी प्रकरणात निकाल न देता सदरहु प्रकरण मा. उपनिवासी जिल्हाधिकारी श्री. पुरुषोत्तम जाधव साहेब कडे रवाना केले व त्यांनी पण सदरहु प्रकरणांत युक्तीवाद घेतला. नंतर त्यांनी ही सदरहु प्रकरण को. वि. मा. श्री. अजय गुल्हाने, नगर दंडाधिकार, जिल्हाधिकारी, नागपूर हयांचेकडे परत गेले व त्यांनी प्रतिज्ञार्थीला नोटीस क्र. १८४६८/२३/११/०४ नोटीस देऊन प्रकरणांत युक्तीवाद ऐकून घेतला आणि आठ दिवसांत निकाल मिळेल म्हणून सांगितले. पण अजूनपर्यंत प्रकरणांत २००८ सालापर्यंत निकाल मिळू शकला नाही. (४) हयाबाबत प्रतिज्ञार्थी एक दिड वर्षे ऑफिसच्या चकरा मारुनही निकालाची प्रत मिळाली नाही. (५) प्रतिज्ञार्थीने जिल्हा लोकशाही दिवस दिनांक ५.२.२००७ ला पत्र देण्यास गेले तेंव्हा जिल्हाधिकारी हयांनी अर्ज घेण्यास नकार दिला म्हणून प्रतिज्ञार्थीने मा.श्री. नागपूर विभागीय आयुक्त, नागपूर आणि मा. जिल्हाधिकारी, नागपूर हयांना (युपीसीने) दिनांक ३.८.२००७ ला पत्रे देऊनही प्रकरणाचा निकाल मिळालेला नाही. म्हणून प्रतिज्ञार्थी माहितीच्या अधिकारानुसार मा. जिल्हाधिकारी आणि नागपूर विभागाचे आयुक्त, नागपूर हयांना (युपीसीने) पत्रे दिनांक १६.१.२००८ पाठविलेले असून मा. जिल्हाधिकारी उत्तर देण्यास असमर्थ झालेले आहे. माहितीच्या अधिकार नियमाप्रमाणे त्यांनी अजून पर्यंत उत्तर दिलेले नाही. हया संबंधाची चौकशी करण्यास प्रतिज्ञार्थी गेल्यानंतर त्यांचेकडून कोर्ट विद्यमान डॉ. जे. पी. लोंढे तथा अपील अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर अपील क्रमांक ५५/एमआरसी/८१/९९-२००० मध्ये नोटीस देऊन त्यांनी पेशी तारीख २९.३.२००८ ला त्यांचे कोर्टात गेले पण त्यांनी माझा बयान घेतला. अजून त्यावर त्यांचेकडून फैसला प्रत मिळू शकली नाही. म्हणून अतः प्रतिज्ञार्थीने आपले कडे माहितीचा अधिकार हया संबंधाने निकाल मिळण्यासाठी तक्रार सादर करीत आहे. (६) प्रतिज्ञार्थी शासन कडून ० हे. ०८ आर जमीन मोजमाप करुन आणि वेगळा नं. ७/१२ नवीन नंबर देण्यास यावा व हया करिता प्रतिज्ञार्थीला कोणताही खर्चाचा भुर्दंड पडता कामा नये तसेच रेकार्ड मध्ये बदल केला त्या वर्षापासून ० हे. ०८ आर. च्या जमिनीतील पिकांची नुकसान भरपाई संबंधित अधिकारी त्यांचेकडून मिळून देण्यास यावी तसेच प्रतिज्ञार्थीला खर्चाचा भुर्दंड पडता कामा नये तसेच बिना खर्च ० हे. ०८ आर. ताबा देण्यात यावा तसेच दस्ताऐवजा प्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात यावे. उत्तरवादी यांना दिनांक १४.५.२००९ रोजी नोटीस काढण्यात आली होती. परंतु नोटीस ही अपीलकर्ता यांना मिळाली. जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी मात्र हजर नाही. त्यामुळे सदरचे अपील हे अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार समजून त्यात निर्णय देण्यात येत आहे. अपीलकर्ता तक्रारदार यांच्या दिनांक १६.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरचे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तसेच आयोगापुढे सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी दिनांक २३.७.२००८ रोजी आयोगाकडे करणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील/तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील/तक्रार ही मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१.२००८ च्या अर्जाप्रमाणे रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा हा आयोगाचे कार्यालयास दिनांक २३.७.२००९ रोजी करण्यांत यावा. तसे न केल्यास माहिती अधिकारी यांना रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यांत येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ३.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४/२००९.

श्री. रमेश धनालाल बळणे,
मु. पुरगांव, पो. गणखैरा,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
वरिष्ठ प्राथमिक शाळा, पुरगांव,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वरिष्ठ प्राथमिक शाळा , पुरगांव यांचेकडे एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती खोटी असल्यामुळे त्यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केलेली दिसून येते. परंतु आज शिक्षणाधिकारी हे हजर नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सुनामी निधी २००४-२००५ हे मुख्याध्यापक यांनी दिलेली नाही. याबाबत उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये ग्रामशिक्षण समितीच्या विशेष सभेच्या बैठकीत मुख्याध्यापकांना विचारणा करण्यात आली. परंतु मुख्याध्यापक यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे मुख्याध्यापकांचे कार्य समाधानकारक नसल्याने त्यांची त्वरित दिली करण्याचा ठराव झाला अशा प्रकारची माहिती अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन देण्यात आली आहे त्यावरुन संबंधित मुख्याध्यापकावर कार्यवाही करण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ठराव पारित झाला असला तरी मुख्याध्यापक तिथेच कार्यरत आहेत. अशा प्रकारे त्यांना खोटी माहिती दिलेली आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली असल्यामुळे ही आयोगाची खात्री झाल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत आयोगाकडे खुलासा करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी व या शास्तीची वसुली शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५/२००९.

श्री. प्रमोद अण्णाजी कारंजेकर,
गांधी वार्ड, मेन रोड, मु. पो. ता. मोहाडी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. कुंभारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार, मोहाडी,
जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. डी. व्ही. बोधेले, अव्वल कारकून हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी तहसीलदार, मोहाडी यांचे कार्यालयात केरोसीन विक्रेता जर्नादन जयदेवजी निमजे, मोहाडी यांचेबद्यल माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.११.२००८ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. तत्पुर्वी अपीलकर्ता यांना दिनांक २४.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती दिशाभूल करणारी असून अपूर्ण आहे. कार्यवाही केलेली नाही अशा प्रकारे नमुद केलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु त्यांना कार्यवाहीची अपेक्षा आहे असे दिसून येते. माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे ती संकलीत करण्यास विलंब लागला व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे. अपीलकर्ता यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असे नमुद केलेले असले तरी खुलासा केलेला नाही व कार्यवाई करणे अपेक्षित नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१/२००९.**

श्री. डी. एस. मेश्राम,
सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय शेजारी,
बस्तरवारी वार्ड, ता. पवनी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. नदीम खान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. डॉ. टी. एम. नाकाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी,
कार्यालय जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा यांचेकडे वेतन श्रेणी व वेतन वाढीच्या संदर्भामध्ये अंतीम वेतन निश्चिती माहिती मागण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साध्या पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.११.२००८ रोजी एकूण ४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता हे हजर न राहिल्यामुळे अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही असे खुलाश्यात म्हटले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांना वेतन श्रेणी ४६००/- हे होते. हे चुकीची असून त्यात वेतन वाढ दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, हिंदी भाषी परीक्षा पास झाली नसल्याने त्यांचे वेतन वाढ रोखण्यात आलेली आहे परंतु असे लेखी आदेश नाहीत. त्यामुळे सदरची वेतन वाढ रोखण्यात आली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीचे आदेश उपलब्ध झालेले आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७/२००९, अपील क्रमांक ३८/२००९, अपील क्रमांक ३९/२००९, अपील क्रमांक ४०/२००९, अपील क्रमांक ४१/२००९ व अपील क्रमांक ४२/२००९.**

श्री. देवेंद्र राधेश्याम तिवारी,
गांधी वार्ड, ता. तिरोडा,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. एम. अंबादे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तिरोडा,
जि. गोंदिया.

श्री. अशोक बरीयेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर परिषद, तिरोडा,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये एकूण ६ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या सहाही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००८ रोजी एकूण ६ माहितीचे अर्ज दाखल केले त्यामध्ये शासकीय माहिती अधिकारी, नगर परिषद, तिरोडा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. प्रशासकीय मान्यतेची प्रत, निविदा प्रकाशित झालेल्या वर्तमानपत्राची प्रत, निविदा फार्म किती विकले व कोणकोणत्या दर व कोणत्या दराची निविदा मंजूर करण्यात आले त्याची ठरावाची प्रत, कामाचे मोजमाप पुस्तिकेची प्रत व देयके किती व कोणाच्या नावाने काएण्यात आले त्याची प्रत. स्वर्ण जयंती रोजगार योजना ११ वा व १२ वा वित्त आयोग अनुदाची माहिती मिळण्याबाबत. वैशिष्ट्य पुर्ण कामे, युडी ६ व स्थानिक विकास निधी (मा. आमदार, मा. खासदार) यांच्या अनुदानातील माहिती मिळण्याबाबत. रस्ता अनुदान व सर्वसाधारण फंड केलेल्या बांधकामाची खर्चाची माहिती मिळण्याबाबत. नगर परिषद मधील व बांधकाम विभागातील वार्षिक कामाकरिता नियुक्त केलेल्या अभियंता, डिजायनर, अंदाजपत्रिका बनविने यांची निविदा व निर्णयाची माहिती मिळण्याबाबत. दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत माहिती मिळण्याबाबत. दिनांक ११.७.२००८ ला निविदा क्रमांक ६ मध्ये कामाची निर्णयाची माहिती मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी सन २००६ ते २००८ अर्जाचे तारखे पर्यंत. वरील सर्व माहिती ही व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. वरील अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी ६ प्रथम अपील दाखल केलेले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे ६ द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागते होते. अन्यथा त्यांना द्वितीय अपील दाखल करावयाची आवश्यकता नव्हती. तसेच ते स्वत: कंत्राटदार आहेत व त्यांना निविदा मिळाली नाही म्हणून त्यांनी ही माहिती मागितलेली आहे. परंतु त्यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केलेले असल्यावर अर्जदाराने जनमाहिती अधिकारी यांचेशी व्यक्तिशः माहिती घेण्याकरिता जाणे आवश्यक असते व माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्याप्रकारचे आक्षेप घेणारे पत्र हे जनमाहिती अधिकाी यांना द्यावयाचे असते. परंतु या ६ अर्जाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी ३० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी व्यक्तिशः माहिती घेण्याकरिता गेले आहेत व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही अशा प्रकारचा पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदार हे पूर्वी त्यांच्या नगरपरिषदेमध्ये उपाध्यक्ष राहिले आहे. नगरसेवक होते व कंत्राटदार म्हणून काम करतात. त्यांचा माहितीचा अर्ज आल्यानंतर ते माहिती घेण्यास त्यांच्याकडे आले नाही. परंतु माहिती घेऊन जा असे त्यांना तोंडी सांगितले त्यांनी असे सांगितले की, माहितीची आवश्यकता नाही. प्रकरण बंद करावे मी पुढे कोणतीही तक्रार किंवा अपील करणार नाही असे तोंडी सांगितले त्यावर विश्वास ठेवून पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र माहिती तयार आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केलेले आहे व त्यावेळेस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी किंवा जनमाहिती अधिकारी यांना याबाबत जाणीव होणे आवश्यक होते. परंतु त्यावेळेस सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांना सांगितले की, त्यांना माहितीची आवश्यकता नाही व द्वितीय अपील करणार नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मी त्यांना असे काहीही सांगितले नव्हते. यावरुन दोनपैकी एक कोणी तरी अप्रामाणिक नसलेला आहे. असे असले तरी प्रथम अपीलामध्ये निर्णय देणे हे आवश्यक होते. त्याही बाबत तसे दिलेले नाही. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहितीची आवश्यकता आहेच. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केलेला नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरची सर्व अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३७/२००९ ते अपील क्रमांक ४२/२००९ या एकूण ६ द्वितीय अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या प्रत्येक दिनांक २६.९.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.९.२००८ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा पत्र व्यवहार केला नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्याधिकारी, नगरपरिषद, तिरोडा, जि. गोंदिया यांनी करावयाची आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६/२००९.

श्री. सुभाष धनवंत खोब्रागडे,
दादमहल वार्ड, बुध्द विहारा जवळ,
चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कारागृह महानिरिक्षक,
कारागृह, पुणे.

श्री. मोहन पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
कारागृह महानिरिक्षक,
कारागृह, पुणे. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.८.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून कारागृह महानिरिक्षक कार्यालय, पुणे-१ यांचेकडे माजी सैनिकासंबंधी महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ मधील माहिती. माहितीचा कालावधी दिनांक १.१.१९७९ ते २००८. महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ अंतर्गत माजी सैनिकांसाठी लागू सेवाशर्ती, वेतनलाभ आणि पदोन्नती इत्यादी बाबत अद्यावत माहिती. ज्यांना सैनिकी सेवा निवृत्ती वेतनचा लाभ मिळणाऱ्या व न मिळणाऱ्यासाठी उपलब्ध नियमावली १९७९ मधील तरतुदीची माहिती अनुक्रमांकानुसार सत्यप्रती देण्यात याव्या. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये सदरील अर्ज दिनांक १.९.२००८ रोजी प्राप्त झाला त्याप्रमाणे मुख्यालयाचे कार्यालयामार्फत आस्थापना - १ व आस्थापना (कार्यकारी) यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी अर्जदाराच्या पत्राची प्रत कार्यालयीन पत्र अनुक्रमे ७४८३ व ७४८४ नुसार माहिती मागविली होती. परंतु माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच माहिती विभागात काम करणारे कर्मचारी हे दिर्घमुदतीच्या (आजारीपणाच्या) रजेवर असल्यामुळे व सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडे स्विय सहाय्यक व रचना व कार्यपध्दती अधिकारी अशा दोन पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यातच माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी यांची बदली मुंबई येथे झाल्याने त्यांचे पद रिक्त होते. नुकतेच त्यापदावर अधिकारी हजर झाल्यामुळे त्यांचेकडे माहिती अधिकारी व प्र.विधी अधिकारी व संशोधन अधिकारी अशी दोन अतिरिक्त पदे देण्यांत आल्यामुळे संबंधितास माहिती पाठविणेस विलंब झाला असा खुलासा केलेला आहे.

३. वास्तविक अपीलकर्ता यांनी कारागृह खात्यात माजी सैनिकांसाठी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना पुन्हा सेवेत काय लाभ मिळतात ही वैयक्तिक माहिती मागितलेली दिसून येत नाही. त्यांनी फक्त नियमावली मागितलेली होती. परंतु अर्जाचे प्रामाणिकपणे वाचन न करता माहिती संकलीत करण्यात वेळ घालविला दिसतो. त्यामुळेच विलंब झालेला दिसत आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी आता सर्व माहिती उपलब्ध

... २

झाली आहे असे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची सर्व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २६.८.२००८ च्या अर्जानुसार हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ४.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२/२००९.

श्री. जगदीश कृष्णराव हरडे,
फ्लॅट क्रमांक ६, भागीरथी अपार्टमेंट,
भरतनगर, अमरावती रोड, नागपूर- १. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती डॉ. सुजाता गंधे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

श्री. एस. टी. शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकून,
मागासवर्ग कक्ष,
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी विभागीय आयुक्त कार्यालय (बी. सी. सेल), नागपूर यांच्याकडे बिंदू नामावली रजिस्टर तपासणी संबंधी माहिती अधिक्षक अभियंता (स्था.) स्थापत्य बांधकाम विभागातील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन जाऊ किंवा पोष्टाने पाठवा असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.११.२००८ ला देण्यात आला असून दिनांक ७.११.२००८ रोजी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, आयुक्त कार्यालयात माहिती उपलब्ध असुन सुध्दा ४८ दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व मुळ अर्ज अधिक्षक अभियंता (स्था.) स्थापत्य बांधकाम विभाग यांचेकडे अग्रेषित करण्यात आला. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांचे वरील स्थापत्य विभाग स्थापत्य बांधकाम विभागातील आहे. बिंदुनामावली रजिष्टर तपासणीकरिता हे आयुक्त कार्यालयातून अपंग कार्यालयात पाठवितण्यात येते ते तपासल्यानंतर त्याच कार्यालयात घेऊन जातात. आयुक्त कार्यालयात त्याबाबतचा कोणत्याही प्रकारची माहिती ही जतन केली जात नाही. माहिती त्या विभागातील बिंदू नामावली कां आवश्यक होती व त्यामुळे तशा प्रकारचे पत्र त्यांना देण्यात आले होते. त्यामुळे सदरची माहिती आयुक्त कार्यालयात उपलब्ध होती असे नाही. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अधिक्षक अभियंता (स्था.) स्थापत्य बांधकाम विभाग यांचेकडे अर्ज अग्रेषित करावा लागला होता व त्यामुळे ही माहिती विलंबाने उपलब्ध झाली त्यातही माहिती अपूर्ण उपलब्ध झाली असल्यामुळे पुन्हा त्याच कार्यालयाकडून माहिती मागवावी लागणार. यात माहिती उपलब्ध करुन न देणे किंवा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणे यात कोणत्याही प्रकारचा हेतु नाही किंवा नव्हता ही सर्व प्रशासकीय बाब आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा जी माहिती उर्वरित राहिली होती ती त्याच कार्यालयातून उपलब्ध करुन घेऊन देण्यात आली

... २

आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती जनमाहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे स्थापत्य बांधकाम विभागातील आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरची माहिती अधिनियमाचे कलम ६ प्रमाणे त्याच विभागात मागणे आवश्यक होती. ज्या विभागातील माहिती नाही त्या विभागात ती माहिती उपलब्ध असली तरी ती देणे बंधनकारक नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या कार्य समजुतीमुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१/२००९.

श्री. दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल,
मु. पो. ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एस. गणवीर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा पुरवठा कार्यालय, गोंदिया यांचेकडे आयुक्त कार्यालय पत्र क्र. ६६३/०८, दिनांक १०.१०.२००८ ची सत्यप्रत, आयुक्त कार्यालय पत्र क्र. कावि-४७६/२००८, दिनांक ४.८.२००८ ची सत्यप्रत, जिल्हा कार्यालय कक्ष-१/अका/पुरवठा/कावि ९८४/०८, दिनांक २५.७.२००८ ची प्रत. या व्यतिरिक्त विभागीय चौकशी संदर्भात झालेला पत्र व्यवहार ही माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१२.२००८ रोजी देण्यात आला असून सदचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ४.११.२००८ रोजी माहिती गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(छ) अन्वये ही माहिती आपणास पुरविणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते व प्रथम अपीलात सुध्दा अपीलकर्ता गैरहजर आहेत व दोन वेळ संधी देऊनही या कारणास्तव अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय देऊन अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते स्वतः सुनावणीचे दिवशी हजर होते व उलट जनमाहिती अधिकारी हे गैरहजर होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे की, अपीलकर्ता हे गैरहजर होते. परंतु अपीलकर्ता जर गैरहजर होते तरी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबतची जबाबदारी ही अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांची असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे कडून माहिती उपलब्ध करुन दिल्याचे संदर्भामध्ये माहिती घेऊन निर्णय देणे आवश्यक होते. अपीलकर्ता गैरहजर होते म्हणून अपील फेटाळून लावले हे प्रामाणिकपणे काम करण्याचे लक्षण नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराचे संदर्भामध्ये ज्या पत्राची प्रत त्यांनी मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, विभागीय चौकशी सुरु होण्या पुर्वीचे पत्र आहे व त्या पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत घेणे आवश्यक नव्हते व त्यामुळे सदरच्या पत्राची छायांकित

... २

प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्रमांक १ ते ३ च्या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच विभागीय चौकशी झाल्यानंतर विभागीय चौकशीचा अहवाल हा सुध्दा अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ४.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४६/२००९.

श्री. विकास गणपतराव शेंडे,
नागरी बँक कॉलोनी,
हिंदनगर, वर्धा - ४४२ ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दुष्यंत सिडाम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
सिताबर्डी, नागपूर.

श्री. प्रविण वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर -१,
१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक,
उमरेड रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचेकडे पल्लवी गृहनिर्माण संस्था येथील व्यवस्थापन आपल्या कार्यालयाचा तपासणी अहवाल व टिप्पणी याबद्यल. सदरची माहिती टपालाने स्पीड पोष्टने घेणार असे नमुद करुन मागितलेली आहे. सोबत परिशिष्ट मध्ये एकुण ८ मुद्यांमध्ये तसेच उपमुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु त्याबद्यलचा उल्लेख नाही. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी माहिती अधिकारात विचारलेली माहिती ही स्पष्ट स्वरुपात नसल्यामुळे स्वतःच्यावतीने माहितीची मागणी केलेली आहे. तरीसुध्दा माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत पत्र देऊन अर्जदारास कळविले आहे. तसेच अर्जदाराने मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्या क्रमांक ३ ची अहवालाची प्रत अर्जदारास पुरविलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना उपलब्ध झालेल्या अहवालामध्ये विसंगती आहे व कागदपत्रामध्ये सुध्दा विसंगती आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जशी माहिती उपलब्ध आहे तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच संस्थेची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तसेही त्यांना अहवाल यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४४/२००९.

श्री. वसंत शालीकराम पोहणकर,
गजानननगर, उपवन हॉटेलच्या मागे,
संत तुकडोजी वार्ड, ता. हिंगणघाट,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. एस. बी. क्षिरसागर, वरिष्ठ लिपिक हे उशिरा हजर झाले. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, नागपूर यांचेकडे एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल न घेता कोणत्याही प्रकारचा निर्णय सुध्दा दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १.९.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५०/२००९.

श्री. दिनकर बैजनाथ जाधव,
अ. रा. अफजल कोल्ड समोर,
मार्केट यार्ड, मेन रोड कळमना,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक ३, नागपूर शहर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लकडगंज विभाग, नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, लकडगंज, नागपूर यांचेकडे पोलीस स्टेशन, कळमना, नागपूर शहर येथे दिलेल्या दिनांक २४.१०.२००८ च्या तक्रार, चौकशी अहवाल व कारवाईची प्रत अरबाजखान, शकील शेख, अकीला बेगम खान, नौशाद मलिक, तसलीम शेख व इतर संबंधितांच्या बयाणाची प्रत निष्कारण त्रास देण्याची कारणे अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १५.१२.२००८ चा अहवालाची प्रत, बयाणाची प्रत उपलब्ध आहे असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्येच दिलेले आहे. परंतु त्यानंतर त्यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी पुन्हा अर्ज केलेला होता. त्या अर्जाबद्यल माहिती मागितलेली दिसून येते असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले दिसून येते.

३. यावरुन अपीलकर्ता यांना दिनांक ६.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे. मात्र नवीन दिनांक १६.१.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अर्थातच तो अर्ज स्वतंत्रपणे दिलेला असल्यामुळे द्वितीय अपीलामध्ये त्या अर्जाचेबद्यल विचार करता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे ही बाब त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५१/२००९.

सौ. सरिता अरुण मंगेशकर,
जोगीनगर, घर नं. २५९५/अ,
रामेश्वरी रिंग रोड, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
नगर रचना विभाग,
महानगर पालिका, नागपूर.

श्री. दिगंबर मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १५.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे ८९/९० चा फ्लॅट स्किम खसरा नं. ६५/२ मौजा बाबुळखेडा, २५.९.२००८ च्या पूर्वी संबंधित अर्जावर आहे. जोडपत्रामध्ये त्या संबंधात तपशीलात एकूण १३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००८ रोजी आपण अर्जात नमुद इमारत नकाशा क्रमांक किंवा इमारत बांधकाम परवाना क्रमांक नमुद केलेला नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती देता येणे शक्य नाही. तरी नकाशा क्रमांक किंवा इमारत बांधकाम परवाना क्रमांक या कार्यालयाला कळविल्यास आपण मागितलेली माहिती देता येणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.१०.२००८ रोजी आपण नमुद केलेल्या नकाशा क्रमांकाची नस्ती या कार्यालयाच्या अभिलेख विभागात उपलब्ध आहे. तरी आपण या विभागात संपर्क करुन व आवश्यक शुल्क भरुन नस्तीचे स्वतः निरिक्षण करुन कागदपत्रे प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.११.२००८ रोजी रुपये २०२/- शुल्क या कार्यालयात जमा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ५.११.२००८ रोजी राहिलेले दस्तावेज नकाशा सोडून मिळाले अशी पोच त्यांनी दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील सर्व नस्तीचे अवलोकन करण्याकरिता दिले होते व त्यातून त्यांना हवी असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन घ्यावी असेही त्यांना सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी ४९ पृष्ठे उपलब्ध करुन घेतली आहेत. परंतु अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, हवी असलेली माहिती त्यात उपलब्ध नाही व त्यामुळे राहिलेले दस्तावेज नकाशा सोडून मिळाले असे त्यांनी आक्षेप नोंदविलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांना त्या नस्तीतील उर्वरित सर्व माहिती उपलब्ध

**... २**

करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक ८.९.२००८ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे संबंधित नस्तीमधील उर्वरित माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात तसेच नकाशाची माहिती व निर्णय झाला असल्यास त्याबद्यलची टिपणीची माहितीची छायांकिंत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५२/२००९.

श्री. हरिश्चंद्र नागोराव लोखंडे,
हमि, १२, शिवराजनगर नं. २,
विश्वकर्मा नगर, रोड नं. १,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. भि. म. कौशल,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर.
श्री. चंद्रकांत क्षिरसागर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर यांचेकडे सहाय्यक संचालक (वृत्त) वर्ग-२, जिल्हा माहिती अधिकारी वर्ग-१, उपसंचालक गट अ (वरिष्ठ) पदाच्या वेतन निश्चितीशी संबंधित शासन निर्णय, कार्यालयीन आदेश, पत्र, अभिलेख, वेतन देयके इत्यादी माहितीच्या सांक्षांकित प्रती मिळण्याबाबत. एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच त्यामध्ये माहितीचा खर्च व टपालखर्च मिळून रुपये ७२/- या कार्यालयाकडे अथवा कोषागारात रक्कम जमा करावी असेही कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १०.१२.२००८ रोजी निर्णय देण्यात आला असून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु २ शासन निर्णय उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वर्ग-१ च्या संदर्भामध्ये आज शासन निर्णय अपीलकर्ता यांनी उल्लेख करतात तशा प्रकारचा शासन निर्णय नाही. असे असल्यामुळे त्याबद्यल त्यास स्पष्टपणे कळविले होते. परंतु त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना २ शासन निर्णय उपलब्ध करुन दिलेले नाही ते हा निर्णय मिळाल्यापासून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... २

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेले शासन निर्णयाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५३/२००९.

श्री. केशव गोविंद तिजारे,
मोदी, नागसेन नगर,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने श्री. अनिल अवताडे, स्विय सहाय्यक हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. एस. एस. धनगरे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २९.८.२००८ रोजी केस क्रमांक ७५/एलईएन/३९/८६-८७ मध्ये झालेल्या निर्णयाची प्रत देण्यात यावी. माहिती स्वत: नेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १४.११.२००८ रोजीचे पत्रानुसार माहिती देण्यास कळविण्यात आले व त्यामध्ये अपीलकर्ता यांना आपण नक्कल विभागाकडे प्रमाणित प्रत मिळण्याबाबत रितसर अर्ज करुन सदर आदेशाची प्रमाणित प्रत प्राप्त करुन घ्यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागितलेली आहे व त्यामुळे पुन्हा अर्ज करुन प्रमाणित प्रत घेण्याची आवश्यकता नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मुळ प्रतीवरुन छायांकित प्रतीची माहिती मिळावी व प्रमाणित करुन मिळावी. तरी ती नियमाप्रमाणे प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.९.२००८ च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे अपीलाच्या निकालाची छायांकित प्रमाणित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी अथवा संबंधित कर्मचारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७/२००९.

श्री. लारेंन्स एलेक्झेंडर ऐलेनजीकल,
गाळा क्र. ८२/९७४, हुडको कॉलोनी,
नारा रोड, बापूना वाईन शॉपच्या मागे,
जरिपटका, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपनिगम आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. कटयारमल,
जनमाहिती अधिकारी तथा
कर निर्धारक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे १ ते ११ मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.८.२००८ रोजी मागविलेली माहिती हि विस्तृत प्रमाणात असल्यामुळे मागविलेली माहिती विहित मुदतीचे आंत देणे अशक्य आहे. तरी आपण अभिलेख विभाग, महाल येथे कार्यालयात येवून नस्तीचे निरिक्षण करावे व आवश्यक तेवढीच माहिती मागवावी. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी नस्तीचे निरिक्षण घेतलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक २.९.२००८ रोजी पुन्हा कर निर्धारक यांनी प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. नस्तीचे निरिक्षण घेऊन आवश्यक असलेली उपलब्ध अभिलेखाची माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.९.२००८ रोजी दिलेला असून अर्जाची शहानिशा करावी व ज्या ठिकाणी रेकॉर्डच्या प्रती मागितल्या आहे त्या उपलब्ध असल्यास ८ दिवसांत देण्याची व्यवस्था करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.१०.२००८ रोजी एकूण १७ पाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये १ ते ११ पर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमुद केलेले आहे. परंतु त्यांना १७ पाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे कोणती माहिती उपलब्ध झाली नाही याबद्यल त्यांनी स्पष्ट खुलासा केलेला नाही व १ ते ११ मुद्यांची तपासणी केली असता त्यातील कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५/२००९.

श्री. रत्नाकर नारायणराव बुरांडे,
द्वारा - शिवाजीराव रनवरे,
५५८, चिटणीस नगर, पंचवटी आश्रम मागे,
उमरेड रोड, नागपूर - ४४० ००९. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. महेश करजगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. अभय गायकवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
सचिव,
प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,
तुळशीबाग, रेशीमबाग रोड, नागपूर.

श्री. अशोक जिवने,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
नवभारत प्राथमिक शाळा,
रशिमबाग, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव यांचेतर्फे श्री. जी. एल. बजाज, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नवप्रभात प्राथमिक शाळा, रेशिमबाग, नागपूर यांच्याकडे कु. संध्या महादेवराव वैद्य, सहाय्यक शिक्षिका हयांच्या सेवाकाळाबाबत व सेवापुस्तिकेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.६.२००८ रोजी कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक ९.६.२००८ अपीलकर्ता यांनी कार्यालयाशी संपर्क साधावयाची आवश्यकता नाही आपण नियमानुसार दिलेल्या वेळेत माहिती मिळावी. त्यासाठी लागणारा खर्च कळवावा व मी तो आपणाकडे जमा करितो व संपूर्ण दस्ताऐवजांचे झेरॉक्स वेळेत द्यावेत असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे दिनांक ११.७.२००८ रोजी सचिव, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, नागपूर यांचे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पत्र देण्यात आले. मुख्याध्यापकाला सुनावणीच्या वेळी आदेश देण्यांत आले व त्याला लागणारा खर्च अपीलकर्तानी भरावा असे ही आदेश देण्यात

... २

आले. परंतु तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही ही बाब जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.५.२००८ च्या अर्जावर माहिती त्यांनी मागितलेली आहे ती स्पष्टपणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सचिव, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी यांचेकडे दाखल केले होते. परंतु ते प्रथम अपीलीय अधिकारी नाही असे त्यांचे वकील यांनी सांगितले व त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यामुळे व आज सचिव, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, नागपूर यांना यावे लागल्यामुळे अपीलकर्ता यांचे विरुध्द खर्चाची मागणी केली याबाबत अर्थात पूर्वी सचिव हे प्रथम अपीलीय अधिकारी असे दाखल केले होते व त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी हे शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांचेकडे दाखल केले आहे. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २४.५.२००८ च्या अर्जाप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०/२००९.

श्री. लिलाधर काशीनाथ गजभिये,
मु. करंभाड, पो. ता. पारशिवनी,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. बी. हनवते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
पारशिवनी, जि. नागपूर.

श्री. एम. जी. निमजे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
पारशिवनी, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पारशिवनी यांचेकडे सदन कापूस योजना, गळीत धान्य विकास योजना, कडधान्य विकास योजना, तृणधान्य विकास योजना या सर्व विविध योजनावर झालेल्या खर्चाची माहिती सह देयकांची सत्य प्रमाणित प्रती देऊन माहिती पुरविण्याबाबत. माहितीचा कालावधी सन २००४-०५ ते मार्च २००८ पर्यंत व इतर मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात कर्मचारी उपलब्ध नाही ते स्वतः एकटेच आहेत. तसेच मागितलेली माहिती ही ४ वर्षाची विविध योजनांची असल्यामुळे त्यांना सर्व माहितीच्या खर्चाची देयके हे एकत्रित नसतात. त्या सर्व देयकांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाच्या योजने प्रमाणे बाहेर वळवावी लागते. परंतु यंत्रणाच नाही तरी माहिती कशी उपलब्ध करुन देण्यात येईल. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिल्यास ती त्यांना तशी दाखविता येईल व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येईल. परंतु याही पुढे अपीलकर्ता यांना छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यांनी सुध्दा वरील प्रमाणे कारण सांगितले अशी वस्तुस्थिती जरी असली तरी अपीलकर्ता यांनी सुध्दा व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्यामुळे सदरच्या माहितीकरिता अपीलकर्ता यांनी अभिलेखाची पाहणी करुन आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे कार्यालयास माहिती आयोगापुढे सांगितली ती सर्वच तालुका कृषि कार्यालयामध्ये कर्मचारी नाही अशी तक्रार आयोगाकडे केली जाते ही बाब

संचालक, कृषि यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष व्यक्तिशः जाऊन आवश्यक असलेल्या अभिलेखाची पाहणी करुन आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकिंत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) त्याकरिता अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तिशः असल्यास त्यांना सर्व अभिलेख पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यात यावा व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, कृषि, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने माहितीकरिता पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ७.७.२००९**

**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६/२००९.

श्री. गोपाळराव कृष्णाजी मस्के,
मु. पो. मांढळ, ता. कुही,
जि. नागपूर - ४४१ २१०.

**..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
विभाग क्रमांक १,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
५४/६३३, मोहता अर्पाटमेंट, पहिला माळा,
काटोल रोड, छावनी, नागपूर - ४४० ०१३.
श्री. प्रमोद सस्ते,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड
कृति व परिरक्षण उपविभाग, ता. कुही,
जि. नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्रीमती वंदना वरणेकर, सहाय्यक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी दिनांक २०.७.१९९९ रोजी कृषी पंप वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जाचे संबंधात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक ५५९/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी वरील प्रमाणे दिनांक २०.७.१९९९ ला कृषी पंप वीज जोडणीच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरचा अपीलाचा निर्णय दिनांक ३०.४.२००९ रोजी झालेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी व तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला आहे व त्यामुळे पुन्हा त्याच माहितीकरिता केलेल्या अर्जाचे संदर्भात पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय देणे हे योग्य नाही. तसेच दिनांक १६.९.२००८ च्या अर्जामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला आहे त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता निर्णय देणे आवश्यक नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अपील क्रमांक ५५९/२००८ मधील माहिती एकच असल्यामुळे व त्या अपीलाचा निर्णय झालेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ७.७.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७७/२००९.**

श्री. प्रमोद छोटमलजी चोरडीया,
मु. पो. बेला, ता. उमरेड,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सचिन हमजादे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
ता. उमरेड, नागपूर.

श्री. शेषराव वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहाय्यक,
तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
ता. उमरेड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणून तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, उमरेड यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक ४४७/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२००८ रोजी मागितलेली माहितीचा अपीलाचा निर्णय दिनांक २२.४.२००९ रोजी झालेला असून अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे. असा निर्णय दिलेला आहे व दोन्ही अर्जातील सारांश एकच असल्यामुळे पुन्हा त्याच माहितीकरिता केलेल्या अर्जाचे संदर्भात पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय देणे हे योग्य नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता निर्णय देणे आवश्यक नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अपील क्रमांक ४४७/२००८ मधील माहिती एकच असल्यामुळे व त्या अपीलाचा निर्णय झालेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४/२००९.

श्री. सुनिल लक्ष्मणराव डफ,
मु. काचनगांव, पो. आर्वी छोटी,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. पी. मुकटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
हिंगणघाट, जि. वर्धा

जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, हिंगणघाट यांचेकडे मा. खा. सुरेश वाघमारे यांचे स्थानिक विकास निधी अंतर्गत काचनगांव ते आर्वी छोटी पांधन रस्त्याचे मातीकरणातील तपशीलाची माहिती ४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.१२.२००८ रोजी देण्यात आला असून त्यातही पुन्हा अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिशाभूल करणारी माहिती दिली हयाकरिता शपथपत्र केलेले आहे व त्यामध्ये प्रत्यक्ष काम केले असे कळविलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, जुन्या काचनगांव कडून आर्वी छोटी कडे जाणाऱ्या वहीवाटीच्या रस्त्याचा वाद उच्च न्यायालयापर्यंत जाऊन न्यायालयाच्या मार्गदर्शनानुसार अप्पर जिल्हाधिकारी, वर्धा हयांनी मौका तपासणी करुन दिनांक १०.४.२००२ रोजी जुन्या वहीवाटीचा रस्ता सरकारी पांदण नसल्याचा निर्णय दिला आहे व अपीलार्थीचे अपील खारीज केले आहे. तसेच मा. खासदार महोदयांनी योग्य मार्गाने रस्त्याचे काम झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. उपलब्ध पांदनचे काम करण्यांत आले आहे. मात्र मौक्यावर काम झाले नाही अशी तक्रार आहे. प्रत्यक्षात मौक्यावर पांदन रस्ता नाही स्थायी कच्ची सडक असून त्यावर अतिक्रमण आहे. उच्च न्यायालयापर्यंत जागेचा वाद गेला व अपील खारीज करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकरण पाठविले आहे. त्याप्रमाणेच माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना जशी माहिती आहे तशी माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७/२००९.

श्री. विजय लिलाधर हिरणवार,
फुटाना ओली, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संगीतराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
रामटेक, जि. नागपूर.

श्री. व्ही. जी. कुंभारे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दिनांक २२.३.२००७ ला केलेल्या अर्जाची सुनावणी का झाली नाही ? अर्जाला निकाली काढण्यासाठी आणखी किती कालावधी अपेक्षित आहे ? सदरची माहिती साधे टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी प्रथम अपील हे अपीलीय अधिकारी तथा पुन्हा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मात्र युक्तिवाद करतांना त्यांच्या प्रकरणात गुणवत्तेवर युक्तिवाद केला. मात्र त्याच प्रमाणामध्ये गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे कोणतीही अधिनियमात तरतुद नाही व त्यामुळे त्यांना दिनांक १७.७.२००८ रोजी मागितलेली माहिती ही उपलब्ध झालेली आहे असे दोन्ही अर्जावरुन दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००/२००९ व अपील क्रमांक १०१/२००९.

श्री. सुनिल खुशाल त्रिसुडे,
द्वारा - धनंजय दामोधर जगताप यांचे घरी,
चोरखिडकी वार्ड, सम्राट अशोक चौक,
चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. महिम गुप्ता,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक, दक्षिण वनवृत्त,
मुल रोड, चंद्रपूर.

श्री. छाजेड,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (योजना)
दक्षिण वनवृत्त, मुल रोड, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १००/२००९ मध्ये दिनांक ९.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून विभागीय वन अधिकारी (योजना) दक्षिण वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे सरळ सेवाभर्ती प्रक्रिया सन २००७-२००८ मध्ये झालेल्या भरती संबंधात गट क व ड संवर्गातील स्वच्छक, वाहन चालक, वनरक्षक, वनपाल पदाकरिता एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक १.१२.२००८ रोजी उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाची सुनावणी केली नाही व माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे कारण दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १०१/२००९ मध्ये दिनांक १०.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (योजना) दक्षिण वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे सरळ सेवा भरती प्रक्रिया सन २००७-०८ बाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती

... २

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००८ प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे पुन्हा दिनांक १.१२.२००८ अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. त्या अपीलामध्ये अर्जामध्ये विचारलेली माहिती टोलमटोल करुन असे कारण दिलेले आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रतिज्ञापत्र व स्पष्टीकरण दाखल केलेले नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १००/२००९ व अपील क्रमांक १०१/२००९ मध्ये माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरची अपीले हे खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२/२००९.

श्री. महेंद्र धनलाल पारधी,
मु. पो. सेजगांव,
ता. तिरोडा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी यांनी खुलासा दाखल केला असला तरी त्यांचेकडे आज परिक्षा असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही अशी विनंती केलेली आहे. परंतु खुलासा दाखल केला असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयात आरोग्य पर्यवेक्षक या पदाकरिता लेखी परीक्षा दिनांक २९.६.२००८ रोजी झालेल्या परिक्षेतील आसन क्रमांक ९२९५००२७ यांचे प्रश्न निहाय गुण मिळणेबाबत तसेच एकूण गुणाची पुनर्तपासणी निवड समितीच्या समक्ष करण्याबाबत व उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिका मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः देण्यात यावी असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध झाली. परंतु ती अपूर्ण असल्यामुळे दिनांक ११.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केल्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता हजर झाले नाही म्हणून दिलेला नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली. परंतु प्रश्न निहाय गुण व उत्तरपत्रिका त्यांना दिलेली नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांनी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांनी उत्तर पत्रिका दाखवून पाहणे हे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी व्यक्तिशः संपर्क साधून त्यांच्या उत्तरपत्रिकेची पाहणी करावी. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यास त्यांना उत्तरपत्रिका पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक राहिल याची नोंद घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४/२००९.

श्री. मंगेश रुपचंद मेश्राम,
मु. पो. पाहार्णी,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मधुसुधन श्रीरामजी गाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागभिड,
जि. चंद्रपूर.

श्री. नरेंद्र मुकुंदराव धोत्रे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, पाहार्णी,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, पाहार्णी यांच्याकडे नविन गाळे इमारतीचे स्केच डिझाईन, नकाशा व इस्टीमेटची इत्यंभूत माहिती टपालाद्वारे घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.९.२००८ रोजी माहिती देण्यात आली. तसेच दिनांक १२.१.२००९ रोजी माहिती मला लेखी आणि तोंडी स्वरुपात प्राप्त झाली. मला त्याबाबत कोणतेही हुजर तक्रार नाही असे सुध्दा लिहून दिलेले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीला सोबत अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञालेख दाखल केलेले आहे. प्रतिज्ञालेखामध्ये माहिती जाणीवपुर्वक अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे लेखी दिलेले आहे. त्यात अंदाजपत्रक मुल्य व प्रत्यक्ष मिळालेला बांधकाम निधी यामधील असेलेली तफावत. वाहन परवाना बिल व प्रत्यक्ष खरेदी बिले यामध्ये तफावत. मजुरांच्या मजुरीचे कोणतेही बित सादर केली नाही. इलेक्ट्रीक सामानमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात तफावत. मिळालेल्या माहितीतुन त्यांनी गुणवत्तेच्याबाबत तक्रार केलेली आहे. अपीलकर्ता यांना गुणवत्तेबाबत तक्रार करावयाची असल्यास ती जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीकडे करणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ९.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७/२००९.

सौ. पुष्पा मोतीराम बावनकर,
गौतमनगर वार्ड, ता. पवनी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. प्रसाद तेजराम रेशमे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
भंडारा.

श्री. सुनीलकुमार चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (सं व सु),
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचा मुलगा श्री. राजेद्र मोतीराम बावनकर हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, भंडारा यांचेकडे कनेक्शन नं. डी.एल. ३१०० पुर्ववत सुरु करण्याबाबत दिनांक १७.३.२००५ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ३.१२.२००८ रोजी विहित मुदतीत स्पष्टपणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीही अपीलकर्ती यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याबाबतही अपीलकर्ती यांना सुस्पष्टरितीने निर्णय दिलेला दिसून येतो. तरीही अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८/२००९.

श्री. सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा,
सेंट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,
व्ही. आय. पी. रोड, धरमपेठ, नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त (मुख्यालय),
नागपूर शहर, नागपूर.

श्री. आर. व्ही. खडसे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.२०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन, नागपूर शहर पोलीस, नागपूर यांचेकडे रेग्युलर क्रिमिनल केस क्रमांक ३३३/२००२ श्री. दिनानाथ नागपुरे विरुध्द महाराष्ट्र शासन यामध्ये शासनाची बाजू मांडण्याकरिता श्री. आर. पी. जोशी यांनी कोणाच्या आदेशाने बाजु मांडली. वरील प्रकरणात सक्षम विभागाची परवानगी न घेता श्री. आर. पी. जोशी यांनी शासनाची बाजु मांडली आहे यांची कृती कायद्याने योग्य आहे काय अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.११.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) यांनी सदरचा माहितीचा अर्ज हा दिनांक ३.१०.२००८ रोजी टपालद्वारे प्राप्त झाला. तसेच मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये नागपूर विद्यापीठातील गुणवाढ व बोगस पदवी प्रकरण संदर्भात सिताबर्डी पोलीस स्टेशन गु.र.क्र. १९४/९९, ३४६/९९ व ३४८/९९ मधून उद्‌भवणाऱ्या मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सत्र न्यायालय व उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील सदर प्रकरणामध्ये ॲड. श्री. आर. पी. जोशी यांची कनिष्ठ विशेष अभियोक्ता म्हणून शासन अधिसुचना दिनांक २९ नोव्हेंबर १९९९ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. ३३३/२००२ ही केस १९४/९९ या गुन्हयातून उद्‌भवलेली असल्याने ॲड. श्री. आर. पी. जोशी यांनी या केसमध्ये बाजू मांडली आहे. सिताबर्डी पोलीस स्टेशन गु.र.क्र. १९४/९९, ३४६/९९ व ३४८/९९ मध्ये उद्‌भवणाऱ्या केस मध्ये संबंध असल्याने शासनाची बाजू मांडली आहे. मुद्या क्रमांक २ प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती दिलेली आहे व तसेच त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा म्हटले आहे. तसेच प्रथम

अपीलाची सुनावणी घेतली नाही असेही त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटले आहे. त्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी स्पष्टपणे "३३३/२००२ ही केस १९४/९९ या गुन्हयातून उद्‌भवलेली असल्याने ॲड. श्री. आर. पी. जोशी यांनी या केसमध्ये बाजू मांडली आहे". असे नमुद केलेले आहे असे असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. विलंबाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचा अर्ज हा ३.१०.२००८ रोजी प्राप्त झाला व माहिती ही दिनांक १.११.२००८ रोजी देण्यात आली परंतु ती हस्तबटव्यानी देण्याची असल्यामुळे ती दिनांक ६.११.२००८ रोजी ती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे तरी ती विहित मुदतीत माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना ४५ दिवसांमध्ये सुनावणी घेतली नाही याबद्यल दिनांक २०.१.२००९ रोजी श्री. पी. टी. पाटील, पोलीस उपायुक्त मुख्यालय, नागपूर शहर पोलीस, नागपूर यांचेकडे मी माहिती अधिकारात माहिती प्राप्त करण्याकरिता नागपूर शहर पोलीस यांना अर्ज केले होते. विहित मुदतीमध्ये अर्जावर सुनावणी न झाल्यामुळे आपणाकडे दिनांक ६.११.२००८ रोजी अपील दाखल केलेले आहे. मी प्रत्यक्ष आपल्या कार्यालयात भेट सुध्दा दिली आहे. परंतु अद्यापही तीन अपीलांची ४५ दिवसांची मुदत संपल्यानंतरही सुनावणी झालेली नाही करिता आपणास विनंती आहे की, आपण त्वरित सुनावणी करुन आदेश द्यावे ही विनंती. तरीही सुध्दा श्री. पी. टी. पाटील, पोलीस उपायुक्त मुख्यालय यांनी त्यांच्या अपीलाची सुनावणी घेतली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले की, त्यामुळेच त्यांना द्वितीय अपील दाखल करावे लागले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे निर्णय दाखल केलेला आहे व तो निर्णय हा दिनांक ३.६.२००९ चा आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही घेण्याच्या संदर्भामध्ये जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता त्या पत्त्यावर मिळाला नाही अशा प्रकारचा निष्कर्ष काढलेला आहे असे दिसून येते व मा.राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे निदर्शनान्वये सुनावणी घेण्यात आली. परंतु कोणत्याही प्रकरणी राज्य माहिती आयोगाने निर्देश दिले त्या प्रकरणाचा उल्लेख दिसून येत नाही. निर्णयामध्ये अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित झाले असते तर त्यांचा प्रश्न सोडविता आला असता असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम १९(५) कडे लक्ष वेधण्यात येते. त्यामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांचे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये जी विनंती केली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्यलची चौकशी करणे आवश्यक असते व तसे निर्णयात सुध्दा आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता गैरहजर आहेत या कारणास्तव अपील खारीज करण्याची आवश्यकता नसते. जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे काटेकोरपणे कडकपणे पालन करणे आवश्यक असते. माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया ही ३० दिवसाचे आंत पूर्ण करावयाची असते. अन्यथा अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती प्रस्तावित केलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा ३० दिवसामध्ये किंवा ४५ दिवसामध्ये द्यावयाचा असतो. परंतु श्री. पी. टी. पाटील, पोलीस उपआयुक्त, मुख्यालय यांचेकडे ३ अपील असुन सुध्दा त्यांनी ४५ दिवसात सुध्दा सुनावणी घेतली नाही. असे पत्र देऊन सुध्दा त्यांनी निर्णय दिलेला नाही व त्यामुळे श्री. पी. टी. पाटील, पोलीस उपआयुक्त मुख्यालय यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करीत नाही व अधिनियमाच्या तरतुदीचे व शासनाच्या निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले दिसून येते. याबाबत मा.पोलीस आयुक्त, नागपूर यांनी दखल घेणे आवश्यक आहे व अशा प्रकारचे जे अधिकारी असतील जे नियमांचे उल्लंघन करीत असतील त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा विलंबाने दिला असला तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मा. पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे माहितीकरिता व पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११५/२००९.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, ता. देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी. एम. सदावर्ते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली.

श्री. बडवाईक,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी त्यांच्या दिनांक १.४.२००८, दिनांक ५.४.२००८, दिनांक ३१.५.२००८, दिनांक ३.४.२००८, दिनांक ७.४.२००८ अशा अनेक अपीलाचे संदर्भामध्ये दिलेल्या आदेशाची सत्यप्रती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचे अनुषंगाने सुनावणीस बोलविण्यात आलेले होते व राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर येथे द्वितीय अपील दाखल केल्याचे आपले लेखी बयानात नमुद केले असल्याने सदरच्या प्रथम अपीलावर सुनावणी करता आली नाही व अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलावर निर्णय देता येऊ शकले नाही. असा खुलासा आयोगाकडे केलेला दिसून येतो व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दाखल केलेल्या अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यानी अधिनियमाचे कलम १९ प्रमाणे ३० दिवसामध्ये किंवा विशिष्ट परिस्थितीमध्ये ४५ दिवसामध्ये निर्णय देणे आवश्यक आहे. परंतु तो दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरची माहिती मागितलेली आहे व त्यावरुन तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांचे विरुध्द प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अधिनियमाचे तरतुदीचे त्यांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते. तसेच दिनांक ४.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने निर्णय दिलेला नसला तरी उत्तर देणे आवश्यक आहे तेही सुध्दा त्यांनी दिलेले नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ४.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांचेकडे माहितीकरिता व पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३/२००९ व अपील क्रमांक १२४/२००९ व कलम १८ अन्वये तक्रार क्रमांक १२६/२००९.

श्री. अब्दुल रब व. हाफिज मो. सईद,
ईस्माईलपूरा, ता. कामठी,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव,
एम. एम. रब्बानी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
ता. कामठी, जि. नागपूर.

श्री. निसार अहमद,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
एम. एम. रब्बानी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
ता. कामठी, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. तसेच दिनांक १७.४.२००९ रोजी कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची व तक्रारीची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक, एम.एम.रब्बानी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, कामठी यांना २ अर्जाचे मुद्यांतून भूतपुर्व मुख्याध्यापक श्री. जमील अहमद यांची ३ मुद्यांची माहिती तसेच शाळेला मिळालेले डोनेशन/अनुदान इतर प्रकारने जमा रक्कम आणि खर्चाची माहिती एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.८.२००८ रोजी २ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिली व उर्वरित माहितीकरिता रुपये १००/- भरावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक २९.८.२००८ रोजी पुन्हा रुपये ५००/- अतिरिक्त खर्चाचे करिता भरावे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना संपूर्ण खर्च हा दोनही अर्जाचे संदर्भात भरलेला आहे व त्याप्रमाणे त्यांना दिनांक १०.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी दोन प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दोनही प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दिनांक २२.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे पुन्हा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खुलासा करतांना माहिती ही त्यांना अपूर्ण व खाडाखोड करुन देण्यात आलेली आहे असा युक्तिवाद केला. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्याबाबत त्यांना माहिती पुन्हा प्रमाणित करुन देण्यास हरकत नाही असे त्यांनी मान्य केले. तसेच अपीलकर्ता यांनी जी तक्रार आयोगाकडे केली होती त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.६.२००९ रोजी सुध्दा खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) श्री. अब्दुल रब (छोटे) हाफिज मोहम्मद सईद, कामठी ने दिनांक १३.३.२००९ को लिखे गए एक पत्र द्वारा (पत्र साथमे संलग्न है) माहिती माँगी उस पत्र मे माहिती संबंधी कालावधी वर्ष १९९५ से वर्ष २००८-०९ तक दर्शाई गई है. परंतु

श्री. अब्दुल रब ने आपको लिखे गए तक्रार पत्र मे माहिती संबंधी कालावधी वर्ष २००४ से १००९ तक दर्शाई है जो की, असल्य है तथा आपको दिशाभूल करने का प्रयत्न किया गया है. २) श्री. अब्दल रब द्वारा लिखे गए दिनांक १३.३.२००९ के पत्र के जवाब मे उसके द्वारा माँगी गई माहिती जमा की गई और उसपर आनेवाले खर्च का आकलन किया गया (ब्यौरा साथमे संलग्न है) तथा दिनांक ६.४.२००९ के पत्र द्वारा उसे सुचित किया गया की, इस पर आनेवाला अनुमानित खर्च ४०,०००/- रुपये है. इसे जमा कराने पर उसे माहिती दी जाएगी. ३) श्री. अब्दुल रब से जब दिनांक १३.३.२००९ की माहिती देने के लिए रुपये ४०,०००/- माँगे गए तो उसने वही माहिती दिनांक १३.५.२००९ को लिखे गए दो पत्रों द्वारा पुन्हा माँगी है. तथा एक पत्र मे कालावधी १९९० से २००८-०९ है व जिस की माहिती दिनांक ९.६.२००९ को दी गई है और दुसरे पत्र की कालावधी २००४-०५ से २००८-०९ तक है जिसकी माहिती की रक्कम उस ने जमा नही कराई है. इसे के पूर्व श्री. अब्दुल रब एक बहुत कम पढा लिखा व्यक्ति है. वह शायद पढना लिखना नही जानता इस कारण वह अपने हस्ताक्षर उर्दु में करता है. इस व्यक्ति के साथ कुछ अन्य व्यक्ति स्कुल के प्रति षडयंत्र रच रहे है. तथा उनका एक ही उद्येश है की, स्कूल के अधिकारीयों को मानसिक व शारिरीक कष्ट दिया जाए तथा अधिकारीयों का बहूमूल्य समय तथा संस्था का पैसा बर्बाद किया जाए. इस बाबत की पुष्टी के लिए कुछ तथ्य आपके समक्ष प्रस्तुत है. (१) एम.एम.रब्बानी हायस्कूल में शिक्षणसेवक की नियुक्ती के लिये दिनांक ३१.१.२००४ को मुलाखत लिया गया तथा दो शिक्षणसेवक, श्री. मोहसिन अख्तर व. अब्दुल वहाब और श्री. मोहम्मद जुनेद अबरार व. मोहम्मद तौहिदुल हक की नियुक्ती की गई. उस समय श्री. अब्दुल रब की बहु श्रीमती रुबीना नाज शहिद रजा ने भी मुलाखत दिया था. परंतु संस्था के अधिकारीयोंने नियम अनुसार उपरोक्त शिक्षणसेवकों की नियुक्ती की. (२) श्री. अब्दुल रब की बहू की नियुक्ती नही की गई इस कारण उसने श्रीमती रुबीना नाज शाहिद रजा द्वारा One member grievance committee (Nagpur Bench) के अध्यक्ष के समक्ष एक याचिका अपील नं. २३.८.२००४ दाखील कर इस नियुक्ती को चैलेंज करवाया तथा इस पेशीमें स्वयं उपस्थित भी रहा. (३) श्री. एन. बी. भागवत, अध्यक्ष, One member grievance committee ने अपने निर्णय दिनांक २०.१.२००५ द्वारा इस याचिका को खारीज किया. (निर्णय साथमें संलग्न है). (४) यही नही श्री. अब्दुल रब ने शिक्षणसेवक की नियुक्ती को अनुचित ठहराते हुए शिक्षण उपसंचालक, नागपूर को भी एक ज्ञापन दिया तथा उसे समाचार पत्र में प्रकाशित कर स्कूल की छवी को बिगाडने तथा बदनाम करने की कोशिश की. (समाचार पत्र दिनांक २०.३.२००४ दैनिक भास्कर की झेरॉक्स प्रत). (५) श्री. अब्दुल रब के पुत्र शहनवाज अख्तर का दाखला ११ वी कक्षा में हुआ. ११ वी कक्षा की उसने साल भर फीस नही दी तथा ११ वी पास करने के बाद १२ वी की फीस भी उसने नही दी. फीस माँगने पर उसने उच्च न्यायालय, नागपूर में एक याचिका दाखील की, रिट पिटीशन नं. ३१२५/२००६ उसका उद्येश सिर्फ स्कूल के अधिकारीयोंको पीडा देना तथा समय व पैसा बर्बाद करना था. माननीय कोर्टने दिनांक १०.७.२००७ के आदेश के अनुसार इस याचिका को भी श्री. अब्दुल रब को वापस कर दिया. उपरोक्त लिखे गए तत्थायों से यह बात स्पष्ट होती है कि, स्कूल अधिकारीयों ने श्री. अब्दुल रब की बहु की नियुक्ती नही की इस कारण वह माहिती अधिकार का दुरुपयोग कर स्कूल के अधिकारीयों को मानसिक पीडा देना तथा स्कूल का बहुमुल्य समय व पैसा बर्बाद करना चाहता है. आपसे अनुरोध है की, इसपर सहानुभूतीपुर्वक विचार कर श्री. अब्दुल रब पर उचित कारवाई करें और हमें मानसिक तथा शारिरिक पीडा से मुक्त करे. यावरुन अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपीलकर्ता यांची दोनही अपीले व तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे दोनही अपीले व तक्रार खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२/२००९.

श्री. प्रविण श्रीराम मेश्राम,
वैशालीनगर, हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
एल. आय. जी. क्वॉर्टर नं. १२/७,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संगीतराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
रामटेक, जि. नागपूर.

श्री. एस. जी. समर्थ,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, रामटेक यांचेकडे रामटेक मौजा काचूरवाही मिन्सी पटवारी हलका नंबर ४६, रामटेक रोड नहरा जवळील श्रीमती जस्वदाबाई परसराम मेश्राम हिचे नावे ५ढ्ढ एकर जमीनबाबत सत्यप्रती. सन १९९५ ते २००८ पर्यंत हा माहितीचा कालावधी व एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्ज दिनांक २६.११.२००८ रोजी प्राप्त झाला असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २५.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध आहे व उक्त प्रकरणात आपणास पाहिजे असलेल्या दस्तऐवजास प्रत्येक पानास १/- रुपये प्रमाणे जितकी रक्कम होईल व पोस्टाने पाठविण्याचा खर्च आपणास वहन करावे लागेल व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यामुळे प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे दिनांक २४.३.२००९ रोजी दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ६.४.२००९ रोजी सर्व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु तत्पुर्वी दिनांक १९.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे अपीलकर्ता यांनी मान्य केले. परंतु त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की, मौजा काचूरवाही, मिन्सी पटवारी हलका नं. ४६ येथील शेत माझी आई स्वर्गीय श्रीमती जस्वदाबाई परसराम मेश्राम हिचे नावानी ५ढ्ढ एकड शेती होती. वर नमुद माझी आई दिनांक १.९.२००८ रोजी दिर्घ आजाराने मरण पावली तिचे मृत्युनंतर वारसान म्हणून मी व माझे तीन भाऊ आहेत. करिता कृपया माझे आईचे मृत्युनंतर माझे नांव वर नमुद शेताचे ७/१२ व इतर दस्ताऐवजावर नोंदवून मला ७/१२ द्यावा अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध होती. मात्र कोणत्याही प्रकारच्या गुणवत्तेबाबत कारवाई करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२०/२००९.

श्री. मुस्ताक अहमद व. अब्दुल जब्बार,
मोमीनपुरा पोलीस चौकीजवळ,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपनिगम आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. प्रकाश वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रवर्तन अधिक्षक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे आपले कार्यालयीन पत्र क्रमांक ५८/प्र.वि., दिनांक १५.६.२००७ अन्वये वार्ड नं. ५२ मधील घर क्र. ५४ चे अनधिकृत बांधकाम दिनांक ३०.९.२००७ नंतर तोडण्यात येईल असे कळविले आहे. परंतु आज १ वर्षाचा कालावधी लोटून सुध्दा अनधिकृत बांधकाम कां तोडण्यात आले नाही. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.८.२००८ रोजी श्रीमती सायराबी अब्दुल मज्जीद, घरा क्र. ५४, पोलीस चौकीमागे, मोमीनपूरा यांनी केलेल्या अपीलच्या सुनावणी वेळी करिता मागणी पत्रानुसार मुळ नस्ती दिनांक २१.६.२००७ ला मा.अतिरिक्त उपायुक्त, महानगरपालिका यांचेकडे पाठविण्यात आली. नंतर कार्यवाही करण्यास्तव नस्ती या विभागाला परत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १७.९.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.११.२००८ रोजी देण्यात आला असून या मुद्यांबाबत प्रवर्तन विभागाला दिनांक ७.११.२००८ रोजी सुचना देण्यात आल्या व त्यामुळे अपीलार्थीचे समाधान झाले व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात आले व त्यामुळे कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रवर्तन अधिकारी यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी सदरचे अनधिकृत बांधकाम दिनांक ३०.९.२००७ नंतर तोडण्यात येईल असे कळविले होते. परंतु अजुन पर्यंत वेगवेगळे कारण देऊन सदरचे अनधिकृत बांधकाम काढले नाही. दिनांक ३०.९.२००७ रोजी सदरची माहिती प्रवर्तन अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली असे सांगितलेले दिसून येते व यावरुन दिनांक २८.८.२००८ रोजी कळविलेल्या उत्तरावरुन तसेच प्रथम अपीलाचे निर्णयावरुन जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे टाळाटाळ करीत आहेत असेच दिसून येते व त्यामुळे शास्ती करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. अपीलकर्ता यांचे नंतर संपूर्ण माहिती

**... २**

घेतल्यानंतर असे दिसून येते की, आयोगाची अशी खात्री झाली आहे की, माहिती अधिकारी हे टाळाटाळ करीत आहेत व त्याकरिता चौकशी करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाचे चौकशी न करता त्यांनी प्रवर्तन अधिकारी यांना सुचना दिलेली दिसून येते व आता पर्यंत सुध्दा प्रवर्तन विभागास सदरची नस्ती परत

आली नाही व कार्यवाही करावयाची नाही असे दिसून येते. त्यामुळे सदरच्या प्रकरणी अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना सदरच्या प्रकरणात अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी योग्य ती चौकशी करुन अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच संबंधित अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१/२००९.

श्री. सुरेश गोपाळराव पांडे,
रा. केरडी, पो. खंडाळा,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. संगीतराव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. एन. सी. बुरडकर, स्विय सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दिनांक ५.८.१९९८ ला आपले कार्यालयात क्षेत्र आराजी दुरुस्ती करिता अर्ज सादर केला होता. करिता क्षेत्र आराजी दुरुस्ती बाबतचे नियम व कार्यपध्दती एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २.८.२००८ रोजी निर्णय दिलेला असून माहिती निःशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या दिनांक ५.४.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.४.२००८ रोजी आपले क्षेत्र दुरुस्तीचे प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १०६ व १३५ अन्वये दुरुस्ती आदेश दिनांक २.४.२००८ रोजी पारित करण्यात आलेले असून मुळ प्रकरण अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचेकडे तसेच आदेशाची प्रत तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, पारशिवनी यांचेकडे पाठविण्यात आलेली असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते व तसेच त्यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा सदरच्या निर्णयाची प्रकरणाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. निर्णयाची प्रत सुध्दा आयोगाकडे दाखल केलेली आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७९/२००८.

श्री. अरुण डि. मादेश्वार,
मु. गुंजेवाही, ता. सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कैलास परदेशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. अ. रा. टेंभुर्णे
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे श्री. डी. एस. धोपटे, माजी सांख्यिकीय सहाय्यक यांच्या सेवा पुस्तकात नोंदविलेल्या आदेशाच्या प्रती मिळण्याबाबत एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २५.१२.२००८ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तरी आपल्याकडे सादर केलेला द्वितीय अपील अर्ज नस्तीबध्द करण्यात यावा ही विनंती. असे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी राज्य माहिती आयुक्त यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर**

**दिनांक :- १०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७/२००९.

श्री. दिवाकर पाटील,
पडोळे नगर, वाठोडा रोड,
नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. राजेश हातीबेड, उच्चश्रेणी लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी आरोग्य अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून दिनांक १.१.१९९१ ते दिनांक ३०.१२.१९९३ मध्ये ऐवजदारांच्या जेष्ठता यादीची चौकशी करण्यात आली होती. त्यात गहाळ झालेल्या कार्डची यादी देण्यात यावी. वर्ष १९९१ ते वर्ष १९९३ मध्ये ऐवजदारांच्या कार्डाची चौकशी करण्यात आली. त्यावेळेस श्री. सबळ यांची वर्कींग लिस्ट आणि मस्टर रोल हे त्या चौकशीला लागले होते. त्याची प्रमाणित प्रत देण्यात यावी. माहिती साधारण पोष्टद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे उत्तर माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी यांनी दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक ३.१.२००९ रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. आज आरोग्य अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी हे हजर नाहीत. परंतु वरिष्ठ लिपिक हजर आहेत. त्यांनी असे सांगितले की, सदरच्या माहितीचा शोध घेतला परंतु ती जुनी माहिती असल्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नाही व तसे अपीलकर्ता यांना मुदतीत कळविण्यात आले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असावयास पाहिजे. परंतु त्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचा पुरावा सादर केलेला नाही. जेष्ठता यादी दाखविली होती ही यादी उपलब्ध आहे असे उत्तरवादी यांनी सांगितले. परंतु मागितलेली माहिती उपलब्ध नाही व त्यास कोणासही आता सांगता येणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२/२००९.**

श्री. सुनिल के. अभिचंदानी,
१४२, रेसीडेन्सी रोड, सदर,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
जुने सचिवालय इमारत, नागपूर.

श्री. भोंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - १,
सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. जे. पी. भगत, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक -१, नागपूर यांचेकडे एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी १९९८ ते २००२ पर्यंत देयकांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.८.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे. शासकीय साधन सामुग्रीचा मोठया प्रमाणात अपव्यय होणार असल्याने आपणास सूचित करण्यात येते की, आपणास आवश्यक लागणाऱ्या माहितीचे निरिक्षण करण्यास शासकीय शुल्क आकारुन परवानगी देण्यात येत आहे. निरिक्षणा अंती आवश्यक लागणाऱ्या कागदपत्राच्या छायांकित प्रती नियमानुसार शुल्क आकारुन आपणास पुरविण्यात येतील याची नोंद घ्यावी. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.१०.२००८ रोजी देण्यात आला असून शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-१, नागपूर यांना असे आदेशित करण्यात येते की, हे आदेश पत्र मिळाल्यापासून १० दिवसांत विभागीय स्तरावरील तसेच विभाग अधिनस्त सर्व उपविभागातून सर्वकष शोध घेऊन आपणांस आवश्यक दस्ताऐवज/कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देऊन अपील मान्य केलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८, दिनांक ६.१२.२००८ रोजी पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १७.११.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांनी पुन्हा माहितीच्या संदर्भामध्ये कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता

... २

यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक १७.११.२००८ रोजी तपशिलासह संपूर्ण माहितीबद्यल कळविण्यात आले आहे. त्यातही जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, जवळ जवळ १० वर्षापूर्वीची माहिती असून अतिशय विस्तृत स्वरुपाची आहे. तरी सर्वत्र शोध घेऊन त्यांना माहिती

उपलब्ध करुन दिलेली आहे. निरिक्षणाची परवानगी सुध्दा देण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यात त्यांनी मागितलेली माहिती नाही. असे असले तरी त्यांना संपूर्ण कागदपत्रांचे निरिक्षणाकरिता जी उपलब्ध असतील ती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील जे अभिलेख उपलब्ध असतील त्या अभिलेखाचे निरिक्षण करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावीत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७/२००९.

श्री. भाऊराव बालाजी नगरकर,
वडगांव वार्ड, पोलीस चौकी जवळ
नागपूर रोड, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. ठवकर, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चंद्रपूर यांचेकडे अर्जदारांनी संबंधित भुखंड वारसाचे नांवे दाखल करण्यासाठी आपणांस दिनांक १४.३.२००७ व दिनांक २४.१.२००८ रोजी पत्र दिले. त्यास संबंधी आपण कोणती कार्यवाही केली याची माहिती द्यावी. कार्यवाही विलंब कशामुळे होत आहे याची माहिती द्यावी. संबंधित वारसदाराचे नांव दाखल करण्यास आदेश केव्हा देणार आहात याची माहिती द्यावी. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.७.२००९ रोजी देण्यात आला. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले होते.

३. जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक १४.३.२००७ चा अर्ज हा त्यांचेकडे कार्यालयात प्राप्त झाला नाही. तसे दिनांक ९.१.२००९ चे अपील सुध्दा त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही. परंतु अपील प्राप्त झाल्याची नोंद अपील मेमोमध्ये दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. आयोगाकडे कागदपत्रे दाखल करतांना अपीलकर्ता यांचे दिनांक १४.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००७ रोजी तलाठी, दुर्गापूर, सा.क्र.११ यांनी तहसीलदार, चंद्रपूर यांना अपीलकर्ता यांच्या अर्जाचे संबंधामध्ये शपथ पत्राचे आधारे रेकार्ड दुरुस्तीची कार्यवाही करता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरची कार्यवाही ही अपीलकर्ता यांनी आता पर्यत केलेली नाही व त्यामुळेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अर्ज केलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १०.७.२००९ रोजी म्हणजे आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ज्या नोटीस बरोबर अर्ज व निर्णय दिलेला दिसून येतो. तसेच अपीलकर्ता यांच्या मागणीच्या संदर्भामध्ये सदरील भुखंड शासनाकडून दिलेला आहे. शासनाकडून दिलेला भुखंड मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पुर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण करण्यास महाराष्ट्र जमीन संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार बंधन आहेत. याबाबींची माहिती तहसील कार्यालयातील दिनांक २०.५.२००९ ते मा. काजी साहेब, दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठस्तर, चंद्रपूर यांनी आयोजित केलेल्या लोकन्यायालयात आपणास कळवून प्रकरण नस्ती करण्यात येत आहे असे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे दिसून येते व अपील खारीज करण्यास पात्र आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०/२००९.

श्री. देवराव किसन आगलावे,
मु. कवठाळा, पो. नांदगांव (सुर्या)
ता. कोरपना, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आ. डो. पेंदराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भुमी अभिलेख,
चंद्रपूर.

श्री. कृ. स. वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचेकडे दिनांक २५.१०.२००५ रोजी अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर येथे मौजा कवठाळा, ता. कोरपणा सर्वे नं. २३४, आराजी २.७१ हे आरचे सिमांकन व हद्द कायम करण्याबाबतीची अपीलची माहिती. आतापर्यंत झालेल्या आदेशाच्या प्रती व आता कोणत्या स्टेज पर्यंत आहे त्या प्रत्येक स्टेजची माहिती व कॉप, नोटशिटच्या कॉपी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा सदरचा अर्ज व अपीलाचे संदर्भात आयोगापुढे कोणत्याही प्रकारची माहिती सांगता आली नाही. यावरुन अपीलकर्ता यांच्या माहितीचा अर्ज व अपीलाची दखल घेण्यात आली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून दिनांक १०.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती कागदपत्राचे स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसांचे आंत कोणत्याही प्रकारची दाखल घेण्यात आलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१)

... २

प्रमाणे रुपये १०,०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४८/२००९.

श्री. महेंद्र नामदेवराव तोटावार,
गुरुदेव वार्ड, ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आदिवासी प्रकल्प अधिकारी,
ता. चिमूर, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १६.७.२००८ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच नौकरीभरतीसाठी सन २००६ ते २००८ बद्यलची माहिती व प्रथम अपीलीय अधिकारी यांस माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार तसेच बी.पी.एल प्रमाणपत्र दाखला आहे असेही नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे सांगितले. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत. यावरुन सदरच्या अर्जाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. ही माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे असले तरी अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील योची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५२/२००९.

श्री. रामेश्वर सुकराम टेंभरे,
पार्डीबांध, पो. डोंगरगांव,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. बी. यशवंते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. जि. गोंदिया.

श्री. एम. यु. गोंडाणे,
जनमाहिती अधिकारी तथा
गट सचिव,
सेवा सहकारी संस्था मर्यादित,
पार्डीबांध, पो. डोंगरगांव,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. अजय दाढे, वकील हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री. एस. बी. निनावे, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनाक २५.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट सचिव, सेवा सहकारी संस्था मर्यादित, पार्डीबांध यांचेकडे सन १९९७ ते ३१ डिसेंबर २००७ पर्यंत कर्ज माफीची यादी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २५.१०.२००८ नुसार मागविलेली कर्जमाफीची संपूर्ण यादी उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांचेकडे अविलंब पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेवर एकूण ४ दिवसानंतर विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून रुपये १०००/- दंड लावण्यात आलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २०.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने व्यवस्थापक मंडळाचे सभेत चर्चा करण्यात आली. त्यानुसार सभेने विषय क्रमांक ७/१ नुसार चर्चा केली व चर्चेत आपण मागितलेली माहिती देण्यात येऊ नये असे ठराव पारित केले. कारण संस्थेच्या कार्यक्षेत्रातील संस्थेच्या कर्जदार सभासदांच्या सामुहिक सहयांचे आपणास संपूर्ण कर्जमाफीची यादीची सत्यप्रत देण्यात येऊ नये अशा आसयाचे पत्र संस्थेला मिळाले व त्याही पत्रावर सभेत चर्चा करण्यात आली त्यानुसार सभेने आपणास संपूर्ण कर्जमाफी यादीची सत्यप्रत देण्यात येऊ नये असे ठराव पारित केले व सभेने असे ठरविले की, श्री. रामेश्वर टेंभरे यांना त्यांच्या वैयक्तिक नावाची माहिती देण्यात यावी. त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे आहे

... २

की, त्यांना संपूर्ण कर्जमाफीची यादी अपेक्षित आहे. जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी असे सांगितले की, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होत नाही. तसेच अपीलकर्ता हे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सभासद असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्यानुसार माहिती घेण्याचा अधिकार आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन द्यावी असा त्यांनी निर्णय दिलेले आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाही. याबाबत माहिती त्यांना प्रथम अपीलाचे निर्णयात कोणतेही विवेचन केले नाही. मात्र त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात आलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांना कोणतीही शास्ती लादण्याचे अधिकार नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द लादलेली शास्ती ही रद्द करणे संयुक्तिक राहिल. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, इतर खातेधारकांनी आक्षेप घेतल्यामुळे त्यांच्या खात्याची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. परंतु अपीलकर्ता यांना कर्जमाफी केलेली यादी अपेक्षित आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येते. असे असले तरी आता पर्यंत जी यादी प्रसिध्द करण्यात आली आहे तीच यादी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीची प्रत हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयातील आदेश क्रमांक २ हा रद्द करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५/२००९.

श्री. चंद्रशेखर आनंदरावजी रेवतकर,
मु. पो. मोहपा (बुधवार पेठ),
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. मेंढे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षण उपनिरिक्षक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर यांच्याकडे २० शिक्षक कर्मचाऱ्यांचे एकच शिक्षक हजेरी रजिस्टर व २० शिक्षक कर्मचाऱ्यांच्या एकच शाळा तपासणी अहवाल माहितीचे अधिकारान्वये मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी कार्यालय शिक्षण उपसंचालक यांनी आपण मागणी केलेली माहिती ही शाळा/शिक्षणाधिकारी (माध्यमिक) स्तरावरील आहे. त्यामुळे सदर्हु माहितीचा अर्ज शाळा व शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांना प्रतिलिपी दिलेली आहे. तसेच मुख्याध्यापक, राणी चित्रलेखादेवी राजे भोसले माध्यमिक विद्यालय, कन्हाळगांव, ता. हिंगणा, जि. नागपूर यांना सुध्दा हा सदरचा अर्ज हस्तांतर केलेला आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी, राणी चित्रलेखादेवी राजे भोसले माध्यमिक विद्यालय, कन्हाळगांव या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होते. परंतु तसे न करता अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी प्रथम अपील शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयात पुन्हा अपील केले. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.१०.२००८ रोजी देण्यात आला असुन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन देऊन अपील फेटाळण्यात आले आहे व त्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर यांनी मा.शासकीय विधिज्ञ उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांना दिलेली असल्यामुळे त्यांचेकडून माहिती उपलब्ध होणे अपेक्षित आहे. परंतु माहिती ही जरी शाळा स्तरावर असल्यामुळे शाळा ही सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी शाळा स्तरावर माहितीचा अर्ज करणे आवश्यक होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४/२००९.

श्री. अशोक मारोती रामटेके,
मु. पो. नवखळा,
ता. नागभिड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. किशोर सुनंकरवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

श्री. जी. एन.करलुके,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार, नागभिड,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांचेकडे दिनांक ५.९.२००८ ला दिलेल्या अर्जानुसार अधिकार अभिलेखाची सन १९५४, १९५५ ची माहिती मिळण्याबाबत. सदरची माहिती साधे पोष्टद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.९.२००८ रोजी आपण दिनांक ५.९.२००८ ला अर्ज करुन मौजा नवखळा येथील मोत्या विक्रम नावाची नोंद असलेले ब.ब.नं. ८९/४ ची अधिकार अभिलेख पंजीची प्रतीची मागणी केली होती. अभिलेखाची तपासणी केली असता सदर नावाची नोंद आढळून न आल्यामुळे या कार्यालयाचे पावती क्रमांक १३९८१३, दिनांक ६.९.२००८ अन्वये अभिलेखात नोंद नसल्याचे प्रमाणपत्र आपणांस देण्यात आलेले आहे. सबब आपला अर्ज नस्तीबध्द करण्यांत येत आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००८ रोजी प्रथम अपील हे उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.१२.२००८ रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असतांना सुध्दा व वस्तुस्थिती सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणले असतांना सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ७ दिवसांत पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. वास्तविक जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे ते स्वयंस्पष्ट तसेच १९५४-५५ अभिलेख सुध्दा आयोगाचे निदर्शनास आणले. त्या अभिलेखाची परिस्थिती जीर्ण झालेली आहे ही वस्तुस्थिती असतांना सुध्दाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी. याबाबत मात्र विश्लेषण केलेले नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा रद्य करण्यास पात्र आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.९.२००८ च्या पत्राचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९/२००९.

श्री. तुळशीराम रुषी सहारे,
गोकुलनगर, वार्ड नं. १२,
चामोर्शी रोड, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वनविभाग, गडचिरोली.

श्री. पी. एम. तेलमासरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वनविभाग, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचेकडे पर्यायी वनीकरण मिश्र रोपवन २००१ पावसाळा क्षेत्र २५ हेक्टर क. नं. १७२ गडचिरोली व.रो. रोपातील अंतर ५ x ५ मीटर रोपांची संख्या ६२५०० वनपरिक्षेत्र गडचिरोली वनविभाग याकामाचे अंदाजपत्रक, खर्चाचे पत्रक, व्हॉवचर व तार फेसींग, मजुरांचे हजेरी बुक, पगार पुस्तिका (पुर्ण नांव व पत्ता, कामाचे एकूण दिवस, कामाचे मजुरांचे सही, आंगठा. तसेच पेंढरी वनपरिक्षेत्रामध्ये वनतलाव, विहीर, तार कंपांऊडचे काम मागील २००५ ते २००४ या कालावधीत करण्यात आले त्यांचे अंदाजपत्रक, एम.बी. रेकॉर्ड, मोजणी पुस्तिका, व्हॉवचर, मजुरी पत्रक, पुर्ण नांव व पत्ता कामाचे दिवस, सही/आंगठा मिळणे बाबत. सदरची माहिती ही स्वत: घेणार असे नमुद केलेले आहे व बी.पी.एल.चे प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती व त्याच वेळेस दिनांक ११.११.२००८ रोजी सुनावणी होऊ शकली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिनांक १२ ते ३०.११.२००८ या कालावधीत १० दिवस सातत्याने क्षेत्रीय दौऱ्यावर जावे लागल्याने कामाचे व्यस्ततेमुळे अनावधानाने दुसऱ्यांदा सुनावणी अथवा निर्णय झाला नाही असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २१.८.२००८ रोजी आल्यानंतर सदरची माहिती ही वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे असल्यामुळे दिनांक ४.९.२००८ व दिनांक १५.९.२००८ रोजी पत्र दिले. दिनांक १९.९.२००८ रोजी स्मरणपत्र दिले. दिनांक २६.९.२००८ रोजी सुध्दा स्मरणपत्र दिले व दिनांक २९.६.२००९ रोजी माहिती प्राप्त झाली व त्याकरिता अपीलकर्ता यांना माहिती घेऊन जाण्याबाबत दिनांक ३०.६.२००९ रोजी पत्र दिले. परंतु अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, मागितलेली माहिती ही वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे असल्यामुळे व सदरचे वनपरिक्षेत्र अधिकारी हे नक्षलवादी प्रदेशामध्ये व दुरच्या अंतरावर असल्यामुळे त्यांचे पर्यंत पोहचणे हे जिकरीचे होते व आता त्यांचेकडे माहिती उपलब्ध आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत स्वतः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३२/२००८.

श्री. जगन्नाथ बापूराव सोनोने,
क्वार्टर नं. ८२, टाईप-३, सी.पी.डब्ल्यू.डी.
जुने क्वार्टर, टी.व्ही.टावर चौक,
सेमिनरी हिल्स, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहवन संरक्षक,
वनविभाग, यवतमाळ.

श्री. पी. एस. वगारे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वनविभाग, यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, यवतमाळ यांचेकडे महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियमानुसार पदासंबंधी कामाची विभागनी १) सहाय्यक वनसंरक्षक, २) वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्राधिकारी, ३) वनपाल, ४) वनसंरक्षक, ५) वनसर्व्हेअर यांचा जॉब चार्ट अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.९.२००८ रोजी माहिती ही आस्थापना शाखा विभागीय कार्यालय, यवतमाळ यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिले व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिली. त्यानंतर दिनांक २३.९.२००८ रोजी उपवनसंरक्षक, यवतमाळ यांनी सदरची माहिती ही संकीर्ण शाखेशी संबंधित असून सदर माहिती त्यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २०.१०.२००८ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आयोगाची नोटीस आल्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु सदरची माहिती ही त्यांनी मागितलेल्या माहिती पेक्षा वेगळी आहे. अर्थातच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, आज अधिकाऱ्यांचे कर्तव्याबद्यल त्यांनी माहिती मागितलेली आहे. त्या पदाच्या संदर्भामध्ये जे १९९० मध्ये स्थायी आदेशाची प्रत काढण्यात आली होती त्या आदेशाची प्रत त्यांना दिलेली आहे. अपीलकर्ता यांची माहिती ही विसंगत आहे. अपीलकर्ता हे महाराष्ट्र झाडे तोडण्याचे संदर्भात माहिती मागितली व पदाचे वर्णन मात्र वनविभागाशी माहिती मागितलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणती माहिती अपेक्षित आहे हे स्पष्ट होत नाही. महाराष्ट्र झाडे तोडण्याचे अधिनियम सर्व अधिकाऱ्यांचे कर्तव्य दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी पदाचे वर्णन दिलेले असल्यामुळे त्यांना पदाचे स्थायी आदेश दिलेले आहे. त्याबाबत अपीलकर्ता यांनी स्वतःच खात्री करुन घेणे आवश्यक राहिल. विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली याबाबत माहिती ही अतिशय जुनी असल्यामुळे ती माहिती संकलीत करणे आस्थापना व संकीर्ण शाखांना पत्र दिले व स्मरणपत्र दिले व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती ही जुनी

... २

असली तरी ती ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यामुळे संबंधित शाखेतील लिपिक, श्री. व्यवहारे हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांना इतर अधिकारी/कर्मचारी सहाय्य घेता येईल व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ज्या अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांना जनमाहिती अधिकारी समजण्यात येते व त्यांनी अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र असतात व त्यामुळे संबंधित लिपिक यांचे सहाय्य घेण्यात आले आहे ते शास्तीस पात्र आहेत. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी म्हणजेच संकीर्ण शाखेतील लिपिक यांचे सहाय्य घेतले असल्यामुळे संबंधित लिपिक हे माहिती अधिकारी म्हणून हे दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे.

२) सदरची विभागीय चौकशी ही विभाग प्रमुख यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत वनसंरक्षक, वनविभाग, यवतमाळ यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६३/२००८.

श्री. अशोक विठ्ठलराव द्रव्येकर,
अंबीका सॉ मिल मागे, हनुमानगड,
कारला चौक, पिपरी मेघे, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. सु. ल. कोल्हे,
जनमाहिती अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी ,
पंचायत समिती, हिंगणघाट, जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी ,
पंचायत समिती, कारंजा (घा.) जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. मानुसमारे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, कारंजा (घा.) यांचे तर्फे श्री. वरखडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्तीमध्ये अनेक अर्ज दाखल केलेली आहेत. त्यापैकी दिनांक २०.५.२००७ व दिनांक २९.५.२००८ त्यांनी माहिती ही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट व कारंजा (घा.) यांचेकडे मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.५.२००८ रोजी देण्यात आला असून श्री. द्रव्येकर, ग्रामसेवक यांनी सुनावणी पुर्वी संबंधित गट विकास अधिकारी यांना माहिती मागितली नाही त्यामुळे अपील करण्यास वाव दिसून आला नाही. श्री. द्रव्येकर, ग्रामसेवक यांनी वेळीच कामाचे मुल्यांकन करुन देणे आवश्यक होते ती जबाबदारी त्यांनी वेळीच पार पाडली नाही. विभागीय चौकशीत श्री. द्रव्येकर, ग्रामसेवक हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. त्यामुळे यास्तरावर फेरनिर्णय घेता येत नाही. संबंधित गटशिक्षणाधिकारी, हिंगणघाट, समुद्रपूर, कारंजा यांनी श्री. द्रव्येकर, ग्रामसेवक यांनी मागणी केल्यास त्या ग्रामपंचायतच्या ऑडीट नोटस पुरविण्यात याव्यात. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्तीमध्ये अनेक माहितीचे अर्ज अनेक प्रथम अपील व अनेक आदेश जोडलेले आहेत. तसेच अनेक साधे अर्ज सुध्दा जोडलेले आहेत व सदरचे अर्ज हे वेगवेगळया प्राधिकरणाकडे केलेले आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी निश्चित असे अनेक अर्जातून निश्चित अशी माहिती पाहिजे व कोणत्या अधिकाऱ्यांकडून माहिती पाहिजे हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती गट विकास अधिकारी यांचेकडे कागदपत्राचे स्पष्ट वर्णन करुन मागितल्यास सदरची माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचेकडे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या कागदपत्राचे स्पष्टपणे वर्णन करुन अर्ज सादर करावा. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यावर गट विकास अधिकारी यांनी संपूर्ण माहिती ही संकलित करुन अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६४/२००८.

श्री. तपसकुमार तारकचंद्र बोस,
प्लॉट नं. २७६, हनुमाननगर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. धिरजकुमार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. दिलीप सावरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे एकूण ७ पृष्ठामध्ये निरनिराळे विषय हे भारतीय संविधानाचे बाबतची माहिती तसेच जनमाहिती अधिकारी यांचे सुध्दा अभिप्राय, भारतीय संविधानानुसार अंमलबजावणी कां झाली नाही अशी माहिती मागितलेली आहे व संविधानाचे प्रमाणे अंमलबजावणी कां झाली नाही अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.७.२००८ रोजी मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) व २(ञ) नुसार माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेत मोडत नसल्याने आपला अर्ज नाकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.७.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) (छ) (ज) (झ) अंतर्गत नेमकी व मुद्येसुद माहिती माहिती अधिकाऱ्यास हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मागणी करावी व माहिती अधिकाऱ्यांने माहितीचा अर्ज प्राप्ती पासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यात निश्‍चित असे कोणतेही कागदपत्रांची माहिती मागितलेली नाही. मात्र संविधानाचे तरतुदी प्रमाणे अनेक विभागातील किंवा अनेक प्रश्नांची अंमलबजावणी कां झाली नाही अशा प्रकारची एकूण ७ पृष्ठ ही माहिती मागितलेली दिसून येते. जिल्हाधिकारी यांची स्थापना केंव्हा पासून झाली अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून आली त्यामुळे जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य आहेत. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १५.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१२९/२००७.

श्री. अविनाश के. चौरसिया,
मोदी नं. २, सिताबर्डी,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. धिरजकुमार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. अविनाश कातडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
नागरिक सुविधा संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. सदरच्या नस्तीमध्ये सुनावणी दिनांक २४.१०.२००८, दिनांक ३१.१०.२००८, दिनांक १९.१.२००९, दिनांक २०.१.२००९, दिनांक ९.२.२००९, दिनांक १८.२.२००९, दिनांक ६.५.२००९, दिनांक २५.६.२००९ असे रोजनामा प्रमाणे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना सदरच्या सुनावणीमध्ये संपूर्ण संधी देण्यात आली आहे. त्यांचे म्हणणे पुर्णपणे ऐकून घेण्यात आले आहे. सदरच्या सुनावणीची तारीख त्यांचे सोईप्रमाणे ठेवण्यात आली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे Computerization pilot projects, procurement related माहितीचा कालावधी २००१ पासून ते २०.२.२००७ पर्यंत सोबत दिलेल्या १७ मुद्यांवर सदरच्या नस्तीचे निरिक्षण करण्याची परवानगी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज दिनांक ९.३.२००७ ला प्राप्त झाला. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती देण्याविषयी कळविण्यात आले. त्यामध्ये ३९७ पृष्ठांकरिता ७९४/- रुपये जमा करावे. रक्कम जमा करुन प्राप्त केलेल्या माहितीपासून आपले समाधान होत नसल्यास किंवा आपणास सदहु माहिती अपूर्ण/त्रुटीपूर्ण वाटत असल्यास आपण उक्त बाबीशी संबंधित नस्त्यांची स्वतः तपासणी करुन आपणास आवश्यक असलेली माहिती योग्य फी भरुन प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र दिनांक ११.४.२००७ रोजी निर्गमित केले असुन अपीलकर्ता यांना दिनांक २०.४.२००७ रोजी प्राप्त झाले असे अपीलकर्ता यांनी सांगितले व जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा सांगितले. परंतु तत्पुर्वीच दिनांक १६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.६.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात आली असून प्रभारी अधिकारी, सेतु यांनी कॉम्पुटर प्रोजेक्ट/सेतु संबंधीच्या नस्ती तपासण्याकरिता त्यांची काहीच हरकत नसल्यामुळे त्याकरिता स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता वाटत नाही. तसेच प्रभारी

..२..

अधिकारी, संजय गांधी योजना यांनी आधार प्रोजेक्ट संबंधीची नस्ती तपासण्याकरिता अपीलार्थीना रितसर उपलब्ध करुन द्यावी. तसचे अपीलार्थीनी आधार प्रोजेक्ट करिता केलेल्या पत्रव्यवहाराची पोहच प्रभारी अधिकारी, संजय गांधी योजना यांना दाखवून त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती प्राप्त करुन घ्यावी. प्रभारी अधिकारी संजय गांधी योजना तसेच प्रभारी अधिकारी, सेतु यांनी या आदेशान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात ३० दिवसांचे आंत सादर करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी १०००/- भरणा केला व त्यानुसार तत्पुर्वी दिनांक २१.७.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना पत्र दिलेले असून त्यामध्ये रुपये ७९४/-आपणास भरणा करण्यास सांगितले होते. परंतु ते आपण भरणा न करता प्रथम अपील दाखल केले असे नमुद केलेले आहे. आपले अर्ज अनुषंगाने वेळोवेळी जिल्हा नियंत्रण कक्षातील सेतु व इतर संगणकीकरणाशी संबंधित ऑनलाईन म्युटेशन बाबत श्रीमती खोडे, महसूल शाखा. आधार प्रोजेक्ट बाबत श्री. लोणारे, लिपिक संजय गांधी योजना शाखा यांच्याकडील नस्त्यांसह उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्या दाखविण्यात आलेल्या असून आपण त्यांचे अवलोकन केलेले आहे. सदर्हु नस्त्यांमधून आपणास हव्या असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स पुरविण्यात येत आहे. त्याकरिता आपणास प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे रक्कम शासन जमा करावयाची आहे. परंतु दिनांक २०.७.२००७ रोजी आपण उपलब्ध करुन दिलेल्या नस्त्यांमधून कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घेण्यास नकार दिलेला आहे. सबब आपणास सुचित करण्यांत येते की, उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्यांमधील आपणास आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती रुपये २/- प्रती पृष्ठ प्रमाणे रक्कम शासन जमा करुन घेऊन जाण्याचे करावे असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे मात्र द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, दिनांक २.८.२००७ रोजी रुपये १०००/- चा भरणा केलेला नाही. त्यानंतर दिनांक २२.८.२००७ रोजी सदरची माहिती अपीलकर्ता यांना पार्सलने पाठविलेली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता केंव्हाही नकार देण्यात आला नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना नस्ती दाखविण्यात आली नाही. परंतु अपीलकर्ता यांना ज्या नस्त्या दाखविण्यात आल्या त्या नस्त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना नस्त्या दाखविल्या आहेत हे निश्चितच. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना हव्या असलेल्या नस्त्या हया जिल्हाधिकारी हे दाबून बसलेले आहेत. त्यांचा प्रकारचा त्यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तशी त्यांना विचारणा करण्यात आले नाही. परंतु त्यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या कामाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना कंत्राट मिळालेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या कामाबाबत फार मोठा भ्रष्टाचार झाला आहे व ते सुध्दा जिल्हाधिकारी यांनी केलेला आहे व ते आयोगापुढे सतत आरोप करीत आहेत. परंतु त्यांच्या जवळ कोणत्याही प्रकारचा पुरावा दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे तक्रार सुध्दा दाखल केली होती. सदरच्या तक्रारीची चौकशी झालेली असून तक्रारीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य आढळून आलेले नसल्यामुळे सदरची तक्रार क्रमांक १११/२००७, दिनांक १४.२.२००८ ही खारीज करण्यात आली आहे उलट त्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांशी सुध्दा ते असभ्य भाषेत बोलत असल्यामुळे व तशी तक्रार महिला कर्मचाऱ्यांनी दिलेली असल्यामुळे त्याची प्रत आयोगाकडे दाखल केलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी माहिती पोष्टाने मागितली नसतांना पार्सल पाठविणे आवश्यक नव्हते. तसेच त्यांनी रुपये ७९४/- मागितले असतांना रुपये १०००/- चा भरणा केला कारण त्याची माहिती ही ४०००/- ते ५०००/- रुपये पर्यंत आहे असे त्यांचे मत आहे. म्हणून त्यांनी रुपये १०००/- चा भरणा केला. अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे माहितीची पृष्ठांची संख्या ही अर्जदारास वाढवावयाची नसेल तरी माहिती अधिकारी यांनी वाढविली असून त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी योग्य तो खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे दिसून येत नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे. अपीलकर्ता यांना सांगितले की, त्यांचे जवळ जास्तीची माहिती आहे. याबद्यलचा कोणताही पुरावा नाही किंवा जिल्हाधिकारी यांनी संबंधित नस्ती दाबून ठेवलेली आहे याबाबतचा पुरावा नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांना दिनांक २२.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६१/२००८.

श्री. अतुल अरुणराव नलोडे,
पोलीस क्वॉर्टर नं. ७, पोलीस स्टेशन, वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ठाणेदार,
पोलीस स्टेशन, चिमूर,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. श्रीराम मोगरे, वाचक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन, चिमूर यांचेकडे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदर प्रकरणी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून आवश्यक असलेली माहिती कोर्टातून घेण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्याने अपीलकर्ता यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे अपील मागे घेत असल्याचे तोंडी सांगितले आणि त्याप्रमाणे रोजनामावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७५/२००९ व अपील क्रमांक १७६/२००९.**

श्री. अतुल रत्नाकर बुरांडे,
२४४, गुंलमोहर, नंदनवन मेन रोड,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. महेश करजगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. नैताम,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती एम. एम. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
गणेश माध्यमिक विद्यालय, ब्रम्हानंदनगर,
वाठोडा रिंग रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेतर्फे श्री. राऊत, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १७५/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सौ. अरुणा अरुण पत्की, शिक्षिकेच्या व्यावसायीक प्रमाणपत्राबाबत १९८६ ते २००८ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.१०.२००८ रोजी माहितीचा खर्च व टपाल खर्च मिळून एकूण ३३/- रुपये चालानद्वारे भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यांना दिनांक १७.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध करुन दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतु सदरची माहिती दिशाभूल करणारी नाही असा निर्णय देऊन अपील खारीज करण्यात आली आहे व त्या निर्णयाचे विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.    अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती मिळाली होती. सौ. अरुणा अरुण पत्की यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेबाबतची शहानिशा करुन घेणे आवश्यक होते. परंतु पात्रतेबाबची शहानिशा अजुनपर्यंत झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सौ. अरुणा अरुण पत्की यांनी सादर केलेली अध्यापन पदविका प्रमाणपत्र हे छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र हे खरे की खोटे आहे हयाबाबत शिक्षणाधिकारी यांचे कर्तव्य नाही. तसेच सौ. अरुणा अरुण पत्की हयांना नियुक्ती दिल्यावर त्याचे सचिव हे होते त्यामुळे त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी यांचेकडून अपेक्षा करणे हे गैर आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद हा योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४.    अपील क्रमांक १७६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गणेश माध्यमिक विद्यालय, वाठोडा यांचेकडे आपण शालेय विद्यार्थ्यांकडून त्यांच्या सोईकरिता व इतरही शैक्षणिक खर्चाकरिता (शुल्क) पैसे घेतो. त्याचे विवरण मिळत नाही. मिळाले नाही. पत्र स्विकारता पण पत्र पोच देत नाही. रजिस्टर पत्र पावती पोचवर मुख्याध्यापिकेचा स्टॅम्प राहत नाही. सही सुध्दा स्पष्ट नाही. भाषेचा वापर उपमर्द करणारा असतो म्हणून शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोईसुविधे करिता त्यांचेकडून किती पैसे घ्यावे. कोणकोणत्या गोष्टीवर त्याचा खर्च व्हावा. त्याचे खाते कोणत्या बँकेत व व्यवहार कोणी करावा हयाबाबत शाळा समितीस सविस्तर चर्चा होऊन ठराव मंजूर करण्यात आला असेल त्या ठरावाची झेरॉक्स प्रत स्टॅम्प, शिक्का सही करुन मला मिळावी. अशी माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५.    अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना काही माहिती उपलब्ध झाली होती. संस्थेच्या ठरावाची प्रत सन २००७-२००८ या कालावधीतील संस्थेच्या ठरावाची प्रत प्राप्त झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सन २००७-२००८ मध्ये तोंडी सुचने प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. संस्थेच्या ठरावाची प्रत नाही असे असल्यामुळे त्यांना त्याप्रमाणे कळविणे आवश्यक राहिल. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे संस्थेचे उपाध्यक्ष आहे व आता सचिव म्हणून आहेत. त्यामुळे त्यांना संस्थेची संपूर्ण माहिती त्यांचे कार्यालयातून मिळू शकेल. परंतु मुख्याध्यापक यांना माहिती मागून त्यांना काय साध्य करावयाचे आहे हे कळून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १४.१०.२००८ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे अपील क्रमांक १७५/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७६/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सन २००७-२००८ या कालावधीतील संस्थेच्या ठरावाबद्यलची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८१/२००९.

श्री. सुरेश ताराचंदजी थोटे,
पोलीस कॉलनी, तकीया वार्ड,
भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. जे. दाभेराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा,
पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००९ रोजी अपील क्रमांक १०१०/२००८ वर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला असून अपील क्रमांक १८१/२००९ मधील विषय सारखाच असल्याचे अपीलकर्ता यांनी तोंडी आयोगापुढे सांगितले असल्यामुळे सदरच्या अपीलामध्ये पुन्हा निर्णय देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८३/२००९.

श्री. कमलसिंह चतुरसिंह कनपुरिया,
प्लॉट नं. ६५, कानफाडे नगर, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रशांत श्री. दानोलीकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,
महाल विभाग, नागपूर.

श्री. बी. ए. हिवरकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,
महाल विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाल यांचेकडे १५ एस नवीन लावणेबाबत आणि नळाचे कनेक्शन करण्याबाबत कामाचे बिल मिळण्याबाबत. एकूण काम करण्याचे रुपये ४५५०/- ते मिळाले नाही ते मागण्याकरिता अर्ज. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना नरेंद्र नगर वितरण केंद्रात १५ एम.एम.चे नळाचे नवीन कनेक्शन घेण्यात आले नाही व नवीन कनेक्शनला विभागीय कार्यालयाकडून मंजूरी सुध्दा दिलेली नाही. त्या खर्चास सुध्दा मंजूरी प्राप्त नाही. तारीख २१.८.२००४ चे कोणतेही बिल हया कार्यालयात प्रलंबित नाही व रुपये ४५५०/- चे काम झाल्याबद्यल हया कार्यालयास माहिती नाही व त्याची संमती देण्यात आलेली नाही. असे कार्यकारी अभियंता, महाल विभाग, नाशप्र, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक १९.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी नरेंद्र नगर उपकेंद्रामध्ये नळ बसविण्याचे काम केले आहे. महानगरपालिकेने काम करण्याचे कंत्राट लेखी दिलेले आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, नविन कनेक्शन घेतले नाही. तरी जुने कनेक्शन सुरु केल्यामुळे ते अवैध होते. त्यामुळे त्याकरिता रुपये ३५०००/- सुध्दा दंड झाला व भरण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी जे देयक आयोगापुढे दाखविले ते देयक त्यांनी दिनांक २१.४.२००७ रोजी सादर केले होते. परंतु तरीसुध्दा त्या देयकाचे बद्यल कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येत नाही. मात्र नळाचे मंजूरीबाबत महानगरपालिका यांनी मंजूरी दिलेली आहे. कनेक्शन करुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे असे दिलेले आहे

ते मुळातच नवीन कनेक्शन घेतले नसल्यामुळे अर्जदाराचे देयकाचेबद्यल कोणत्याही प्रकारची कार्यवाही या कार्यालयास नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या देयकांची मागणी मागता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांचे जवळ त्यांना सदरचे काम करण्याकरिता त्यांना आदेश दिलेले आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२/२००९.

श्री. कल्याण मल्लेश सोदारी,
रा. घुग्गुस, वार्ड क्र. ६,
ता.जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. टी. डी. बरगे,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष समाज कल्याण अधिकारी/संशोधन अधिकारी,
जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, प्रशासकीय भवन,
२ रा माळा, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. आर. डी. पांचाळ, विधी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००८ रोजी विशेष समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे श्री. राजेश रामजनम चौव्हाण, केस नं. २४१७ व केस नं. २०९६ वरील दोन्ही केसच्या सत्यप्रती व व्ही.सी. नंबर ४६८ चे सत्यप्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राचा पुरावा जोडलेला आहे असे दिलेले आहे. परंतु दिनांक २३.१०.२००८ रोजी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडले आहे ते साक्षांकित नसल्यामुळे ते मुळ प्रत जोडण्यात यावी. त्याप्रमाणे साक्षांकित प्रत जोडण्यात आली असे अपीलकर्ता यांनी पत्र दिलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक ११.२.२००९ रोजी सदर अर्जासोबत आपण जनमाहिती अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या मुळ अर्जाची प्रत जोडावी व सदर अपील अर्ज विहित नमुन्यात पाठवावे. फॅक्सची प्रत वाचनीय व स्पष्ट नसते म्हणून फॅक्सद्वारे पाठवू नयेत असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.१०.२००८ रोजी त्यांना या कार्यालयास हजर राहून आवश्यक त्या माहितीचे अवलोकन करावे व आवश्यक असलेली माहिती झेरॉक्स घेऊन जाण्याबाबत पत्र पाठविण्यात आले. परंतु त्यांनी त्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही अथवा कार्यालयात हजरही झाले नाहीत. त्यामुळे दिनांक ६.७.२००९ रोजी माहितीच्या झेरॉक्सप्रती नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेल्या आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक ४६८ च्या संबंधाबाबत ते त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी आता पर्यंत १२-१३ अर्ज दाखल केलेले आहेत व त्या सर्व अर्जामध्ये बी.पी.एल. चे प्रमाणपत्र लावून ते माहिती मागत असतात व त्यांना माहितीचे पाहणी करिता बोलाविले असता ते येत नाही व पाहत नाही. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास निधी या कार्यालयास नाही व ते माहिती मागतांना त्रयस्थ पक्षाची माहिती मागतात. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जरी जोडले असले तरी त्यांचेकडे मोबाईल आहे. त्यामुळे मोबाईलचे दर

महिन्याचे बिल देण्याची त्यांची ऐपत दिसून येते. त्यामुळे ते दारिद्रय रेषेखालील आहेत किंवा नाही याबाबतची याबाबतची माहिती चौकशी करणे आवश्यक आहे. याबाबत खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर यांनी श्री. कल्याण मल्लेश सोदारी, रा. घुग्गुस, वार्ड क्र. ६, ता.जि. चंद्रपूर यांचे बी.पी.एल. कुटुंब आय.डी.क्रमांक १३७११ खात्री करुन बी.पी.एल. कार्ड धारण करण्याची पात्रता आहे काय यांची रितसर चौकशी करणे आवश्यक राहिल. त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याकरिता खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर यांनी श्री. कल्याण मल्लेश सोदारी, रा. घुग्गुस, वार्ड क्र. ६, ता.जि. चंद्रपूर हे बी.पी.एल. कार्डधारक क्रमांक १३७११ हे दारिद्र रेषे खालील प्रमाणपत्र आहे किंवा नाही याबद्यलची चौकशी करुन तशा प्रकारचा निर्णय हा विशेष समाज कल्याण अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, नागपूर विभाग, चंद्रपूर यांचेकडे सादर करावा.

२) खंड विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे बी.पी.एल. प्रमाणपत्र धारण करण्याचे संदर्भामध्ये चौकशी केलेला अहवाल विशेष समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे सादर केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अपीलकर्ता यांनी नस्तीची पाहणी करण्यास द्यावयाची किंवा नाही असा निर्णय घेण्यात यावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०/२००९.

श्री. राजेंद्र दवलत तुमसरे,
मु. पो. करडी, ता. मोहाडी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहाडी,
जि. भंडारा.

श्री. बी. एस. भांडारकर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, बेटाळा,
ता. मोहाडी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्रीमती एन. आर. खंगार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, बेटाळा यांचेकडे एकूण ९ मुद्यांची व त्यामध्ये उपमुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.७.२००९ ला संपूर्ण माहिती देण्यात आली आहे असे लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७/२००९ व अपील क्रमांक १९८/२००९.

श्री. दशरथ लखुजी मेश्राम,
द्वारा - शंतनु भोयर, वकील,
बॅचलर रोड, धंतोली, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. निमजे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वर्धा.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. डफ,
जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १९७/२००९ मध्ये दिनांक १४.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे श्री. वा. छो. त्रिवेदी, मुख्याध्यापक, न्यु.म्यु.से.स्कूल/ज्यु.कॉलेज, हिंगणघाट यांची ए.जी. ऑफीसद्वारे मंजूर झालेल्या पेन्शन केस आदेशाची प्रमाणित छायांकित प्रत मिळणेबाबत वगैरे माहिती व्यक्तिशः घेंणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेली माहिती प्रमाणित करुन न दिल्यामुळे दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणीची नोटीस काढण्यात आलेली आहे. परंतु निर्णय मात्र दिलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती मिळाली परंतु ती प्रमाणित करुन दिलेली नसल्यामुळे अपील केले आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे माहिती प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १९८/२००९ मध्ये दिनांक १४.११.२००८ रोजी माहिती अधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट यांचेकडे श्री. वा. छो. त्रिवेदी, मुख्याध्यापक, न्यु.म्यु.से.स्कूल/ज्यु.कॉलेज, हिंगणघाट यांची ए.जी. ऑफीसद्वारे मंजूर झालेल्या पेन्शन केस आदेशाची

... २

प्रमाणित छायांकित प्रत मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.१२.२००८ रोजी कार्यालयास सदर आदेश प्राप्त झालेला नाही. श्री. वा. छो. त्रिवेदी यांची पेंशन तयार करते वेळी उपमुख्याध्यापक पदाचा पगार काढून त्यांचा पेंशन केस करते वेळी विचार करण्यात आला. असे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी ते आदेश प्राप्त झाले नाही म्हणून लेखी देणे याकरिता तसेच विसंगत माहिती दिली म्हणून प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.२.२००९ रोजी देण्यात आला. अर्जातील मुद्या क्रमांक ३ ची माहिती दिल्याचे दिसून येत असून मुद्या क्रमांक ४ मधील माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णय हा योग्य आहे तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यांचे समाधान झाले आहे तरीसुध्दा द्वितीय अपील का दाखल केले याबद्यल अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करुन असे सांगितले की, नगरपरिषद, मुख्याधिकारी हे कार्यालयात उपस्थित नसतात हे सांगण्याकरिता त्यांनी द्वितीय अपील दाखल केले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १९७/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही माहितीच्या अधिकारातून प्रमाणित करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १९८/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८७/२००९.

श्री. तरुन चतुरभाई परमार,
१८, भुपेशनगर, पोलीस लाईन टाकळीच्या मागे
नागपूर - ४४० ०१३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक १, सिताबर्डी विभाग,
नागपूर.

श्री. व्ही. ए. बाहेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे वाचक श्री. बहिर, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.७.२००८ रोजी माहिती दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.९.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्यांच्या अपीलमध्ये अपील मान्य करण्यायोग्य कोणतीही संयुक्तिक बाब अगर वैध आधार आढळून न आल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यावर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी ती अपूर्ण माहिती आहे व त्यांच्या अर्जातील मुद्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, काही माहिती ही आयुक्त यांचे कार्यालयात आहे. असे असले तरी त्यांच्या दिनांक ११.६.२००८ च्या अर्जात मागितलेली प्रथम अपीलाचे निर्णयात विश्लेषण केल्याप्रमाणे मुद्येनिहाय माहितीचे संदर्भात कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक नाही. अपीलकर्ता यांना माहिती दिली असल्यामुळे व त्यांना मुदतीत दिलेली असल्यामुळे त्यांना शास्ती करण्यात यावी. परंतु अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन देतांना टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी मुळातच तक्रार ही अतिरिक्त पोलीस आयुक्त यांचेकडे केली व माहिती मात्र आयुक्त यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे मागितलह व त्याबद्यल त्यांना कळविण्यात आले होते व अपीलकर्ता यांना माहिती संकलित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.६.२००८ च्या अर्जातील नमुद केलेल्या मुद्यांप्रमाणे तसेच प्रथम अपीलात विश्लेषण केल्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कागदपत्रे विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९५/२००९ व अपील क्रमांक १९६/२००७.

श्री. नंदलाल हरीलाल बाटबरैया,
मु. रोहा, पो. बेटाळा, ता. मोहाडी,
जि. भंडारा.

..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य)
आयुक्त, मत्स्य व्यवसाय कार्यालय,
तारापोरवाला मत्स्यालय, मुंबई.

श्री. जी. टी. सानघरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
दुग्ध कार्यालय, भंडारा.

..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १९५/२००९ मध्ये दिनांक २०.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध कार्यालय, भंडारा यांचेकडे सदर संस्थेचे तलाव तक्रार अर्जात नमुद ठेकेदारांना परस्पर ठेक्याने दिल्याची आमची तक्रार असल्याने त्यांचे बयानांची झेरॉक्स प्रत. तक्रार दिनांक २६.८.२००८ सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.११.२००८ रोजी दिनांक २६.८.२००८ रोजी दिलेल्या रिपोर्टची बयानांची प्रत हया कार्यालयास उपलब्ध नसल्यामुळे ती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे दिनांक २.१.२००९ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आयुक्त, मत्स्य व्यवसाय यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचे संदर्भात प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही व तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात त्यावेळेस चौकशी झाली नव्हती म्हणून अहवालाची प्रत उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु आता चौकशी झाली असल्यामुळे अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यास अडचण नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र अधिनियमाच्या तरतुदीची कोणतीही माहिती करुन घेतली दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील हे ३० दिवसामध्ये किंवा विशिष्ट परिस्थितीमध्ये ४५ दिवसांमध्ये निर्णय करणे आवश्यक असते. परंतु अद्यापपर्यंत प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही असा खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते व त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही ही त्यांच्या वरिष्ठांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

... २

४. अपील क्रमांक १९६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध कार्यालय, भंडारा यांचेकडे बहुउद्येशिय वैनगंगा मत्स्यपालन सहकारी संस्था मर्यादित, रोहा र.न. ४९५ ची माहिती मिळण्याबाबत. या संस्थेबाबत ८ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना ही त्यांचे कार्यालय स्तरावर उपलब्ध नसुन ती संस्था स्तरावर उपलब्ध असल्याने तसेच त्या संस्थेचे व्यवस्थापक जनमाहिती अधिकारी आहेत. त्यांचेकडे दिनांक ७.१०.२००८ रोजी अर्ज हस्तांतर करण्यात आलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २.१.२००९ रोजी प्रथम अपील हे उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील प्रलंबित आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५ अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संस्था स्तरावरील आहे व अपीलकर्ता हे संस्थेचे सचिव आहेत व तरीही संस्थेच्या सभासदांची व इतर माहिती जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध कार्यालय, भंडारा यांचेकडे मागितलेली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २०.३.२००९ रोजी संस्थेचे व्यवस्थापक यांनी संस्थेकडून १ ते ८ मुद्यांबद्यलची माहिती आवश्यक फी भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक दिसते. तसेच दिनांक १०.७.२००९ रोजी संस्थेचे अध्यक्ष यांनी अपीलकर्ता यांनी रुपये ३६/- जमा केलेले आहे. त्यानंतर दिनांक १०.७.२००९ ला रजिस्ट्री करुन माहिती पाठविली आहे असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १९५/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रार अर्जाचे संदर्भातून त्यांना ३० दिवसांचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपील क्रमांक १९६/२००९ हे खारीज करण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०२/२००९.

श्री. राजेंद्र गुलाबराव शंभरकर,
जी. एस. छात्रालय, रुम नं. १७,
सिव्हील लाईन, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. स्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
वर्धा.

श्री. व्ही. ई. मून,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. सेलू, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून सहकारी संस्था, सेलू यांचेकडे श्री. कलदेव महादेव नागदेवते, रा. टाकळी (किटे), ता. सेलू यांनी सादर केलेल्या तक्रारीवरुन आपण केलेल्या चौकशी अहवालाबाबत. माहितीचा कालावधी दिनांक २४.६.२००८ ते २०.११.२००८ माहितीचे विवरणामध्ये एकूण १५ प्रश्न विचारलेली आहेत. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या एकूण १५ मुद्ये निहाय संबंधित सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सेलू यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच उत्तराची सत्यता दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांचेकडून रुपये ५०/- घेतले आहे. परंतु एकूण ५ पृष्ठांची माहिती दिली असल्यामुळे रुपये १०/- सरकारी खजिन्यात जमा करुन रुपये ४०/- अर्जदारास त्वरित परत करण्यात येईल अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. मात्र सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये वस्तुनिष्ठ अहवाल सादर न केल्यामुळे कलदेव नागदेवते यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणेबाबत तसेच चुकीची, अपूरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबाबत. अर्जात मागितलेले एकही प्रमाण पुरावे दिले नाही. न मागितलेले कागद विक्रीपत्राचे ५ पाने पुरविणे वगैरे कारण दिलेले आहेत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना चौकशी अहवाल पूर्वीच दिलेला आहे. परंतु चौकशी अहवालातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भातून अपीलकर्ता यांनी विश्लेषण करुन माहिती मागितलेली आहे व ती अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे अपेक्षित नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १५ चे संदर्भात कार्यवाहीचे पत्र प्राप्त झाले असल्यास तसेच टंकलेखन चुक झाल्याची कबूली दिली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी अपीलामध्ये विक्री पत्राची पाने द्यावी असे पुन्हा मागणी केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे कडून अधिक रक्कम

... २

भरुन घेतली आहे व त्याबाबत रुपये ४०/- परत करण्यात यावे असे आदेश दिलेले असल्यामुळे सदरचा अतिरिक्त खर्च परत करण्याचे संदर्भात अपीलकर्ता यांनी संपर्क साधला नसल्यामुळे व त्यांनी संपर्क साधताच त्यांना रुपये ४०/- परत करण्यात येतील असे आयोगास सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना या प्रकरणास वेगळीच दिशा देण्याचा प्रयत्न श्री. राजेंद्र गुलाबराव शंभरकर हे करीत आहेत. वास्तविकता मात्र वेगळीच आहे. चौकशी ही वस्तुनिष्ठपणे केली असून सत्य व खरा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यांत आलेला आहे. सदरची केस अवैध सावकारीत मोडत नाही. श्री. राजेंद्र गुलाबराव शंभरकर यांचा यामागील हेतु काय हे समजण्यास मार्ग नाही. त्यांनी या कार्यालयात भेट दिली असतांना सुध्दा त्यांची वर्तणूक वेगळयाच व उग्र स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आलेली आहे. श्री. राजेंद्र गुलाबराव शंभरकर हयांनी पोलीस स्टेशन, सेलू, तहसीलदार, पटवारी, ग्रामसेवक, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हाधिकारी तसेच वृत्तपत्रात बदनामीकारक तक्रारी व वृत्तपत्रात हयापूर्वी दिलेले आहे. त्यांचा तक्रारी करण्याचा छंद आहे व दबाव आणने व अवाजवी पैशाची मागणी करणे, हर्रासमेंट करणे हा त्यांचा मुळ हेतु आहे. तरी सदरची तक्रार व प्रकरण नस्तीबध्द करावे अशी आयोगापुढे लेखी खुलासा केलेला आहे. तसेच श्री. राजेंद्र गुलाबराव शंभरकर यांनी बी.पी.एल. प्रमाणपत्र सुध्दा सादर केलेले आहे व ते बी.पी.एल. प्रमाणपत्र सादर करुन माहितीच्या अधिकारात माहिती मागत असतात असेही आयोगापुढे सांगितले. असे असल्यास जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे विरुध्द पोलीसांकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. सदरच्या प्रकरणामध्ये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सेलू यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वर्धा यांना दिनांक १६.१०.२००८ रोजी अहवाल सादर केलेला आहे. तसेच दिनांक २९.१२.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वर्धा यांनी मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे अहवालाचे संदर्भामध्ये माहिती पाठविलेली दिसून येते व त्यात सुध्दा अर्जात केलेली तक्रार ही वस्तुस्थितीला धरुन नसल्यामुळे तक्रार नस्तीबध्द करण्यात यावी असे दिसून येते. त्यातही श्री. प्रभाकर दामोदरराव जांबूतकर तसेच श्री. कलदेव महादेव नागदेवते व अपीलकर्ता यांचे कोणत्याही प्रकारचे संबंध नाही व तेच एका गावातील सुध्दा नाही असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सहाय्यक निबंधक यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी रुपये ४०/- परत घेऊन जावे असेही पत्र दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेला अहवालावरुन त्यांनी प्रश्न विचारले आहेत ते अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांची माहिती होते. परंतु कोणत्याही प्रकारचे जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय किंवा मत हे विचारता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०८/२००९ व अपील क्रमांक २५०/२००९.

कु. जी. पी. नांदुरकर,
६१३, न्यु सुभेदार ले आऊट,
नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सी. डी. मुन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्री. बी. एम. ओरके,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ७.३.२००९ रोजी व दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही अपीले एकच आहेत पण वेगवेगळया तारखांना दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, कळमेश्वर यांचेकडे कर्मचाऱ्यास मानसोपचार तज्ञांचे प्रमाणपत्र मागण्यासंबंधी तरतुद असलेली नियमावलीची सत्यप्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दिनांक २९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.३.२००९ रोजी देण्यात आला असून आपल्या अर्जावरुन प्रशासनाला मानसिक तज्ञाचे वैद्यकीय अधिक्षक, शासकीय मनोरुग्णालय, नागपूर प्रमाणपत्र मागविण्याचे अधिकार आहेत हीबाब प्रत्यक्ष सुनावणीत अवगत करुन दिली आहे. त्यामुळे सदर विषय अंतिमरित्या निकालात काढण्यात येऊन प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमेश्वर यांनी दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमेश्वर यांनी आपली मानसिक स्थिती ढासळल्यामुळे रजेवर जात असल्याचे संदर्भित अर्जान्वये आपण कार्यालयास कळविले आहे. संदर्भित अर्जानुसार आपण मानसोपचार तज्ञाचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे. त्याशिवाय आपणास कामावर रुजू करुन घेतल्या जाणार नाही असे कळविलेले असल्यामुळे त्यांनी नियमाची मागणी केली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलात सुध्दा नियमाचे माहिती न देता किंवा छायांकित प्रती न देंता त्यांना प्रमाणपत्र मागविण्याचे अधिकार आहेत असेच त्यांनी निर्णय दिलेला आहे. अपीलकर्ती यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये निरनिराळया प्रकारे छळ करण्यात येतो.

... २

त्यांचे टेबलच्या डॉवरमध्ये दारुची बॉटल व सिगारेटची थोटे असतात व माहिती असतांना सुध्दा त्यांना एकटयांनी त्यांना कामास बाहेर जावे व त्यांनी स्वतः काम करावे असे त्यांनी सांगितले. उत्तर सुध्दा दिले नाही अधिकार दिलेला आहे. त्यात कृषि विभागातील गोडाऊनची जबाबदारी कनिष्ठ लिपिकाकडे देण्याबाबत मा. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र असतांना सुध्दा दिनांक १७.९.२००८ ला मा. सभापती यांचे कक्षात मला बोलावून सदर विषयावर झालेल्या चर्चेनुसार मा. सभापती आपण स्वतः व श्री. येस्कर, कृषी अधिकारी यांनी माझ्या कार्यभार सुचीच्या व्यतिरिक्त कामे करण्यास संयुक्तरित्या जाणीवपूर्वक माझ्याशी असभ्य वर्तणूक करुन दबाव आणल्यामुळे माझी मनःस्थिती ढासळली आहे. त्यामुळे मी दिनांक १८.९.२००८ पासून कार्यालयात उपस्थित राहू शकत नाही. याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी मला १ आठवडा विश्रांती घेण्याबाबत सल्ला दिलेला असून वैद्यकीय प्रमाणपत्र यासोबत जोडण्यात येत आहे. तेंव्हा कृपया दिनांक १८.९.२००८ पासून मला वैद्यकीय कारणास्तव १ आठवडयाची अर्जित रजा मंजूर करावी ही नम्र विनंती. सहपत्र वैद्यकीय प्रमाणपत्र जनमाहिती अधिकारी तसेच खंड विकास अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ती यांचे संदर्भामध्ये आयोगापुढे तक्रार केली. परंतु एकूणच महिला कर्मचाऱ्यांचे संदर्भामध्ये चौकशी होणे जरुरी आहे व त्यांचेवर आरोप केलेले आहे व त्याबाबत चौकशी होणे जरुरी असल्यामुळे सदरची चौकशी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांच्या दिनांक १९.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नियमाची प्रत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, कळमेश्वर यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा नियमाची प्रत न देता प्रमाणपत्र मागविण्याचे अधिकार आहे एवढेच दिलेले असल्याने प्रकरण नस्तीबध्द करण्यात आलेले आहे. त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमेश्वर यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची कोणतीही माहिती दिसून येत नाही असे दिसून येते.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१२/२००९ व अपील क्रमांक २१३/२००९.

श्रीमती उषा गिरीधर केदार,
प्लॉट नं. २०६/०७, सिव्हील लाईन,
जी.पी.ओ. चौकजवळ,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ती**

श्री. गिरीधर परसराम केदार,
प्लॉट नं. २०६/०७, सिव्हील लाईन,
जी.पी.ओ. चौकजवळ,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. एस. डी. कटयारमल,
जनमाहिती अधिकारी तथा
कर निर्धारक (कर आकारणी विभाग),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती व अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती/अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २१२/२००९ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कर निर्धारक, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे Information regarding Tax Assessment/Mutation of House No. २४४/A/७/A & House no. २४४/A/७ Ward No.६६ N.M.C. अपीलकर्ती यांनी श्री. विश्वनाथ पुरी गुरु शिव शंकर पुरी यांना दिलेले अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ती यांनी अर्जासोबत नंतर ५ प्रती दिलेल्या दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात न चुकता माहिती दयावी. कोणत्या प्रकारची माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसतो परंतु कोणत्या प्रकारची माहिती द्यावी याबद्यलचे विश्लेषण या निर्णयात केलेले नाही व त्यामुळेच अपीलकर्ती यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, ज्या अर्जाचा उल्लेख त्याचा माहितीच्या अर्जात केलेला आहे त्या अर्जाचे संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली आहे. परंतु ती माहिती त्यांना दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांना ज्या घराचे संदर्भामध्ये माहिती अपेक्षित आहे त्या घराचे संदर्भामध्ये आता पर्यंत एकूण १७ अर्ज केलेले आहेत व १७ अर्जामध्ये संपूर्ण १००० पानापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्या व्यतिरिक्त तशा प्रकारची नस्ती त्यांचेकडे उपलब्ध नाही. त्यावर

... २

जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी म्युटेशन करावे असा आदेश दिला असतांना सुध्दा म्युटेशन झाले नाही व त्यामुळेच त्यांनी ही माहिती मागितलेली आहे. त्याकरिता जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, म्युटेशन करावयाचा अधिकार हा सहाय्यक आयुक्त यांना असल्यामुळे त्यावर सहाय्यक आयुक्त यांना सदरच्या प्रकरणी प्रकरण विलंब असल्यामुळे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व ही बाब त्यांना माहिती आहे व हीच बाब त्यांच्या अपीलाच्या सुनावणीत लक्षात आणून घेऊन निर्णय देणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे ठोकळबाज निर्णय करीत असतात व कोणत्याही प्रकरणी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहितीची शहानिशा न करता माहिती ८ दिवसात द्यावी असा निर्णय दिलेला असतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपील हे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करावयाचे असते. त्याचा उद्येश एवढा आहे की, त्यांच्याच कार्यालयात माहिती असेल ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध झाली. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे काहीच करीत नाही व कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी लिहून आणल्यावर ते सही करतात व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागते. सदरच्या प्रकरणात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांना काय माहिती मागितली आहे व त्यातही ती योग्य किंवा नाही याबद्यल कोणतीही दखल घेतली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ती यांना आता पर्यंत मागितलेल्या माहितीच्या संदर्भाचे विवरण व एकूण उपलब्ध करुन दिलेली पृष्ठे व पाने व माहिती ही संपूर्ण आयोगाकडे दाखल केलेली आहे व यावरुन अपीलकर्ती यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यांचे संबंधित आदेश फेरफार करुन मिळावी असे दिसून येते व ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपामध्ये उदा. :- कागदपत्रे टिपणी, अभिलेख, दस्ताऐवज इत्यादी स्वरुपात माहिती उपलब्ध असते ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकाराची व्याख्या आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. असे असले तरी अपीलकर्ती यांना जर काही माहिती उपलब्ध झाली नसेल तर त्यांना सदरच्या घर क्रमांक संदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करुन घेऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. परंतु निर्णय करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी हे अपेक्षित नाही.

४. अपील क्रमांक २१३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी Information regarding Tax Assessment/Mutation of House No. २४४/A/७/A & House no. २४४/A/७ Ward no.६६ N.M.C. या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा कर निर्धारक, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक १३.४.२००७, दिनांक २०.४.२००७, दिनांक २७.४.२००७ व दिनांक ४.५.२००७ च्या अर्जामध्ये त्यांच्या नावाच्या फेरफाराच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते व त्याकरिता त्यांनी दिनांक ४.५.२००७, दिनांक १४.५.२००७, दिनांक १९.५.२००७ व दिनांक २४.५.२००७ रोजी अर्ज दिलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा मुळ अपीलात नमुद केल्याप्रमाणे असल्यामुळे पुन्हा त्यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, या दुसऱ्या अपीलामध्ये प्लॉट नं. वेगळा आहे व त्याबद्यलची त्यांना माहिती आतापर्यंत दिलेली नाही. परंतु अपील क्रमांक २१२/२००९ मधील त्यातील दिनांक २०.१२.२००८ च्या अर्जामध्ये Subject matter of information जे दिलेले आहे ते एकच आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा बदल नाही. त्यात कोणत्याही प्रकारचा घर क्रमांकात बदल नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा आयोगाचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. प्रकरण एकच आहे. काही प्रकरणात पुरी यांना अर्ज केलेला आहे त्यांनी दुसऱ्या प्रकरणात अपीलकर्ता यांनी अर्ज केलेला आहे व या दोनही अर्जामध्ये माहिती मागितलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दोनही अर्जाचे संदर्भात एकच मालमत्ता असल्यामुळे व सहाय्यक उपआयुक्त यांनी कोर्टात प्रकरण प्रलंबित असल्यामुळे अपील निर्णय देता येत नाही. दुसऱ्या प्रकरणात सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. दोनही प्रकरणातील मालमत्ता व घर क्रमांक एकच आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये वर संपूर्ण विवेचन आलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असेही

सांगितले की, त्यांनी अपीलकर्ता यांना वेळोवेळी दुरध्वनी वरुन, भ्रमणध्वनीवरुन बोलाविले. नंतर त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे. तसेच त्यांचे कार्यालय हे चष्मा करावयास गेले असता त्यांना मारहाण झाली आहे व तशी तक्रार त्यांनी केलेली आहे व त्या तक्रारीची प्रत त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणली व तसेच अपीलकर्ता यांनी एकूण १७ अर्जामध्ये अपीलकर्ता हे निरनिराळया नवीन अर्ज करतात व त्यांना १७ अर्जामधून संपूर्ण उपलब्ध झालेल्या माहितीच्या नस्तीची छायांकित प्रती त्याना दिलेली आहे व त्यांनी आयोगास सुध्दा सादर केलेली आहे. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या माध्यमातून फेरफार करुन मिळावी याकरिता अनेक अर्ज करीत आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरिता सुध्दा सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु अपीलकर्ता यांनी शेवट पर्यंत त्यांना माहिती मिळाली नाही असाच युक्तिवाद केलेला असल्यामुळे त्यांना १७ अर्जाचे पलीकडे आणखी माहिती हवी असल्यामुळे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहितीच्या नस्तीचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल व यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा गैरवापर थांबविणे आवश्यक राहिल. अशा प्रकारे अनेक अर्ज करुन प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत निर्णय दिल्या जात नाही याची ही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे निरिक्षणाकरिता अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक २१२/२००९ व अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २१३/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या एकूण १७ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे व्यतिरिक्त माहिती हवी असल्यामुळे त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांना लेखी पत्राने कार्यालयीन कामकाजाचे दिवशी वेळ व तारीख कळवून जनमाहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तिशः उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरिक्षण करावे.

२) अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः स्वतः वरील प्रमाणे अर्ज केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयाचे अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचे उपस्थित अपीलकर्ता यांना ज्या नस्त्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या व्यतिरिक्त नस्त्या असल्यास निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्याव्या. त्यातून अपीलकर्ता यांनी आवश्यक असलेली माहिती त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) अपीलकर्ती/अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७३/२००८.

श्री. विनोद जयराम सोनटक्के,
मु. पो. वानाडोंगरी, (वैभवनगर),
ता. हिंगणा, जि. नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एस. धनगरे, शिरस्तेदार हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यानी दिनांक २५.२.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणा यांच्याकडे शिधापत्रिका क्र. निरंक मध्ये सात नावे होती. या शिधापत्रिकाबद्यल कार्यालयाने फेरफार केलेले आहेत. अश्या फेरफाराच्या नोंदी व त्यासाठी प्राप्त अर्ज. संबंधित नोंदवहीची प्रत. फेरफार आदेशांच्या प्रती. शिधापत्रिकेची प्रत आपले संदर्भासाठी जोडलेली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.५.२००८ रोजी देण्यात आला असून तहसीलदार, हिंगणा यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला असून अपीलकर्ता यांना सदरच्या आदेशाची प्रतिलिपी दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले. दिनांक ११.५.२००९ रोजी तहसीलदार, हिंगणा यानी संदर्भाकिंत प्रकरण हाताळणारे कर्मचारी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २००९ व इतर प्रशासकीय कामात असल्याने व सीईटी परिक्षेत व्यस्त असल्याने संदर्भाकिंत प्रकरण उपलब्ध होऊ शकले नाही. सदर प्रकरणाचा शोध चालू आहे. तरी सदर प्रकरणाची सुनावणी पुढील तारखेवर ठेवावीही नम्र विनंती. त्याप्रमाणे सदरच्या प्रकरणाची सुनावणीची मुदत देण्यात आली होती. त्या तारखेस जनमाहिती अधिकारी हजर होते. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहे. ते त्यांनी प्रथम अपीलात लेखी आदेश देण्यात यावे यानुसार दिलेले आहेत. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही यावरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणा हे जबाबदार दिसून येतात. तसेच त्यांनी माहिती उपलब्ध देणारे अधिकारी व कर्मचारी हे सुध्दा जबाबदार दिसून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१)(२) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणा यांनी त्यांच्या दिनांक २५.२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणा यांनी तसेच त्यांच्या कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रुपये ५०००/- ची शास्ती कायम करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५२/२००८.

श्री. मो. इकबाल मो. उमर,
कब्रस्तान रोड, मोमीनपुरा, इलेक्ट्रीक बिल कलेक्शन सेंटर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर असून त्यांनी त्यांचे म्हणणे दिनांक २४.६.२००९ रोजी सादर केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे गैरअर्जदार सैय्यद शब्बीर अली यांचे घराचे अनधिकृत बांधकामाचे संदर्भामध्ये एकूण ७ मुद्यांतून माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः द्यावी असे नमुद केलेले आहे. विहित मुदती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक २०.१०.२००८ ला माहिती दिली आहे. परंतु त्या माहितीनुसार अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही. दिनांक ९.७.२००८ चे अर्जातील मुख्यतः मुद्या क्रमांक ५ व ६ बाबत अपीलार्थीचा आक्षेप आहे. मुद्या क्रमांक ५ व ६ ची माहिती अपीलार्थीस ८ दिवसात द्यावी असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र दिनांक २०.१०.२००८ रोजी जी माहिती उपलब्ध झाली आहे ती सुध्दा अपूर्ण माहिती दिलेली आहे. अपीलकर्ता यांना जरी माहिती उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांची कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना आयोगाचे निदर्शनास असे आणले की, मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भामध्ये मा. लोकआयुक्त यांचे कार्यालयातील कक्ष अधिकारी यांचेकडून दिनांक २०.१०.२००८ रोजी जी माहिती प्राप्त झाली आहे त्यामध्ये मा.लोकआयुक्त यांचे पत्र उपलब्ध नस्तीत संलग्न नाही असे म्हणणे आहे. परंतु सदरचे पत्र दिनांक १८.१०.२००८ चे असून प्रत आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर असे अग्रेषित केलेले आहे व त्या पत्राची प्रत आयोगाकडे दाखल केलेली आहे. यावरुन सदरचे पत्र हे आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना दिलेले आहे व त्या पत्रानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. ते पत्र दिले नसून पत्र संलग्न नाही असा उत्तर दिलेले आहे व त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी या संबंधी जबाबदार दिसून येतात. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना श्री. सैय्यद शब्बीर अली यांचे घराचे बांधकामाची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे बांधकाम हे अनधिकृतपणे आहे. मात्र श्री. सैय्यद शब्बीर अली यांनी रिवाईज प्लॅन सादर केलेला आहे. परंतु निश्चित असे उत्तर उपलब्ध त्यांना

... २

दिले नाही व त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही व दिलेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी हे दोषी आढळून येतात. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत श्री. सैय्यद शब्बीर अली यांचे घर क्रमांक ५२९ च्या बांधकामाचे संदर्भामध्ये (अधिकृत/अनधिकृत) माहिती तपशिलात माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व दिनांक २०.१०.२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करण्यात यावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.७.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९४/२००८ व अपील क्रमांक ३९५/२००८.**

श्री. सत्तार खान अब्बास खान,
पांडे महाल समोर, भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा.

श्री. ए. एन. वाकोडीकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कामगार अधिकारी,
विभागीय नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ३९४/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१०.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा यांचेकडे वाहेद खान अब्बास खान यांना कायम अपंगत्व कोणत्या नियमाखाली मंजूर केल्याबाबत माहिती पुरवावी. तसेच एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.११.२००७ रोजी एकूण १० मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.१.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागणी केलेली माहिती आवश्यक परिपत्रक व कागदपत्रे त्यांना व्यक्तिशः दिलेली आहेत. त्यामुळे प्रथम अपील हे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. प्रथम अपीलाचे निर्णयाने अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना वैद्यकीय प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी आज प्रतिज्ञापत्र सुध्दा दाखल केलेले आहे. परंतु प्रतिज्ञापत्रात सुध्दा काही मुद्यांमधून अभिप्राय मागितलेला दिसून येतो व त्या मुद्यांच्या प्रमाणे जी माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही ती माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३९५/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१०.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, भंडारा यांचेकडे खोटे प्रमाणपत्र सादर करुन अनुकंपा तत्वावर नौकरी मिळविणेबाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली

दिसून येते. सदरची माहिती ही अमजत खान वाहेद खान यांची आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना एकूण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.१.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी उपलब्ध झालेल्या माहितीचे संदर्भामध्ये प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्र सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचे मत येईल अशा प्रकारचे प्रश्न विचारले आहे. परंतु कोणत्याही प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांचे मत अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जर कागदपत्राचे स्वरुपात माहिती उपलब्ध झाली नसेल तर त्याबाबतची संबंधित कागदपत्रे अपीलकर्ता यांना त्यांच्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांचे अपील क्रमांक ३९४/२००८ व अपील क्रमांक ३९५/२००८ मध्ये आज रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे जी माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध झाली नसेल ती सर्व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३/२००९.

श्री. रत्नाकर नारायणराव बुरांडे,
द्वारा - शिवाजीराव रनवरे,
५५८, चिटणीस नगर, पंचवटी आश्रम मागे,
उमरेड रोड, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अध्यक्ष,
ब्रम्हानंद बहुउद्येशिय युवक कल्याण संस्था,
६०३, हिवरीनगर, नागपूर.

श्री. जानबा म्हस्के,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
ब्रम्हानंद उच्च प्राथमिक विद्यालय,
ब्रम्हानंदनगर, वाढोडा रोड, रिंगरोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे वतीने श्री. नैताम, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष यांचेवतीने श्रीमती प्रतिभा शेलारे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ब्रम्हानंद उच्च प्राथमिक विद्यालय, नागपूर यांना शिक्षकांच्या सेवा कार्यकालाची माहिती १९८६ ते १९९३ श्री. जानबा शंकरराव म्हस्के यांचेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.६.२००८ रोजी पंजीबध्द डाकेने लिफाफा पाठविले. परंतु सदर लिफाफा परत आला असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००८ रोजी प्रथम अपील अध्यक्ष, ब्रम्हानंद बहुउद्येशिय युवक कल्याण संस्था, नागपूर यांचेकडे दाखल केले आहे व दिनांक ११.८.२००८ रोजी प्रथम अपील पुन्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. त्यानुसार दिनांक १२.१२.२००८ ला दोन प्रतीमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु छायांकित प्रती हया वाचता येण्याजोग्या नाही. त्यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती अतिशय जुनी असल्यामुळे त्याप्रतीची झेरॉक्स प्रती व्यवस्थित येत नाही. त्यामुळे जशी आली आहे तशीच देण्यात आली आहे असे असले तरी पुन्हा अपीलकर्ता यांना वरील प्रतीवरुन छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपीले हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत वरील कागदपत्रांच्या स्वच्छ छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१६/२००९.

श्री. गंगाधर हरिश्चंद्र निमजे,
चिचोली, पो. भागडी,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माधमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. तुळशीराम काशीराम तोंडरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
प्रशांत विद्यालय, भागडी,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे वतीने श्री.ओमप्रकाश गुढे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रशांत विद्यालय, भागडी यांचेकडे पदमान्यता कर्मचारी अपृव्हल प्रत २ नग दिनांक १४.३.१९९५ ते सत्र अखेर दिनांक २६.६.१९९५ ते दोन वर्ष. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी दिलेली मान्यता मंजूरी आदेश. तसेच पदमान्यता आदेश क्रमशः मिळणेबाबत. कर्मचारी मान्यता व पदमान्यता अपृव्हल प्रत. माझी त्याकाळालील वैयक्तिक पदमान्यता, आदेश प्रत व तुकडया मंजूरी प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००९ रोजी पत्राने त्यांना काही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. तसेच दिनांक १९.१.२००९ रोजी सुध्दा मुख्याध्यापक यांनी त्यांना पत्र दिलेले दिसून येते व त्यांना स्वतःचें नियुक्ती बद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्यांना प्रती माहिती मागितलेली दिसून येते व त्यात प्रशांत विद्यालय, भागडी यातील पदमान्यता संच सन १९९१-९२, १९९२-९३, १९९३-९४ इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. तरी त्यावर दिनांक २८.१.२००९ रोजी माहिती शाळा स्तरावर असल्यामुळे सदरचा अर्जास शाळा स्तरावर पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी दिनांक १५.१२.२००८ रोजी मुख्याध्यापक यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शिक्षणाधिकारी यांना अहवाल पाठविलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सन १९९१-९२, १९९२-९३, १९९३-९४ या वर्षातील पदमान्यता संच मिळाला नाही. दिनांक ५.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सन १९९१-९२, १९९२-९३, १९९३-९४ ची माहिती मागितलेली नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जाचे संदर्भात अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रपत्र अ मध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे माहिती

मागितलेली आहे व ती त्यांच्या दिनांक ५.१२.२००८ च्या अर्जाचे पेक्षा अतिरिक्त माहिती मागितलेली दिसून येते. याचा अर्थ धड प्रथम अपील सुध्दा केलेले नाही व धड माहितीचा अर्ज सुध्दा दाखल केला नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले व तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले आहे. प्रथम अपीलात नविन माहिती मागता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१७/२००९.

श्री. विनायक मारोती उके,
मातोश्री कॉम्प्लेक्स मागे,
श्रीराम नगर, ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माधमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. येरने ,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माधमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे वतीने श्री.ओमप्रकाश गुढे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे वैयक्तिक पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत. तसेच अपंग ३ टक्के आरक्षणांतर्गत सरळ सेवा भरती. तसेच अपंग ३ टक्के आरक्षण पदोन्नतीची शाळा निहाय नांवासह यादी मिळणेबाबद. सदरची माहिती प्रत्यक्षात प्राप्त व्हावी या पध्दतीने देण्यांत यावी. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.९.२००८ रोजी माहिती अधिकारी शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी अपीलकर्ता यांना आपले मागणीनुसार आपण या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन उपलब्ध माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २४.१२.२००८ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा अपंगाच्या संदर्भातील जिल्हयातील सर्व मुख्याध्यापकांना आपणास माहिती पुरविण्याचे निर्देश दिलेले आहेत असा निर्णय दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, शिक्षणाधिकारी यांना शासनाकडे दरवर्षी माहिती पाठवावी लागते त्यामुळे त्यांचेकडे माहिती उपलब्ध असावयास पाहिजे व तीच माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती त्यांचेकडे ३७५ शाळांची उपलब्ध नसते. नवीन शाळा ज्या असतात त्यांची माहिती संकलित करावी लागते व त्यामुळेच सर्व शाळांचे मुख्याध्यापकांकडून माहिती गोळा करण्याकरिता पत्र दिलेले आहे व ती माहिती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यातही ज्या शाळांची माहिती उपलब्ध आहे ती घेऊन जावे याकरिता पत्र दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना संपूर्ण जिल्हयातील माहिती हवी आहे. मात्र ही बाब आयोगाचे निदर्शनास आणली नाही म्हणून अपीलकर्ता हे सुध्दा आयोगाची दिशाभूल करतात असे दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व जी माहिती शाळेकडून संकलीत करुन उपलब्ध करुन घ्यावयाची आहे ती माहिती ३० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून ३० व्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१८/२००९.

श्री. महेंद्रकुमार चुन्नीलालभाऊ नागभिरे,
स्टेपअप जिमच्या जवळ, रामनगर,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दिघोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोंदिया.

श्री. काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोंदिया यांचेकडे राष्ट्रीय अनुसुचित जनजाती आयोग, भोपाल यांचे नोटीस संख्या एम.बी./३३०६/महाराष्ट्र/गोंदिया /१/०७/ जी आर च्या अनुषंगाने आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कली/प्रस्तु/कावि/५५१/०८, दिनांक ३० सप्टेंबर २००८ प्रमाणे आयोगास सादर आदिवासी जमीन हस्तांतरण कायदा अंतर्गत सुरु असलेल्या प्रकरणांची माहिती एकूण ५ मुद्यांत मागितलेली दिसून येते. सदरची महिती ही १९७५-७६, १९८२-८३, १९९२-९३ या कालावधीतील दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.२.२००९ रोजी देण्यात आला असून मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती निर्धारित कालावधीत पुरविण्याची व्यवस्था करावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक २.३.२००९ रोजी प्रथम अपीलाचा पुन्हा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामध्ये मुद्या क्रमांक १ ते ५ मध्ये नमुद माहितीबाबतचे सर्व प्रकरणे व फाईल अपीलार्थीस दाखविण्यात यावे व त्यांना आवश्यकता असेल त्या मागणी केलेल्या माहितीची आकारणी न घेता पत्र प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुरवावे व तसे या कार्यालयास अवगत करावे. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये शासकीय माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोंदिया यांनी खुलासा खालील प्रमाणे केलेला आहे. अपीलार्थी श्री. महेंद्रकुमार चुन्नीलालभाऊ नागभिरे, रा. गोंदिया यांनी दिनांक २९.१०.२००८ चे जोडपत्र अ नुसार गोंदिया तालुक्यातील आदिवासी जमीन हस्तांतरण प्रकरणाबाबत माहिती विचारली होती. माहितीचा विषय गोंदिया तहसील कार्यालयातील श्री. एस. के. पांडे, कनिष्ठ लिपिक, प्रस्तुतकार-एक यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडून माहिती मागविण्यात आली. दरम्यानच्या काळात शासकीय माहिती अधिकारी दिर्घ काळाच्या रजेवर असल्याने व माहितीचा विषय श्री. पांडे यांचेशी संबंधित असल्यामुळे आणि ते सहाय्यक माहिती अधिकारी असल्याने अर्जदाराचा जोडपत्र अ मधील अर्ज मा. तहसीलदार, गोंदिया यांनी पुढील कार्यवाहीसाठी श्री. पांडे, प्रस्तुतकार-२ यांचेकडे पाठविला होता. या

काळात शासकीय माहिती अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. बी. जी. कावळे, नायब तहसीलदार (संगायो), गोंदिया यांचेकडे होता. विहित कालावधीत माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी दिनांक ३१.१.२००९ रोजी मा. तहसीलदार, गोंदिया तथा अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलाच्या कार्यवाहीत दिनांक २.२.२००९ व दिनांक २१.२.२००९ असे दोन वेळा पत्र देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी पत्र दिले. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, गोंदिया यांनी संबंधित लिपिक श्री. पांडे यांना आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलार्थी हयांना माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी आदेशित केले होते व अपीलार्थी हयांना श्री. पांडे यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घेण्याविषयी कळविले होते. परंतु श्री. एस. के. पांडे, कनिष्ठ लिपिक, प्रस्तुतकार-२ यांचेकडून माहिती प्राप्त न
झाल्याने अपीलार्थी हयांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास श्री. एस. के. पांडे, कनिष्ठ लिपिक हे जबाबदार होते व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची नस्ती हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात येईल. अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्तीचे व्यक्तिशः अवलोकन करावे व त्यातून आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. (प्रश्नोत्तराची उत्तरे मिळणार नाही).

२) जनमाहिती अधिकारी किंवा सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची रक्कम ही तहसीलदार, गोंदिया यांनी त्यांच्या दरमहिन्याचे वेतनातून वसूल करुन ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२५/२००९.

श्री. अनिल रामभाऊजी दिकोंडवार,
घुटकाळा वार्ड, रंगारी पुरा, तुकडोजी पुतळया मागे,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. के. आर. अलोणे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
इंदिरा गांधी विद्यालय, चेकदरुर,
ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इंदिरा गांधी विद्यालय, चेकदरुर यांचेकडे शाळेचा प्रशासकिय बाबी संबंधी सन १९९८ ते २००७ या कालावधीतील जुलै २००० ते जून २००८ पर्यंत शिक्षकांचे हजेरी रजिष्टरच्या प्रती अशा प्रकारची एकूण २१ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक ५.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक ३ व मुद्या क्रमांक ९ ची माहिती मिळाली नाही अशा प्रकारची पोच दिलेली दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे मुद्यांमध्ये मात्र कोणती माहिती उपलब्ध झाली व कोणती उपलब्ध झाली नाही याबद्यलचे कारण दिले नाही व संपूर्ण माहितीचे वर्णन पुन्हा केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २०.१०.२००८ रोजी संबंधितांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्रमांक २, ३, ७, ८, ११, १३, १६, १८, १९ ची माहिती लगेच उपलब्ध करुन देतो असे कबूल झाले. परंतु अजूनपर्यंत वरील मुद्यांची माहिती आपण उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मुख्याध्यापक यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु ती सुध्दा उपलबध करुन न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे असे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे म्हटले आहे. परंतु नंतर मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही याबद्यलचा कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. मात्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अपीलीय अधिकारी यांचेकडे जो खुलासा केलेला आहे त्यामध्ये मात्र कोणत्या मुद्यावर माहिती उपलब्ध झाली व कोणत्या मुद्यांवर माहिती उपलब्ध झाली नाही हा खुलासा केलेला आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सदरचा खुलासा उपलब्ध आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे सोबत जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाश्याप्रमाणे त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी (संस्थेकडे असलेली माहिती वगळून) माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२१/२००९.

सौ. बिणा अशोक गायकवाड,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चारगांव (बुज),
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. भिमराव खंडाते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३,
प्रशासकीय भवन, नागपूर.

श्री. दि. व. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
विभागीय समाज कल्याण,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३,
प्रशासकीय भवन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ८.११.२००८ रोजी मी आपले कार्यालयाला दिनांक ७.६.२००७ ला स्वतः अर्ज दिला. तो आपले कार्यालयाला प्राप्त झाला. पोचपावतीवर आवक जावक लिपिकांची स्वाक्षरी आहे. परंतु आपले कार्यालयाकडून दिनांक ८.११.२००८ ला जात पडताळणी बाबत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तसेच दिनांक ३१.७.२००८ ला स्मरणपत्र सुध्दा आपले कार्यालयाला दिले आहेत. आपले कार्यालयाकडून किती दिवसात जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळतील या विषयी सविस्तर माहिती देतील अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३, नागपूर हे कार्यालय ऑक्टोंबर २००७ पासून नव्याने सुरु झालेले आहे. तसेच गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयासाठी जात पडताळणी समिती क्रमांक २, चंद्रपूर नव्याने सुरु झालेले आहे. या कार्यालयात सादर केलेला प्रस्ताव दिसून येत नाही. जात पडताळणी प्रस्तावात नियुक्ती किंवा पदोन्नतीची स्पष्ट नमुद केले असल्यास किंवा जातीचे प्रमाणपत्र ज्या जिल्हयाचे असतील त्या जिल्हयातील समितीच्या कार्यक्षेत्रात असल्यास त्याच कार्यालयात जाती पडताळणी वैधता प्रमाणपत्राकरिता कार्यवाही केल्या जाते. अन्यथा सदर प्रस्ताव परत करण्यांत येते. करिता प्रस्ताव सादर केल्याची झेरॉक्स प्रत, जाती प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत तसेच ज्या कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर केला ती झेरॉक्स प्रत या कार्यालयास सादर केल्यास पुढील कार्यवाही करणे सोयीची होईल असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी दिलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराप्रमाणेच उत्तर दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ती यांनी दिनांक ७.६.२००७ ला दिलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांचे कार्यालयात दिलेल्या स्विकृतीच्या संदर्भातील नोंद आयोगास दाखविली. स्मरण पत्राची सुध्दा नोंद आहे. यावरुन सदरचा अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात घेतला आहे हे स्पष्ट होते व त्यामुळे सदरचा अर्ज आवक जावक ही त्या कार्यालयात उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारे जर स्विकृती करुन नोंद घेतली नसेल तर संबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरणे आवश्यक राहिल व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या कार्यालयात संबंधित अर्जाचा कसून शोध घ्यावा व तसे अपीलकर्ती यांना कळविणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांनी दिलेल्या दिनांक ७.६.२००७ चा अर्ज व दिनांक ३१.७.२००८ चे स्मरणपत्राचा कसून शोध घ्यावा व सदरच्या पत्राची आवक जावक नोंदीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) सदरच्या अर्जावर स्विकृती दिली असल्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांनी सदरचा अर्जाची नोंद केली नसेल त्या कर्मचाऱ्या विरुध्द जबाबदारी निश्चित करावी व त्याची विभागीय चौकशी करावी व तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३४/२००९.

सौ. चंदा दुधराम घोडसे,
मु. पो. खापरी (रेहपाडे),
ता. पवनी, जि. भंडारा. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. डी. एम. वैरागडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पवनी,
जि. भंडारा.

श्री. डी. एच. जाधव,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, खापरी (रेहपाडे),
ता. पवनी, जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २२.७.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पवनी यांचेकडे हजेरी पटाची क्रमांक १ ते ३ ची सत्यप्रत मिळणेबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.८.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत, खापरी (रेहपाडे) यांनी हजेरी पट क्रमांक १ ते ३ दोन्ही प्रत डाटा एन्ट्रीसाठी भंडारा येथे पाठविले आहे. ते हजेरी पट ग्रामपंचायतला परत मिळाल्यावर आपणांस देण्यात येईल व हजेरीपट क्रमांक १ ते ३ च्या सत्यप्रतसाठी लागणारा खर्च अंदाजित २४०/- आपणास ग्रामपंचायतच्या फंडात जमा करावा लागेल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ९.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यावर दिनांक १४.१०.२००८ रोजी गट कार्यक्रम अधिकारी तथा तहसीलदार, पवनी यांनी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ती यांना दिनांक २९.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण हमी योजना कामात हजेरी पटावर बोगस मजुरांचे नांव व खोटया सहया असुन त्यांना मजूरी भेटली आहे असे त्यांनी आयोगास सांगितले व त्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्यावेळी माहितीच्या अधिकारात सौ. चंदा घोडसे यांनी माहिती मागितली होती त्यावेळी सदरचे हजेरी पट डाटा एन्ट्रीसाठी, जिल्हाधिकारी, भंडारा येथे पाठविले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला. असे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा केलेंला आहे. नंतर माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी ती विलंबाने दिली आहे. अपीलकर्ती यांचेकडून रुपये २४०/- चा भरणा करुन घेतला आहे. परंतु अधिनियमातील कलम ७(३) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते. त्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते.

... २

वास्तविक ही तरतुद खंड विकास अधिकारी यांना सुध्दा अवगत असणे आवश्यक होते. परंतु खंड विकास अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ती यांचे कडून खर्चाचा भरणा करुन घेण्यास आक्षेप घेतलेला दिसून येत नाही व त्यामुळे सदरचा खर्च हा परत करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचेकडून अतिरिक्त खर्च रुपये २४०/- चा केलेला भरणा हा त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सचिव, ग्रामपंचायत, खापरी (रेहपाडे), ता. पवनी/ खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांनी परत करावा. अन्यथा विद्यमान जनमाहिती अधिकारी अथवा खंड विकास अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३२/२००९.

श्री. दिगंबर वंगणुजी वालदे,
मु. पो. शेंदूरवाफा, ता. साकोली, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, साकोली,
जि. भंडारा.

श्री. एन. टी. मेळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, शेंदूरवाफा
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. एच. एस. ठोसरे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत शेंदूरवाफा यांचेकडे मौजा शेंदूरवाफा, पंचायत समिती, साकोली, जि. भंडारा येथील (नवजीवन कॉलोनी) प्लॉट नं. १८ चे घरासमोर ग्रामपंचायतनी नाली खोदण्याचे ठराव घेतले असल्यास त्याची ठरावाची नक्कल प्रतची माहिती हवी आहे किंवा ठराव न घेतल्यास त्याची माहिती हवी आहे. माहितीचा कालावधी दिनांक १.१.२००८ ते दिनांक १४.८.२००८ पर्यंत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध
झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १९.९.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.१०.२००८ रोजी देण्यात आला असून दिनांक १६.७.२००८ च्या ठरावाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी (उच्चश्रेणी - १) यांचेकडे उपसरपंच यांनी पदाचा करुन गावात अवैध नाली खोदून खड्डे घराला लागून केल्याबद्यल चौकशी करुन कार्यवाहीबाबत दिनांक १८.८.२००८ रोजी हस्तलिखित अर्ज केलेला आहे. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. माहिती व्यक्तिशः घेणार किंवा पुन्हा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.१२.२००८ रोजी देण्यात आलेला आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलात दोन माहितीचे अर्ज व दोन प्रथम अपील असे दाखल केलेले आहेत. परंतु द्वितीय अपीलामध्ये मात्र दिनांक १८.८.२००८ रोजीचा अर्जाचा उल्लेख आहे.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००८ रोजीचा निर्णय हा दिनांक २४.१२.२००८ रोजी देण्यात आला असून चौकशी करणे हे

... २

माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही. फक्त उपलब्ध असलेली माहितीचे दस्ताऐवज पुरविता येतात असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी दिलेल्या तक्रारीच्या अर्जावर झालेली कार्यवाहीची माहिती मागितली आहे. याचा अर्थ माहिती मागण्यासाठी पुर्वी चौकशी व्हावयास पाहिजे अशी त्यांची अपेक्षा आहे व ही बाब जनमाहिती अधिकारी किंवा गट विकास अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना आकलन झालेली दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी तशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे या दोनही प्रकरणामध्ये संबंधित तक्रारीची विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १८.११.२००८ च्या तक्रार अर्जावर संबंधितानी चौकशी केली असल्यास त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संबंधित माहिती अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३१/२००९.

श्री. पँथर यशवंत बळीराम अंबागडे,
मु. पो. सिर्सी, ता. उमरेड,
जि. नागपूर - ४४१ २१४. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजेश मधुकर कुंठे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव,
लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी,
द्वारा - वसंतराव नाईक कृषि विद्यालय, सिर्सी,
ता. उमरेड, जि. नागपूर.

श्रीमती चित्रा मधुकर आरगोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
वसंतराव नाईक कृषि विद्यालय, सिर्सी,
ता. उमरेड, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व त्यांचे वतीने श्री. पाटोडे हे बाजू मांडणार आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत व त्यांच्यातर्फे श्री. पराग वाघ, वकील हे बाजू मांडणार आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपील हे सचिव, लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी यांचेकडे रजिष्टर पोष्टाने दाखल केले होते. परंतु रजिष्टर पत्र परत आलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ते दिनांक २८.१.२००९ ला पोष्टमन, सिर्सी यांनी हस्तपोच दिले असे नमुद केलेले आहे. परंतु उपलब्ध झालेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्ता यांचे मत असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता व मुख्याध्यापिका व संस्थेचे सचिव हे एकाच गावात राहत असले तरी संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा अर्ज घेतला जात नाही ते रजिष्टर पोष्टाने पाठवावे लागते व रजिष्टर पोष्टाने पाठविलेले पत्र सुध्दा स्विकारले जात नाही असे त्यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. आयोगापुढे युक्तिवाद करतांना त्यांचे वकील यांनी असे सांगितले की, मुख्याध्यापिका हया आजारी होत्या. परंतु अपीलकर्ता यांचा अर्ज मुळात दिनांक २७.११.२००८ रोजी दिलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही दिनांक २७.१२.२००८ च्या आत उपलब्ध होणे आवश्यक होती. परंतु त्याबद्यलचे कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. मात्र अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ५.२.२००९ रोजी रुपये ५००/- झेरॉक्स प्रती काढणे व टपाल खर्चाकरिता कळविण्यात आलेले

... २

आहे. सचिव हे हजर आहेत व सचिव यांनी असे सांगितले की, संस्थेमध्ये वाद असल्यामुळे अशा प्रकारची माहिती मागितली जाते. असे असले तरी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३३/२००९.

श्री. नंदलाल हरीलाल बाटबरैया,
मु. रोहा, पो. बेटाळा, ता. मोहाडी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. म. व. जोगळेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक उपआयुक्त,
मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी,
नागपूर.

श्री. बांडेबुचे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त, भंडारा माहिती अधिकारी म्हणून अर्जदारानी दिनांक २६.८.२००८ रोजी आपले कार्यालयात बहुउद्येशीय वैनगंगा मत्स्यपालन सहकारी संस्था मर्यादित रोहा र.नं. ४९५ यांनी वैयक्तिकरित्या संस्थेकडील तलाव परस्पर ठेक्यांनी दिल्याबाबत रिपोर्ट अर्ज दिलेला आहे. दिलेल्या रिपोर्टवर आपणाकडून संबंधित संस्थेबाबत कार्यवाही करण्यात आली किंवा कसे, करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरुपात झेरॉक्स प्रतीसह कायदेशीर कार्यवाहीकरिता व माहितीकरिता आवश्यक असल्याने मिळण्यास विनंती आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००८ रोजी आपणाकडे असलेल्या कागदपत्रासह या कार्यालयात दिनांक २०.१०.२००८ रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्या अनुषंगाने दिनांक ५.१.२००९ रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, भंडारा यांना सहकारी संस्थेची माहिती सादर करावी म्हणून प्रादेशिक उपआयुक्त मत्स्य व्यवसाय, नागपूर यांनी पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २०.१.२००९ रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय भंडारा यांनी प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व दिनांक १२.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा चौकशीचे संदर्भात पुरावा असल्यास या कार्यालयास देण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु ते न सादर केल्यामुळे आपल्या तक्रारीबाबत कुठलेही पुरावे वजा कागदपत्र न आढळल्याने हे प्रकरण आता दप्तरी दाखल करण्यांत येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २८.२.२००९ रोजी संपूर्ण कागदपत्रे हवी असल्यास नियमान्वये जी माहिती आपणास देय असेल ती माहिती आपण रक्कम जमा केल्यानंतर आपणास देण्यात येईल असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.५.२००९ रोजी मागितलेली माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असल्याने या कार्यालयात येऊन माहितीची रक्कम जमा करुन घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक १२.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना ४ प्रती प्राप्त करुन दिल्या आहेत असा आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांना प्रत प्राप्त झाल्याची नोंद झाली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५/२००९.

श्री. प्रशांत रमेशराव धिरडे,
१८, व्यवहारे ले आऊट, गोपाल नगर,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. हरिष दुबे,
जनमाहिती अधिकारी तथा
निगम सचिव,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००८ रोजी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर किंवा जनमाहिती अधिकारी यांचेकडे Resolution No. ११९, दिनांक २६.९.१९७५, Resolution No. २६१, दिनांक ३०.१०.१९८६ व Resolution No. १४७, दिनांक १३.८.२००३ च्या शासनाकडे केलेली टिपणी किंवा पत्र व्यवहार प्रमाणित प्रत तसेच शासनाने नागपूर सुधार प्रन्यास संबंधी घेतलेल्या निर्णयाचे संबंधीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.८.२००८ रोजी अधिक्षक, समिती विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना संदर्भीत पत्रामध्ये नमुद केलेली माहिती ही नगर रचना विभागाच्या संबंधित असल्यामुळे आपणांद्वारे सादर केलेले पत्र नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आले असून त्या विभागाद्वारे आपणांस माहिती देण्यांत येईल असे कळविलेले दिसून येते. दिनांक ८.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना संदर्भीय पत्रात नमुद केलेली माहिती नगर रचना विभागात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००८ रोजी दिनांक ८.१२.२००८ रोजी सुनावणीस हजर राहणेसाठी उपस्थित राहण्यासाठी कळविलेले दिसून येते. नोटीस दिल्यावर अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे व त्यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती त्यांना जनमाहिती अधिकारी किंवा आयुक्त यांचेकडे मागितली. सदरची मागितलेल्या माहितीकरिता जनमाहिती अधिकारी हे नगर रचना विभागात असल्यामुळे त्यांचेकडे सदरचे पत्र पाठविण्यात आले होते व ती माहिती उपलब्ध नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर निगम सचिवांनी सुध्दा महापौर यांचे निजी सहाय्यक यांनी नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्यासंबंधाने महानगरपालिकेद्वारे राज्य शासनास करण्यांत आलेल्या पत्र व्यवहाराचा शोध महापौर कार्यालयामध्ये शोध घेतला असता महापौर कार्यालयीन दस्तावेजामध्ये कोणतीही नोंद नाही असे दिसून येते. त्यानंतर

सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन) यांनी निगम सचिव यांचे कार्यालयात रेकॉर्डचा शोध घेतला असता याबाबत कुठल्याही प्रकारे माहिती आढळून आलेली नाही असे दिसून येते. यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ केलेली नाही. मागितलेली माहिती ही अतिशय जुनी असल्यामुळे ती शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे व सर्व विभागामध्ये शोधण्यात आलेले आहे व तशा प्रकारचे बैठक प्रस्ताव शासनाकडे उपलब्ध नाही असेच आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांनी सुध्दा कळविले आहे. अतिरिक्त आयुक्त, निगम सचिव यांनी सुध्दा कळविले यावरुन संपूर्ण माहितीचा शोध घेण्यात आला असून माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारे निष्कर्ष दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४४/२००९.

श्री. दिवाकर सुभाष मडावी,
तालुका निरिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,
गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,
गोंडपिपरी, जि. चंद्रपूर.

श्री. विश्वेश्वर जोगी,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,
गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी पररिक्षण भूमापक या पदाचे वेतन कां काढले नाही तसेच दिनांक ६.१.२००३ पासून एकस्तर पदोन्नती मुख्यालय सहाय्यक या पदाचे वेतन मिळत असतानी परिरक्षण भूमापक या पदाचे वेतन कां काढले व यासंपूर्ण प्रकरणातून एकूण १३ मुद्यांवर कारणासहीत लेखी स्वरुपात माहिती द्यावी अशा प्रकारचे मुद्दे उपस्थित करुन जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, गोंडपिपरी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१०.२००८ रोजी मुद्दे निहाय माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये पुन्हा अपीलकर्ता यांनी प्रत्येक मुद्यांच्या संदर्भात कारणासहित माहिती मिळावी असे वर्णन केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १३.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कारणे उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अभिप्राय दिलेले नाही. अपीलकर्ता यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. ही चौकशी व निर्णय हा जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भुमी अभिलेख, पुणे डॉ. शैलेश कुमार शर्मा यांनी दिलेला असल्यामुळे त्याबाबतचे अभिप्राय जनमाहिती अधिकारी देऊ शकत नाही व त्यांची विभागीय चौकशी संबंधाबाबत आदेश दिलेले आहे व त्याबाबत त्यांना कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २३.७.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४९/२००९.

श्री. संजय मुकुंदराव चिचखेडे,
मु. पो. कोहळी, ता. कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रकांत मुन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर.

श्री. व्ही. डी. ओरके,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, कळमेश्वर यांचेकडे पंचायत समिती, कळमेश्वर अंतर्गत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ३०% पंचायत समितीस्तर व २०% जिल्हा परिषदस्तर सन २००५-२००६, सन २००६-२००७ व सन २००७-२००८ अन्वये उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, हिंगणा, उपअभियंता सिंचाई, उपविभाग, कळमेश्वर, उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग सावनेर व बांधकाम विभाग पंचायत समिती, कळमेश्वर मार्फत करण्यात आलेल्या कामाचा मंजूर कृती आराखडा त्यानुसार प्रत्येक कामाचा प्राकलनाच्या व मुल्यांकनाच्या सत्यप्रती, प्रत्यक्ष कामावर झालेल्या खर्चाचे विवरण, त्यानुसार लावण्यात आलेल्या मजुरीच्या व साहित्याचा व्हावचरच्या सत्यप्रती, मजूरांच्या नोंदणीच्या सत्यप्रती देण्यात याव्यात. सबब माहिती मला व्यक्तिशः देण्यात यावी. फी व खर्च भरण्यास तयार आहे. तरी भरावयाची रक्कम मला त्वरित कळविण्यात यावी. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.९.२००८ रोजी उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, सिंचाई/ग्रामीण पाणी पुरवठा/बांधकाम, कळमेश्वर/ सावनेर/हिंगणा शाखा अभियंता, बांधकाम, पंचायत समिती, कळमेश्वर यांना माहितीकरिता लागणारा एकूण खर्च प्रमाणे (प्रती झेरॉक्स २/- रुपये नग) या कार्यालयात पाठविण्यात यावे. त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.५.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना रुपये ८०००/- संपूर्ण कागदपत्राकरिता भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले होते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना असा खुलासा केला आहे की, अपीलकर्ता यांनी हीच माहिती मागण्याकरिता दिनांक १५.५.२००८ रोजी अर्ज केलेला होता व दिनांक ११.६.२००८ रोजीचे पत्रान्वये केलेला अर्ज मागे घेतला आहे. अपीलकर्ता यांना त्या अर्जाचे

अनुषंगाने दिनांक ११.६.२००८ रोजी सदर माहिती तांत्रिक स्वरुपाची असून माहिती संकलीत करण्याकरिता तांत्रिकदृष्टया गुंतागुंतीची असल्याने विलंब लागत आहे. त्यामुळे माहितीचा अधिकारात दिनांक १४.५.२००८ च्या पत्रानुसार माहिती पुरविण्याकरिता २० दिवसाची मुदतवाढ देण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. परंतु तीच माहिती मागण्याकरिता अर्ज मागे घेतला असून व तीच माहिती मागण्याकरिता दिनांक २०.९.२००८ रोजी अर्ज केलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांचे असेही म्हटले आहे की, अपीलकर्ता यांनी अनेक विभागातून सर्व कामाची ३ वर्षाची माहिती सर्व स्तरावर पंचायत समितीमध्ये मागितलेली आहे व विभाग प्रमाणे आहे व त्यामुळे ती माहितीकरिता पृष्ठे होती ती संकलीत करण्यास विलंब झाला आहे. माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही. अपीलकर्ता हे स्वतः उपसभापती असल्यामुळे सदरच्या माहितीची कल्पना आहे व त्यामुळे त्यांना सदरच्या माहितीचे रुपये ८०००/- भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. परंतु ते कोणत्याही संपर्कात राहावे लागणार आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना खर्चाचा भरणा हा ५ महिने विलंबाने कळविण्यात आलेले आहे. परंतु दिनांक २०.९.२००८ रोजीचे अर्जान्वये अपीलकर्ता यांना दिनांक २५.९.२००८ रोजी खर्चाची रक्कम याबद्यलची कल्पना देण्यात आली होती. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी अतिव्यापक प्रमाणात माहिती मागितलेली व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित नाही. त्यातही अपीलकर्ता हे पंचायत समिती उपसभापती असल्यामुळे मोघम व व्यापक स्वरुपाची माहिती मागणे ही व्यापक जनहित दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल. मागितलेल्या माहितीचे दिलेल्या खर्चाचा पेक्षा जास्त पृष्ठे होत असल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा ती जास्तीची रक्कम भरावी लागेल व पृष्ठे कमी होत असल्यामुळे भरणा केलेल्या रक्कमेतून परत रक्कम मिळेल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २४५/२००९.

श्री. रमेश देवरावजी पोहरे,
नेहरु वार्ड, कन्या शाळेच्या मागे,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. मेंढे, शिक्षण उपनिरिक्षक हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. निमजे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक १०.७.१९८० पासून सुधारित वेतन श्रेणी मंजूर न करण्याबाबत. दिनांक १०.७.१९९२ पासून वरिष्ठ श्रेणी मंजूर न करण्याचे कारणे. सदरची माहिती टपालाद्वारे हवी असे नमुद करुन मागितलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सदर माहिती आपण आपल्या मुख्याध्यापक/संस्थेकडून घेण्यात यावी. या कार्यालयातर्फे मंजूर केली जात नाही फक्त लागु केलेले वेतन मान्य केल्या जाते. तरी आपण आपले मुख्याध्यापकाशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००८ रोजी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयाचे संबंधामध्ये दिनांक २.९.२००८ रोजी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी शिक्षणाधिकारी यांनी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत व वरिष्ठ वेतन श्रेणी लागू न केल्याबाबत घेतलेल्या निर्णयाविरुध्द शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अपील करण्याची नियमात तरतुद नाही. आपण समुचित प्राधिका-याकडे अपील करावे. असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जामध्ये श्री. पोहरे, सेवानिवृत्त शिक्षक कोणत्या शाळेत कार्यरत होते या अर्जात शाळेचे नांव नमुद केले नाही. त्यांनी दिनांक १०.७.१९८० पासून सुधारित श्रेणी व १२ वर्षानंतर वरिष्ठ श्रेणी मंजूर न होण्याचे कारणे असे अर्जात नमुद केले आहे. तसेच दिनांक २२.१.२००९ ला माहिती न मिळाल्यामुळे अपील शिक्षण उपसंचालक कार्यालयात केलेली आहे. सदर शिक्षक कोणत्या शाळेत वा कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत होते याबाबत उल्लेख नसल्यामुळे माहिती देता आली नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**